**(सभापतीस्थानी माननीय उप सभापती )**

**पृ. शी.** : अकोला विमानतळ विस्तारीकरणाचा प्रश्न दीर्घ काळापासून प्रलंबित असणे

**मु. शी.** : अकोला विमानतळ विस्तारीकरणाचा प्रश्न दीर्घ काळापासून प्रलंबित असणे, या संबंधी श्री. विनोद तावडे, ॲड. आशिष शेलार, सर्वश्री चंद्रकांत पाटील, रामनाथ मोते, गोपीकिसन बाजोरिया, वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.विनोद तावडे ( विरोधी पक्ष नेते ) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"अमरावती विभागांतर्गत अकोला येथील विमानतळ विस्तारीकरणाचा दीर्घ काळ प्रलंबित असलेला प्रश्न, श्री.विजय प्रसाद अग्रवाल, सदस्य, भारतीय विमान पत्तन प्राधिकरण, यांनी ए.टी.आर.72 या प्रकारची विमाने अकोला विमानतळावर उतरण्याचे दृष्टीने सध्या असलेली 1400 मीटर लांबीची धावपट्टी आणखी 400 मीटरने वाढविण्याची सूचना करणे, त्या सूचनेस अनुसरुन जिल्हाधिकारी, अकोला यांनी अतिरिक्त जमीन संपादित करण्याकरिता शासनाची मान्यता मिळणेस्तव दिनांक 5 ऑक्टोबर, 2010 रोजी पाठविलेल्या प्रस्तावावर अद्यापपर्यंत कोणतीही कार्यवाही न होणे, या जमीन संपादनात डॉ.पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाच्या कुलगुरुंनी घेतलेली नकारात्मक भूमिका, त्याचप्रमाणे जिल्ह्याधिकारी अकोला यांनी अप्पर मुख्य सचिव, सामान्य प्रशासन विभाग यांना दिनांक 16 नोव्हेंबर, 2013 रोजी सदर विमानतळाच्या विस्तारीकरणाबाबत आवश्यक असलेला जमिनीचा सविस्तर प्रस्ताव सादर करुनही या संदर्भात अद्यापपर्यंत कोणतीही सकारात्मक कार्यवाही न होणे, औद्योगिक दृष्ट्या मागासलेल्या अमरावती विभागाचा औद्योगिक विकास होण्यासाठी सदर विमानतळ मोलाचा असूनही त्या बाबतची शासनाची उदासीनता, परिणामी, अमरावती विभागातील जनतेमध्ये निर्माण झालेला प्रचंड असंतोष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.फौजिया खान ( सामान्य प्रशासन राज्यमंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवते.

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

..3..

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, विदर्भाचा विकास करण्यासाठी किंवा त्या भागात उद्योग येण्यासाठी मुळात तेथे इन्फ्रास्ट्रक्चर मजबूत असणे गरजेचे आहे. अकोला विमानतळाच्या विस्तारीकरणाचा विषय अनेक वर्षांपासून प्रलंबित आहे. सन्माननीय सदस्य श्री.पांडुरंग फुंडकर विरोधी पक्ष नेते होते तेव्हापासून हा प्रश्न प्रलंबित आहेत. ते, मी आणि सन्माननीय सदस्य श्री.गोपीकिसन बाजोरिया वारंवार हा विषय सभागृहात मांडत आहोत. विमानतळाच्या विस्तारीकरणासाठी कृषी विद्यापीठाच्या 60.68 हेक्टर जमिनीची आवश्यकता आहे. शिवाय 34.06 हेक्टर खाजगी जमीन लागणार आहे. कृषी विद्यापीठाकडे सध्या जी जागा आहे ती त्या विद्यापीठाकडून वापरली जात नाही. कृषी विद्यापीठाची वापरात नसलेली जागा घेऊन त्यांना महसूल विभागाकडून अन्य ठिकाणी जागा देता येऊ शकते. यासाठी दोन-तीन विभागाच्या मंत्री महोदयांनी एकत्र येऊन निर्णय घेणे अपेक्षित आहे. त्यांनी ऐकमेकांशी समन्वय साधून निर्णय घेतला तरच अकोला विमानतळाच्या विस्तारीकरणाचा प्रश्न मार्गी लागेल. नाही तर एकमेकांकडे बोट दाखवून कोणीच त्या विमानतळाच्या विस्तारीकरणासाठी जागा देणार नाही आणि तो प्रश्न प्रलंबित राहील. विविध विभागांच्या मंत्र्यांनी एकत्र येऊन अकोला विमानतळासाठी जागा उपलब्ध करुन दिली तर त्या विमानतळावर एटीआर-72 प्रकारची विमाने उतरु शकतील, कमर्शियल फ्लाईट उतरु शकतील. अकोला विमानतळ अस्तित्वात आल्यास उद्योग व व्यवसायाला चालना मिळू शकेल. या निमित्ताने मी विचारु इच्छितो की, अकोला विमानतळ अस्तित्वात येण्यासाठी कृषी विद्यापीठाच्या जमिनीच्या मोबदल्यात त्यांना अन्य जमीन देण्याचा तसेच खाजगी जमीन संपादित करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे काय ? विद्यापीठाच्या संपादित होणाऱ्या जमिनीच्या मालमत्तेपोटी 4.21 कोटी रुपये, खाजगी जमिनीपोटी 34.28 कोटी रुपये आणि इतर अनुषंगाने 15 लाख रुपये इत्यादी तरतुदीच्या अनुषंगाने 32.85 कोटी रुपये खर्च करण्यास शासन तयार आहे काय ?

प्रा.फौजिया खान : महोदय, अकोला विमानतळाची धावपट्टी 1800 मीटर पर्यंत करण्यासाठी डॉ.पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाची 60.68 हेक्टर आणि 34.06 हेक्टर खाजगी जमिनीची आवश्यकता आहे. त्या ठिकाणी टर्मिनल बिल्डींग, एटीसी टॉवर आणि फायर ब्रिगेड व्यवस्था

..4..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.फौजिया खान....

उपलब्ध करुन देण्यासाठी तसेच धावपट्टीची लांबी वाढविण्यासाठी अनेक बैठका घेतल्या आहेत. त्या बाबतचा प्रस्ताव जिल्हाधिकाऱ्यांना सादर करण्यास सांगितले होते. मी स्वत: बैठक घेतली होती. तसेच मुख्य सचिवांनी या संदर्भात व्हिडीओ कॉन्फरन्सिंगद्वारे संबंधितांना सूचना दिल्या होत्या. कृषी विद्यापीठाची जमीन विमानतळाच्या विस्तारीकरणासाठी हस्तांतरित करण्याबाबतचा प्रस्ताव जिल्हाधिकारी, अकोला यांच्याकडून दिनांक 16 नोव्हेंबर, 2013 रोजी शासनाला प्राप्त झाला आहे. अकोला विमानतळाच्या विस्तारीकरणासाठी डॉ.पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाने जमीन देण्यास तत्वत: मान्यता दिली आहे. या संदर्भातील फाईल मान्यतेसाठी कृषी विभागाकडे पाठविली आहे. कृषी विद्यापीठाने मान्यता दिल्यानंतर तो प्रस्ताव मंत्रिमंडळाच्या मान्यतेसाठी ठेवण्यात येईल. आता या प्रकरणी अडचण राहिलेली नाही. संशोधन केंद्र व इमारतीचा खर्च देण्यास शासन तयार आहे. या निमित्ताने मी सांगू इच्छिते की, लवकरच अकोला विमानतळाच्या विस्तारीकरणाचा प्रश्न मार्गी लावण्यात येईल.

नंतर श्री.कांबळे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. फौजिया खान ....

विद्यापीठाने पर्यायी जमीन सुचविली होती आणि सांगितले होते की, या जमिनीऐवजी ती जमीन घ्यावी. त्यामुळे एअरपोर्ट ऑथोरिटी ऑफ इंडियाच्या प्रतिनिधींनी येऊन पाहिले. त्यांनी सांगितले की, ही जमीन तांत्रिकदृष्ट्या व्हायबल नाही, तीच जमीन व्हायबल आहे. सर्व प्रक्रिया झाली आहे. आता जिल्हाधिकाऱ्यांकडून आलेला प्रस्ताव परिपूर्ण आहे. आता या कामाला उशीर लागेल, असे मला वाटत नाही.

श्री. प्रकाश बिनसाळे : सभापती महोदय, उत्तरातील क्रमांक 3 मध्ये असे म्हटले आहे की, विमानतळाची धावपट्टी पूर्व-पश्चिम असून विमानतळाच्या पूर्वेस राष्ट्रीय महामार्ग असल्यामुळे त्या बाजूस धावपट्टीची लांबी वाढविणे शक्य नाही. जगात अनेक ठिकाणी रस्ते विमानतळाच्या धावपट्टीच्या खालून जाताना आपण पाहतो. हे तांत्रिकदृष्ट्या दिलेले उत्तर चुकीचे आहे. धावपट्टी वरून घेतली आणि खालून जर टनेल केला तर त्या ठिकाणीही धावपट्टीची लांबी वाढविणे शक्य आहे. अधिकारी अशा प्रकारचे उत्तर देत असतील तर ते चुकीचे आहे. त्यांनी तांत्रिक गोष्टींवर विचारच केलेला नाही. अधिकाऱ्यांकडून अशा पध्दतीने विचार न केल्यामुळे महत्त्वाचे प्रकल्प रखडले जातात. शासनाने त्याबाबत तातडीने कार्यवाही केली पाहिजे. सर्वांगीण विचार करून प्रस्ताव तयार केला पाहिजे. शासनाचे त्याबाबत काय मत आहे ?

प्रा. फौजिया खान : सभापती महोदय, प्रस्ताव कॉस्ट इफेक्टिव्ह झाला पाहिजे, कमी खर्चात झाला पाहिजे, मग प्रस्तावित जमीन केंद्र शासनाची असो किंवा राज्य शासनाची असो. प्रकल्प कमी खर्चात होत असेल तर केला पाहिजे.

श्री. प्रकाश बिनसाळे : सभापती महोदय, पण त्यामुळे डिले होऊ शकतो. डिले झाला तर कॉस्ट वाढते.

प्रा. फौजिया खान : सभापती महोदय, हा तांत्रिकदृष्ट्या विषय नाही. एअर डायरेक्शन वगैरे सारखे विषय असतात. एअरपोर्ट ऑथोरिटी ऑफ इंडियाने त्यांचे तांत्रिक मत कळवून आजचीच प्रस्तावित डायरेक्शन योग्य आहे, असे सांगितले आहे. बाकीचा त्यांचा तांत्रिक अभ्यास आहे. दुसऱ्या दिशेने हे व्हायबल नाही, असे त्यांचे मत आहे. म्हणून हेच क्षेत्र निवडण्यात आले आहे.

..2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, गेल्या 6-7 वर्षांपासून हा विषय सभागृहात चर्चेला येत आहे. प्रत्येक वेळी वेगवेगळी कारणे सांगून हा विषय पुढे ढकलण्याचा प्रयत्न सुरू आहे. 34.6 हेक्टर खाजगी जमीन आहे. खाजगी जमिनीचा प्रश्न शिल्लक राहिलेला नाही. भूसंपादन प्रस्तावाच्या संदर्भात जिल्हाधिकाऱ्यांनी मान्यता द्यावयाची आहे. त्यामुळे खाजगी जमिनीचा प्रश्न सुटलेला आहे. आता पंजाबराव कृषी विद्यापीठाच्या 60 हेक्टर जमिनीचा प्रश्न आहे. पंजाबराव कृषी विद्यापीठ हे शासनाचे आहे. विमानतळ व्हावे, ही शासनाची भूमिका आहे. माननीय मुख्यमंत्री यांनी अकोल्यात आल्यावर, हा प्रश्न ताबडतोब मार्गी लावू, असे अकोलेकरांना आश्वासन दिले आहे. परवा माननीय मुख्यमंत्र्यांनी स्टेटमेंट केले आहे की, महाराष्ट्रातील अशा प्रकारच्या सर्व विमानतळांचा विचार करून ताबडतोब सुधारित विमानतळास मान्यता देणार आहे. अकोल्याचा प्रश्न पश्चिम विदर्भाचा आहे. अकोल्याचे विमानतळ झाले तर पश्चिम विदर्भातील विकासामध्ये भर पडणार आहे. पंजाबराव कृषी विद्यापीठाने जमिनीच्या संदर्भात तत्वत: मान्यता दिली आहे. आता घोडे कुठे अडले आहे, हे माहीत नाही. पंजाबाराव कृषी विद्यापीठाने ही जमीन देण्यास तत्वत: मान्यता दिली आहे. तुम्ही सांगितले की, फाईल कृषी विभागाकडे गेली अहे. मग ती फाईल तेथून कॅबिनेटमध्ये जाईल. आता यामध्ये 5-7 महिने गेले आहेत. माझा प्रश्न असा आहे की, माननीय कृषी मंत्र्यांची सही घेऊन येणाऱ्या कॅबिनेटमध्ये तातडीने हा विषय मंजूर करून घेणार आहात का ?

प्रा. फौजिया खान : सभापती महोदय, सन 1983 च्या ॲग्रीकल्चर युनिव्हर्सिटी ॲक्टच्या सेक्शन 31 प्रमाणे एक्झिक्युटिव्ह काऊन्सिलची मान्यता आवश्यक आहे. ती नसल्यामुळे खास बाब म्हणून कृषी विभागाची मान्यता घेऊन जमीन घेण्यात येणार आहे. त्यासाठी फाईल कृषी विभागाकडे पाठविण्याची गरज आहे. विलंब झालेला नाही.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, केस सुरू आहे. ती फाईल कृषी विभागाकडे जाईल, तेथे 6 महिने पडेल आणि मग कॅबिनेटकडे येईल. वर्षांनुवर्षे हेच उत्तर देत असाल तर प्रश्न सुटणार नाही. मी माननीय मुख्यमंत्र्यांना विनंती करणार आहे की, अकोल्याचा प्रश्न खास बाब म्हणून विचारात घेऊन त्यामध्ये स्वत: लक्ष घालून ताबडतोब प्रस्ताव कॅबिनेटसमोर आणणार आहात का ?

( नंतर श्री. खंदारे ....

अमुद्रित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.फौजिया खान : सभापती महोदय, या विमानतळासाठी आवश्यक असलेल्या जमिनीची मोजणी झालेली आहे, सीमांकन झालेले आहे, भूसंपादनाची कार्यवाही झालेली आहे. फक्त मंत्रिमंडळासमोर प्रस्ताव सादर करण्याची प्रक्रिया चालू आहे. हा प्रस्ताव मंत्रिमंडळासमोर लवकरात लवकर जाणार आहे.

श्री.गोपीकिशन बाजोरिया : सभापती महोदय, मी प्रथम माननीय मुख्यमंत्र्यांचे आभार मानतो. त्यांनी अकोला येथे आल्यानंतर या विमानतळाबाबत आश्वासन दिले होते. त्याचप्रमाणे सन्माननीय राज्यमंत्री प्रा.फौजिया खान यांनीही श्री.मीना साहेब यांच्यासह अकोला येथे तातडीने भेट देऊन या प्रकल्पाची शहानिशा करुन घेतली, दिवसभर लोकप्रतिनिधींबरोबर बैठक घेतली होती. त्याचप्रमाणे ही लक्षवेधी सूचना उपस्थित केल्याबद्दल मी सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री.विनोद तावडे यांनाही धन्यवाद देतो. अकोला येथील विमानतळाबाबत जिल्हाधिकाऱ्यांनी सविस्तर प्रस्ताव पाठविलेला आहे. या विमानतळाच्या विस्तारीकरणासाठी आवश्यक असलेली 74 हेक्टर जमिनीपैकी काही जमीन पी.के.व्ही.ची व काही जमीन खाजगी आहे. शासनाने नंद नावाच्या खाजगी व्यक्तीची जमीन संपादित केलेली आहे. त्यांनी उच्च न्यायालयात दावा दाखल केलेला आहे. परंतु या विमानतळासाठी ही जागा आवश्यक असेल तर पी.के.व्ही.विरुध्द दाखल केलेला दावा परत घेण्यासाठी तयार आहेत, त्यासाठी ते कोर्टात ॲफिडेव्हिट देण्यास तयार आहेत. माझी खाजगी जमीनही एका बैठकीत राज्य शासनाला देण्यासाठी मी तयार आहे. माझी मुख्यमंत्री महोदयांना विनंती आहे. खाजगी लोक स्वत:हून जागा हस्तांतरित करण्यास तयार आहेत, दावा परत घेण्यास तयार आहेत व 34 हेक्टर जमीन अशीच देण्यासाठी तयार आहे.

**उप सभापती** : सन्माननीय सदस्यांनी आपला प्रश्न विचारावा.

श्री.गोपीकिशन बाजोरिया : सभापती महोदय, 4 लक्षवेधी, 2 नियम 93 च्या सूचना व 2 तारांकित प्रश्न विचारल्यानंतर मला या प्रश्नावर अधिक बोलण्याची संधी मिळाली आहे. त्यामुळे आज या प्रश्नाचा निकाल लागावा अशी माझी इच्छा आहे. मी अधिक वेळ कधीच घेत नाही. त्यामुळे आज आपण मला दोन मिनिटे अधिक वेळ द्यावा अशी मी आपल्याला विनंती करीत आहे. सन्माननीय सदस्य श्री.वसंतराव खोटरे हे या संदर्भातील लोकल समितीचे सदस्य आहेत. त्या समितीचे असे म्हणणे आहे की, त्याच्या बाजूला पर्यायी जमीन शासनाची असेल तर आम्ही बिनशर्त





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ D/ ST/

श्री.गोपीकिशन बाजोरिया........

पी.के.व्ही.ची जागा देण्यास तयार आहोत. उदेगाव येथे शासनाची पर्यायी जमीन उपलब्ध आहे. माननीय मुख्यमंत्र्यांनी शासनाची जागा पी.के.व्ही.ला द्यावी. गिव्ह ॲण्ड टेक पॉलिसीचा त्यांनी अवलंब करावा. या संदर्भात माननीय मुख्यमंत्री एक बैठक घेऊन हा प्रश्न मार्गी लावतील का ?

श्री.पृथ्वीराज चव्हाण : सभापती महोदय, मी काही महिन्यांपूर्वी अकोल्याला गेलो होतो. पश्चिम विदर्भात संपर्काची साधने कमी पडत आहेत. त्यासाठी तेथे विमानतळ असणे अत्यंत आवश्यक आहे. ऑल वेदर म्हणजे नाईट लॅण्डिंगच्या फॅसिलिटीचे विमानतळ असणे हे अतिशय आवश्यक आहे. कारण त्या जिल्ह्यात गुंतवणूक करण्यासाठी येणारे बाहेरचे पाहुणे, राज्यातील अधिकारी, राजकीय पुढारी यांच्याकरिता हे विमानतळ आवश्यक आहे. हा प्रश्न अनेक दिवस प्रलंबित होता म्हणून मी स्वत: कृषी विद्यापीठाच्या अधिकाऱ्यांची व इतर अधिकाऱ्यांची एक बैठक घेतल्यानंतर काही विषय मार्गी लागले आहेत. विद्यापीठालाही काही अधिकार आहेत, त्या अंतर्गत त्यांनी सुरुवातीला या कामाला विरोध केला होता. ही गोष्ट खरी आहे. विद्यापीठाला आवश्यक असलेली पर्यायी जमीन उपलब्ध करुन द्यावी. विद्यापीठाच्या जमिनीवर संशोधन केंद्र, प्रशासकीय इमारत व अन्य इमारती असतील त्या बांधून द्याव्यात. तेथे सरोवर आहे, शेतीसाठी जर पाणी कमी पडले तर पाणी उपलब्ध करुन द्यावे या तीन अटीवर जमिनीची अदलाबदल करण्याचा निर्णय त्यावेळी झाला होता.

नंतर श्री.शिगम.......

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ D/ ST/ पूर्वी श्री.खंदारे 11:45 v

पृथ्वीराज चव्हाण ....

सन्माननीय राज्यमंत्री महोदयांनी सांगितल्या प्रमाणे उदगाव, तालुका अकोला येथील 60.68 हेक्टर जमीन ही विद्यापीठाला पर्यायी जमीन म्हणून द्यायची आणि 64 कोटी 21 लाख रुपये इतर कामासाठी द्यायचे आणि खाजगी 34 हेक्टर जमिनीच्या संपादनाचा खर्च द्यावयाचा अशा प्रकारचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन असून तो कॅबिनेट पुढे येईल असे राज्यमंत्री महोदयांनी सांगितलेले आहे.

सन्माननीय सदस्य श्री. पांडुरंग फुंडकर यांनी सांगितल्या प्रमाणे मला स्वत:ला अनुभव आलेला आहे. पावसाळ्यामध्ये मला राजकीय कार्यक्रमाकरिता अकोला येथे जायचे होते. परंतु मला दिवसभर नागपूर विमानतळ सोडता आले नाही. संपर्क होत नसेल तर फार अवघड आहे, गाडीने कुठे जायचे, रेल्वेने कधी जायचे अशी मानसिकता तयार होते. मग गुंतवणुकीमध्ये फरक पडतो. शासनाने असे धोरण घेतलेले आहे की प्रत्येक विभागामध्ये एक तरी लाईट लॅडिंग विमानतळ असले पाहिजे. मी असा निर्णय घेतलेला आहे की, प्रत्येक विभागामध्ये किमान 2 तरी ऑल व्हेदर विमानतळ असले पाहिजेत. मराठवाड्यामध्ये नांदेड आणि औरंगाबाद येथे विमानतळ आहे. नागपूर विभागामध्ये गोंदिया आणि नागपूर येथे विमानतळ आहेत. मुंबईमध्ये एक विमानतळ आहे. पुण्यामध्ये एक विमानतळ आहे. कोल्हापूरला विमानतळ करावयाचे आहे. अमरावती आणि अकोला या दोन्ही ठिकाणी विमानतळ नाही. या दोन्ही विमानतळाची लांबी वाढवायची आणि नाईट लँडिंग फॅसिलिटी करायची असा विचार असून यासंबंधी एअरपोर्ट ॲथॉरिटी ऑफ इंडियाच्या चेअरमनशी माझ्या अनेक बैठका झालेल्या आहेत. ते करायला तयार आहेत. बरीच विमानतळे ते स्वत: तयार करायला घेणार आहेत. त्यामुळे हे करण्याकरिता आम्ही कटिबद्ध आहोत. सभागृहाच्या भावना लक्षात घेऊन हा प्रस्ताव लवकरात लवकर मंत्रिमंडळासमोर आणून पुढील कार्यवाही करण्याकरिता प्रयत्न करु.

सभापती महोदय, असाही विचार या ठिकाणी मांडण्यात आला की, हायवे आडवा येत असेल तर हायवेला टनेल करुन धावपट्टी लांबवू शकतो. माननीय राज्यमंत्री महोदयांनी उत्तर दिलेले आहे की लिस्ट कॉस्ट आणि लिस्ट टाईम हा ॲप्रोच आपण वापरत आहोत. माझ्या माहिती प्रमाणे आतापर्यंत एअरपोर्ट ॲथॉरिटीने कोठेही विमानतळाच्या खाली टनेल करायला परवानगी दिलेली नाही. पाश्चिमात्य देशामध्ये ती सर्रास होती. आपली एअरपोर्ट ॲथॉरिटी फार कॉँझर्व्हेटीव्ह आहे. माझ्या माहितीप्रमाणे देशात कोठेही टनेल नाही. मुंबईला जुहूच्या ठिकाणी असे





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पथ्वीराज चव्हाण....

करावे अशा प्रकारचा प्रस्ताव आहे. हा प्रस्ताव ते मान्य करायला तयार नाहीत. मिठीनाला खालून न्यावा अशा प्रकारचा प्रस्ताव आहे त्याला देखील मान्यता देण्यास ते तयार नाहीत. एअरपोर्ट ॲथॉरिटीची परवानगी घेण्यासाठी वर्षानुवर्षे लागले आणि हा जरी कमी खर्चाचा प्रस्ताव असला तरी तो होणार नाही. एअरपोर्ट ॲथॉरिटीकडून आम्हाला खूप अडचणी येतात. माझा त्यांच्याशी सातत्याने संपर्क चालू आहे.

सभापती महोदय, मुंबईचा विषय देखील या ठिकाणी मांडणे आवश्यक आहे. एअरपोर्टच्या फनेलमध्ये ज्या इमारती येतात त्यांच्या उंचीवर मर्यादा असण्यामध्ये काही गैर नाही. परंतु चारही बाजूनी उंचीवर मर्यादा असताना ती उंची वाढवायची असेल तर एअरपोर्ट ॲथॉरिटीकडे जावे लागते. त्यांच्याकडून परवानगी मिळण्यास वेळ लागतो. धारावीच्या इमारती देखील यामुळे थांबलेल्या आहेत. एअरपोर्ट ॲथॉरिटीकडे टनेलकरिता जायचे म्हटले तरी ते इतके कॉंझर्व्हेटिव्ह आहेत की ते अशा प्रकारचा निर्णय अजिबात घेणार नाहीत. म्हणून जी पर्यायी व्यवस्था केलेली आहे तो योग्य मार्ग आहे. तेव्हा लवकरात लवकर धावपट्टी वाढवून अकोला येथे एक ऑल व्हेदर एअरपोर्ट निश्चितपणे केले जाईल यासाठी आम्ही लगेच मिटींग घेऊन पुढची कारवाई करु.

----

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



MSS/ D/ ST/ पूर्वी श्री.खंदारे 11:45

**पृ. शी.** : बृहनमुंबई महानगरपालिकेच्या सफाई कामगारांना घरे बांधून देण्यासाठी तातडीने करावयाची कार्यवाही

**मु. शी.** : बृहनमुंबई महानगरपालिकेच्या सफाई कामगारांना घरे बांधून देण्यासाठी तातडीने करावयाची कार्यवाही यासंबंधी सर्वश्री विजय उर्फ भाई गिरकर, विनोद तावडे, दिवाकर रावते, पांडुरंग फुंडकर, रामदास कदम, जयंत प्र. पाटील, सुमंत गायकवाड, चंद्रकांत पाटील, डॉ. दीपक सावंत, श्रीमती शोभताई फडणवीस, डॉ.नीलम गो-हे, श्री रामनाथ मोते, ॲड. आशिष शेलार, डॉ. रणजित पाटील, सर्वश्री नागो पुंडिलि गाणार व भगवान साळुंखे,वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.भाई गिरकर (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय नगरविकास मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"बृहन्मुंबई महानगरपालिकेचे २८ हजार सफाई कामगार गेल्या अनेक वर्षापासून जुन्या मोडकळीस आलेल्या इमारतींमध्ये धोकादायक स्थितीत वास्तव्य करीत असणे, सदर इमारतींचा पुनर्विकास करून सर्व सफाई कामगारांना महापालिकेच्या निधीतून महापालिका निवासस्थाने पुरविण्यासाठीची आश्रय योजना फेब्रुवारी, २०१३ च्या अर्थसंकल्पाद्वारे जाहीर होणे, या आश्रय योजनेअंतर्गत नियोजन, प्राथमिक आराखडा इ. अद्यापर्यंत तयार नसणे, त्यास इमारत प्रस्ताव विभागाची मंजुरी नसणे, महानगरपालिकेची आर्थिक तरतूद तुटपुंजी असणे, यामुळे सदर योजना कागदावरच राहणे, या सफाई कामगारांच्या अनेक समस्या दुर्लक्षित असणे, जैविक तसेच धन कचऱ्याची योग्य विल्हेवाट लावण्याची व्यवस्था नसल्यामुळे या सफाई कामगारांच्या विशेषत: महिलांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होणे, जैविक कचऱ्यात समाविष्ट असलेले सेनेटरी नॅपकिन व इतर तत्सम टाकावू वस्तू विघटन करताना तसेच ते हाताळताना महिला सफाई कामगारांना हॅपेटायटीस किंवा एचआयव्ही यासारख्या गंभीर आजारांची लागण होणे, असे सेनेटरी नॅपकिन्स व तत्सम वस्तू तयार करणाऱ्या कंपन्यांनी अशा नॅपकिनची विल्हेवाट लावण्यासाठी मोहीम राबविण्याची गरज, या सफाई कामगारांना तातडीने घरे बांधून देण्यासाठी आणि त्यांच्या आरोग्यावर होणाऱ्या दुष्परिणामांस आळा घालण्यासाठी शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

..४..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. उदय सामंत (नगरविकास राज्यमंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

..5..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भाई गिरकर : उप सभापती महोदय, ही लक्षवेधी सूचना स्वीकारल्या बद्दल मी आपल्या मार्फत माननीय सभापती महोदयांना धन्यवाद देतो. या विषयाच्या संदर्भात मी नियम 289 अन्वयेच्या प्रसतावाची सूचना दिली होती. तसेच सन्माननीय सदस्य श्री. विनायराव मेटे यांनी देखील लक्षवेधी सूचना दिली होती आणि त्या लक्षवेधी सूचनेला अशाच प्रकारे उत्तर देण्यात आले होते. आता माननीय मुख्यमंत्री महोदय या सदनामध्ये उपस्थित आहेत. मी सांगू इच्छितो की, माझे वडील सफाई कामगार होते. महानगरपालिकेमध्ये नोकरीला असताना मी सफाई कर्मचाऱ्यांचा पे-शीट क्लार्क म्हणून काम केले वसाहतीत राहिलो आहे त्यामुळे सफाई कामगारांच्या अडचणी आणि त्यांच्या आरोग्याचे प्रश्न मला माहीत आहेत. सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री. विनोद तावडे आणि माननीय मंत्री महोदया प्रा. वर्षाताई गायकवाड ह्या सफाई कर्मचाऱ्यांच्या एका कार्यक्रमाला आल्या होत्या. मी या ठिकाणी सांगू इच्छितो की, शासनाने 1 लाख 60 हजार गिरणी कामगारांना घरे देण्याचे मान्य केले, माथाडी कामगारांना 10 हजार घरे देण्याचे मान्य केले,

...नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ABG/ D/ ST/ 11:50

श्री.भाई गिरकर....

सभापती महोदय, रस्त्यावर राहणाऱ्या आणि फुटपाथवर राहणाऱ्या लोकांना शासनाच्या माध्यमातून घरे उपलब्ध करुन दिली जात आहेत. एस.आर.ए.च्या माध्यमातून 1995च्या पूर्वी जे लोक मुंबई शहरात आले आहेत त्यांना देखील शासन घरे उपलब्ध करुन देत आहात. मुंबई महानगरपालिकेमध्ये 28 हजार सफाई कामगार आहेत. मुंबई महानगरपालिकेची स्थापना 1874 या वर्षी झालेली आहे. गेल्या 140 वर्षापासून सफाई कामगार मुंबई शहराच्या सफाईचे काम करीत आहेत. परंतु त्यांना या मुंबई शहरात हक्काचे घर नाही. माझ्या हातात एक जी.आर. आहे. तो सभापती महोदय, आपल्या मार्फत तो जी.आर. मी माननीय मुख्यमंत्र्यांना सादर करणार आहे. त्या जी.आर.मध्ये असे म्हटले आहे की, आम्ही महानगरपालिकेस 4 एफएसआय देऊन हा प्रश्न निकाली काढण्यात येईल. हा जी.आर.पाच वर्षापूर्वी काढण्यात आलेला असून त्या बाबतीत अद्याप काहीही कार्यवाहीझालेली नाही.

या विषयाच्या अनुषंगाने सन्माननीय सदस्य श्री. विनायक मेटे यांनी लक्षवेधी सूचना मांडली होती. त्यावेळी माननीय मुख्यमंत्र्यांनी 2 ऑगस्ट 2013 रोजी सांगितले की, या विषयाच्या बाबतीत एक महिन्यात बैठक घेण्यात येईल. परंतु त्या अनुषंगाने देखील कार्यवाही झालेली नाही. मुंबई महानरपालिकेमध्ये 28 हजार सफाई कामगार आहेत, त्यांच्यासाठी मुंबई महानगरपालिकेने घरे बांधून देण्याचे मान्य केले आहे. 28 हजार सफाई कामगारांसाठी घरे बांधावयाची झाली तर 1680 कोटी रुपये लागतील. महानगरपालिकेने या कामासाठी दरवर्षी 1 टक्का निधी राखून ठेवला तर 300 कोटी रुपये जमा होतील आणि तो निधी सहा वर्षे काढला तर 1800 कोटी रुपये त्यांना जमविणे सहज शक्य होईल. सफाई कामगारांना 4 एफएसआय देण्याची फाईल गेल्या चार वर्षापासून मंत्रालयात प्रलंबित आहे. मुंबईतील सफाई कामगारांची घरे बांधण्यासाठी 4 एफएसआय उपलब्ध करुन द्यावा. आपण दुसरी अशी माहिती दिली आहे की, काही सफाई कामगारांना स्थलांतरित करण्यात येत आहे. राजवडकर स्ट्रीट, पंचशीलनगर, आंबेडकर सदन अशा सहा वस्तीतील सफाई कर्मचाऱ्यांना शिफ्ट करण्याचे काम सुरु आहे. हा डिसेंबर महिना आहे. कुलाबा येथे राहणाऱ्या सफाई कामगाराच्या कुटुंबीयांना माहूल येथे शिफ्ट केले तर त्यांच्या मुलांनी शिक्षण कोणत्या शाळेत घ्यावयाचे असे अनेक प्रश्न निर्माण झालेले आहेत. महानगरपालिकेतील 28 हजार सफाई कर्मचाऱ्यांची घरे बांधण्यासाठी 4 एफएसआय देण्यासंबंधीचा शासन निर्देश देईल काय?

2...

18-12-2013 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) E-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भाई गिरकर...

सफाई कर्मचाऱ्यांच्या सहा वसाहतीमधून त्यांना दुसरीकडच्या ट्रान्झीटमध्ये स्थलातरित केले जात आहे. जे कर्मचारी स्थलांतरित झाले नाहीत त्यांना महानगरपालिकेच्या सेवेतून अमानवी पध्दतीने कमी करण्यात आले आहे. म्हणून त्या सहा वसाहतीतील सफाई कामगारांसाठी त्या ठिकाणीच संक्रमण शिबिर बांधून ठेवले जाईल काय ?

श्री.उदय सामंत : सभापती महोदय, मुंबई शहरात 28028 सफाई कामगार कार्यरत आहेत. त्यांच्या घरांचा प्रश्न अतिशय महत्वाचा आहे. हा एकूण प्रकल्प 1829 कोटी रुपयांचा आहे. हा प्रकल्प येत्या आठ वर्षात पूर्ण होणे अपेक्षित आहे. सन्माननीय सदस्यांनी उल्लेख केला की, मुंबई महानगरपालिकेने दरवर्षी 1 टक्का निधी या कामासाठी राखून ठेवला तर एका वर्षात 300 कोटी जमा होतील आणि सहा वर्षात 1800 कोटी रुपये जमा होऊ शकतात. 2012-2013 मध्ये मुंबई महानगरपालिकेने 50 कोटी रुपयांची तरतूद संक्रमण शिबिरे आणि नवीन घरे बांधण्यासाठी केलेली होती. 2013-2014 या वर्षी 180 कोटी रुपयांची तरतूद प्रस्तावित आहे. सफाई कामगारांना घरे बांधून देण्यासाठी 4 एफएसआय देणे गरजेचे आहे. परंतु मुंबई महानगरपालिकेकडून अजूनही तशा प्रकारचा प्रस्ताव शासनाकडे आलेला नाही. संबंधित महानगरपालिकेला सूचना देण्यात आली आहे की, अशा आशयाचा प्रस्ताव एक महिन्याच्या आत शासनाकडे पाठवावा. सफाई कामगारांच्या बाबतीत शासनाने 4 एफएसआय संबंधी जी कमिटमेंट केलेली आहे ती शासन निश्चितपणे पूर्ण करील. या संबंधीचा प्रस्ताव एका महिन्याच्या आत शासनाने पाठवावा. आम्ही देखील याबाबतीत निर्देश दिलेले आहेत. संक्रमण शिबिराच्या बाबतीत जी वस्तुस्थिती सांागितली ती योग्य आहे. कुलाबा येथील सफाई कामगारांना स्थलांतरित केले जात आहे, त्यासाठी मोठा विरोध होत आहे.त्यांच्या मुलांच्या शिक्षणाचा देखील प्रश्न निर्माण झालेला आहे.तसेच इतरही प्रश्न निर्माण झ ाालेले आहेत. या बाबतीत काही पर्यायी व्यवस्था करता येते काय, यादृष्टीने शासन प्रयत्नशील आहे.

श्री. विनायक मेटे : सफाई कामगारांची महत्वाची लक्षवेधी सूचना मी गेल्या अधिवेशनात उपस्थित केली होती. सफाई कामगारांच्या महत्वपूर्ण प्रश्नाबाबत तसेच त्यांच्या घरांच्या बाबतीत माननीय नगरविकास राज्यमंत्र्यांनी असे उत्तर दिले होते की, या सगळया परिस्थितीची आम्हाला

3...



श्री.विनायक मेटे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

कल्पना आहे. सफाई कामगारांच्या प्रश्नाची आम्हाला माहिती आहे. या गोष्टी लक्षात घेऊन एक महिन्याच्या आत माननीच मुख्यमंत्री महोदयांच्या उपस्थितीमध्ये सर्व संबंधित मंडळींना बोलावून एक बैठक आयोजित करुन हा प्रश्न मार्गी लावू. माननीय मुख्यमंत्री महोदय सभागृहात उपस्थित आहेत.

यानंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनायक मेटे.....

माझी त्यांना विनंती आहे की, लवकरात लवकर याच महिन्यात किंवा आपल्याला सोयीचे होईल त्या दिवशी सर्व संबंधित लोकांची बैठक बोलावून या प्रश्नावर तोडगा काढणार आहात का?

श्री.उदय सामंत : सभापती महोदय, मागील अधिवेशनात या प्रश्नासंबंधी चर्चा झाली होती. त्यावेळी असा निर्णय झाला की, ट्रान्झिट कॅम्पची टेंडर प्रक्रिया लवकर सुरु केली जाईल. तसे आश्वासन नगरविकास विभागाचा राज्यमंत्री या नात्याने मी दिले होते. गौतमनगर येथे 324, राजवाडकर स्ट्रीट येथे 55, चेंबूर येथे 110 निवासस्थानांचे संक्रमण शिबिर बांधायचे आहे.

श्री.विनायक मेटे : ही सर्व माहिती निवेदनामध्ये दिली आहे. मागील अधिवेशनात आश्वासन दिल्याप्रमाणे कार्यवाही पूर्ण करणार आहात का?

श्री.उदय सामंत : एक महिन्यात बैठक लावण्यात आली नसली तरी महानगरपालिका आणि शासन कार्यवाही करण्याचा प्रयत्न करीत आहे.

श्री.भाई गिरकर : सभापती महोदय, सफाई कामगारांचा लढा सुरु आहे. या कामगारांनी मोर्चा काढला होता. मुंबईमध्ये सफाई कामगारांनी काम थांबविले तर शहराची दुर्दशा होईल. मागील अधिवेशनात आश्वासन दिल्याप्रमाणे एक महिन्यात बैठक घ्यावी. ट्रान्झिट कॅम्पबाबत काहीच प्रक्रिया झालेली नाही. मुंबई महापालिकेचे अधिकारी असत्य माहिती देत आहेत. जवळजवळ 30 ते 40 कि.मी.अंतरावर या कामगारांना शिफ्ट केले जात आहे.

सभापती महोदय, या कामगारांना नोटीस दिली नसल्याचे सांगितले जात असेल तर मी नोटिसांच्या प्रती माननीय सभापतीमार्फत मंत्री महोदयांकडे पाठवितो. जे शिफ्ट होण्यास तयार नाहीत त्यांना निलंबित केले जात आहे. सफाई कामगार स्वत:चा जीव धोक्यात घालून मुंबई शहराची सफाई करतात, त्यांच्यावर अन्याय होत आहे. माननीय मुख्यमंत्र्यांकडे ते आशेने पहात आहेत. एक महिन्याच्या आत 4 एफएसआय मंजूर करुन योजना मान्य करावी आणि या कामगारांचे स्थलांतर थांबवून सध्याच्या ठिकाणीच ट्रान्झिट कॅम्प बांधून त्यांचा प्रश्न मार्गी लावावा.

श्री.पृथ्वीराज चव्हाण : सभापती महोदय, राज्यमंत्री महोदयांनी स्पष्टपणे उत्तर दिलेले आहे की, मुंबईतील 28 हजार सफाई कर्मचाऱ्यांच्या राहण्याचा प्रश्न अत्यंत संवेदनशील आहे. शासन या प्रश्नाबद्दल अतिशय गंभीर आहे. येथे दोन गोष्टी नमूद करण्यात आलेल्या आहेत.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पृथ्वीराज चव्हाण.........

अतिरिक्त एफएसआय देऊन मोडकळीस आलेल्या इमारतींची पुनर्बांधणी करावी अशा प्रकारचा प्रस्ताव अद्याप महानगरपालिकेकडून शासनाकडे आलेला नाही. ताबडतोब प्रस्ताव शासनाकडे पाठवावा असे आम्ही त्यांना आदेश देत आहोत. तो प्रस्ताव आला की लगेच तपासून निर्णय घेऊ.

सभापती महोदय, ट्रान्झिट कॅम्पच्या प्रश्नाबद्दल सांगू इच्छितो की, जमिनीची उपलब्धता पाहून सुरु असलेल्या प्रकल्पाची माहिती घेऊन अधिक काय करता येईल याबद्दल माहिती घेतली जाईल. 4 एफएसआय देऊन ट्रान्झिट कॅम्प बांधता येईल का याबद्दलचा प्रश्न विचाराधीन आहे. प्रस्ताव आला की, निश्चितपणे त्याबद्दल पुढे कार्यवाही करता येईल. याबाबत आपले सहकार्य आवश्यक आहे. विशेषत: महापालिकेकडून लवकर प्रस्ताव शासनाकडे यावा यासाठी विरोधी पक्षाच्या सन्माननीय सदस्यांनी मदत करावी.

श्री.हेमंत टकले : सभापती महोदय, सफाई कामगारांच्या घराचा प्रश्न महत्वाचा आहे. महिला सफाई कामगारांची संख्या देखील मोठी आहे. सफाई कामगारांचे आरोग्य सुरक्षित राहणे फार महत्वाचे आहे. अशा प्रकारचे काम करणाऱ्या कामगारांचे आयुष्यमान आरोग्य सांभाळले नाही तर कमी होण्याची शक्यता असते. प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या मार्गदर्शनाखाली 15 मे.टन जैविक कचऱ्याची विल्हेवाट लावली जात असल्याचे निवेदनात नमूद केले आहे. गेल्या काही वर्षात सफाई कामगारांची नियमितपणे आरोग्य तपासणी झाली आहे का? त्यांची राहण्याची आणि कामाची जागा यामुळे त्यांच्या आरोग्यावर दुष्परिणाम झाल्यानंतच योजना आखलेली आहे का? जैविक कचरा हाताळण्याचे काम करणारी जी एजन्सी नेमली आहे, त्या एजन्सीने गेली दोन-तीन वर्षे हे काम व्यवस्थितपणे केले आहे का? प्रदूषण नियंत्रण मंडळाने, त्यांनी वेळेवर काम केले नसेल तर त्याबद्दल काही कारवाई केली आहे का?

नंतर जी.1...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.उदय सामंत : सभापती महोदय, जैविक कचऱ्याचे दोन प्रकार आहेत. हॉस्पिटल, नर्सिंग होम द्वारे बायो मेडिकल वेस्ट तयार होते. त्यावर प्रक्रिया करणारा 15 टनाचा प्लांट मुंबई महानगरपालिकेत आहे. त्यात प्रतिदिन 12 ते 13 मे.टन कचऱ्यावर प्रक्रिया केली जाते. महिला व पुरूष सफाई कामगारांच्या आरोग्याच्या दृष्टीने सन्माननीय सदस्य श्री.हेमंत टकले यांनी प्रश्न उपस्थित केला आहे. घरगुती जैविक कचऱ्याची विल्हेवाट लावणे महत्त्वाचे आहे. ती कशी लावण्यात येते यासंबंधी शासन देखील साशंक आहे. 15 टनाचा प्रकल्प हा खाजगी कंपनी मार्फत चालविण्यात येतो. घरगुती जैविक कचऱ्यासंबंधी कुठलाही निर्णय घेण्यात आलेला नाही. मी आपल्याला परदेशातील उदाहरण देऊ इच्छितो. घरगुती जैविक कचऱ्यामध्ये सॅनेटरी नॅपकिनचे प्रमाण मोठ्या प्रमाणावर असते. त्यामुळे त्याचे उत्पादन करणाऱ्या कंपनीला कम्पल्सरी नॅपकिन गोळा करण्यात सांगण्यात येते. तसे महाराष्ट्रात करावयाचे असेल तर आरोग्य विभाग, पर्यावरण विभागांना नगरविकास विभागातर्फे नक्की कळविण्यात येईल. सचिव, वैद्यकीय शिक्षण, सचिव, पर्यावरण, सचिव, नगरविकास, सचिव, ग्रामविकास यांची एकत्रित बैठक घेऊन त्यात घरगुती जैविक कचऱ्यावर चर्चा करण्यात येईल. सन्माननीय सदस्यांनी महापालिकेच्या सफाई कामगारांच्या आरोग्या संबंधी प्रश्न उपस्थित केला आहे. त्यासंबंधी सांगू इच्छितो की, सफाई कामगारांची देखील आरोग्य तपासणी होत असते. घरगुती जैविक कचऱ्याची विल्हेवाट लावण्यासाठी जेथे जेथे रूग्णालये आहेत तेथे तेथे महानगरपालिकेने बंदिस्त बॉक्स तयार करावेत आणि जी कंपनी 15 टनाचा प्रकल्प चालवित आहे त्यांच्याकडूनच विल्हेवाट लावावी अशा प्रकारची सूचना महानगरपालिकेला केली जाईल.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, माननीय मुख्यमंत्र्यांनी उत्तर दिलेले असल्यामुळे 4 एफ.एस.आय.संबंधीचा विषय संपलेला आहे. दुसरा विषय सन्माननीय सदस्य श्री.भाई गिरकर यांनी उपस्थित केलेला आहे. सन्माननीय सदस्य श्री.भाई गिरकर हे सफाई कामगारांच्या वस्तीमध्ये फिरतात व त्यांच्या बरोबर बैठका होतात. मी माननीय मुख्यमंत्र्यांना सांगू इच्छितो की, आता मुलांच्या परीक्षा जवळ आलेल्या आहेत. त्यामुळे सफाई कामगारांचे स्थलांतर करण्याचे काम



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे...

मार्च-एप्रिल पर्यंत थांबवून त्यांना आहे तेथेच राहू द्यावे अशी तेथील रहिवाशांची विनंती आहे. कुलाब्याचा मुलगा देवनार येथे गेला तर त्याला रोज शाळेत येणे शक्य नाही. ज्या कामगारांना मुले नाहीत त्यांना शिफ्ट होण्यास हरकत नाही. पण अर्ध्यांना शिफ्ट करून काही उपयोग नाही. साधारणत: 30 एप्रिल पर्यंत परीक्षा संपतील. तो पर्यंत सफाई कामगारांच्या स्थलांतरास आपण स्थगिती देणार आहात काय, असा माझा पहिला प्रश्न आहे. माननीय मुख्यमंत्र्यांनी महापालिकेने प्रस्ताव तयार करण्यासंबंधी विरोधी पक्षाने पाठपुरावा करावा अशा प्रकारची विनंती केली आहे. मुंबईचे माननीय महापौर आणि महापालिका आयुक्त यांचे म्हणणे आहे की, महाराष्ट्र शासना समवेत दर तीन महिन्यांनी बैठक झाली पाहिजे. कारण मुंबईत अनेक प्रश्न आहेत. तेव्हा शासन दर तीन महिन्यांनी बैठक घेण्याची कार्यवाही करणार आहे काय ?

श्री.उदय सामंत : सभापती महोदय, आदरणीय विरोधी पक्ष नेते श्री.विनोद तावडे यांनी शासनाने मुंबईचे महापौर आणि महापालिका आयुक्त यांच्या समवेत समन्वयासाठी बैठक घेण्याची सूचना केली आहे. या संबंधातील बैठक नक्की आयोजित केली जाईल. तसेच, सफाई कामगारांच्या मुलांना त्रास होणार नाही अशा प्रकारचे निदेश शासनाकडून मुंबई महानगरपलिकेला दिले जातील.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, बायो मेडिकल वेस्ट संबंधातील प्रश्न आहे. मुंबईत लाखो टन कचरा गोळा होत असतो. त्यामुळे बायो मेडिकल वेस्ट गोळा करणाऱ्या कर्मचाऱ्यांना आरोग्याच्या दृष्टीने विम्याचे कवच देण्यात येणार आहे काय ? आज सफाई कामगारांना कोणत्याही सुविधा उपलब्ध नाहीत. तेव्हा या कामगारांना शासन आरोग्य विम्याचे कवच देणार आहे काय, असा माझा पहिला प्रश्न आहे. आज रूग्णालयातून बायो मेडिकल वेस्ट तयार होते. तेथेच विशिष्ट प्रकारची यंत्रे तयार करून ती तेथे ठेवण्यात येणार आहेत काय ? रूग्णालयामध्ये ऑपरेशन

झाल्यानंतर अवयवांची कशा प्रकारे विल्हेवाट लावणार आहात ? 4 महिन्याच्या आतील मृत गर्भ हा पुरावा गणला जावा की, तो बायो मेडिकल वेस्ट समजण्यात यावा यासंबंधी कुठलाही नियम नाही. त्यामुळे यासंबंधी शासन नियम करणार आहे काय ?

यानंतर श्री.जुन्नरे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. उदय सामंत : सभापती महोदय, मी सुरुवातीलाच सांगितले आहे की, जैविक कचऱ्याच्या बाबतीत नियम करणे आता गरजेचे बनलेले आहे. घरगुती कचऱ्याच्या संबंधात नियम झालेले नाहीत ही वस्तुस्थिती आहे. सन्माननीय सदस्यांनी जी सूचना केली आहे त्या सूचनेचा शासन नक्की विचार करील. सफाई कामगारांच्या विम्याच्या बाबतीत सन्माननीय सदस्यांनी जी भूमिका मांडलेली आहे त्याबाबतीत महानगरपालिकेला सूचना दिल्या जातील.

-----------

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : बुलढाणा जिल्ह्यातील जनुना-जळवत्र, तेली, बोथा-बुलढाणा खामगाव-बोथा, जळगाव, टुनकी-सोनाळा, नांदूरा-मोताळा व टाकरखेड-बडनेर-जिगाव या रस्त्याच्या कामांच्या निविदेमध्ये झालेला गैरव्यवहार

**मु. शी.** : बुलढाणा जिल्ह्यातील जनुना-जळवत्र, तेली, बोथा-बुलढाणा खामगाव-बोथा, जळगाव, टुनकी-सोनाळा, नांदूरा-मोताळा व टाकरखेड-बडनेर-जिगाव या रस्त्याच्या कामांच्या निविदेमध्ये झालेला गैरव्यवहार या संबंधी श्री.विनायक मेटे, वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.विनायक मेटे ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"बुलढाणा जिल्ह्यातील सार्वजनिक बांधकाम विभाग अंतर्गत जनुना-जळवत्र, तेली, बोथा-बुलढाणा, खामगांव-बोथा, जळगांव जा,टुनकी-सोनाळा, नांदुरा-मोताळा व टाकरखेड -बडनेर-जिगांव या रस्त्याच्या कामासाठी 6 ते 7 निविदा फार्म विकण्यात येणे, अधीक्षक अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग अकोला याच्या कार्यालयाने मर्जीतील कंत्राटदारांची निविदा पाकिटे घेणे, इतर कंत्राटदारांची निविदा न स्वीकारणे, कमी दराच्या निविदा असून सुध्दा त्या न स्वीकारता जादा दरांच्या निविदा स्वीकारुन करण्यांत आलेला भ्रष्टाचार, याबाबत तेथील नागरिकांनी पुन्हा नव्याने ई-निविदा बोलविण्यात याव्यात अशी मा.उप मुख्यमंत्री यांचेकडे मागणी करणे, दिनांक 12 नोव्हेंबर, 2013 रोजी क्र.ई.15 मध्ये सुध्दा 6 ते 7 निविदा फार्म स्वीकारुन करण्यांत आलेला भ्रष्टाचार, ई-निविदा क्रमांक 11 व 15 बाबत चौकशी करुन या कामासाठी पुन्हा निविदा बोलावून संबंधितांविरुध्द कारवाई करण्याची होत असलेली मागणी, यावर शासनाने तातडीने केलेली वा करावयाची कारवाई व प्रतिक्रिया."

श्री. छगन भुजबळ ( सार्वजनिक बांधकाम मंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

**निवेदन**

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

----

..3..



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनायक मेटे : सभापती महोदय,या लक्षवेधी सूचनेमध्ये एकंदरीत 7 कामांचा उल्लेख आहे. 7 कामापैकी एक काम 8.5 कोटी रुपयांचे असून दुसरे काम 9 कोटी रुपयांचे आहे. या कामाच्या संदर्भात इ-निविदा काढण्यात आलेल्या आहेत याचा उल्लेख उत्तरामध्ये करण्यात आलेला आहे. परंतु आपल्या खात्याने इ-निविदा स्वीकारल्या परंतु जेव्हा निविदांचे लिफाफे उघडावयाचे असतात त्यावेळेला आपल्या खात्याने ज्यांच्या इ-निविदा उघडावयाच्या आहेत त्यांच्याच इ-निविदा उघडलेल्या आहेत. बाकीच्या लोकांनी ज्या इ-निविदा भरल्या होत्या त्यांच्या निविदा मात्र उघडल्याच नाहीत अशी स्थिती आहे. निविदा मॅनेज करण्याचे काम या ठिकाणी झालेले आहे.यामध्ये श्री. मोथा तसेच एस.एफ. कासेलाणी यांच्याच निविदा घेण्यात आल्या. निविदा घेण्यामध्ये तांत्रिक बाब असावी यासाठी गुरु कन्स्ट्रक्शन अशा तिघांच्याच निविदा स्वीकारण्यात आल्या. बाकी कोणाचेच लिफाफे उघडले नाही. या निविदेच्या संदर्भात तीव्र स्पर्धा असतांना या ठिकाणी जास्त दराने कामे देण्यात आलेली आहेत. कमी दराने किंवा आहे त्या दराने काम करणाऱ्या ज्या निविदा होत्या त्या उघडल्या गेल्या नाहीत. त्यामुळे यासंदर्भात मी माननीय मंत्री महोदयांना प्रश्न विचारु इच्छितो की, या निविदा प्रक्रियेत गडबड गोंधळ झालेला असून त्यामध्ये मोठया प्रमाणात अनियमितता झालेली आहे. त्यामुळे या कामाच्या संदर्भात ज्या निविदा काढण्यात आलेल्या आहे त्या रद्द करुन नवीन निविदा काढल्या जातील काय, या निविदांमध्ये मोठया प्रमाणात ज्या अधिकाऱ्यांनी गैरव्यवहार आणि भ्रष्टाचार केलेला आहे अशा अधिकाऱ्यांना आपण निलंबित करणार आहात काय ?

श्री.छगन भुजबळ : सभापती महोदय, या निविदेच्या संदर्भात वर्तमानपत्रात इ-निविदेच्या दोन सूचना प्रसिध्द झाल्या होत्या. इ-निविदा सूचना क्रमांक 11 मध्ये एकंदर 8 कामे होती. यामध्ये एकंदर 34 निविदा धारकांनी इ-निविदेद्वारे कामाची मागणी केली होती. 34 निविदा धारकांपैकी 16 इ-निविदा धारक पात्र ठरले. 16 मध्ये जी मंडळी लोएस्ट होती त्याच लोकांना कामे देण्यात आलेली आहेत. दुसऱ्या निविदा सूचना क्रमांक 15 मध्ये एकंदर 7 कामे होती. यामध्ये 23 निविदा धारकांनी इ-निविदेद्वारे कामाची मागणी केली. 23 पैकी 13 लोक इ-निविदेमध्ये पात्र ठरले. पहिल्या इ-निविदा सूचना क्रमांक 11 मध्ये सर्वांना लोएस्टमध्येच कामे देण्यात आलेली आहेत.

..4..

अमुद्रित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. छगन भुजबळ....

एक काम सीईच्या लेव्हलचे असल्यामुळे ते सीईकडे पाठविण्यात आले आहे. दरम्यानच्या काळात तक्रारी प्राप्त झाल्यामुळे सीईने या कामाची वर्क ऑर्डर दिली नाही. इ-निविदा सूचना क्रमांक 15 मध्ये जी 7 कामे होती त्या कामांची कोणालाही वर्कऑर्डर दिली नसून त्याचे कारण असे आहे की, सीईने या सर्व कामांचे गुण नियंत्रण दक्षता समितीला चौकशीचे आदेश दिलेले आहेत. त्यामुळे दुसऱ्या सूचीमधील कामे कोणालाही दिलेले नाही. ही सर्व कामे होल्डवर ठेवण्यात आलेली आहेत.

यानंतर श्री.अजित.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.छगन भुजबळ...

सन्माननीय सदस्य जे सांगत आहे त्याप्रमाणे त्या सर्व बाबींची चौकशी केली जाईल. यामध्ये कोणी गडबड केली असेल तर ती निविदा प्रक्रिया रद्द करण्यात येईल आणि ज्यांनी चुकीचे काम केले असेल त्यांच्यावर ताबडतोब कारवाई करण्यात येईल.

श्री.विनायक मेटे : सभापती महोदय, माननीय मंत्रिमहोदयांनी सकारात्मक उत्तर दिल्यामुळे मी त्यांचे आभार मानतो. परंतु मी या ठिकाणी नमूद करु इच्छितो की, निविदा क्रमांक 15 मध्ये एकूण तीन निविदा आल्या आणि त्यातील दोन निविदाकारांना काम देण्यात आले. या कामासाठी अन्य निविदा येऊ दिल्या नाहीत अशाप्रकारचे पुरावे आहेत. तेव्हा ही निविदा प्रक्रिया रद्द करुन नवीन निविदा काढण्यात येईल काय ?

श्री.छगन भुजबळ : सभापती महोदय, मी आताच सांगितले की, सन्माननीय सदस्य ज्या निविदेचा उल्लेख करीत आहे त्या निविदेचे काम झालेले नाही. त्यातील प्रक्रिया पूर्ण केलेली असली तरी आपण ती होल्डवर ठेवलेली आहे. या प्रकरणाची पूर्ण चौकशी झाल्याशिवाय कोणालाही काम देण्यात येणार नाही. यामध्ये काही गैरप्रकार झाल्याचे आढळून आल्यास ती निविदा रद्द करण्यात येईल आणि ज्यांनी अशा प्रकारामध्ये भाग घेतला असेल त्यांच्यावर कारवाई करण्यात येईल.

-------

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

AJIT/ D/ ST/ पूर्वी श्री.जुन्नरे.. 12:10

**पृ. शी.** : राज्यातील सार्वजनिक बांधकाम विभागातील मागासवर्गीय व इतर मागासवर्गीय संवर्गातील कार्यकारी अभियंता पदाची चुकीची सेवा ज्येष्ठता सूची मॅटने रद्द करण्याचे आदेश देऊनही त्याची अंमलबजावणी न होणे

**मु. शी.** : राज्यातील सार्वजनिक बांधकाम विभागातील मागासवर्गीय व इतर मागासवर्गीय संवर्गातील कार्यकारी अभियंता पदाची चुकीची सेवा ज्येष्ठता सूची मॅटने रद्द करण्याचे आदेश देऊनही त्याची अंमलबजावणी न होणे या संबंधी श्री.सुभाष चव्हाण,वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.सुभाष चव्हाण ( नामनियुक्त ) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"राज्यातील सार्वजनिक बांधकाम विभागातील मागासवर्गीय व इतर मागासवर्गीय संवर्गातील कार्यकारी अभियंता यांची सन 1990-98 या कालावधीसाठी तयार करण्यात आलेली चुकीची सेवा ज्येष्ठता सूची दिनांक 27 एप्रिल, 2000 मध्ये प्रसिध्द करण्यात आलेली असणे, सदर सूची मागासवर्गीय व इतर मागासवर्गीय यांच्यावर अन्यायकारक असल्यामुळे महाराष्ट्र न्याय प्राधिकरणाने (मॅट) फेटाळून लावून सदरहू सेवा जेष्ठता सूची त्वरित रद्द करण्याचे आदेश देण्यात येणे, परंतु सेवा जेष्ठता सूची अद्याप रद्द करण्यात आली नसणे, या चुकीच्या सेवा ज्येष्ठतेमुळे मागासवर्गीय व इतर मागासवर्गीय अधिकारी पदोन्नतीपासून वंचित राहणे, यामुळे मागासवर्गीय व इतर मागासवर्गीय यांच्यात निर्माण होत असलेला तीव्र असंतोष व संतापाची भावना, याबाबत शासनाने तातडीची करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

श्री.छगन भुजबळ (सार्वजनिक बांधकाम मंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

..3..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुभाष चव्हाण : सभापती महोदय, राज्यातील मागासवर्गीय अधिकाऱ्यांच्या संदर्भातील लक्षवेधी सूचना मी उपस्थित केलेली आहे. माननीय श्री.छगन भुजबळ साहेब हे अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, मागासवर्ग, इतर मागासवर्गीयांचे आवडते नेते आहेत. त्यामुळे या लक्षवेधी सूचनेला ते न्याय देतील अशी मला खात्री आहे.

सभापती महोदय, मागासवर्गीय आय.ए.एस, आय.पी.एस.अधिकारी व अधिकारी व कर्मचाऱ्यांना योग्य तो न्याय दिला जात नाही. त्यांच्यावर अन्याय केला जातो. मागासवर्गीयांमधील आय.ए.एस.अधिकाऱ्यांना की-पोस्टींग दिले जात नाही. अनुसूचित जातीच्या अधिकाऱ्यांना सामाजिक न्याय विभागाचा कार्यभार दिलेला आहे. सिडको, नगरविकास विभाग, महसूल विभाग, गृह विभाग यासारख्या महत्वाच्या विभागांचा कार्यभार अन्य समाजातील अधिकाऱ्यांना दिला जातो. या विभागांचा कार्यभार कोणाकडे दिला जातो हे आपणास माहीत आहे. तेव्हा महत्वाच्या विभागांवर मागासवर्गीय अधिकाऱ्यांची नियुक्ती करुन त्यांना योग्य तो न्याय द्यावा.

सभापती महोदय, महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कार्यकारी अभियंत्यांची सन 1990 आणि 1998 च्या कालावधीतील चुकीची ज्येष्ठता सूची दिनांक 27 एप्रिल, 2000 रोजी प्रसिध्द झाली हे खरे आहे काय ? ही चुकीची ज्येष्ठता यादी दहा ते बारा वर्षांनी म्हणजे 18 फेब्रुवारी, 2012 दरम्यान शासकीय नियमानुसार मागासवर्गीय, इतर मागासवर्गीय, कार्यकारी अभियंत्यांचा समावेश करुन ज्येष्ठता यादी नियमित करुन अंतिम यादी तयार केलेली आहे हे खरे आहे काय ? सन 2000 ते 2010 या काळातील तात्पुरत्या ज्येष्ठता यादीवर अधीक्षक अभियंता पदावर पदोन्नती दिल्याप्रमाणे 2011 च्या तात्पुरत्या ज्येष्ठता यादीवर पदोन्नती देण्यास शासन तयार आहे काय ?

श्री.छगन भुजबळ : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी सविस्तर आणि मोठे प्रश्न विचारलेले आहेत. सन्माननीय सदस्यांनी सांगितले की, मी मागासवर्गीयांचा आणि आपला आवडता नेता आहे असे सांगितल्याबद्दल त्यांचा आभारी आहे. सन्माननीय सदस्य श्री.विनायक मेटे यांचा सुध्दा मी आवडता नेता आहे. तसा आपला सुध्दा आवडता नेता आहे. त्याबद्दल मी आपणा सर्वांचे आभार मानतो. सन्माननीय सदस्यांनी सांगितले की, मागासवर्गीय अधिकाऱ्यांवर अन्याय होतो. मुंबई आणि ठाणे सारख्या विभागात अधीक्षक अभियंता सारख्या महत्वाच्या पदावर दोन

..4.



AJIT/ D/ ST/ पूर्वी श्री.जुन्नरे.. 12:10

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.छगन भुजबळ...

मागासवर्गीय अधिकाऱ्यांची नियुक्ती झालेली आहे. माझ्या मंत्रीपदाच्या काळात या विभागाचे सचिव शेड्युल कास्टचे झालेले आहेत. अधिकाऱ्यांची काम करण्याची क्षमता पाहून त्यांच्यावर कामाची जबाबदारी सोपविण्यात येते. त्यामध्ये डावे उजवे केले जात नाही.

यानंतर श्री.बोर्डे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SJB/ D/ ST/ पूर्वी श्री.अजित... 12:15

श्री.छगन भुजबळ....

ही लक्षवेधी सूचना अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती किंवा मागासवर्गीयांबाबतची नाही. कारण ज्येष्ठता यादीशी त्यांचा काही संबंध नाही. वर्ग-1 आणि वर्ग-2 यांच्यातील हा वाद आहे. विभागाने एका वर्गाच्या बाजूने निर्णय दिला की, दुसरा वर्ग त्या निर्णयाच्या विरोधात मॅट पासून उच्च न्यायालय व सर्वोच्च न्यायालयापर्यंत जातो. दुसऱ्या वर्गाच्या बाजूने निर्णय दिला की, पहिला वर्ग सर्वोच्च न्यायालयापर्यंत जातो. त्यामुळे हे सर्व प्रलंबित आहे.

महोदय, मी सभागृहाच्या निदर्शनास आणून देतो की, सर्वप्रथम दिनांक 27/04/2000 रोजी ज्येष्ठता यादी जाहीर करण्यात आली. त्यानंतर दिनांक 28 फेब्रुवारी रोजी ती प्रसिध्द करण्यात आली व दिनांक 12 मे, 2010 रोजी अंतिम करण्यात आली. यामध्ये 10 वर्षाचा विलंब होण्याचे कारण असे होते की, 1970 ते 90 या काळातील ज्येष्ठता यादी संदर्भात उच्च व सर्वोच्च न्यायालयामध्ये ज्येष्ठता यादीबाबत कोर्टबाजी सुरु होती. त्यामुळे पुढील 10 वर्षे ज्येष्ठता यादी प्रलंबित राहिली. दिनांक 12 मे, 2010 रोजी ज्येष्ठता यादी अंतिम केल्यानंतर मॅटने दिनांक 25 एप्रिल, 2011 रोजी असा निर्णय दिला की, ताबडतोब दुसरी तात्पुरती ज्येष्ठता यादी तयार करावी. न्यायालयाचे म्हणणे होते की, मागच्या 10 वर्षांच्या काळात अनेकजण निवृत्त झाले किंवा काही सेवेत नाहीत. त्यामुळे अगोदरची 10 वर्षांतील ज्येष्ठता यादी न करता, नव्याने तात्पुरती ज्येष्ठता यादी तयार करावी. न्यायालयाच्या निर्देशानुसार दिनांक 28 फेब्रुवारी, 2012 रोजी ज्येष्ठता यादी अंतिमरित्या प्रसिध्द करण्यात आली. परंतु त्याच न्यायाधिकरणाने ती ज्येष्ठता यादी दिनांक 10 मे, 2012 रोजी रद्द करण्यास सांगितले. त्या विरोधात मुंबई उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठ, नागपूर खंडपीठ येथे याचिका दाखल करण्यात आल्या. त्यामुळे राज्य शासनाच्या वतीने मुंबई उच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायधीशांना विनंती करण्यात आली की, ज्येष्ठता यादी प्रकरणी दाखल करण्यात आलेल्या याचिका एकाच प्रकारच्या असल्यामुळे त्या मुंबई उच्च न्यायालयात वर्ग कराव्यात. ही प्रक्रिया सुरु असताना नागपूर उच्च न्यायालयात एकाने सिव्हील ॲप्लीकेशन दाखल केले. त्यावर न्यायालयाने असा निर्णय दिला की, ज्याने आमच्याकडे सिव्हील ॲप्लीकेशन केले आहे त्याला शक्य असेल तर पदोन्नती द्यावी. महोदय, सुरुवातीला न्यायालयाने आम्ही तयार केलेली यादी रद्द केली होती. त्यावर उच्च न्यायालयात अपील सुरु आहे. तरीही नागपूर खंडीपीठ म्हणते की, पदोन्नती देणे शक्य असेल तर द्यावे. पदोन्नती देताना नेमकी

..2..



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.छगन भुजबळ....

कोणती यादी ग्राह्य धरावी यासाठी आम्ही ॲड.कुंभकोणी यांचा सल्ला मागितला. या प्रकरणी दिनांक 21 जानेवारी, 2014 रोजी मुंबई उच्च न्यायालयात हिअरिंग आहे. हा विषय पदोन्नती देण्याबाबतचा असला तरी वर्ग-1 आणि वर्ग-2, हे दोन्ही वर्ग ऐकमेकांच्या विरोधात सातत्याने मॅट ते सर्वोच्च न्यायालयापर्यंत जात असल्यामुळे पदोन्नती देण्यात विलंब होत आहे. यामध्ये एससी, एसटी किंवा मागासवर्गीयांचा काही संबंध नाही. मी अगोदर सांगितलेले आहे की, मुंबई व ठाणे या दोन्ही ठिकाणी मागासवर्गीय उच्च अधिकारी कार्यरत आहेत.

**उप सभापती** : मी माननीय मंत्र्यांच्या निदर्शनास आणून देतो की, आपल्या विभागामध्ये सचिव पदाची एक जागा रिक्त आहे. तसेच मुख्य अभियंत्यांची 8 आणि अधीक्षक अभियंत्यांची अनेक पदे रिक्त आहेत. या पदांवर पदोन्नती करण्याची बाब सामान्य प्रशासन विभागाकडे प्रलंबित आहे. लोकप्रतिनिधी या नात्याने आम्हाला लोक भेटावयास येतात. त्यांच्याकडून काही बाबी मला समजतात. या सर्व प्रकाराला सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सचिवांचे औदासीन्य कारणीभूत आहे. त्याचा फटका मला सुध्दा एका प्रकरणी बसलेला आहे. जर या गोष्टीत तथ्य असेल तर आपल्याला सोयीस्कर होईल असा कार्यक्षम अधिकारी रिक्त असलेल्या सचिव पदी नियुक्त करावा, असे मला वाटते.

श्री.छगन भुजबळ : महोदय, हे खरे आहे की, आमच्या विभागात सचिवाची जागा रिक्त आहे. त्या जागेवर नेमक्या कोणत्या व्यक्तीची नेमणूक करावी हे ठरवावे लागेल. कारण या पदावर एससी, एसटी किंवा अन्य कोणत्या प्रवर्गाचा बिंदू येतो ते पहावे लागेल. नाही तर या बाबत पुन्हा वाद निर्माण होईल.

नंतर श्री.कांबळे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. छगन भुजबळ ....

त्या संदर्भात जीएडीकडे चर्चा होते. प्रत्येक जण जीएडीमध्ये जाऊन आपले म्हणणे मांडतो. सेवाज्येष्ठता यादीचा प्रश्न कार्यकारी अभियंत्यांच्या संदर्भात आहे तसा अधीक्षक अभियंत्यांच्या संदर्भात देखील आहे. त्यामुळे मी आमच्या सचिवांना आणि जीएडीच्या अधिकाऱ्यांना सांगितले आहे की, असे असले तरी, आज 8 जागा रिक्त असतील तर त्यातील 5 जागा अशा निघतील की, त्यामध्ये दोन्ही प्रकारे विचार केला जाईल. कोणताही प्रकार घेतला तरी ते सिनिअरच आहेत. त्यांची यादी तयार करा आणि द्या. सभापती महोदय, त्याप्रमाणे आता एक यादी परत गेली आहे. सचिवांचा बिंदू ठरविण्याचा प्रश्न हायकोर्टात प्रलंबित आहे. मघाशी मी सांगितले की, कॉमन यादी निघेल, सेवाज्येष्ठतेची यादी आता पाठविण्यात आली आहे. आम्ही जीएडीला सांगितले आहे की, तुम्ही त्या संदर्भात ताबडतोब निर्णय घ्यावा. सभापती महोदय, मी आपल्या माहितीसाठी सांगतो की, मी 2 वेळा मंत्रिमंडळात या विषयाच्या संदर्भात चर्चा घडवून आणली आणि कर्मचारी/अधिकारी कामासाठी कमी पडत आहेत, काम वाढले आहे, या संदर्भातील निर्णय लवकर घ्यावा असे सांगितले आहे. मी स्वत: त्या बाबतीत लक्ष घातले आहे.

**उप सभापती** : माननीय मंत्री महोदय, मी या बाबतीत निर्देश द्यायचे का ? पदोन्नतीस पात्र असलेल्या कर्मचारी/अधिकारी यांची यादी जीएडीने ताबडतोब फायनल करून एक महिन्यात आपल्याकडे पाठवावी, अशा प्रकरचे सुस्पष्ट निर्देश दिले तर चालतील का ? मी हे सर्व कर्मचारी/अधिकारी आणि आपल्या हितासाठी विचारीत आहे.

श्री. छगन भुजबळ : सभापती महोदय, विभाग त्या संदर्भात काम करीत आहे. निर्देश देणे हा आपला अधिकार आहे, त्या खुर्चीचा अधिकार आहे, मी त्याबद्दल काय सांगणार ?

**उप सभापती** : मी सुस्पष्ट निर्देश देतो की, जी पदे भरणे अत्यंत आवश्यक आहे, योग्य आहे, त्या बाबतीत जीएडीने ताबडतोब निर्णय घेऊन, येत्या 15 दिवसांच्या आत या संदर्भातील नस्ती माननीय मंत्र्यांकडे पाठवावी.

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

..2

**पृ.शी.** : राज्यातील विविध भागात महिलांवर होत असलेले लैंगिक अत्याचार

**मु.शी.** : राज्यातील विविध भागात महिलांवर होत असलेले लैंगिक अत्याचार या संबंधी डॉ. नीलम गोऱ्हे, सर्वश्री विनोद तावडे, दिवाकर रावते, रामदास कदम, पांडुरंग फुंडकर, श्रीमती शोभा फडणवीस, श्री. चंद्रकांत पाटील, ॲड. अनिल परब, सर्वश्री विनायक राऊत, भाई गिरकर, वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना

डॉ. नीलम गोऱ्हे (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने माननीय गृहमंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छिते आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करते.

"दिनांक 8 डिसेंबर, 2013 रोजीच्या सुमारास तांदूळवाडी (ता.बारामती, जि.पुणे) येथील एका अल्पवयीन मुलीवर सुरेंद्र काजळे या आरोपीने सुनिता सांळुके यांच्या घरात नेऊन बलात्कार करणे, सदरच्या घटनेनंतर सदरच्या मुलीला जीवे मारण्याची दिलेली धमकी, या धमकी व होणाऱ्या बदनामीमुळे सदरच्या मुलीने स्वत:ला पेटवून आत्महत्या करण्याचा केलेला प्रयत्न, सदरची तक्रार नोंदविण्यास गेले असता तक्रार नोंदविण्यास पोलिसांनी केलेली टाळाटाळ, वर्धा जिल्ह्यातील समुद्रपूर तालुक्यातील एका 20 वर्षांच्या युवतीवर बलात्कार करुन तिला जिवंत जाळण्यात आल्याची घटना नुकतची उघडकीस येणे, सदरच्या प्रकरणात पोलीस अधिकाऱ्यांनी कारवाई करण्यास टाळाटाळ करणे, दिनांक 2 ऑक्टोबर, 2013 रोजीच्या सुमारास आष्टी (जि.वर्धा) येथील नायब तहसीलदार श्री. धनंजय देशमुख यांनी रसिका या मुलीची भररस्त्यात छेड काढल्याप्रकरणी तक्रार नोंदविण्यास गेले असता पोलीस अधिकाऱ्यांनीही असभ्य वर्तन केल्याप्रकरणी उच्च न्यायालयात दाखल झालेल्या याचिकेवर निर्णय देतांना सदर प्रकरणी गृह सचिवांनी शपथ पत्र सादर केले नसल्याने राज्य शासनाच्या कार्यशैलीवर ओढलेले ताशेरे, ता.राजापूर, जि.रत्नागिरी येथील एका प्राथमिक शाळेशेजारील दुकानदार सुरेंद्र बाणे याने पहिली ते सातवी पर्यंतच्या तब्बल

..3



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे ....

16 अल्पवयीन बालिकांशी अश्लील चाळे केल्याची माहे सप्टेंबर, 2013 च्या दुसऱ्या आठवड्यात घडलेली घटना, अशा प्रकारच्या घटनांवर आळा बसून आरोपींवर कडक कारवाई करण्यास होत असलेला विलंब, तसेच पोलीसांशीही या आरोपींचे हितसंबंध असल्याने गुन्हेगारीमध्ये होत असलेली वाढ, याबाबत शासनाने तातडीने केलेली वा करावयाची कारवाई."

श्री. आर.आर.पाटील (गृहमंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(**प्रेस** : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

----

..4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, 4 घटनांच्या संदर्भात एकत्रितपणे लक्षवेधी सूचना देण्याची वेळ आली आहे. रत्नागिरी जिल्ह्यातील घटना निर्देशित केली आहे. शाळेमध्ये जाणाऱ्या 16 अल्पवयीन मुलींच्या सोबत शाळेच्या जवळ असलेल्या दुकानाचा दुकानदार अश्लील चाळे करीत होता. दिनांक 20.08.2012 ला त्या मुलींच्या पालकांनी शाळेच्या मुख्याध्यापकांकडे तक्रार केली. मधल्या काळात गाव समितीच्या बैठका झाल्या, तंटामुक्त समितीच्या बैठका झाल्या. 12 वाड्यांवरील लोकांनी वारंवार तक्रारी केल्या, पोलीस अधीक्षकांकडेही तकारी केल्या. सदर प्रकरणी पोलीस स्टेशनकडून मात्र दिनांक 28.09.2013 ला तक्रार दाखल करून घेण्यात आली. सांगण्याचा उद्देश असा आहे की, तक्रार नोंदवून घेण्यास एका वर्षाचा काळ लोटला. 16 मुलींच्या तक्रारी असूनही हा माणूस ताबडतोब जामिनावर सुटला आहे. त्याने गावात जाऊन परत दुकान सुरू केले आहे. लोकांनी त्याला सांगितले की, दुकान चालवू नकोस, तुझ्यामुळे मुलींना त्रास होत आहे. परंतु, त्याने ऐकले नाही. त्याने दुकान बंद केले नाही. त्याने परत इतर मुलींच्या सोबत असेच अश्लील चाळे केले. शेवटी तेथील पोलीस निरीक्षकांनी त्याला अटक केली. दुकान बंद केले नाही. पॉस्को कायद्याखाली अटक झालेल्या आरोपीला जामीन मिळत नाही. त्या दुकानदाराने 16 मुलींचा सामूहिकपणे विनयभंग केला आहे. शाळेत जाणाऱ्या 195 मुलांपैकी 92 मुलगे आहेत, 102 मुली आहेत. मुली शिक्षणाकडे वळत आहेत. राजापूर पोलीस स्टेशनकडून तक्रार नोंदवून घेण्यास प्रचंड दिरंगाई झाली आहे. संबंधित पोलीस अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई करणार आहात ?

सभापती महोदय, गुन्हेगारी स्वरूपाच्या घटना गाव पातळीवर होतात. त्यावेळी तंटामुक्ती समिती समजावून सांगण्याचे काम करते. त्यामुळे तक्रार उशिरा दाखल होते. परिणामी, ती केस विक होते. आपण त्यांना सुस्पष्ट निर्देश द्याल का की, अशा गुन्हेगारी स्वरूपाच्या केसेस मिटविण्याचा प्रयत्न होता कामा नये किंवा समज देऊन थांबविता कामा नये. रत्नागिरीची स्पेसिफिक केस फास्ट ट्रक कोर्टामध्ये चाललीच पाहिजे. मी बारामतीच्या केसच्या संदर्भात काल नियम 289 चा प्रस्ताव दिला होता. सदर प्रकरणाच्या तक्रारीची दखल पोलीस स्टेशनकडून घेतली गेली नाही.

( नंतर श्री. खंदारे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे....

80 टक्के जळालेली मुलगी कोणत्या कारणामुळे जळाली ? तो 35 वर्षाचा विवाहित माणूस आहे. त्याला दोन मुली आहेत, ही मुलगी 15 वर्षांची आहे. ही घटना दिनांक 8 डिसेंबरला घडली आहे. परंतु पोलिसांनी तिची जबानी दिनांक 15 डिसेंबर रोजी घेतली आहे. 80 टक्के जळालेल्या केसमध्ये 8 दिवसांची दिरंगाई झाली आहे. हा अपघात संशयास्पद असला तरी जळीत केस असल्यामुळे पोलिसांनी या केसची वेळेवर दखल घेणे आवश्यक होते. त्यामुळे बारामतीच्या पोलीस अधिकाऱ्यांची चौकशी व राजापूर येथील पोलीस अधिकाऱ्यांना निलंबित केले जाईल काय ? छेडछाडीबाबत पोलीस स्टेशनमध्ये तक्रार आल्यानंतर दोन तासाच्या आत तक्रार दाखल करण्याबाबत मंत्री महोदय सूचना देतील काय ?

श्री.आर.आर.पाटील : बारामतीच्या घटनेची मी स्वत: माहिती घेतलेली आहे. तेथील घटना दि.8 रोजी घडली होती, दि.9 रोजी तिला सूर्या हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले होते. तिने स्टोव्हचा भडका उडाल्यामुळे भाजल्याचा जबाब दिला आहे. दि.9 रोजी ससून हॉस्पिटलमध्ये गेल्यानंतर माझे प्रेमसंबंध होते असा जबाब दिला आहे. दोन्ही ठिकाणी ही जळीत केस असल्यामुळे पुण्याचे पोलीस गेले होते. दि.14 रोजी तिने अंतिम जबाब दिला त्यावेळी बारामतीचे पोलीस स्वत:हून पुणे पोलिसांच्या माहितीवरुन तेथे गेले होते. पहिल्या दोन्ही वेळी तिने वेगवेगळे जबाब दिले आहेत. तिसऱ्या वेळी वेगळा जबाब दिला आहे. दि.14 रोजी संध्याकाळी जबाब दिल्याबरोबर दि.15 रोजी गुन्हा नोंद करुन एका आरोपीला अटक करण्यात आली होती. पहिल्या घटनेत पोलिसांनी विलंब केल्याचे मला तरी दिसलेले नाही. तरी सुध्दा एस.पी.यांनी या घटनेत विलंब झ ाला आहे का हे तपासावे, अशा सूचना दिलेल्या आहेत.

रत्नागिरीमधील केसमध्ये त्या दुकानदाराविरुध्द 5 केसेस दाखल झालेल्या आहेत. पहिली तक्रार आल्यानंतर पोलिसांनी गुन्ह्याची नोंद केली आहे. कारवाई करीत असताना त्याच्याविरुध्द अन्य 4 गुन्ह्याची नोंद नंतर झाली होती. कधी एक वर्षापूर्वी विनयभंग केला होता, सहा महिन्यापूर्वी विनयभंग केला होता, त्याची निश्चित तारीख आठवत नाही असे सांगितले जात होते, या प्रकरणी त्या गावातील राजकीय वातावरण कारणीभूत आहे असे दिसते. याबाबतीत मी कोणत्याही निष्कर्षाप्रत आलेलो नाही. विनयभंगाच्या प्रकरणाबाबत त्याविरुध्द गुन्हा नोंदला होता,





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ D/ ST/ KTG/

श्री.आर.आर.पाटील....

त्याला ताबडतोब अटक केलेली आहे. त्याला जामीन न मिळण्यासाठी पोलिसांनी कोर्टात प्रयत्न केला होता. परंतु कोर्टाने त्याला जामीन दिलेला आहे. उर्वरित 4 केसेस पोलिसांकडे कधी आल्याच नव्हत्या. मी स्वत: ते सुध्दा रेकॉर्ड तपासून पाहिले आहे. सन्माननीय सदस्यांनी 16 मुलींचा उल्लेख केला आहे. माझ्याकडे असलेल्या माहितीवरुन त्याच्याविरुध्द 5 केसेस दाखल झालेल्या आहेत. या घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन कोकण रेंजचे आय.जी.या गंभीर घटनेकडे लक्ष घालतील. ते स्वत: चौकशी करतील. पालक पोलिसांकडे गेल्यानंतर पोलिसांनी कोणाला पाठीशी घातले आहे असे निष्पन्न झाले तर जे कर्मचारी याला जबाबदार असतील त्यांच्यावर कारवाई केली जाईल. रत्नागिरीच्या केसमध्ये आय.जी.लक्ष घालतील व संशयाला कोठेही वाव राहू नये म्हणून बारामतीच्या केसमध्ये स्वत: एस.पी.लक्ष घालतील.

श्रीमती शोभा फडणवीस : सभापती महोदय, या अल्पवयीन मुली शाळेत शिकणाऱ्या होत्या. शाळेतील मुलींची जबाबदारी मुख्याध्यापकांची असते. ही घटना मुख्याध्यापकांना माहीत असूनही त्यांना आदर्श शिक्षकांचा पुरस्कार देण्याचा प्रस्ताव सादर झालेला आहे. मुलींची असुरक्षितता निर्माण करणाऱ्या मुख्याध्यापकांना आदर्श पुरस्कार मिळू नये यासाठी शासन प्रयत्न करणार आहे काय ? 5 केसेस नोंदविलेल्या आहेत त्या सुध्दा मुलींच्या संदर्भातील आहेत. याचे गांभीर्य लक्षात घेऊन मोठ्या प्रमाणात कारवाई केली जाणार आहे. पण अशा केसेसचा निकाल लवकर लागण्यासाठी शासनाने प्रयत्न करावा.

तिसऱ्या घटनेबाबत असे निवेदन करण्यात आले आहे की, फिर्यादीने संगनमताने आरोपीविरुध्द खोटी तक्रार दिली असल्याचे पोलीस तपासात निष्पन्न झाले. असे निष्पन्न झाल्यानंतर पुन्हा एस.पी.कडे तक्रार येते. त्यामुळे त्यांच्यावर पुन्हा तीच कारवाई केली जाते. म्हणून पुन्हा चौकशी करुन त्याही गुन्ह्यामध्ये खोट्या तक्रारीबाबत कोणतीही केस होणार नाही याची शासन दक्षता घेईल काय ?

नंतर श्री.शिगम.......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. आर.आर.पाटील : सन्माननीय सदस्यांनी तिसरा प्रश्न वर्ध्यासंबंधी विचारला. त्या संदर्भात मी सांगू इच्छितो की, प्रथमदर्शनी तक्रारीमध्ये काही तथ्य नसल्याचे आढळून आले असले तरी आणि तशा प्रकारचा निष्कर्ष पोलिसांनी काढलेला असला तरी एसपीकडे पुन्हा तक्रार केल्यानंतर डीवायएसपी लेव्हलच्या अधिकाऱ्याकडून पुन्हा चौकशी करण्याचे आदेश दिलेले असून ती चौकशी सुरु आहे. त्या मुलीचे लोकेशन दुसरीकडे असल्याचे सबळ पुरावे मिळत आहेत आणि ज्या नायब तहसीलदार विरुध्द तक्रार आलेली आहे त्याचेही लोकेशन तेथे नसल्याचे पुराव्यानिशी सिद्ध झालेले आहे. त्यांनी एका वकिलाच्या विरोधात कारवाई केली होती म्हणून नायब तहसीलदाराविरुध्द तक्रार करण्यात आली. असे जर काही असेल तर त्याची देखील सत्यता पडताळून पाहिली पाहिजे. त्या महिलेला संरक्षण मिळाले पाहजे. परंतु अधिकाऱ्यांवर देखील शहानिशा न करता कारवाई करीत बसलो तर अधिकाऱ्यांविरुध्द देखील अशा प्रकारच्या तक्रारी येऊ शकतील. ही दोन अधिकाऱ्यांच्या संबंधातील तक्रार असल्यामुळे या प्रकरणाच्या खोलात जाऊन तपास करण्याच्या सूचना शासनामार्फत दिलेल्या आहे.

सन्माननीय सदस्यांनी रत्नागिरीच्या संदर्भात प्रश्न विचारला. शाळेच्या आवारामध्ये घटना घडली. त्या शाळेच्या मुख्याध्यापकांनी मुलींच्या सुरक्षिततेसाठी पुरेशी व्यवस्था केली नसेल तर त्याला आदर्श शिक्षक पुरस्कार देण्याचा विचार करु नये अशा पध्दतीची शिफारस शिक्षण विभागाला करण्यात येईल. शाळेतील सगळयाच गोष्टी ह्या मुख्याध्यापकाच्या कक्षेत येतात अशातला भाग नाही. परंतु मुलींनी वेळोवेळी तक्रार करुन देखील मुख्याध्यापकांनी त्याची दखल घेतली नसेल तर त्याला आदर्श शिक्षक का करायचा हा सन्माननीय सदस्यांचा प्रश्न देखील बरोबर आहे. तशा पध्दतीची शिफारस निश्चितपणे करता येईल. रत्नागिरीच्या प्रकरणामध्ये ज्या घटना घडलेल्या आहेत त्या शाळेच्या आवाराच्या बाहेर दुकानात कुठे बिस्किटचा पुडा देताना अंगाला हात, हाताला हात ... मुख्याध्यापकाकडे तक्रार करुन देखील मुख्याध्यापकांनी त्याकडे दुर्लक्ष केले असेल कानाडोळा केला असेल तर आपण सांगितलेली सूचना शासनाला मान्य आहे.

डॉ. दीपक सावंत : अशा प्रकारचे आरोपी हे जामिनावर बाहेर येतात आणि पुन्हा विनयभंगाचे चाळे करण्यासाठी मोकळे होतात. तेव्हा हा राजापूरचा खटला आपण फास्टट्रॅक कोर्टामध्ये चालविणार आहात काय ?

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. आर.आर.पाटील : विनयभंगाची ही घटना आहे. फास्ट ट्रॅक कोर्ट किती आहेत आणि पहिल्या फास्ट ट्रॅक कोर्टामध्ये किती केसेस आहेत हे मला पहावे लागेल. नाही तर फास्ट ट्रॅक कोर्टामध्ये केस जाऊन ती पुन्हा स्लो व्हावयास नको. तेव्हा याबाबतची पहिल्यांदा माहिती घेण्यात येईल.

डॉ. नीलम गो-हे : सुप्रीम कोर्टाने मार्च महिन्यामध्ये गाईड लाईन्स दिल्या होत्या. त्यानुसार आस्थापनांमध्ये तक्रार समित्या नेमण्याबरोबरच जिल्हास्तरावर स्थानीय समित्या नेमणे बंधनकारक आहे. 13 डिसेंबरला यासंबधीचे रुल्स देशभर कार्यान्वित झालेले आहेत. शाळा किंवा अन्य आस्थापना असोत, प्रत्येक जिल्हाधिकाऱ्याच्या ठिकाणी स्थानीय समित्या करुन या तक्रार निवारण समित्या होतात की नाही हे पाहिले जाईल काय ? आरोपीचा जामीन रद्द करण्याच्या दृष्टीने प्रयत्न केले जातील काय ?

श्री. आर.आर.पाटील : जामीन मिळून खूप दिवस झालेले आहेत. परंतु नंतर आलेल्या तक्रारी गृहीत धरुन जामीन रद्द करता येतो का हे तपासून पाहिले जाईल. सुप्रीम कोर्टाने महिलांच्या सुरक्षिततेच्या संदर्भात, मग कार्यालयामध्ये काम करणाऱ्या महिला असतील किंवा अन्य महिला असतील, त्यांच्या संदर्भात ज्या गाईड लाईन्स आहेत त्याची अंमलबजावणी शासना मार्फत केली जात आहे. काही कारवाई महिला बालविकास विभागामार्फत तर काही कारवाई गृह विभागामार्फत केली जाते. गृह विभागामार्फत ज्या गोष्टी करावयाच्या आहेत त्या निश्चितपणे केल्या जातील. पण उर्वरित बाबी महिला बालविकास विभागाने कराव्यात अशा सूचना दिल्या जातील. दोन्ही सन्माननीय सदस्यांना मी सांगू इच्छितो की, सुप्रीम कोर्टाने ज्या गाईड लाईन्स दिलेल्या आहेत त्याचे पालन आपण करुच. परंतु संपूर्ण देशाला गाईड लाईन होऊ शकेल अशा प्रकारचा धर्माधिकारी समितीचा रिपोर्ट अंतिम टप्प्यामध्ये आहे. त्यामध्ये अनेक बाबी स्वीकारलेल्या आहेत हे दोन्ही सन्माननीय सदस्यांना माहीत आहे. ज्यावेळी धर्माधिकारी समितीच्या गाईड लाईन्स स्वीकारल्या जातील त्यावेळी त्या आपल्याला बंधनकारक असतीलच परंतु देशाला सुध्दा महिलांच्या सुरक्षिततेच्या बाबतीत मार्गदर्शक ठरु शकतील इतका डिटेल अभ्यास धर्माधिकारी समितीच्या माध्यमातून राज्य सरकारने केलेला आहे. विधानसभा आणि विधानपरिषदेतील महिला सदस्यांनी आणि सामाजिक कार्यकर्त्यांनी यामध्ये खूप मोठे सहकार्य आणि सहभाग दिलेला आहे.

...नंतर श्री. गिते..

अमुद्रित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

**पृ. शी.** : मॅट्रीक पूर्व शिष्यवृत्ती योजनेत कचरावेचकांच्या मुलांचा समावेश न होणे

**मु. शी.** : मॅट्रीक पूर्व शिष्यवृत्ती योजनेत कचरावेचकांच्या मुलांचा समावेश न होणे यासंबंधी श्री.मोहन जोशी,वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.मोहन जोशी ( नामनियुक्त ) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय सामाजिक न्याय मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"अस्वच्छ व्यवसायात काम करणाऱ्यांच्या मुलांना मिळणाऱ्या "मॅट्रीक पूर्व शिष्यवृत्ती" योजनेची केंद्र शासनाने व्याप्ती वाढवून त्यात कचरावेचकांच्या मुलांचा देखील समावेश करणे, केंद्र शासनाने दिनांक ७ मे, २०१३ रोजीच्या पत्राद्वारे राज्य शासनाला प्रस्ताव पाठविण्याबाबत सूचित केलेले असताना आजतागायत शासनाने कार्यवाही केली नसणे, केंद्र शासनाने शिष्यवृत्ती योजनेची सदर वाढवलेली व्याप्ती यावर्षी महाराष्ट्र दिना पासून लागू करुन सन २०१३-१४ या आर्थिक वर्षाकरिता दिनांक १५ जून, २०१३ पर्यत प्रस्ताव मागविलेले असतानाही केवळ शासनाच्या चुकीच्या धोरणामुळे पूणे शहरातील ३००० मुलांसह राज्यातील लाखो कचरा वेचणाऱ्यांच्या मुलांना शिष्यवृत्ती अभावी शिक्षणाच्या मूळ प्रवाहापासून विस्थापित व्हावे लागत असणे, कचरा वेचक दोन लाख कुटुंबाना निवृत्ती वेतन देऊन त्यांना अंत्योदय योजनेमध्ये समाविष्ट करण्याची होत असलेली मागणी, केंद्र शासनाने राष्ट्रीय स्वास्थ विमायोजनेमध्ये कचरा वेचकांचा समावेश करून राज्य शासनाकडून केवळ RSBY फॉरमॅट मध्ये माहिती मागविली असणे, परंतु शासनाकडून कार्यवाही होत नसणे, या सर्वच बाबतीत शासनाचे झालेले दुर्लक्ष, याबाबत शासनाने तातडीची करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

श्री.शिवाजीराव मोघे (सामाजिक न्याय मंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मोहन जोशी : महोदय, अस्वच्छ व्यवसायात काम करणाऱ्यांच्या मुलांना मिळणाऱ्या मॅट्रीक पूर्व शिष्यवृत्ती योजनेची केंद्र शासनाने व्याप्ती वाढविली होती आणि केंद्र शासनाने दिनांक 7 मे, 2013 रोजी अशा आशयाचे पत्र सुध्दा राज्य शासनाला पाठविले होते. या योजनेची अंमलबजावणी या राज्यात व्हावी म्हणून सातत्याने पाठपुरावा करण्यात येत होता. राज्यात कचरावेचक म्हणून जे लोक काम करीत आहेत, त्यांच्या मुलांच्या शिक्षणासाठी शिष्यवृत्ती मिळणे अतिशय गरजेचे आहे. परंतु या लक्षवेधी सूचनेच्या अनुषंगाने राज्य शासनाने असे निवेदन दिले आहे की, सप्टेंबर महिन्यामध्ये या योजनेत काही बदल केलेले आहेत. त्यामध्ये कचरावेचक लोकांच्या मुलांचा समावेश करण्यात आलेला नाही. सामाजिकदृष्टया अतिशय महत्वाचा असलेला हा वर्ग आहे. समाजाचे एवढे मोठे काम ते करतात. अशा वर्गांच्या मुलांच्या शिक्षणासाठी राज्य सरकार नागपूरचे अधिवेशन संपण्यापूर्वी अथवा लागलीच केंद्र शासनाकडे पाठपुरावा करुन या योजनेत कचरावेचकांच्या मुलांचा समावेश व्हावा म्हणून प्रयत्न करणार काय, केंद्र सरकारकडून सप्टेंबर महिन्यात राज्य शासनास पत्र आलेले आहे. त्याच्यात डायरेक्ट बेनिफिट बाबत म्हटलेले होते. केंद्र शासनाने त्यांचा समावेश केलेला होता. या बाबतीत राज्य शासनाने केंद्र शासनाकडे पाठपुरावा केला तर निश्चितपणे ही मागणी मान्य होईल. केंद्र सरकारने ही मागणी मान्य केली तर पुढील वर्षापासून कचरावेचकाच्या मुलांना शिष्यवृत्तीची योजना लागू करणार काय, महाराष्ट्रामध्ये मांग, गारुडी, बुरुड असा अतिशय मागासलेला समाज आहे. त्या समाजातील लोकांना त्यांच्या पायावर उभे करण्यासाठी एखादी योजना महाराष्ट्र सरकारने आखलेली आहे काय? त्या योजनेमुळे या समाजातील लोकांच्या मुलांना रोजगाराची संधी मिळू शकेल. या व्यवसायात काम करणाऱ्या लोकांसाठी जी पेन्शन योजना आहे, त्यासाठी एखादी समिती राज्य शासनाच्या माध्यमातून नेमली जाईल काय ?

श्री.शिवाजीराव मोघे : सभापती महोदय, ही योजना केंद्र शासनाने रिव्हाईज केली. त्यात कचरावेचणारा पाचवा ग्रुप जो होता, तो केंद्र सरकारने वगळला. तो ग्रुप दिनांक 5 सप्टेंबर, 2013 रोजीच्या पत्रान्वये वगळला आहे. आता स्कॅव्हेंजर, स्विपर्स, टॅनर प्लायर्स यांच्यासाठी लागू आहे आणि इतरासाठी तो लागू नाही. सन्माननीय सदस्यांच्या म्हणण्याप्रमाणे कचरावेचकांच्या मुलांचा देखील यात समावेश व्हावा म्हणून केंद्र शासनास पत्र पाठविण्यात येईल. सन्माननीय सदस्यांच्या दुसऱ्या प्रश्नाच्या बाबतीत सांगू इच्छितो की, अनुसूचित जातीमध्ये काही काही जाती अतिशय रिअर

3...



श्री.शिवाजीराव मोघे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

आहेत. माल गारुडी, बुरुड अशा पाच ते सात जाती अतिशय रिअर आहेत. या जातीतील लोकांना वेगळे प्रशिक्षण देण्याच्या बाबतीत येत्या एक महिन्याच्या कालावधीत निर्णय घेण्यात येईल.

श्री.मोहन जोशी : या बाबतीत राज्य शासनाकडून समिती नेमली जाईल काय अशा प्रकारचा प्रश्न विचारला होता, परंतु त्या प्रश्नाचे उत्तर माननीय मंत्री महोदयांकडून आले नाही. या बाबतीत माननीय मंत्री महोदयांनी उत्तर द्यावे अशी माझी विनंती आहे.

श्री.शिवाजीराव मोघे : आपण या संबंधी पत्र पाठवा, त्या पत्राचा विचार करण्यात येईल.

श्री.जयदेव गायकवाड : विद्यार्थ्यांची यादी पाठविण्याबाबतचे प्रस्ताव केंद्र शासनाने 15 जून,2013 पर्यंत प्रस्ताव मागविले होते. ती यादी केंद्र शासनाकडे पाठविली आहे काय ?

श्री.शिवाजीराव मोघे : महोदय, प्रस्ताव पाठविण्याअगोदरच योजना रिव्हाईजचे पत्र आल्यामुळे सदरहू विद्यार्थ्यांच्या यादीचे प्रस्ताव पाठविण्यात आले नाहीत.

--------------

4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



**पृ. शी.** : सहकार कायद्यानुसार बीड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेकडून

कर्ज वसुली न करणे

**मु. शी.** : सहकार कायद्यानुसार बीड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेकडून कर्ज वसुली न करणे यासंबंधी विक्रम काळे, अनिल भोसले जयवंतराव जाधव, दिपकराव साळुंखे, सतीश चव्हाण ,वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.विक्रम काळे (औरंगाबाद विभाग शिक्षक ) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय सहकार मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"बीड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेवर सहकार अधिनियमातील तरतुदीनुसार दिनांक ११ नोव्हेंबर, २०१३ रोजी प्रशासकीय मंडळाची नियुक्ती होणे, प्रशासकीय मंडळाचे अध्यक्ष तथा अप्पर जिल्हाधिकारी, बीड यांनी सहकार कायद्यानुसार बँकेच्या कर्ज वसूलीबाबत कोणतीही कार्यवाही न करणे, बँकेची आर्थिक परिस्थिती डबघाईला आलेली असतांना त्यांनी बँकेत बेकायदेशीररित्या कर्मचाऱ्यांना पदोन्नत्या देणे, बँकेला नवीन वाहन खरेदी करणे, आवश्यकता नसतांना बांधकाम करणे, बँकेच्या १७ शाखा बंद करुन अनेक शाखांचे एकत्रीकरण करुन शाखेतील फर्निचर व इतर साहित्य यांची विल्हेवाट लावतांना कोट्यवधी रुपयांचा भ्रष्टाचार करणे, बँकेच्या वाहनाला अनधिकृतरित्या अंबरदिवा बसवून दिव्याच्या व पदाच्या प्रभावाखाली गोर-गरीब शेतकऱ्यांवर फौजदारी गुन्हे दाखल करणे, बँकेच्या पैशाने अनधिकृतरित्या विमा प्रवासावर मोठा खर्च करणे, कनिष्ठ कर्मचारी व अधिकारी यांच्या नांवे मोठ्या रक्कमेचे संड्री ॲडव्हान्स दाखवून अपहार करणे, कर्ज वसुलीतून जमा झालेला सुमारे १०० कोटी रुपयांचा निधी दहा ते वीस टक्के कमिशन घेऊन ठेवीदारांना वाटप करणे, बँकेत सी.सी.टी.व्ही.कॅमेरा व संगणकीय प्रणाली खरेदीच्या कामांत लाखो रुपयांचा भ्रष्टाचार होणे, अनेक पतसंस्था व ठेवीदारांनी प्रशासकीय अध्यक्षांनी ठेवी वाटपात कमिशन मागितल्याच्या तक्रारी देणे, श्री.टाकसाळे यांनी गैरमार्गाने कोट्यवधी रुपयांची संपत्ती खरेदी करणे, प्रशासकीय मंडळातील इतर सदस्यांना विश्वासात न घेता बँकेत मनमानी व हुकूमशाही वृत्तीने कारभार करणे यामुळे बीड जिल्हा बँकेचे परिणामी ठेवीदारांचे कोट्यवधी रुपयांचे नुकसान होवून याबाबत अनेक सामाजिक संघटनांनी शासनाकडे निवेदन देऊन

५...

प्रकरणाच्या चौकशीची मागणी करणे, वा मागणीकडे शासनाने केलेले अक्षम्य दुर्लक्ष यामुळे बीड जिल्ह्यातील जनतेत व ठेवीदारांमध्ये पसरलेला तीव्र असंतोष व शासनाची प्रतिक्रिया. याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही"

श्री.हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

यानंतर श्री. भोगले....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विक्रम काळे : सभापती महोदय, बीड जिल्हा मध्यवर्ती बँकेत आर्थिक घोटाळे झाले त्याबद्दल त्या बँकेवर प्रशासकाची नियुक्ती करण्यात आली आहे. तीन वेळा प्रशासक बदलण्याचे काम झाले. त्यानंतर प्रशासकीय मंडळ नेमण्याचे काम झाले. प्रशासकीय मंडळाच्या अधिपत्याखाली जिल्हा मध्यवर्ती बँकेचे कामकाज सुरु आहे. प्रशासकीय मंडळाचे प्रमुख हे अपर जिल्हाधिकारी असून पूर्वीच्या लोकनियुक्त मंडळाने कामकाज नीट गेले नाही, बँकेत आर्थिक घोटाळे केले म्हणून अधिकाऱ्याच्या अध्यक्षतेखाली प्रशासकीय मंडळ नेमण्यात आले आहे. अपेक्षा अशी होती की, बँकेचा कारभार सुधारावा, बँकेची आर्थिक वसुली वाढावी, कर्ज येणे बाकी आहे ते वसूल व्हावे. त्या अनुषंगाने प्रशासकीय मंडळ नेमण्यात आले होते. परंतु ज्याला राखायला ठेवले त्यानेच चोरी करण्याचे काम केले आहे. या प्रशासकाने लोकांच्या लाखो रुपयांच्या आर्थिक ठेवी परत देण्यासाठी त्यांच्याकडून कमिशन घेतले.

सभापती महोदय, ज्यांच्या ठेवी होत्या त्यांना पैसे परत देण्यासाठी 20 टक्के कमिशन घेऊन कोट्यवधी रुपयांचा गैरव्यवहार केला आहे. इतकेच नव्हे तर बँकेच्या 17 शाखा बंद केल्या आहेत. त्या शाखांमध्ये काम करणा-या कर्मचाऱ्यांपैकी कोणाला सेवानिवृत्ती द्यायची, कोणाला घरी बसवायचे आणि कोणाला कामावर ठेवायचे याबाबत कर्मचाऱ्यांकडून पैसे गोळा केले. जे पैसे देतील त्यांना सेवानिवृत्त केले, जे पैसे देतील त्यांना कामावर ठेवले आणि जे पैसे देत नाहीत त्यांना सक्तीने सेवानिवृत्त करण्याचे काम केले. शासनाने या संदर्भात चौकशी समिती नेमली. ही चौकशी नि:पक्षपातीपणे व्हायची असेल तर पहिल्यांदा त्या अधिकाऱ्याला सस्पेंड केले पाहिजे. त्या अधिकाऱ्याला सस्पेंड केले जाईल काय? मंत्री महोदयांचा राज्यात नावलौकिक आहे. ते आम्हाला न्याय दिल्याशिवाय राहणार नाहीत याची आम्हाला खात्री आहे.

श्री.हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, बीड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेत श्री.टांकसाळे या महसूल विभागातील अतिरिक्त जिल्हाधिकाऱ्यांना प्रशासक म्हणून नेमले होते. त्यांनी प्रशासक म्हणून बँकेचे कामकाज चालवावे यासाठी ही नेमणूक केली होती. तक्रारीमध्ये ज्या गोष्टी नमूद केल्या आहेत त्या सर्व गोष्टींची चौकशी करण्याकरिता एका चौकशी अधिकाऱ्याची नियुक्ती केलेली आहे. डॉ.खरात यांची दिनांक 29.11.2013 रोजी चौकशी अधिकारी म्हणून नियुक्ती केली आहे. माननीय सदस्यांनी दिलेल्या तक्रार अर्जातील सर्व मुद्दे सहकार विभागाच्या सचिवांच्या माध्यमातून त्यांना कळविलेले आहेत. या सर्व मुद्यांबाबत सविस्तर चौकशी करावयाची आहे.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हर्षवर्धन पाटील............

सभापती महोदय, एखाद्या संस्थेवर प्रशासक नेमला जातो त्यावेळी त्या प्रशासकावर सुध्दा अधिक जबाबदारी असते. मग तो अधिकारी सहकार विभागातील असो किंवा महसूल विभागातील असो. अशा पध्दतीने प्रशासकाबद्दल तक्रारी येणे ही बाब योग्य नाही. ज्यावेळी माझ्याकडे आणि सचिवांकडे तक्रारी प्राप्त झाल्या त्यानंतर संबंधित प्रशासकाची आम्ही बदली केली. बदली केल्यानंतर वृत्तपत्रातून अशाही बातम्या प्रसिध्द झाल्या की, जाणूनबुजून त्या प्रशासकावर कारवाई करण्यात आली. त्या बद्दलचा खुलासा मी स्वत: दौऱ्यावर असताना केला. ज्यांची बदली झालेली आहे त्यांची चौकशी करण्यासाठी एक अधिकारी नियुक्त केलेला आहे. तक्रारीत नमूद केलेल्या गोष्टी व्यतिरिक्त आयुक्तांच्या माध्यमातून त्या प्रशासकाच्या काळातील ऑडिट रिपोर्ट असेल किंवा इतर ज्या घटना घडल्या असतील त्याची सविस्तर चौकशी करु. चौकशी सुरु असून चौकशी अहवाल आल्यानंतर योग्य ती कारवाई करण्यात येईल.

श्री.विक्रम काळे : सभापती महोदय, मंत्री महोदयांनी सविस्तर उत्तर दिले आहे. परंतु ही चौकशी नि:पक्षपातीपणे व्हायची असेल तर त्या अधिकाऱ्याला सक्तीच्या रजेवर का पाठविले जात नाही किंवा सस्पेंड का करीत नाही? मंत्री महोदय बीड जिल्हयामध्ये दौऱ्यावर आले होते. त्या अधिकाऱ्याला पाठीशी घालण्याचे काम का केले जात आहे?

नंतर पी.1...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उप सभापती** : एकाच वेळी सन्माननीय सदस्यांनी कृपा करून बोलू नये. आपण सर्वजण एकाच वेळी बोलला तर नेमके कोणाच्या प्रश्नाला उत्तर द्यायचे हे मंत्री महोदयांना समजणार नाही

श्री.राम पंडागळे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.विनायकराव मेटे, धनंजय मुंढे, अमरसिंह पंडित, श्री.एन.एम.शेख, प्रा.सुरेश नवले व मी असे एकूण 6 सदस्य हे बीड जिल्ह्यातील आहेत. हे प्रकरण अतिशय गंभीर आहे. ते माननीय सहकार मंत्र्यांना देखील समजले आहे. कर्ज देताना लोकांकडून 20 टक्के दराने पैसे घेतले आहेत. हे अतिशय गंभीर प्रकरण आहे. तेव्हा चौकशी करण्यापूर्वीच या अधिकाऱ्याला निलंबित करण्यात यावे अशी मी मागणी करीत आहे. त्यानंतर मग चौकशी करावी. गोरगरीब जनतेला कळू द्यावे की, शासन भ्रष्टचार करणाऱ्या अधिकाऱ्याला पाठीशी घालत नाही.

श्री.हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, या प्रकरणात दोन प्रकारच्या तक्रारी प्राप्त झाल्या आहेत. एक तक्रार नागरिकांकडून व दुसरी तक्रार स्थानिक लोकप्रतिनिधींच्या माध्यमातून आली आहे. या तक्रारीं संदर्भात आम्ही चौकशी अधिकारी नेमला. हा अधिकारी सहकार विभागाचा नाही. तो महसूल विभागाचा अधिकारी आहे. त्याच्याकडे सहकार खात्यांतर्गत येणाऱ्या बँकेवर प्रशासक या नात्याने जबाबदारी होती. त्या जबाबदारीतून त्याला मुक्त करण्यात आले आहे. तो अधिकारी आता महसूल विभागात कार्यरत आहे. या संबंधी मी आजच माननीय महसूल मंत्र्यांशी बोललो आहे. अपर मुख्य सचिव, महसूल यांच्याशी देखील बोललो आहे. औरंगाबादचे विभागीय आयुक्त श्री.जयस्वाल यांच्याशी देखील माझी मागच्या आठवड्यामध्ये चर्चा झालेली आहे. प्रशासक म्हणून तो आज बँकेमध्ये कामाला नाही. त्याचे प्रशासक म्हणून अधिकार काढून घेतले आहेत. रिपोर्ट आल्यानंतर यासंबंधातील योग्य ती कारवाई करण्यात येईल.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, सध्या या बँकेमध्ये किती ठेवी आहेत, 100 कोटी रूपयांच्या ठेवी संबंधी कमिशनर आणि सचिवांची परवानगी त्या अधिकाऱ्याने घेतली होती काय ? बँक आर्थिक डबघाईस आलेली असताना या बँकेचा स्टाफ कमी करण्याचा, प्रमोशन देण्याचा अधिकार प्रशासकाला आहे काय ? प्रशासक म्हणून काम करीत असताना बँकेच्या कर्मचाऱ्यांना प्रमोशन देण्याचे काम होत असेल तर राज्य शासनाला यासाठी मार्गदर्शक तत्त्व ठरवावे लागेल. तशी मार्गदर्शक तत्त्वे शासन ठरविणार आहे काय ?

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी अतिशय व्हॅलिड प्रश्न विचारला आहे. एखाद्या संस्थेवर प्रशासक नेमताना गाईड-लाईन्स करण्याची निश्चितच आवश्यकता आहे. त्या अधिकाऱ्याची येथे ऑर्डर काढावी अशा प्रकारची मागणी करण्यात आली होती. महसूल विभागाच्या अधिकाऱ्याला बँकिंग क्षेत्रातील किती नॉलेज असते याचासुद्धा आम्हाला निश्चित विचार करावा लागेल. कुठल्याही संस्थेवर दुर्दैवाने प्रशासक नेमण्याची पाळी आली तर त्यासाठी नियमावली करण्याची आवश्यकता आहे. कोणत्या कॅटेगरीचा, कोणत्या ग्रेडेशनचा, कोणत्या संस्थेवर प्रशासक नेमावा लागेल याबद्दल सुद्धा काही धोरण ठरविण्याची आवश्यकता आहे. नेमलेल्या प्रशासकाची जबाबदारी काय, तो प्रमोशन देऊ शकतो काय, बदल्या करू शकतो काय, तो डिपॉझिटरचे पैसे देऊ शकतो काय, वन टाईम सेटलमेंट करू शकतो काय, असे आपण प्रश्न उपस्थित केले आहेत. यासंबंधी रिझर्व्ह बँक, नाबार्ड यांची नियमावली असताना सुद्धा या अधिकाऱ्याने त्याच्या कालखंडामध्ये या सर्व गोष्टी कोणत्या कॅपॅसिटीमध्ये केल्या, यास कोणाची मान्यता घेतली हे सर्व चौकशीमध्ये घेतले जाईल. हा अधिकारी अपर जिल्हाधिकारी असून तो महसूल विभागाचा आहे. गरज पडली तर माननीय महसूल मंत्री व अपर मुख्य सचिव यांना देखील सांगण्यात येईल.

यानंतर श्री.जुन्नरे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंतराव जाधव : सभापती महोदय, संबंधित अधिकारी त्याच जिल्हयात कार्यरत आहे. महसूल विभागाचा प्रभाव खात्यावर संपूर्णपणे असल्यामुळे ही लक्षवेधी सूचना आपण राखून ठेवणार आहात काय किंवा माननीय महसूल मंत्र्यांना अर्ध्या तासात या सभागृहात पाचारण करुन त्यांच्याकडून माहिती घेतली जाईल काय ? या ठिकाणचे प्रोसिडींग गेल्या एक वर्षापासून लिहिले गेले नव्हते. आता हे प्रोसिडींग गायब झालेले आहे. सदर गायब झालेल्या प्रोसिडींग संबंधी फौजदारी गुन्हा दाखल करण्यासाठी आताचे जे विद्यमान प्रशासक आहेत त्यांना सांगितले जाणार आहे काय ? संबंधित मुदत कर्जाची मुदत संपलेली नसतांना 4500 निरपराध शेतकऱ्यांवर जे गुन्हे दाखल करण्यात आलेले आहेत ते मागे घेतले जाणार आहेत काय ?

श्री. हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, या प्रकरणाची चौकशी सुरु आहे हे मी मागच्या प्रश्नाच्या उत्तरामध्ये सुध्दा सांगितले होते. या ठिकाणी जे काही मुद्दे उपस्थित करण्यात आलेले आहेत ते मुद्दे सुध्दा चौकशीमध्ये आहेत. संबंधित अपर जिल्हाधिकारी आता सहकारात काम करीत नसून ते आता महसूल विभागामध्ये काम करीत आहेत. रिपोर्ट आल्यानंतर त्यामध्ये संबंधित अधिकारी दोषी आढळला तर संबंधितावर निश्चितपणे योग्य ती कारवाई केली जाईल. पुढील कारवाई करण्याची गरज पडली तर पुढील कायदेशीर कारवाई करण्यासाठी आमचा प्रयत्न राहील एवढे मी या निमित्ताने सांगू इच्छितो.

श्री. विनायक मेटे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. विक्रम काळे तसेच इतर सहकाऱ्यांनी बीड जिल्हयाच्या संदर्भातील महत्वाची लक्षवेधी सूचना या ठिकाणी उपस्थित केलेली आहे. लक्षवेधी सूचनेमध्ये विचारण्यात आलेले प्रश्न आणि त्यावर माननीय मंत्री महोदयांनी दिलेली उत्तरे यामधून काहीही निष्पन्न झालेले नाही असेच दिसून येईल. प्रश्नाला न्याय मिळण्यासाठी सभागृहात प्रश्न उपस्थित केले जात असतात. जर आमच्या प्रश्नाला न्याय मिळणार नसेल तर प्रश्न उपस्थित करण्याला काही अर्थ राहणार नाही. या ठिकाणी माननीय मंत्री महोदयांनी सांगितले आहे की, संबंधित अधिकारी आता महसूल विभागामध्ये काम करतात. परंतु आपण जेष्ठ मंत्री आहात त्यामुळे मंत्री मंडळाचा सांघिक निर्णय म्हणून माननीय मंत्री महोदय, निर्णय घेऊ शकतात, संबंधित अधिकाऱ्याच्या निलंबनाची घोषणा निश्चितपणे करु शकतात. त्यामुळे संबंधित अधिकाऱ्याला निलंबित करण्याची घोषणा माननीय मंत्री महोदय करणार आहात काय ? जर आपण संबंधित

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनायक मेटे ....

अधिकाऱ्याचे निलंबन करु शकत नसाल तर ही लक्षवेधी सूचना प्रलंबित ठेवून उद्या घेण्यात यावी व यासंदर्भात माननीय महसूल मंत्र्यांबरोबर काय तो निर्णय आपण घ्यावा. अशी विनंती आहे.

श्री. हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, या लक्षवेधी सूचनेला उत्तर देत असतांना नेमलेल्या चौकशीचा रिपोर्ट एक महिन्याच्या आत पूर्ण केला जाईल. या प्रकरणामध्ये संबंधित अधिकाऱ्याची आपण दुसरीकडे बदली केली असून संबंधित प्रकरणाची चौकशी एक महिन्यात पूर्ण केली जाईल. या प्रकरणात नियमाप्रमाणे कडक कारवाई करणे अपेक्षित असेल तर त्या प्रमाणे योग्य ती कडक कारवाई करण्यात येईल. या प्रकरणामध्ये कोणालाही पाठीशी घातले जाणार नाही.

**उप सभापती** : आता सभागृहाची विशेष बैठक स्थगित होत असून सभागृहाची नियमित बैठक दुपारी 1.00 वाजता पुन: सुरु होईल.

( सभागृहाची बैठक दुपारी 12.54 ते 1.00 वाजेपर्यंत स्थगित झाली.)

---

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

AJIT/ KTG/ पूर्वी श्री.जुन्नरे.. 1:00

**(स्थगितीनंतर )**

**(सभापतीस्थानी माननीय सभापती )**

**<u>मराठा समाजाला आरक्षण देण्याच्या संदर्भात पॉईन्ट ऑफ इन्फर्मेशन बाबत</u>**

श्री.विनायक मेटे : सभापती महोदय, मागील आठवड्यात मराठा समाजाला आरक्षण देण्याच्या संदर्भातील प्रश्न येथे चर्चेला आला होता. या प्रश्नाच्या संदर्भात ज्येष्ठ मंत्री श्री.नारायण राणे यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमण्यात आलेली आहे. तरी देखील हा प्रश्न येथे चर्चेला आला. या प्रश्नावर माननीय मुख्यमंत्री महोदयांनी उत्तर द्यावे असा आम्ही आग्रह धरला होता. आपणही आमचा आग्रह मान्य करुन माननीय मुख्यमंत्री महोदयांकडून पुढील आठवडयात उत्तर देण्यात येईल असे सांगितले. आज माननीय मुख्यमंत्री महोदयांशी संबंधित असलेल्या प्रश्नांचा दिवस आहे आणि दोन दिवसानंतर अधिवेशन संपणार आहे. या प्रश्नाच्या संदर्भात अजूनही काही कार्यवाही झालेली दिसत नाही.

सभापती महोदय, मी आपले आभार मानतो कारण गेल्या वर्षी दिनांक 19 डिसेंबर, 2012 रोजी या सभागृहात मराठा समाजाच्या आरक्षणा संदर्भातील चर्चेवरुन सभागृहाचे कामकाज बंद पाडण्यात आले होते. परंतु आपल्या पुढाकाराने माननीय मुख्यमंत्री महोदयांना बैठक घ्यावी लागली. आपल्या पुढाकारामुळे मराठा समाजाला न्याय मिळाला. आपल्या पुढाकारामुळे ज्येष्ठ मंत्री श्री.नारायण राणे यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमण्यात आली. या समितीला तीन महिन्याची मुदत दिली होती. आता वर्ष झालेले आहे, परंतु मराठा समाजाच्या आरक्षणाच्या संदर्भात अजून निर्णय झालेला नाही. मराठा समाजाला न्याय देणे गरजेचे आहे. आपल्या पुढाकाराशिवाय हा प्रश्न सुटणार नाही. तेव्हा माझी आपणास नम्र विनंती आहे की, आपण उद्या तरी मराठा समाजाच्या आरक्षणा संदर्भातील प्रश्न लावावा व या प्रश्नाच्या संदर्भात शासनाने सक्षमपणे निर्णय द्यावा असे शासनास आदेश द्यावेत.

**सभापती** : मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, माननीय मुख्यमंत्री महोदयांना या प्रश्नाला उद्या म्हणजे गुरुवार दिनांक 19 डिसेंबर, 2012 रोजी उत्तर देण्याच्या अनुषंगाने कळविले आहे.

------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

<u>**सभागृहाच्या कामकाजासंबंधी**</u>

श्री.अमरसिंह पंडित : सभापती महोदय, आजच्या कामकाजपत्रिकेतील अनुक्रमांक आठवर सत्ताधारी पक्षाचा नियम 260 अन्वयेचा प्रस्ताव दाखविण्यात आलेला आहे. परंतु आता जोडपत्र काढून अनुक्रमांक आठवर विरोधी पक्षाचा अंतिम आठवडा प्रस्ताव दाखविण्यात आलेला आहे. आपण आज अंतिम आठवडा प्रस्तावावरील चर्चा ठेवल्यामुळे आम्ही मराठवाड्याच्या सर्वांगीण विकासा संदर्भात दिलेला नियम 260 अन्वयेचा प्रस्ताव पुढे ढकलला जाणार आहे. तेव्हा आपण आम्हाला न्याय द्यावा अशी विनंती आहे.

**सभापती** : मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, मराठवाड्याच्या सर्वांगीण विकासा संदर्भातील आपला महत्वाचा प्रस्ताव आहे. हा प्रस्ताव कसा चर्चेला येईल या दृष्टीने मी प्रयत्न करीन. तेव्हा आपण काळजी करु नये.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, महिला व बालकांवर होत असलेल्या अत्याचारा संदर्भातील प्रस्तावावर चर्चा झालेली आहे. परंतु या चर्चेवरील माननीय मंत्री महोदयांचे उत्तर अजून झालेले नाही.

**सभापती** :मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, ज्या दिवशी एखाद्या प्रस्तावावर चर्चा होते त्याच दिवशी माननीय मंत्री महोदयांचे उत्तर होणे अपेक्षित असते. परंतु आपण चर्चा करायची आणि आठ-दहा दिवसानंतर माननीय मंत्री महोदयांचे उत्तर घ्यायचे अशी अनिष्ट प्रथा चालू आहे. आपण ही पध्दत बंद करणे आवश्यक आहे.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांचे उत्तर केव्हा होईल ?

**सभापती** : सभागृहापुढील कामकाज पाहून मी सांगतो.

--------



अमुद्रित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: तोंडी उत्तरे

**अमरावती येथील बेलोरा विमानतळाचे विस्तारीकरण करण्याबाबत**

**(1) * 46540 श्री.प्रवीण पोटे-पाटील, डॉ.रणजित पाटील,श्रीमती शोभाताई फडणवीस , श्री.मितेश भांगडिया** : सन्माननीय **मुख्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) अमरावती येथील पंचतारांकित औद्योगिक वसाहत विकास होण्याच्या दृष्टीने विस्तारीत विमानतळाची गरज भासणार असल्यामुळे बेलोरा विमानतळाचे विस्तारीकरण करण्यात येणार आहे, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, सदर विमानतळ विस्तारीकरणाच्या दृष्टीने शेतकऱ्यांची 286 हेक्टर जमीन अधिग्रहीत करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(3) असल्यास, उर्वरीत विस्तारीकरणाला लागणारी जमीन अधिग्रहण करताना विलंब होत आहे, हे ही खरे आहे काय,

(4) असल्यास, विमानतळाच्या पायाभूत सुविधांसाठी विमानतळ प्राधिकरणाने 250 कोटीचा प्रस्ताव शासनाकडे पाठविला आहे, हे ही खरे आहे काय,

(5) असल्यास, विमानतळाचे विस्तारीकरण हे अमरावती-यवतमाळ राज्य महामार्ग विस्तारीकरणाअभावी प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,

(6) असल्यास, विमानतळ विस्तारीकरण तसेच वरील प्रश्नांचे निवारण करण्याच्या दृष्टीने शासनस्तरावर कोणत्या प्रकारची कार्यवाही करण्यात येत आहे,

(7) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा.फौजिया खान, श्री.पृथ्वीराज चव्हाण यांच्याकरिता** : (1) विदर्भातील महत्वाकांक्षी मिहान प्रकल्प, अमरावती जवळील नांदगाव पेठ येथील विशेष आर्थिक क्षेत्र, परिसरातील उद्योग, कापूस, संत्रा इ.शेतमालाची वाहतूक, शिक्षणसंस्था इ.विचारात घेता वाहतुकीच्या सक्षमीकरणाकरिता तसेच नागपूर विमानतळावरील वाहतुकीचा भार कमी करण्याच्या दृष्टीने अमरावती जिल्ह्यात बेलोरा येथे नवीन ग्रीनफोल्ड विमानतळ विकसित करण्यात येत आहे.

(2) बेलोरा, जि.अमरावती येथील विमानतळाच्या विस्तारीकरणाच्या दृष्टीने अंदाजे 281.72 हेक्टर जमिनीचे संपादन पूर्ण करण्यात आले आहे.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 46540...

प्रा.फौजिया खान.....

(3) संपादित केलेल्या जमिनीच्या आतील भागातून सुटलेल्या 6.65 हेक्टर व डि.व्ही.ओ.आर. करिता आवश्यक असलेल्या 29.23 हेक्टर जमीन संपादनाची कार्यवाही महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनीमार्फत सुरू आहे. त्यामुळे संपादनास विलंब होत आहे असे म्हणता येणार नाही.

(4) हे खरे नाही.

(5) हे खरे नाही.

(6) व (7) विमानतळासाठी आवश्यक जमिनीच्या भूसंपादनाची कार्यवाही करण्यात येत आहे. बेलोरा, जि.अमरावती येथील विमानतळ विकसित करण्याची इच्छुकता भारतीय विमानपत्तन प्राधिकरणाने दर्शविली असून त्यानुषंगाने भारतीय विमानपत्तन प्राधिकरणास विस्तृत प्रस्ताव सादर करण्याची विनंती करण्यात आली आहे.

यानंतर श्री.बोर्डे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SJB/ D/ KTG/ पूर्वी श्री.अजित.... 13:05

ता.प्र.क्र.46540...

श्री.प्रवीण पोटे-पाटील : सभापती महोदय, अमरावती येथील विमानतळाच्या विस्तारीकरणाचा प्रश्न हा गंभीर असून, तो अनेक दिवसांपासून रखडलेला आहे. तत्कालीन राष्ट्रपती महामहिम श्रीमती प्रतिभाताई पाटील यांच्या कारकिर्दीपासून हा प्रश्न प्रलंबित आहे. अमरावती येथील एमआयडीसी विकसित होण्याच्या दृष्टीने या विमानतळाचा विस्तार होणे आवश्यक आहे. या निमित्ताने मी विचारु इच्छितो की, विमानतळाच्या विस्तारीकरणासाठी किती कोटी रुपयांचा प्रस्ताव तयार केला आहे, या विमानतळाच्या विस्तारीकरणाच्या प्रस्तावाला मान्यता देण्यात येणार आहे काय, त्या ठिकाणी भूसंपादनाचे जे काम शिल्लक राहिलेले आहे ते दोन महिन्यात पूर्ण करण्यात येईल काय ? आजची परिस्थती अशी आहे की, त्या विमानतळाच्या धावपट्टीवर विमान उतरु शकत नाही. दोन-तीन वेळा व्हीव्हीआयपी त्या भागात आले होते. सध्याच्या विमानतळाच्या ठिकाणी विमान उतरविणे योग्य नाही असे विमानतळ विभागाने जे सांगितले आहे ते खरे आहे काय ? आम्ही वर्तमानपत्रात वाचले की, अमरावती येथील विमानतळावर विमाने उतरावीत म्हणून धावपट्टीची दुरुस्ती करण्यासाठी महाराष्ट्र शासन निधी उपलब्ध करुन देणार आहे. मी विचारु इच्छितो की, खरोखरच धावपट्टीची दुरुस्ती करण्यासाठी महाराष्ट्र शासन निधी उपलब्ध करुन देणार आहे काय ?

प्रा.फौजिया खान : महोदय, आज सकाळी लक्षवेधी सूचनेवरील उत्तराच्या वेळी आदरणीय मुख्यमंत्र्यांनी सांगितले की, राज्य सरकारच्या प्रस्तावित विमानचालन धोरणानुसार प्रत्येक महसुली विभागामध्ये किमान एक किंवा दोन नाईट लँडींग फॅसिलिटीसह धावपट्टी करण्यात येईल. विदर्भातील नागपूर येथे मिहान प्रकल्प आहे. अमरावती येथे महत्त्वाचा एयरपोर्ट प्रस्तावित आहे. दिनांक 27 फेब्रुवारी 2009 रोजीच्या जी.आर.नुसार अमरावतीचे विमानतळ एमआयडीसीकडून एमएडीसीकडे हस्तांतरित करण्याचा निर्णय घेतला होता. हे विमानतळ बीओटी तत्त्वावर एमआयडीसीकडून एमएडीसीला देऊन विकास करण्याबाबतचा निर्णय घेण्यात आला होता. त्यानुसार सर्व भौतिक सुविधांसह 71.40 हेक्टर जमीन एमएडीसीला देण्याचा निर्णय घेण्यात आला होता. अमरावती विमानतळाची धावपट्टी वाढविण्यासाठी आणि त्या भागातील महामार्गांसाठी 288.73 हेक्टर जमीन देण्याचे ठरले आहे. त्या भागातील लोकांचे पुनर्वसन करणे सुध्दा आवश्यक आहे. या सर्व कामांसाठी संरक्षण, पर्यावरण, विमानचालन, भारतीय विमानपतन इत्यादी

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.46540...

प्रा.फौजिया खान....

मंत्रालयांची परवानगी घ्यावयाचे ठरले होते. सध्या अमरावती विमानतळाची धावपट्टी 1372 x 30.50 मीटर असून, तिचा विस्तार करुन ती 2600 x 45 मीटर करणे आवश्यक आहे. त्या ठिकाणी 35 हजार स्क्वेअर फूटची 200 प्रवासी क्षमतेची टर्मिनल बिल्डींग करणे, फायर स्टेशन, एटीआर टॉवर इत्यादींचा विकास करण्याचे ठरविले होते. या कामांसाठी राज्य सरकारचा 90 कोटी रुपये आणि केंद्र सरकारचा 200 ते 300 कोटी रुपये खर्च होणे अपेक्षित होते. महोदय, या संदर्भातील प्रक्रिया सुरु असतानाच हे काम बीओटी तत्त्वाऐवजी एयरपोर्ट ऑथॉरिटी ऑफ इंडिया यांच्याकडून करुन घेण्याबाबत माननीय मुख्यमंत्र्यांकडे बैठक घेण्यात आली. अपर मुख्य सचिव त्या बैठकीला उपस्थित होते. कोणताही कायदेशीर बोजा नसलेली जमीन विनामूल्य उपलब्ध करुन दिल्यास अमरावती येथील विमानतळ विकसित करण्याची तयारी एयरपोर्ट ऑथॉरिटी ऑफ इंडियाने दाखविली आहे. त्यांनी सांगितले आहे की, जळगाव एयरपोर्टचा जसा विकास केला त्याच धर्तीवर अमरावती एयरपोर्टचा विकास करता येईल. त्यानुसार त्यांना दिनांक 02/08/2013 आणि 31/08/2013 रोजी डिटेल प्रस्ताव पाठविण्याबाबत पत्र पाठविले होते. त्यांनी दिनांक 06/12/2013 रोजी सदरहू प्रस्तावाच्या बाबतीत एक पत्र पाठविले आहे. दीर्घ मुदतीसाठी भाडे तत्त्वावर त्यांना जमीन देणे, एमओयु करणे,

नंतर श्री.कांबळे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**<u>ता.प्र.क्र. 46540 ....</u>**

प्रा. फौजिया खान ....

बडनेरा-यवतमाळ बायपास आहे. नॅशनल हायवे क्रमांक 6 मध्ये 6 पदरी रस्ता करून देणे, गौण खनिज वापराबाबत रॉयल्टीमधून सूट देणे किंवा अकृषिक आकारणीची सूट देणे, मालमत्ता कराची सूट देणे इत्यादी सवलती त्यांनी दाखविल्या आहेत. आता आपण बीओटी तत्वावरचा निर्णय घेतला आहे, कार्यवाही झाली आहे. 288 हेक्टर मधील 281 हेक्टर जमीन संपादित केली आहे. फक्त 6.62 हेक्टर जमीन संपादित करण्याची राहिलेली आहे. मला या संदर्भात डिटेल माहिती देता येईल.

सभापती महोदय, अमरावती-यवतमाळ वळण रस्त्याकरिता सुध्दा भूसंपादनाची कार्यवाही गतिमान पध्दतीने होत आहे. कार्यकारी अभियंत्याकडे ताबा वाटप पूर्ण होऊन त्यांना ते देण्यात आले आहे. फक्त 35.88 हेक्टर भूसंपादनाची कार्यवाही सुरू आहे. सेक्शन 5, 6 प्रमाणे ही कार्यवाही सुरू आहे. अमरावती एअरपोर्टची कार्यवाही गतीने होत आहे. शासनाचे धोरण आहे की, हे एअरपोर्ट लवकर तयार व्हावे.

श्रीमती शोभा फडणवीस : सभापती महोदय, हे करता येईल, ते करणार आहोत, त्यांना देणार आहोत, बीओटीवर देणार आहोत, असे उत्तर देण्यात आले आहे. ठोस निर्णय दिलेला नाही. माननीय मंत्री या संदर्भातील ठोस निर्णय कधी देणार ? जमीन संपादित केली आहे. परंतु, पुढील प्लॅनकरिता किती खर्च येणार आहे, ते केव्हा सुरू होणार आहे ? हे करू, ते करू, असे भविष्यातील बोलत आहेत. इतक्या तारखेपर्यंत करू, असे ठोस उत्तर आम्हाला अपेक्षित आहे. आपण कशा पध्दतीने करणार, केव्हा देणार, याचे उत्तर मिळाले पाहिजे. विमानतळ विकसित करण्याची इच्छा भारतीय विमानपत्तन प्राधिकरणाने दर्शविली असून त्या अनुषंगाने भारतीय विमानपत्तन प्राधिकरणास विस्तृत प्रस्ताव सादर करण्याची विनंती करण्यात आली आहे, असे उत्तरात सांगितले आहे. ही विनंती केव्हा केली, त्यांच्याकडून प्रस्ताव आला का, तो किती कोटी रूपयांचा आहे ?

प्रा. फौजिया खान : सभापती महोदय, मी याचे डिटेल्स दिले आहेत. भारतीय विमानपत्तन प्राधिकरणाकडून प्रस्ताव आला आहे, त्यांनी आपल्यासमोर कंडिशन्स ठेवल्या आहेत, त्याप्रमाणे





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**<u>ता.प्र.क्र. 46540 ....</u>**

प्रा. फौजिया खान ....

बीओटी तत्वाच्या ऐवजी एअरपोर्ट ऑथोरिटी ऑफ इंडिया हे करण्यासाठी तयार आहे. मी स्वत: या संदर्भात अमरावतीला जाऊन आले आहे. राज्य शासन हायवे वगैरे गोष्टी करण्यासाठी 90 कोटी रूपये देणे अपेक्षित आहेत आणि 200 ते 300 कोटी रूपयांचा खर्च करण्यास एअरपोर्ट ऑथोरिटी ऑफ इंडिया तयार आहे. मी सर्व लोकप्रतिनिधींची बैठक घेतले आणि त्यांचे प्रश्न जाणून घेतले. भूसंपादनाची कार्यवाही आहे. माझ्या सोबत एसीएससुध्दा तिकडे गेले होते. ही प्रक्रिया लवकर व्हावी, यासाठी सर्व सूचना देण्यात आल्या आहेत.

----

..3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**मुंबईतील सातरस्ता येथील विकासकाने बॅलन्स कॅपिटल व्हॅल्यू**
**आणि व्याजापोटीची रक्कम न दिल्याबाबत**

**(2) * 46784 श्री. विजय ऊर्फ भाई गिरकर , श्री.विनोद तावडे , ॲड.आशिष शेलार** : सन्माननीय **मुख्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) मुंबईतील सातरस्ता येथील विकासकाने बॅलन्स कॅपिटल व्हॅल्यू आणि व्याजापोटीचे 48 लाख रुपये न दिल्याने इमारत बांधून तयार असतानाही पालिकेच्या 84 सफाई कर्मचाऱ्यांचे संसार रस्त्यावर येण्याची वेळ आल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, कर्मचाऱ्यांना विकासकाकडून मिळत असलेल्या सहा हजार रुपये घराचे भाडे जून पर्यंत असून यापुढे भाडे न देण्याचे विकासकाकडून कळविण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(3) असल्यास, त्यामुळे कर्मचारी हवालदिल झाले असून यापुढे त्यांच्या राहण्याची समस्या निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(4) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय,

(5) असल्यास, चौकशीनुसार कोणत्या उपाययोजना करण्यात आल्या आहेत ?

**श्री. उदय सामंत, श्री.पृथ्वीराज चव्हाण यांच्याकरिता :** (1) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या जी/दक्षिण विभागातील सात रस्त्याजवळील जे.आर.बोरिचा मार्गावरील महापालिका वसाहतीच्या पुनर्विकास प्रस्ताव झोपडपट्टी सुधार प्राधिकरणामार्फत विकास नियंत्रण नियमावली 33 (14) अंतर्गत मंजूर करण्यात आला होता. प्रस्तावानुसार संबंधित विकासकाने कॅपिटलाईज्ड व्हॅल्यूपोटी महापालिकेला रूपये 1,23,35,000/- भरणा करणे आवश्यक होते. सदर रक्कम विकासकाने वेळेवर भरणा न केल्याने विलंबाने केलेल्या भरण्यापोटी विकासकाने रू.48.00 लाख व्याज भरणे देय झाल्याचे त्याला कळविण्यात आले. विकासकाने रक्कम वेळेवर भरणा न केल्याने झोपडपट्टी पुनर्विकास प्राधिकरणाने बांधकामास ताबा प्रमाणपत्र दिले नाही. संबंधित विकासकाने दिनांक 9.10.2013 रोजी रू.24,67,000/- रकमेचा भरणा केला आहे. उर्वरित संपूर्ण कॅपिटलाईज्ड व्हॅल्यूचा भरणा केल्यावर व्याजाची रक्कम त्यांचेकडून वसूल करणेसापेक्ष ताबा प्रमाणपत्र देण्याची विनंती झ ोपडपट्टी पुनर्विकास प्राधिकरणाला महापालिकेने केली व त्याप्रमाणे त्यांनी ताबा प्रमाणपत्र दिल्यावर दिनांक 2.11.2013 रोजी तेथील विस्थापित सफाई कामगारांना नवीन महापालिका सेवा निवासस्थानाचे पुनर्वाटप करण्यात आले.

(2) विकासकाने सफाई कामगारांना दिनांक 9.10.2013 रोजी दिनांक 30 सप्टेंबर, 2013 पर्यंत घर भाड्याचे अधिदान केलेले आहे.

(3), (4) व (5) कर्मचाऱ्यांना सेवा निवासस्थानाचा ताबा दिलेला आहे.

श्री. भाई गिरकर : सभापती महोदय, मी सफाई कामगारांच्या एनजीओ चालवित असल्यामुळे मला या विषयाच्या संदर्भात अधिक माहिती आहे. सफाई कामगारांच्या घरांची योजना 33(10) अंतर्गत मान्य झाली, 33(10) प्रमाणे मालकी तत्वावरील घरांचा करार करून घेण्यात आला.





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**ता.प्र.क्र. 46784 ....**

श्री. भाई गिरकर ....

परंतु, असे असताना, 33(14) प्रमाणे बिल्डर व अधिकारी यांच्या संगनमताने त्यांना रूम देण्यात आला आहे. झोपडपट्टीवासीयांना 269 चौ.फु.चे घर देण्यात आले. मात्र सफाई कामगारांना 180-190 चौ.फु.ची घरे देण्यात आली आहेत. 33(10) प्रमाणे करार केला असताना देखील 33(14) प्रमाणे, महानगरपालिकेचे अधिकारी व विकासक यांनी घोटाळा केला आहे. शासन त्यांच्यावर कारवाई करणार का ? इमारतीला ओसी मिळाली नाही, पाण्याची अडचण आहे, सर्व अडचणी आहेत आणि असे असताना सफाई कामगारांना तेथे कोंडलेले आहे. किती कामगार तेथे राहिले आहेत किंवा रहायचे आहेत, संबंधित दोषींवर कारवाई करणार का आणि 33(10) प्रमाणेच सफाई कामगारांना घरे देणार का ?

( नंतर श्री. खंदारे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.46784.....

श्री.उदय सामंत : सभापती महोदय, नियम 33(10) अनुसार ही योजना सुरु करण्याचा निर्णय घेतला होत. परंतु नंतर नियम 33(14) अनुसार ही योजना पूर्ण केलेली आहे. 84 सफाई कामगारांना 225 चौ.फु.च्या सदनिका दिलेल्या आहेत. त्याचप्रमाणे 113 सदनिका विकासकाकडून घेण्यात आलेल्या आहेत. विकासकाने 1 कोटी 23 लाख 35 हजार रुपये भरण्यास विलंब केल्यामुळे 48 लाख रुपयांचे व्याज लावलेले आहे. या सदनिका सफाई कामगारांना दिलेल्या आहेत. सगळ्यात महत्वाची गोष्ट म्हणजे त्या विकासकाकडून 1 कोटी 23 लाख 35 हजार रुपये भरुन घेतलेले आहेत. व्याजाचे 48 लाख रुपये सफाई कामगारांकडून येणे बाकी आहे, ते पैसेही भरण्याच्या सक्त सूचना दिल्या आहेत. जोपर्यंत 48 लाख रुपये भरले जात नाहीत तोपर्यंत सेलेबल कॉम्पोनण्टमधील सदनिकांसाठी ओसी देऊ नये असे एसआरएला कळविले आहे.

श्री.भाई गिरकर : 33(10) प्रमाणे सफाई कामगारांबरोबर करारनामा करण्यात आला. त्याप्रमाणे काम झाले असते तर त्यांना 269 चौ.फुटाचे घर मिळाले असते. बिल्डर व अधिकाऱ्यांनी कायद्याचे उल्लंघन केलेले आहे. 33(10) ऐवजी 33(14) खाली ही योजना का केली आणि ती बिल्डरच्या फायद्यासाठी करण्यात आली आहे काय ? त्यामुळे या कन्व्हर्शनची चौकशी केली जाईल काय, या सफाई कामगारांना मालकी तत्वावर घरे देण्याचा करार केलेला असताना सेवा निवासस्थानात बदल का करण्यात आला त्याचीही चौकशी केली जाईल का ?

श्री.उदय सामंत : स्लमसाठी 33(10) हा नियम लागू होतो. परंतु यामध्ये सन 2009-10 मध्ये सुधारणा करण्यात आली. त्यानुसार 33(14) अन्वये सफाई कामगारांना घरे देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. तेथे नियम 33(10) अनुज्ञेय नसल्यामुळेच नियम 33(14) नुसार काम केलेले आहे. सदरहू सेवा निवासस्थाने 84 कामगारांना देण्यात आलेली आहेत.

-----

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ D/ KTG/

**आचरा (जि.सिंधुदूर्ग,ता.मालवण) येथील दत्तात्रय भाऊ कोयंडे यांच्या स्मारकाची होत असलेली दुरवस्था**

**(3) * 45598 श्री.किरण पावसकर , श्री.हेमंत टकले , श्री.रमेश शेंडगे , श्री.प्रकाश बिनसाळे , श्री.नरेंद्र पाटील , श्री.जयवंतराव जाधव** : सन्माननीय **मुख्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) आचरा (जि.सिंधुदुर्ग,ता.मालवण) येथील श्री.दत्तात्रय भाऊ कोयंडे यांचे हुतात्मा स्मारक सुमारे 30 वर्षापूर्वी बांधले असून या स्मारकाची दुरवस्था झाली आहे, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, हे हुतात्मा स्मारक चुकीने शासकीय जागेवर न बांधता खाजगी जागेत बांधण्यात आल्याची बाब 30 वर्षानंतर निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(3) असल्यास, स्मारक ज्या ठिकाणी आहे तेथेच ठेऊन ही खाजगी जागा ग्रामपंचायतीला स्मारकांसाठी मिळावी व या कामासाठी मिळालेल्या 10 लाख रुपयाच्या निधीतून स्मारक दुरुस्ती व इतर कामे करावीत असा ठराव ग्रामपंचायत आचरा यांनी घेऊन ठरावाची प्रत महसूल राज्यमंत्री यांचेकडे दिनांक 5 ऑक्टोबर, 2013 रोजी वा त्या सुमारास पाठविली आहे, हे खरे आहे काय,

(4) असल्यास, यावर शासनाने कोणता निर्णय घेतला आहे,

(5) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा.फौजिया खान, श्री.पृथ्वीराज चव्हाण यांच्याकरिता** : (1) होय.

(2) होय.

(3), (4) व (5) सरपंच, ग्रामपंचायत, आचरा यांचे यासंदर्भातील पत्र जिल्हाधिकारी कार्यालयाकडे प्राप्त झाले असून, स्मारकाची सद्याची जागा व स्मारकासाठी मूळ संपादित जागा या वेगळया असल्याने जागा अदलाबदल अथवा सध्याच्या मालकाकडून दानपत्र करुन घेणे इत्यादीबाबत जिल्हाधिकारी, सिंधुदुर्ग कार्यालयामार्फत कार्यवाही करण्यात येत आहे.

श्री.हेमंत टकले : आचरा, ता.मालवण, जि.सिंधुदुर्ग येथील श्री.दत्तात्रय भाऊ कोयंडे यांचे हुतात्मा स्मारक 30 वर्षांपूर्वी बांधले होते. शासनाचा कारभारच मजेशीर आहे. 30 वर्षानंतर ही जागा व मूळ जागा यामध्ये फरक आहे असे निदर्शनास आले आहे. हे स्मारक खाजगी जागेवर बांधले होते. एका छोट्याशा गावातील एका हुतात्याचे स्मारक होते. 10 लाख रुपयांच्या निधीतून स्मारकाची दुरुस्ती व इतर कामे करण्यासाठी ग्रामपंचायतीने ठराव करुन दिलेला आहे. महत्वाच्या हुतात्म्याच्या स्मारकाच्या बाबतीत शासनाकडून निष्काळजीपणा होत आहे. लेखी उत्तरात असे नमूद केले आहे की, "जागा अदलाबदल अथवा सध्याच्या मालकाकडून दानपत्र करुन घेणे" दानपत्र घ्यावयाचे असल्यास त्यांना काही मोबदलाही द्यावा लागेल. हे प्रश्न दीर्घ काळ प्रलंबित न राहता भारताच्या स्वातंत्र्याशी निगडीत असलेल्या हुतात्म्यांचे स्मारक आहे याची शासनाने जाणीव ठेवली पाहिजे.

नंतर श्री.शिगम.......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.45598....

तेव्हा "लवकरात लवकर" असे उत्तर न देता पुढे येणाऱ्या प्रजासत्ताक दिनाच्या दिवशी या स्मारकाच्या जागेचे प्रकरण मिटून स्मारकाची दुरुस्ती होईल आणि गावकऱ्यांच्या दृष्टीने अभिमानाचे असलेले हे स्थळ निश्चितपणे उभारले जाईल अशा प्रकारचे उत्तर मंत्री महोदयांकडून अपेक्षित आहे.

प्रा. फौजिया खान : आचरा, ता.मालवण, जिल्हा सिंधुदुर्ग येथील हुतात्मा कै. दत्तात्रय भाऊ कोयंडे यांचे स्मारक 30 वर्षापूर्वी बांधण्यात आले होते. 30 वर्षापासून या स्मारकाकडे कुणाचे लक्ष गेले नाही. श्री. आबा गणपत मिराशी, श्री.काशिराम रघु मिराशी श्री. यशवंत शंकर मिराशी या जमीन मालकांनी 1981मध्ये ही जमीन विनामूल्य दिली होती. शासनाचे नाव सदर जमिनीच्या 7/12वर नोंदविण्यात आले. परंतु या जमिनीची जेव्हा मोजणी करण्यात आली त्यावेळी हे स्मारक दुसऱ्या जमिनीवर बांधण्यात आलेले असल्याचे निदर्शनास आले. आचरा ग्रामपंचायतीने 5.10.2013 रोजी जिल्हाधिका-यांना पत्र लिहिलेले आहे की, हे स्मारक चुकीच्या जागेवर बांधण्यात आलेले आहे. यानुषंगाने या प्रकरणाची सर्व माहिती घेऊन अहवाल सादर करावा अशा प्रकारचे आदेश जिल्हाधिकाऱ्यांनी तहसीलदारांना दिले. जिल्हाधिकारी, सिंधुदुर्ग यांनी असे पत्र लिहिलेले आहे की, या स्मारकाच्या जागेची अदलाबदल करावी किंवा संबंधिताकडून दानपत्र घेण्याची कारवाई करावी अशा प्रकारच्या सूचना दिलेल्या आहेत. सन्माननीय सदस्यांनी सांगितले की, आचरा ग्रामपंचायतीला नागरी सुविधा योजनेंतर्गत 10 लाख रुपये प्राप्त झालेले आहेत. परंतु जोपर्यंत हा जमिनीचा प्रश्न मिटत नाही तोपर्यंत हा पैसा खर्च करता येणार नाही. महाराष्ट्रामध्ये 206 हुतात्मा स्मारके आहेत. या हुतात्मा स्मारकासाठी आमदार निधीतून खर्च करुन त्यांची देखभाल दुरुस्ती करण्याचे धोरण शासनाने स्वीकारलेले आहे. त्या शिवाय डीपीडीसीच्या निधीमधून भरीव तरतूद करता येईल. माननीय मुख्यमंत्री महोदयांनी 14.1.2013 रोजी सर्व पालकमंत्र्यांना पत्र पाठवून सर्व हुतात्मा स्मारकाकडे लक्ष देण्याच्या सूचना दिलेल्या आहेत. पालकमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली असलेल्या समितीकडून या स्मारकांची देखभाल होणे अपेक्षित आहे. त्याबाबत सूचना दिलेल्या आहेत. हा प्रश्न लवकर मार्गी लागेल यादृष्टीने प्रयत्न सुरु आहेत.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.45598....

श्री. विजय सावंत : सन्माननीय सदस्य श्री. हेमंत टकले साहेबांनी विचारलेल्या प्रश्नाचे उत्तर आले नाही. जमिनीचे दानपत्र किंवा बक्षिसपत्र एक दिवसात करता येते. तेव्हा 26 जानेवारी या प्रजासत्ताक दिनाच्या दिवशी हा प्रश्न निकालात काढण्यात येईल का ?

प्रा. फौजिया खान : हा प्रश्न लवकरच मिटेल यादृष्टीने या प्रश्नाकडे शासन लक्ष देईल.

श्री. रामनाथ मोते : 30 वर्षापूर्वी शासकीय जागेत हे हुतात्मा स्मारक न बांधता एका खाजगी मालकाच्या जागेत बांधले याबद्दल मी शासनाचे अभिनंदन करतो. परंतु ती चूक झालेली आहे हे आता लक्षात आल्यामुळे जागेची अदलाबदल करण्याचे प्रयत्न सुरु आहेत. स्मारकाच्या दुरुस्तीसाठी पैसे आल्यानंतर ही चूक निदर्शनास आली. आता जिल्हाधिका-यांकडे अहवाल आला असेल तर दानपत्राच्या किंवा अन्य काही अडचणी असल्या तरी त्या अडचणी दूर करुन 15 दिवसात किंवा एक महिन्यात या स्मारकाची दुरुस्ती आणि स्मारकाची जागा निश्चित करण्यात येईल काय ?

प्रा. फौजिया खान : हा प्रश्न लवकर मिटावा यादृष्टीने शासन प्रयत्न करील. 206 स्मारके आहेत. त्याबाबतीत देखील एक धोरण ठरविण्याची आवश्यकता असून ती वेळ आता आलेली आहे. हुतात्मा स्मारकाच्या देखभालीच्या संदर्भात स्वतंत्र धोरण करण्याची गरज असून तशा प्रकारचे धोरण तयार करण्यात येईल. आता दरवर्षी 10 हजार रुपये स्मारकाच्या देखभाल दुरुस्तीसाठी देण्यात येतात. हा खूप जुना निर्णय आहे. हा देखभाल दुरुस्तीचा निधी वाढविण्याची गरज आहे. हा निधी 10 हजार रुपयावरुन 25 हजार रुपये करण्याचे आम्ही ठरविलेले आहे. 206 स्मारकाची सद्य:स्थिती काय आहे, या स्मारकासाठी किती निधीची आवश्यकता आहे, आमदारांनी निधी दिलेला आहे किंवा नाही,

...नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.45598....

प्रा.फौजिया खान...

डी.पी.डी.सी.मधून किती खर्च झालेला आहे, या स्मारकांची सद्य:स्थिती काय आहे यासंबंधीचे अहवाल सर्व जिल्हाधिकाऱ्यांकडून मागविण्यात येतील.

श्री.भाई जगताप : या स्मारकाच्या बाबतीत प्रश्न अतिशय साधा आहे. आपले म्हणणे बरोबर आहे की, या बाबतीत पूर्वी शासनाने काही पॉलिसी निर्णय घेतलेले आहेत. त्यात नवीन असे काही नाही. या स्मारकास लागणाऱ्या निधीच्या बाबतीत आपण चिंता करु नका. हे एका स्वातंत्र्य सैनिकाचे स्मारक आहे. त्या स्मारकाच्या कामासाठी आम्ही आमच्या आमदार निधीतून पैसे उपलब्ध करुन देऊ. या ठिकाणी प्रश्न एवढाच आहे की, स्मारकाच्या जागेची अदलाबदल झालेली आहे. त्या जागेचे बक्षिसपत्र घेणे हे एका दिवसाचे काम आहे. जिल्हाधिकारी यांनी यात पुढाकार घेतला तर जागेच्या मालकास बोलाविले जाईल, त्याला वस्तुस्थिती सांगून त्याच्याकडून बक्षिसपत्र घेऊ शकता. ग्रामपंचायतीने तसा ठराव केलेला आहे. ग्रामपंचायतीने घेतलेला ठराव म्हणजे गावातील सर्व लोकांनी केलेला तो ठराव आहे. इतर स्मारकांच्या बाबतीत वेगवेगळे निकष लावले जातील. या ठिकाणचा प्रश्न तत्काळ सोडविला जावा. दिनांक 26 जानेवारी सारख्या पवित्र दिवसापूर्वी या सगळया बाबी पूर्ण झाल्या तर त्या गोष्टीचे एक वेगळे महत्व राहील. म्हणून या बाबतीत जिल्हाधिकाऱ्यांना तत्काळ सूचना देऊन त्या जागेचे बक्षिसपत्र तयार करुन घेणार काय आणि हा प्रश्न कायमचा निकालात काढणार काय ?

प्रा.फौजिया खान : या बाबतीत जिल्हाधिकारी यांना निश्चितपणे सूचना देण्यात येतील. शक्य झाले तर 26 जानेवारी पूर्वी हा प्रश्न निकाली निघेल अशा प्रकारच्या देखील सूचना त्यांना देण्यात येतील. मला या ठिकाणी असे लक्षात आणून द्यावयाचे आहे की, स्मारकाच्या ठिकाणची फरशी खराब झालेली आहे. तेथे खूपच दुरावस्था आहे. या स्मारकासाठी आमदार महोदयांनी निधी दिलेला आहे काय या बाबतचा अहवाल मागविणे गरजेचे आहे. या स्मारकाची अवस्था बघून वाटत नाही की, या स्मारकाच्या कामासाठी कोणी निधी उपलब्ध करुन दिलेला आहे.

श्री.जयंत प्र.पाटील : या राज्यात एकूण 260 हुतात्मा स्मारके बांधण्यात आलेली आहेत. बॅ.ए.आर.अंतुले यांच्या कार्यकाळात ही स्मारके बांधण्यात आलेली आहेत. त्या स्मारकांची परिस्थिती अतिशय वाईट आहे. त्या ठिकाणी जुगार खेळला जातो.त्या ठिकाणी अनैतिक धंदे सुरु आहेत.

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील...

माझ्या जिल्हयात शिरडोल, चिरनेर, रेवदंडा अशा वेगवेगळया गावांमध्ये जवळ जवळ 25 स्मारके आहेत. ती स्मारके सेवाभावी संस्थांकडे सोपवा, ही स्मारके चांगल्या प्रकारचे काम करणाऱ्या एन.जी.ओ.यांच्याकडे सोपवा. ज्या संस्था गेल्या 25 वर्षापासून चांगल्या प्रकारे काम करीत आहे, त्यांच्याकडे सोपवा. सांगली जिल्हयातील हुतात्मा स्मारकांची परिस्थिती अतिशय वाईट आहे. आमदार निधीतून कोणी पैसे देणार नाही, त्याचे सातत्य रहाणार नाही. या सर्व स्मारकांचे पावित्र्य अबाधित रहावे म्हणून शासन काही धोरणात्मक निर्णय घेईल काय ?

प्रा.फौजिया खान : माननीय पालक मंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली समिती निर्माण करण्यात आली आहे. ती समिती संस्था निवडत असते. त्या संस्थेला स्मारकांच्या देखभाल दुरुस्तीची कामे देण्यात येतात. आपण सांगितले की, या बाबतीत स्वतंत्र धोरण करण्याची गरज आहे.मी मघाशीच सांगितले की, या स्मारकांच्या बाबतीत सर्वंकष विचार करुन त्या ठिकाणी कोणत्या प्रकारच्या दुरुस्त्या करणे आवश्यक आहे या बाबतीत विचार करण्यात येईल्.

--------------

3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



ABG/ D/ D/ KTG/ ST/ प्रथम श्री.शिगम 13:25

**पुणे येथील घोले रस्त्यावरील आर्ट गॅलरीचे काम अपूर्णावस्थेत असल्याबाबत**

**(४) * ४६४२८ श्रीमती दिप्ती चवधरी , श्री.चरणसिंग सप्रा , श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप , डॉ.सुधीर तांबे , श्री.सुभाष चव्हाण , श्री.संजय दत्त , श्री.अमरनाथ राजूरकर :** सन्माननीय **मुख्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे येथील घोले रस्त्यावरील आर्ट गॅलरीचे काम गेल्या १३ वर्षापासून अपूर्णावस्थेत असल्याचे दिनांक २ ऑक्टोबर, २०१३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आतापर्यंत ८ कोटी रुपये खर्च करुनही अद्यापी प्रेक्षकागृहातील खुर्च्या बसवणे, वॉक-वे तयार करणे, दरवाजे बसवणे, फ्लोरिंग करणे, साईड मार्जिन करणे, स्टेजचे लाकडी काम, अग्नीशमन व्यवस्था, कलादालनातील इंटेरियर, पार्टीशन, फॉलसिलींग इत्यादी कामे अपूर्णावस्थेत असल्याचे आढळून आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, गॅलरीचे काम लवकर पूर्ण करावे या मागणीसाठी व्यंगचित्रकार मंगेश तेंडूलकर यांनी आंदोलनही केले होते, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणाची शासनाने सखोल चौकशी केली आहे काय,

(५) असल्यास, चौकशीअंती आर्ट गॅलरीचे काम प्रलंबित ठेवणाऱ्या अधिकारी व ठेकेदारावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, तसेच आर्ट गॅलरीचे काम तातडीने पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली आहे,

(६) अद्याप, कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.उदय सामंत,श्री.पृथ्वीराज चव्हाण यांच्याकरिता :** (१) व (२) हे अंशत: खरे आहे. सदर आर्ट गॅलरीच्या कामापैकी वॉक वे, दरवाजा बसविणे व अग्नीशमन व्यवस्था ही कामे पूर्ण करण्यात आली आहेत.

(३), (४) व (५) महानगरपालिकेमार्फत दरवर्षी उपलब्ध झालेल्या तरतुदीप्रमाणे कामे केलेली आहे. हेतुत: कोणतेही काम प्रलंबित राहिलेले नाही. त्यामुळे चौकशी अथवा कार्यवाहीचा प्रश्न येत नाही. तसेच उर्वरित कामाकरीता निविदा प्रक्रिया हाती घेण्यात आलेली आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्रीमती दिप्ती चवधरी : सभापती महोदय, मी महापौर होते. गेल्या दहा वर्षांपूर्वी सदरच्या प्रकल्पाचे काम हाती घेण्यात आले होते. या प्रकल्पांवर आतापर्यंत ८ कोटी रुपये खर्च झालेला



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिप्ती चवधरी...

आहे. या ठिकाणी फक्त ऑर्ट गॅलरीज् नाहीत. तेथे सायन्स सेंटर आहे, म्युझिक रुम आहे.ॲडिटोरियम आहे. मुलांसाठी सांस्कृतिक भवनातील एक भाग म्हणून ऑर्ट गॅलरी आहे. ही ऑर्ट गॅलरी लवकरात लवकर सुरु व्हावी अशी सर्वांची इच्छा आहे. ही ऑर्ट गॅलरी लवकरात लवकर सुरु व्हावी म्हणून  ज्येष्ठ व्यंगचित्रकार मंगेश तेंडुलकर, ज्येष्ठ पत्रकार रवी परांजपे, अशा अनेक विख्यात चित्रकारांनी एकत्र येऊन आंदोलन केले. परंतु घाईघाईने ऑर्ट गॅलरी सुरु करण्यात आली. परंतु तिचे काम सध्या अपूर्णावस्थेत आहे.त्या ठिकाणी अपुऱ्या सुविधा आहेत. या ऑर्ट गॅलरीच्या बाबतीत प्रत्येक वेळी आम्हाला सांगण्यात येते की, संबंधितांकडून माहिती घेतो, सहा महिन्यात पूर्ण होईल. काम सुरु होऊन दहा वर्षाचा कालावधी झाला आहे. हा प्रकल्प तातडीने पूर्ण करावा अशा प्रकारचा आदेश महापालिकेला दिला जाईल काय ?

यानंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.46428......... श्रीमती दिप्ती चवधरी......

दर वेळेला त्या विषयी माहिती घेतली असता सहा महिन्यात पूर्ण होणार असे सांगितले जाते. दहा वर्षे होऊन गेली आहेत. तातडीने हा प्रकल्प पूर्ण करण्याबाबत महापालिकेला शासनाकडून आदेश दिले जातील काय? एक सुंदर इमारत पूर्ण झाल्यानंतर त्या ठिकाणी प्रशासनाने कार्यालय सुरु करण्याचा घाट घातला आहे. तेथे सध्या एक कार्यालय सुरु असून हळूहळू अनेक कार्यालये व प्रशिक्षण केंद्रे सुरु होत आहेत. प्रशासनाने अनधिकृतपणे सुरु केलेले कार्यालय तातडीने बंद करण्याबाबत महापालिकेला आदेश दिले जातील काय?

श्री.उदय सामंत : सभापती महोदय, पुणे येथील आर्ट गॅलरीचे काम 10 वर्षापूर्वी सुरु झाले ही वस्तुस्थिती आहे. या कामाचे अंदाजपत्रक 9.44 कोटी रुपयांचे आहे. त्यातील काही भाग पूर्ण झाला आहे. ऑर्ट गॅलरी सुरु झालेली आहे. प्रशासनाचे एक कार्यालय तेथे सुरु आहे. उर्वरित काम सहा महिन्यात पूर्ण होईल असे अनेकदा सांगून झाले आहे. मी खात्रीने सांगतो की, या संस्थेच्या बाबतीत महापालिकेने बजेटमध्ये रु.1.60 कोटी एवढी भरीव तरतूद केलेली आहे. हे काम नक्की सहा महिन्याच्या आत पूर्ण होईल.

सभापती महोदय, मंगेश तेंडुलकर आणि तत्सम महनीय कलाकारांच्या उपस्थितीत बैठक घेतली होती. त्यांनी केलेल्या सूचनांना अधीन राहून सहा महिन्याच्या आत आर्ट गॅलरीचे काम पूर्ण केले जाईल.

--------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**शिक्षणाधिकारी मुंबई महानगरपालिका यांनी महापालिका शाळांमध्ये चिक्की पुरवठा करण्याकरिता एकाच व्यक्तीला टेंडर दिल्याबाबत**

**(५) * ४७०२९ श्री.विजय सावंत :** सन्माननीय **मुख्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शिक्षणाधिकारी मुंबई महानगरपालिका यांनी महापालिका शाळांमध्ये चिक्की पुरवठा करण्याकरिता नामांकित व अनुभवी बोलीदारांकडून निविदा मागविल्या होत्या, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, निविदा काढताना शिक्षणाधिकारी यांनी अग्रवाल नावाच्या एकाच व्यक्तीच्या नावाने निविदा काढली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, प्रश्न भाग १ व २ ची चौकशी करण्यात आली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व अन्य चिक्की व्यवसायिकांच्या नावे निविदा न काढण्याची कारणे कोणती आहेत ?

**श्री.उदय सामंत, श्री.पृथ्वीराज चव्हाण यांच्याकरिता :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.
(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री.भाई जगताप : सभापती महोदय, माझी उत्तराला हरकत आहे. शिक्षणाधिकारी, मुंबई महापालिका यांनी शाळेतील विद्यार्थ्यांना चिक्की पुरवठा करण्यासाठी नामांकित व अनुभवी बोलीदारांकडून निविदा मागविल्या होत्या हे खरे आहे का? या प्रश्नाला "हे खरे आहे" असे उत्तर दिलेले आहे. दुसऱ्या प्रश्नाला "हे खरे नाही" असे उत्तर दिलेले आहे. मग खरे काय आहे हे स्पष्ट केले पाहिजे होते. तीन महिने अगोदर प्रश्न दिला जातो. सन्माननीय सदस्यांनी तक्रार केलेली आहे, त्यामुळे स्पष्ट उत्तर येणे अपेक्षित आहे. अन्यथा तारांकित प्रश्न का म्हणायचे? अधिकारी बेजबाबदारपणे उत्तर देत असतील तर हा खटाटोप कशासाठी करायचा? खरे काय आहे हे शासनाने स्पष्ट केले पाहिजे.

श्री.उदय सामंत : पहिल्या प्रश्नाचे उत्तर दिले आहे की, या कामाचे टेंडर मागविले होते. परंतु चिक्की पुरवठ्याचे टेंडर मागविले असता त्यात कोणी क्वॉलिफाय झालेला नाही म्हणून पुरवठ्याचे काम कोणाला दिलेले नाही. त्याकरिताच हे खरे नाही असे उत्तर दिलेले आहे.

**सभापती** : मंत्री महोदय, आपण उत्तर योग्य दिलेले आहे. त्यात अधिक स्पष्टीकरण असते तर सन्माननीय सदस्यांचा प्रश्न विचारण्याचा जो हेतू होता त्या दृष्टीने आणखी उपयुक्त ठरले असते, याची नोंद घ्यावी.

श्री.उदय सामंत : होय.

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.४७०२९.......

श्री.विजय सावंत : सभापती महोदय, चिक्की व्यवसाय लोणावळा येथे मोठ्या प्रमाणात चालतो. महापालिकेने शाळेतील विद्यार्थ्यांना आहार म्हणून चिक्कीचा पुरवठा करण्याकरिता निविदा मागविली होती. याकरिता पुरवठादाराने १.२८ कोटी रुपये अनामत रक्कम भरावयाची होती. कोणताही चिक्की उत्पादक एवढी मोठी अनामत रक्कम भरु शकत नाही. अग्रवाल नावाच्या व्यक्तीने सांगितले की, मी निविदा घेतो आणि तुम्हाला काम देतो. निविदा जाहीर झाली त्यावेळी मी तक्रार केली होती. आता पुन्हा निविदा काढण्यात आली आहे का, चिक्की पुरवठा करण्याचे काम दिलेल्या कंपनीचे नाव काय आहे?

श्री.उदय सामंत : सभापती महोदय, हे टेंडर मुंबई महापालिकेकडून काढण्यात आले होते. सध्या कोणालाही टेंडर दिलेले नाही. निकषात बसणारा ठेकेदार उपलब्ध झाला तर त्याला टेंडर देण्यात येईल.

--------

..४...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**म्हाडातर्फे मुंबई व परिसरात विविध शैक्षणिक, सामाजिक, आरोग्य इत्यादी विविध कारणांसाठी वितरित केलेल्या भूखंडाची तपासणी करण्याबाबत**

**(६) * ४६८६५ श्री.रामदास कदम ,ॲड.अनिल परब , डॉ.दीपक सावंत , डॉ.नीलम गोऱ्हे , श्री.विनायक राऊत :** सन्माननीय **मुख्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) म्हाडातर्फे मुंबई व परिसरात विविध शैक्षणिक, सामाजिक, आरोग्य इत्यादी विविध कारणांसाठी वितरित केलेल्या सुमारे २७.५ एकर क्षेत्रफळाच्या भूखंडाचा वापर योग्यरितीने होतो की नाही याबाबत तपासणी करण्यासाठी म्हाडाने कोणतीही यंत्रणा निर्माण केलेली नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्याची कारणे काय आहेत,
(३) असल्यास, उक्त भूखंडाची तपासणी करण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.पृथ्वीराज चव्हाण :** (१) मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाच्या अखत्यारितील जे भूखंड विविध शैक्षणिक, सामाजिक, आरोग्य इत्यादी कारणासाठी वितरीत केलेले आहेत, त्यांच्या सद्य:स्थितीचा आढावा घेण्याचे निर्देश संबंधित विभागाच्या कार्यकारी अभियंता यांना म्हाडाच्या मुंबई मंडळाकडून देण्यात आले आहेत.
(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

----------

नंतर वाय.१....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.46865..

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, हा प्रश्न अतिशय महत्त्वाचा आहे. म्हाडाने विविध संस्थांना भूखंडाचे वाटप केले आहे. 25 भूखंडाचे वाटप झालेले आहे. एखाद्या संस्थेला भूखंड दिल्यानंतर त्यावर तीन वर्षामध्ये बांधकाम झाले नाही तर तो भूखंड परत घेण्यात यावा असा नियम आहे. भूखंडाचे वाटप शासनाच्या, माननीय मंत्र्यांच्या परवानगीने झाले पाहिजे. तथापि, म्हाडाने परस्पर नियमबाह्य पद्धतीने भूखंडांचे वाटप केलेले आहे. तेव्हा माझी आपल्याला विनंती आहे की, भूखंडांचे वाटप झाल्यानंतर त्यावर बांधकाम झाले आहे किंवा नाही हे पहावे. तसेच, ज्या संस्थांना हे भूखंड देण्यात आले आहेत त्यांना दुसऱ्या माध्यमातून भूखंडांचे वाटप झाले आहे किंवा नाही याची चौकशी न करता वाटप झालेले असल्यामुळे या सर्व प्रकरणांची सीआयडी मार्फत चौकशी करण्यात येणार आहे काय ? तसेच, ज्या संस्थांनी तीन वर्षामध्ये बांधकाम केले नाही त्यांचे भूखंड म्हाडा परत घेणार आहे काय ? ज्या संस्थांना मुंबई महानगरपालिका, एमआयडीसी किंवा अन्य शासकीय संस्थांमार्फत भूखंड दिले असतील अशा संस्थांची कोणतीही चौकशी न करता त्यांना ज्या अधिकाऱ्याने भूखंड दिले आहेत त्याच्यावर कारवाई करण्यात येणार आहे काय ?

श्री.पृथ्वीराज चव्हाण : सभापती महोदय, म्हाडाने काही भूखंड वेगवेगळ्या कारणाकरिता दिलेले आहेत ही वस्तुस्थिती आहे. महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास जमिनीचे वाटप अधिनियम 1982 आहे. यातील विनियम 16 च्या तरतुदीनुसार भूखंडांचे वाटप केले जाते. माझ्या महिती प्रमाणे म्हाडाने आता पर्यंत 107 भूखंड वितरित केलेले आहेत. त्यापैकी 55 भूखंडांवर बांधकाम सुरू आहे. सदर बांधकाम नियमाप्रमाणे आहे किंवा नियमबाह्य आहे याची चौकशी म्हाडातर्फे सुरू आहे. उर्वरित 52 भूखंडांपैकी 27 भूखंडांची माहिती घेतली जात आहे, तर 25 भूखंडांची माहिती आलेली नाही. या सर्व प्रकरणांची म्हाडाच्यावतीने सखोल चौकशी करण्यात येत आहे. 107 भूखंडांमध्ये 33 हेक्टर पेक्षा जास्त जमीन गुंतलेली आहे. 25 भूखंडांची माहिती आलेली नाही. ते भूखंड परत घेण्याबद्दलची शिफारस म्हाडाने केलेली आहे. कारण वेळेत बांधकामास सुरूवात केलेली नाही. त्यामध्ये काही न्यायिक, सीआरझेडची अडचण असेल तर त्याची चौकशी करता येईल. मुख्यमंत्री व गृहनिर्माण मंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली शासनाची उप समिती आहे. ..2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.46865..

श्री.पृथ्वीराज चव्हाण...

जून 2009 मध्ये सदर उप समितीचे गठन झाले होते. त्या उप समितीने या भूखंडांचे वाटप केलेले आहे. त्यामुळे परस्पर किंवा नियमबाह्य भूखंडांचे वाटप झाले आहे असे सकृतदर्शनी दिसत नाही. परंतु, जे वाटप झाले आहे त्याची सखोल चौकशी करण्यात येईल. तसेच ज्या 25 भूखंडांवर कोणतीही कार्यवाही करण्यात आलेली नाही ते भूखंड परत घेता येतील काय याची चौकशी सुरू आहे. 55 भूखंडांवर बांधकाम सुरू आहे. ते नियमाप्रमाणे आहे किंवा नाही हे पाहिले जात आहे. तसेच 27 भूखंडांसंबंधातील माहिती गोळा करण्याचे काम सुरू आहे.

यानंतर श्री.जुन्नरे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**ता.प्र.क्र. :46865......**

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, माननीय मुख्यमंत्री महोदयांनी सांगितले आहे की, काही भूखंडांवर काम सुरु झाले आहे. परंतु माझ्या माहिती प्रमाणे हे काम फक्त दाखविण्यासाठी अंशत: सुरु झाले आहे हे खरे आहे काय ? अनेक संस्थांनी मुंबई महानगरपालिकेकडून, म्हाडा कडून तसेच आस्थापनांकडूनही भूखंड घेतलेले आहेत त्यामुळे अशा संस्थांवर कायदेशीर कारवाई करुन सदर भूखंड परत घेतले जाणार आहे काय ?

श्री. पृथ्वीराज चव्हाण : सभापती महोदय, मी सांगितले आहे की, आतापर्यंत 55 भूखंडांवर काम सुरु आहे. हे काम नियमा प्रमाणे झाले की नाही, त्यामध्ये नियमांचे उल्लंघण झाले आहे काय अशा सर्व बाबी तपासण्याचे काम सुरु आहे. परंतु सकृतदर्शनी या भूखंडांवर काम सुरु झालेले आहे असे दिसून आले आहे. 25 भूखंडाच्या संदर्भात काहीही माहिती मिळालेली नाही. 27 भूखंडांच्या संदर्भात माहिती घेण्याचे काम सुरु आहे. त्यामुळे 27 भूखंडांची माहिती लगेच येईल. 55 भूखंडावर सकृतदर्शनी काम सुरु आहे. भूखंडाच्या बाबतीत निश्चितपणे दुर्लक्ष झाले आहे ही वस्तुस्थिती आहे. यामध्ये कदाचित संगनमत असण्याची शक्यता आहे. खरे म्हणजे यामध्ये 33 हेक्टर जागा आहे. 33 हेक्टर जागेमध्ये काही उद्यानाची आरक्षणे आहेत, बागेची आरक्षणे आहेत. त्यामुळे ही परत बीएमसीला किंवा म्हाडाला डेव्हलप करण्यासाठी दिली जातील. त्याच आरक्षणाला अधीन राहून यामध्ये जर रहिवाशांची आरक्षणे असतील व ते कोणी डेव्हलप करीत नसतील तर ती जागा परत घेऊन म्हाडाच्या लँडबॅकमध्ये घालून त्यातून गृहनिर्माणाचा कार्यक्रम राबविता येईल. या सगळया गोष्टींचा आढावा मी स्वत: घेत असून यासंदर्भातील माहिती मिळाल्यानंतर पुढील कार्यवाही करण्यात येईल.

श्री. मोहन जोशी : सभापती महोदय, पुणे शहरामध्ये म्हाडाच्या वसाहतीची नियमावली बऱ्याच दिवसापासून शासनाकडे प्रलंबित आहे. लाखो कुटुंबे पुणे शहराच्या म्हाडाच्या वसाहतीमध्ये राहत आहेत. माझी आपल्या माध्यमातून माननीय मुख्यमंत्र्यांना विनंती आहे की, पुण्याची म्हाडाची नियमावली किती दिवसात जाहीर केली जाणार आहे ?

श्री. पृथ्वीराज चव्हाण : सभापती महोदय, गेल्या अधिवेशनात मुंबईच्या म्हाडाच्या ज्या वसाहहती आहेत त्या पुनर्निमाणासाठी नवीन नियमावली केलेली आहे. मुंबईच्या धर्तीवर अतिरिक्त एफएसआय, अतिरिक्त क्षेत्रफळ देऊन पुण्याकरिताही लवकरात लवकर नियमावली करण्याचा आमचा प्रयत्न सुरु असून दोन महिन्यात नियमावली तयार केली जाईल. ...2...

**ता.प्र.क्र. :46865**......

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, जे भूखंड देण्यात आले आहेत ते भूखंड त्या संस्थांनी विशिष्ठ कामासाठी घेतले आणि नंतर त्या भूखंडाचे आरक्षण बदलून घेतले. या संस्थांचे आपल्या भूखंडावर कोणते ना कोणते प्रोग्राम सुरु आहेत. ज्या उद्दिष्ठासाठी भूखंड घेतले त्याचे आरक्षण बदलून त्या ठिकाणी कमर्शिअल ॲक्टीव्हीटीज सुरु असतील तर नियमाप्रमाणे शासनाला त्यातील 50 टक्के उत्पादनाचा वाटा मिळणार आहे काय ? मग तो भूखंड शुक्लांचा असो, शिंदेचा असो किंवा देशमुखांचा असो, अशांच्या भूखंडावरील 50 टक्के उत्पन्न शासनाकडे जमा केले जाणार आहे काय ?

श्री.पृथ्वीराज चव्हाण : सभापती महोदय, जे 107 भूखंड देण्यात आले होते त्यापैकी 67 भूखंड हे निवासी आहेत. 14 भूखंडावर खेळाचे मैदान आहे. 14 भूखंड अनिवासी आहेत. 6 भूखंड दवाखाने व रुग्णालयाकरिता आहेत. 6 भूखंड समाज मंदिर व इतर कारणासाठी आहेत.

या भूखंडाचा युजर बदललेला असेल किंवा आरक्षण बदलले असेल तर ते नियमाप्रमाणे बदलण्यात आले आहे असे आता गृहीत धरले पाहिजे. जर नियमा प्रमाणे आरक्षण बदलले नसेल किंवा काही चुकीचे झाले असेल किंवा वापर बदलला असेल तर ते नियमाप्रमाणे बदलले आहे किंवा नाही हे पाहिले जाईल. युजर बदलला तर त्यातील 50 पैसे शासनाला मिळाले पाहिजेत यासंदर्भात शासनाचे जे काही नियम आहेत ते पाळले जात आहेत की, नाही याची सखोल चौकशी करण्यात येईल. परंतु आता जे काही वाटप झालेले आहे ते वरील प्रमाणे झाले आहे. 67 भूखंड निवासी भूखंड म्हणून देण्यात आलेले आहेत. परंतु यामध्ये जर काही बदल झाला असेल तर तो नियमा प्रमाणे बदल झाला आहे किंवा नाही, कशामुळे बदल झाला याची सर्व चौकशी केली जाईल.

ॲड. अनिल परब : सभापती महोदय, म्हाडातर्फे जे भूखंड देण्यात आले आहेत यातील बऱ्यांच जणांनी दुसऱ्या संस्थांकडूनही भूखंड घेतले आहेत. भूखंड घेतांना शपथपत्रात लिहून दिले जाते की, माझ्याकडे कोणताही भूखंड नसून मला या या कारणासाठी भूखंड हवा आहे.त्यामुळे असत्य शपथपत्र देऊन ज्यांनी एकापेक्षा जास्त भूखंड घेतले आहेत अशा लोकांवर आपण कोणती कारवाई करणार आहात ?

यानंतर श्री.अजित.....

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

AJIT/ D/ ST/ पूर्वी श्री.जुन्नरे.. 13:45

ता.प्र.क्र.46865....

ॲड.अनिल परब...

माननीय मुख्यमंत्री महोदयांनी चौकशी करण्यात येईल असे येथे सांगितलेले आहे. माझा प्रश्न आहे की, या प्रकरणाची न्यायालयीन चौकशी करण्यात येईल काय ?

श्री.पृथ्वीराज चव्हाण : सभापती महोदय, माहिती गोळा करण्याचा प्रयत्न करीत आहोत असे मी म्हटलेले आहे. आम्हाला डेटाबेस तयार करावा लागेल म्हणजे एकूण किती क्षेत्रफळ आहे, कोणत्या संस्थेला आणि कोणत्या कारणासाठी जागा दिली, किती भूंखड दिला, भूखंडाची किंमत किती होती, भूखंडाच्या वेगवेगळ्या किमती आहेत, कमी किंमतीमध्ये भूखंड देण्यात आला की, नाममात्र किंमतीमध्ये देण्यात आला इत्यादी माहिती गोळा करायची आहे. अस्तित्वात असलेल्या नियमांचे उल्लंघन झाले असेल तर संबंधितांवर निश्चितपणे कारवाई करण्यात येईल. भूखंडाचे वाटप करण्यासाठी मंत्रिमंडळाची उप समिती नेमलेली आहे. त्या त्या समितीने संस्थेनेकडून "मला कोणत्याही शासकीय भूखंडाचे वाटप झालेले नाही" अशा आशयाचे शपथपत्र घेतले असेल असे मी गृहीत धरतो. ज्यांनी अगोदर शासनाकडून भूखंड घेतला असेल आणि चुकीचे शपथपत्र देऊन पुन्हा शासनाकडून भूखंड घेतला अशी माहिती सन्माननीय सदस्यांना असेल तर त्यांनी ती माहिती मला द्यावी. त्या संदर्भात निश्चितपणे कडक कारवाई करण्यात येईल.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, माननीय मुख्यमंत्री महोदयांच्या उत्तरामध्ये प्रामाणिकपणा आहे. परंतु आम्हाला माननीय मुख्यमंत्री महोदयांकडून कृती अपेक्षित आहे. या प्रकरण्ाची न्यायालयीन चौकशी करण्यात येईल काय ? माननीय मुख्यमंत्री महोदयांनी येथे सांगितले की, आम्ही माहिती घेत आहोत. प्रशासकीय यंत्रणेकडून माहिती घेण्यास एक-दीड वर्षे लागतील. माननीय मुख्यमंत्री महोदयांनी येथे सांगावे की, दोन-तीन महिन्यात माहिती घेऊन कारवाई करण्यात येईल. या प्रकरणाची चौकशी करण्याची माननीय मुख्यमंत्री महोदयांची इच्छा दिसली. परंतु आम्हाला आपल्या उत्तरातील प्रामाणिकपणा कृतीमध्ये अपेक्षित आहे. तेव्हा माननीय मुख्यमंत्री या प्रकरणाबाबत ठोस उत्तर देतील काय ?





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.46865....

श्री.पृथ्वीराज चव्हाण : सभापती महोदय, या प्रकरणातील सद्य:स्थिती जाणून घेण्याचे काम सुरु आहे. बरीचशी माहिती आलेली आहे. परंतु ती अजून पूर्ण आलेली नाही. प्रत्येक जमिनीचे किती क्षेत्रफळ आहे, कोणाला किती जमीन दिली, जमीन देताना आरक्षण बदलले काय, संस्थेने काम सुरु केले किंवा कसे इत्यादी सर्व माहिती गोळा करण्याचे काम सुरु आहे. यामध्ये कोणत्याही प्रकारची अनियमितता आढळून आल्यास संबंधितांवर कडक कारवाई करण्यात येईल. सन्माननीय सदस्यांना जर अतिरिक्त माहिती मिळाली असेल तर ती त्यांनी आमच्याकडे द्यावी. संस्थेने चुकीचे शपथपत्र देऊन भूखंड घेतला असेल तर त्याची देखील आम्ही चौकशी करु. मी पुन्हा एकदा सांगतो की, जर यामध्ये अनियमितता आढळून आल्यास निश्चितपणे कारवाई करण्यात येईल. संस्थेने नियमाप्रमाणे वेळेत काम सुरु केले नसेल आणि त्याचे सबळ कारण नसेल तर तो भूखंड परत घेण्यात येईल, तशी शिफारस देखील आलेली आहे आणि शासनामार्फत तशी कारवाई करण्यात येईल.

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, मी माननीय मुख्यमंत्री महोदयांचे आभार मानतो. त्यांचा हेतू स्वच्छ आहे याबद्दल कोणाच्याही मनात दुमत नाही. आपण या ठिकाणी सांगितले की, ज्यांना 25 भूखंड दिलेले आहेत ती माणसे समोर येत नाहीत. याचा अर्थ आपणाला आणि मलाही माहीत आहे म्हणून मी सुरुवातीला सीआयडी चौकशीची मागणी केली. आपल्या हेतूबद्दल मला अजिबात शंका नाही. यामध्ये कशाप्रकारे भ्रष्टाचार झालेला आहे हे आपणास देखील समजले आहे. आपण या प्रकरणाची चौकशी केल्यानंतर 25 भूखंड कोणाच्या नावावर व कोणत्या अधिकाऱ्यांनी घेतले याची माहिती आपणास मिळेल. आपण या प्रकरणातील माहिती घेतल्यानंतर ती मिळणार नाही. अधिकाऱ्यांना निवासी भूखंड देण्याचे अधिकार असतील परंतु आरक्षण असलेल्या जागेवरील भूखंड देण्याचा अधिकार त्यांना नाही. तो अधिकार शासनाला आहे. तेव्हा मी अगोदर सांगितले की,अधिकाऱ्यांनी काही प्रकरणामध्ये शासनाची परवानगी घेतलेली नाही. तेव्हा संबंधित अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई करणार आहात ? सन 1992 पासून म्हणजे जवळपास 20 वर्षापूर्वी या जागा दिलेल्या आहेत. एकूण 107 भूखंड आहेत. भूखंड दिल्यानंतर तीन वर्षात बांधकाम केले नसेल आणि 20 वर्षानंतर बांधकामास सुरुवात झाली असेल, म्हणजे आम्ही प्रश्न दिल्यानंतर 40

..3.



AJIT/ D/ ST/ पूर्वी श्री.जुन्नरे.. 13:45

ता.प्र.क्र.46865....

श्री.रामदास कदम...

दिवसामध्ये कामास सुरुवात केली असेल तर त्यांच्यावर काय कारवाई करणार ? खरे म्हणजे 40 दिवसांत माहिती प्राप्त होणे अपेक्षित होते. जवळपास 67 हेक्टर जागेचा हा प्रश्न आहे. तेव्हा माझा प्रश्न आहे की, 67 हेक्टर जागा ताब्यात घेऊन त्या जागेवर गिरणी कामगारांसाठी घरे बांधण्यात येतील काय ?

यानंतर श्री.बोर्डे..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.46865....

श्री.पृथ्वीराज चव्हाण : सभापती महोदय, हा प्रश्न विभागाला प्राप्त झाल्यानंतर या प्रश्नाची माहिती विभागाकडून गोळा करण्यात आली. पण सध्या माझ्याकडे जी माहिती आलेली आहे ती फार समाधानकारक नाही. त्या ठिकाणी एकूण 25 भूखंड असे आहेत की, त्यांच्या बाबतीत प्रतिसाद मिळाला नाही. 25 भूखंडांपैकी 12 भूखंड निवासी, 6 भूखंड अनिवासी, 4 भूखंड शैक्षणिक, 1 भूखंड खेळाचे मैदान आणि 2 भूखंड रुग्णालयासाठी आरक्षित आहेत. यातील चार प्रकरणांच्या बाबतीत कारवाई झाल्याचे दिसून येते. काही भूखंडांची प्रकरणे न्यायालयामध्ये जमिनीच्या मालकी कारणावरुन अडकलेली आहेत. काही भूखंड सीआरझेडमुळे बाधित असल्यामुळे त्या ठिकाणी बांधकाम करता येत नाही. काही प्रकरणी अधिमूल्याचा भरणा केलेला नाही. वास्तविक पाहता या भूखंडांच्या बाबतीत आणखी किती दिवस वाट पाहायची हा प्रश्न निकाली निघावयास हवा होता. आम्ही या भूखंडांच्या मालकीबाबत काही संस्थांकडे पत्रव्यवहार केला, परंतु त्याला उत्तर येत नाही. कदाचित त्या बोगस संस्था असाव्यात म्हणून त्यांच्याकडून उत्तर येत नाही, अशी माहिती पुढे आली आहे. भूखंडांच्या बाबतीत न्यायालयीन आणि सीआरझेडची कारणे काय आहेत ती तपासली जातील. परंतु इतर ज्या भूखंडांचे वाटप झाले आहे ते निश्चितपणे रद्द करावे लागतील, अशी शिफारस म्हाडाने केली आहे. ती शिफारस मंत्रिमंडळाच्या उप समितीपुढे जाईल. परंतु ते भूखंड केवळ रद्द न करता त्या भूखंडांसाठी मुळात अर्ज कोणी केला, तो बोगस होता काय, त्यामध्ये संगनमत होते काय इत्यादी बाबींची चौकशी करुन चौकशीमध्ये जे दोषी आढळतील त्यांना योग्य ते शासन करण्यात येईल.

---------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**मुंबईतील माझगांव ताडवाडी येथील बी.आय.टी.चाळींच्या पुनर्विकास प्रकल्पाबाबत**

**(७) * ४६१४२ श्री.नरेंद्र पाटील , श्री.जयवंतराव जाधव , श्री.किरण पावसकर , श्री.प्रकाश बिनसाळे :** सन्माननीय **मुख्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील माझगांव ताडवाडी येथील बी.आय.टी.चाळींचा पुनर्विकास प्रकल्प सन २००६ पासून प्रलंबित असून महानगरपालिका नियोजित विकासकास स्थानिक रहिवाशांची ७० टक्के मंजूरी नसतानाही मुंबई महानगरपालिकेने या प्रकल्पास मंजूरी दिली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या संदर्भात चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, त्यात काय आढळून आले व तद्नुसार पुढे कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.उदय सामंत, श्री. पृथ्वीराज चव्हाण यांच्याकरिता :** (१)बृहन्मुंबई महानगरपालिकेने सदर प्रकल्पाच्या इमारतीतील एकूण भाडेकरुंपैकी ७०% पेक्षा जास्त भाडेकरुंची संमती घेऊन प्रकल्पास मंजुरी दिली आहे.

(२),(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री.नरेंद्र पाटील : सभापती महोदय, मुंबईतील माझगांव येथील नावाजलेल्या बी.आय.टी. चाळींच्या पुनर्विकासासंदर्भातील हा प्रश्न आहे. या चाळीने भरपूर लोकप्रतिनिधी दिलेले आहेत. त्या संदर्भात सन्माननीय सदस्य श्री.बाळा नांदगांवकर आणि माननीय मंत्री श्री.शशिकांत शिंदे यांचा उल्लेख करता येईल. त्यांचे बालपण बी.आय.टी. चाळीमध्ये गेल्यामुळे या प्रश्नावर चर्चा करण्यासाठी पुरेसा वेळ द्यावा अशी मी विनंती करतो.

महोदय, या बी.आय.टी. चाळीमध्ये एकूण 17 इमारती आहेत. 2007 पासून त्या इमारती खराब अवस्थेत आहेत. त्या इमारतींचा पुनर्विकास करण्यासाठी प्रस्ताव मागविण्यात आला होता. त्या चाळीतील 17 इमारतींपैकी 13 इमारतींतील 70 टक्के रहिवाशांनी पुनर्विकास करण्यासंदर्भात विकासकाला सहमती दिली आहे. परंतु उर्वरित 4 इमारतींतील रहिवाशांनी त्या विकासकाला विरोध केला आहे. त्या इमारतीतील रहिवाशी उच्च न्यायालयापासून सर्वोच्च न्यायालयापर्यंत दाद मागण्याचा प्रयत्न करीत आहेत. या निमित्ताने मी विचारु इच्छितो की, ज्या इमारतींनी विकासकास विरोध केला आहे त्यांना विकासकापासून वेगळे करु शकतो काय किंवा करणार काय ? तसेच दुसरी बाब अशी की, त्याच परिसरात आताच्या विकासकाने ट्रान्झिट कॅम्प बांधण्यासाठी मुंबई महानगरपालिकिकडे परवानगी मागितली तर, महापालिका ती परवानगी देईल काय ?

..3..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.46142....

श्री.नरेंद्र पाटील....

महोदय, आपल्याला माहीत आहे की, त्या परिसरातील आजूबाजूला अनेक इमारती कोसळल्या आहेत. डॉकयार्ड आणि रे-रोड येथे इमारत कोसळून अनेक नागरिक मृत्युमुखी पडले होते. बी.आय.टी. चाळीत राहणारे अनेक लोक महापालिका आणि पोलीस विभागात काम करणारे आहेत. काही लोकप्रतिनिधी त्या ठिकाणी पूर्वी राहत होते. त्यांचे त्या ठिकाणी अजूनही घर आहे. माझी विनंती आहे की, सरकारने हा विषय गांभीर्याने हाताळून तेथील रहिवाशांना न्याय दिला पाहिजे. या निमित्ताने मी स्पेसिफिक प्रश्न विचारतो की, जे लोक विकासकाच्या विरोधात न्यायालयात गेले आहेत त्यांचे नेमके प्रश्न जाणून घेऊन त्यांना माननीय मुख्यमंत्री न्याय देणार काय ?

श्री.उदय सामंत : सभापती महोदय, नियम 33 (7) अन्वये एकत्रित पुनर्विकास योजनेंतर्गत इमारतीतील एकूण रहिवाशांच्या 70 टक्के रहिवाशांची संमती असेल तरच इमारतींचा पुनर्विकास करावा अशी नियमात तरतूद आहे. हे खरे आहे की, रहिवाशांनी विरोध केल्यामुळे काही इमारतींच्या पुनर्विकासाचे काम रखडलेले आहे. रेल्वे प्रशासनाकडून पुनर्विकासाच्या बाबतीत काही एनओसी मिळावयाच्या होत्या. त्या मिळाल्यानंतर कामाला सुरुवात करण्यात आली. परंतु अन्य 4 इमारतीतील रहिवाशांनी या विरोधात उच्च न्यायालयात धाव घेतली. सध्या हे प्रकरण सर्वोच्च न्यायालयामध्ये आहे. सर्वोच्च न्यायालयाने या प्रकरणी 'जैसे थे' ठेवण्याचे आदेश दिलेले आहेत.

नंतर श्री.कांबळे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**ता.प्र.क्र. 46142 ....**

श्री. उदय सामंत ....

मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, आम्ही शासन म्हणून लवकरात लवकर सुप्रीम कोर्टात म्हणणे मांडू. सन्माननीय सदस्यांनी ट्रन्झिट कॅम्पच्या विषयाबाबत मागणी केली आहे. त्यांची मागणी रास्त आहे. माननीय मंत्री श्री. शशिकांत शिंदे साहेबांचा उल्लेख केला. मी सांगू इच्छितो की, माननीय मंत्री श्री. शशिकांत शिंदे यांनी या संदर्भात दोनदा बैठक लावली आहे. हा अतिशय सेंसिटिव्ह विषय आहे, याची शासनाला कल्पना आहे. सुप्रीम कोर्टाने दिलेल्या गाईडलाईन्स, डायरेक्शन्स यांच्या अधीन राहून ट्रन्झिट कॅम्पच्या बाबतीत निर्णय घेण्यात येईल.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, संपूर्ण प्रकल्पाच्या 70 टक्क्यांचा एलओआय दिलेला आहे. विकासकाने 13 इमारतींचा प्रकल्प हाती घेतला आहे. मोडकळीस आलेल्या 4 इमारती बाजूला ठेवल्या आहेत. सर्वोच्च न्यायालयापर्यंत प्रकरण गेले आहे. मुंबई मनपाच्या आयुक्तांनी स्वत: सर्वोच्च न्यायालयात सांगितले आहे की, या 4 इमारती केव्हाही कोसळतील. त्यामुळे ट्रॅन्झिट कॅम्प बांधून यांना पर्यायी जागा देण्याकरिता विकासकाला परवानगी द्यावी किंवा आम्हाला परवानगी द्या. सर्वोच्च न्यायालयाने फक्त 4 इमारतींकरिताच अशी मंजुरी दिली आहे. परंतु, तरीही पुढील हालचाल होत नाही. विकासक यांच्याकरिता कोणतेही ट्रॅन्झिट कॅम्प बांधण्यास तयार नाही. संपूर्ण इमारतीचा प्रकल्प असेल आणि 4 इमारतींना बाजूला टाकून, त्या संदर्भात मनपाने पहावे असे सांगत असेल तर विकासकाला दिलेला एलओआय आपण रद्द करून नवीन टेंडर काढणार का, हा विषय निर्माण होत आहे अन्यथा हा प्रकल्प पूर्णत: रद्द करून तो मनपाने ताब्यात घेऊन विकसित करावा, अशी भूमिका शासन घेणार का ?

श्री. उदय सामंत : सभापती महोदय, हायकोर्ट व सुप्रीम कोर्ट यामध्ये तेथील लोकांनी दोनदा त्यांचे म्हणणे मांडले आहे. सन्माननीय सदस्यांनी सांगितले आहे की, सर्वोच्च न्यायालयाने दिनांक 21.10.2013 ला इमारत क्रमांक 13, 14, 15 व 16 येथे राहणाऱ्या रहिवाशांची घरे रिक्त करून त्यांना ट्रॅन्झिट कॅम्पमध्ये पाठविण्याच्या सूचना दिल्या आहेत. मी आपणास सांगू इच्छितो की, त्या पध्दतीने कळविण्यात येऊन तशा पध्दतीची कार्यवाही करण्यात येईल.

..2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**<u>ता.प्र.क्र. 46142 ....</u>**

श्री. रमेश शेंडगे : सभापती महोदय, मुंबई मनपाच्या हद्दीमध्ये धोकादायक इमारती कोसळून अनेकांचे जीव गेले आहेत. काही इमारती अतिधोकादायक म्हणून मनपाने जाहीर केल्या आहेत. जाहीर केलेल्या अतिधोकायदायक इमारतींतील लोकांच्या पुनर्वसनाच्या संदर्भात कारवाई करण्याच्या बाबत कोणी अडथळे निर्माण करीत असतील तर त्यांच्यावर आपण फौजदारी कारवाई केली पाहिजे, आपण तसे करणार का ? 1600 पेक्षा जास्त भाडेकरू या सर्व इमारतींत राहत आहेत. मुंबईमध्ये अतिक्रमण करून बेकायदेशीररित्या राहणाऱ्यांना एसआरए मार्फत किंवा दुसऱ्या योजनेमार्फत हक्काची घरे दिली. माझा प्रश्न असा आहे की, येथे राहणाऱ्या लोकांना सुध्दा त्यांचे पुनर्वसन होईल, तेव्हा मालकीची घरे देणार का ?

श्री. उदय सामंत : सभापती महोदय, इमारत क्रमांक 13, 14, 15 व 16 असा प्रकल्प सुरू आहे आणि त्या संदर्भातील प्रश्न आहे. सन्माननीय सदस्यांनी केलेल्या सूचना तपासून पाहण्यात येतील. सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते साहेबांनी ट्रॅन्झिट कॅम्पच्या बाबतीत नक्की काय करायचे, असा प्रश्न विचारला आहे. सुप्रीम कोर्टाने स्पष्ट आदेश दिले आहेत की, इमारत क्रमांक 13, 14, 15 व 16 येथील रहिवाशांनी कोणत्याही परिस्थितीत ट्रॅन्झिट कॅम्पमध्ये गेले पाहिजे. ट्रॅन्झिट कॅम्प बांधण्याच्या संदर्भातील निर्णय महानगरपलिका व विकासक यांच्या सोबत बैठक घेऊन चर्चा करून लवकर घेण्यात येईल.

श्री. भाई गिरकर : सभापती महोदय, ताडवाडी येथील लोकांना बिल्डर्सशी संगनमत करून पोलीस बळाचा वापर करून काढून टाकण्यात आले आहे. सर्व लोकांमध्ये अराजकतेचे वातावरण निर्माण झाले आहे, लाठीचार्ज झाला आहे. लोकांनी प्रतिकार केला आहे. आपण विकासक धार्जिणे नियम का करता ? ताडीवाडीमध्येच बीआयटी चाळी आहेत असे नाही तर नागपाडा, आग्रीपाडा, बेलासिस रोड, वाडीबंदर येथेही बीआयटी चाळी आहेत. बॉम्बे इम्प्रुव्हमेंट ट्रस्ट म्हणजे बीआयटी चाळी 100 वर्षांपूर्वी बांधल्या आहेत. आपण त्यांच्या संदर्भात धोरण ठरविले आहे का ? मला समजले की, त्या संदर्भातील फाईल मनपाने आपल्याकडे पाठविली आहे. परंतु, ती आपल्याकडे वर्षभर पडून आहे. बीआयटी चाळींच्या संदर्भातील निर्णय प्रलंबित आहे. आपण बीआयटी चाळींच्या संदर्भातील निर्णय घेणार का आणि धोरण जाहीर करणार का ?

( नंतर श्री. खंदारे ....

अशुध्दीत प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

NTK/ D/ ST/ पूर्वी श्री.कांबळे 14:00

ता.प्र.क्र.46142....

श्री.उदय सामंत : माझगाव येथील बीआयटी इमारतीचा नियम 33(7) खाली पुनर्विकास करण्याचे ठरविले होते. त्याच्या फेजेसची मी माहिती दिलेली आहे. सर्वोच्य न्यायालयाने उर्वरित 4 इमारतीमधील नागरिकांना संक्रमण शिबिरात जाण्याचे आदेश दिलेले आहेत. माझ्या स्तरावर एका बैठकीचे आयोजन केले जाईल. या 4 इमारतीमधील लोकांना संक्रमण शिबिरात कशा प्रकारे पाठवावयाचे व महानगरपालिकेला सूचना देण्याबाबत लक्ष घातले जाईल. बी.आय.टी.च्या इमारतींच्या पुनर्विकासाचे प्रस्ताव जर शासनाकडे आले तर त्या इमारतींचा याच पध्दतीने विकास केला जाईल.

ॲड.निरजंन डावखरे : सभापती महोदय, या 4 इमारतींचे स्ट्रक्चरल ऑडिट झालेले आहे काय, तेथील विकासक जर संक्रमण शिबिर बांधून देत नसेल तर त्याचे एलओआय रद्द करुन दुसऱ्या विकासला परवानगी दिली जाईल काय आणि एफएसआय वाढवून दिला जाईल का ?

श्री.उदय सामंत : त्या इमारती धोकादायक झाल्या असल्यामुळेच त्या लोकांनी संक्रमण शिबिरात गेले पाहिजे असे महानगरपालिकने सांगितले होते. विकासक बदलावयाचा असेल तर सर्व गोष्टींची तपासणी करुन आवश्यकता असेल व त्या लोकांना न्याय देणे गरजेचे आहे ही शासनाचीही भूमिका आहे. म्हणून ही बाब तपासूनच यावर कार्यवाही केली जाईल.

श्री.दिवाकर रावते : त्या ठिकाणी लाठीचार्ज झाला होता. त्या विकासकाचे पाणी व वीज कापण्यात आले होते. त्या इमारतींमध्ये राहणारे बेकायदेशीर भाडेकरु नाहीत, पिढ्यान्‌पिढ्या राहणारे ते भाडेकरु आहेत. त्या विकासकाने चारही इमारतीतील लोकांना पुनर्विकासाच्या योजनेत सामील करुन घेतले आहे. पण त्यांच्यासाठी संक्रमण शिबिर बांधले नाही. त्यामुळे थेट महानगरपालिकेच्या आयुक्तांनाच सर्वोच्च न्यायालयामध्ये जावे लागले. त्यामुळे तेथून परवानगी आली आहे. ती इमारत कोसळून लोक मेले तरी चालतील असे सांगून गेले चार महिने अशा प्रवृत्तीने चालढकल करीत आहे. या विकासकाचा एलओआय व विकासक रद्द करुन मुंबई महानगरपालिकेने टेंडर काढून त्या इमारती बांधण्याचा निर्णय घेतला जाणार आहे काय ? या घमेंडखोर विकासकाला बाजूला करण्यात यावे, लोकांच्या जीवनमरणाचा प्रश्न निर्माण झालेला आहे. तेथे खूप मोठे आंदोलन झाले होते, ते दूरदर्शनवर दाखविण्यात आले होते, मंत्री ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



NTK/ D/ ST/

महोदयांनी कदाचित ते पाहिले असेल. त्या इमारतीतील लोकांचा गंभीर विषय आहे. विकासकाच्या बाजूने शासनाला जाता येणार नाही. शासन महानगरपालिकेच्या माध्यमातून नवीन पर्याय शोधणार आहे काय ? त्या इमारती महानगरपालिकेच्या आहेत व कर्मचारी देखील त्यांचेच आहेत.

श्री.उदय सांमत : विकासक बदलण्याचा निर्णय मुंबई महानगरपालिकेने घेणे गरजेचे आहे. तेथील लोकांच्या भावना लक्षात घेता व तेथे झालेला लाठीचार्ज विचारात घेता, उद्या जर आवश्यकता भासली तर विकासक बदलण्यासाठी सविस्तर बैठक घेतली जाईल. तसेच आवश्यकता भासली तर विकासकावरही कारवाई केली जाईल.

श्री.प्रकाश बिनसाळे : त्या योजनेसाठी विकासकाला नियम 33(7) अन्वये एलओआय देण्यात आला आहे. तो केव्हा देण्यात आला होता ? नियम 33(7) अंतर्गत 300 चौ.फुटाचे घर देण्याचा निर्णय झालेला आहे. त्यामुळे त्या इमारतींचे पुनर्विकासाचे आराखडे जुन्या नियमानुसार तयार झालेले आहेत की नवीन नियमानुसार तयार झालेले आहेत, एलओआय दिल्यापासून किती दिवसात प्रकल्पाचे काम सुरु केले पाहिजे यासाठी काही नियम आहेत काय ? मुंबईत अनेक विकासक नियम 33(7) खाली एनओसी घेऊन ठेवतात. अनेक वर्षे होऊनही जीर्ण इमारतींचा पुनर्विकास करीत नाहीत. अशा इमारतींचा पुनर्विकास वेळेत होण्यासाठी एनओसी घेतल्या पासून ठराविक कालावधीत इमारती बांधण्यासाठी काही बंधने घातली जाणार आहेत काय ?

श्री.उदय सामंत : मी सुरुवातीला सांगितल्याप्रमाणे रेल्वे प्रशासनाने एनओसी न दिल्यामुळे या योजनेला विलंब झाला. त्यानंतर हे प्रकरण उच्च न्यायालयात व नंतर सर्वोच्च न्यायालयात गेले होते. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार आता कारवाई चालू आहे. विकासक कितीही मोठा असला तरी शासन त्यांना पाठीशी घालणार नाही.

**सभापती :** प्रश्नोत्तराचा तास संपला आहे.

-------

नंतर श्री.शिगम.......

अमुद्रित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**राज्यसरकारी अधिकारी व कर्मचा-यांच्या निवृत्तीची वयोमर्यादा 60 करण्याबाबत**

श्री. भाई जगताप : सभापती महोदय, मी आपले व या सभागृहाचे लक्ष राज्य शासनाच्या प्रशासनाच्या संबंधातील अत्यंत महत्वाच्या बाबीकडे वेधू इच्छितो. आपल्या सरकारचा डोलारा ज्या राज्य शासकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांवर उभा आहे त्या अधिकारी व कर्मचाऱ्यांचे सेवानिवृत्तीचे वय केन्द्राप्रमाणे 58 वर्षावरुन 60 वर्षे करणे आणि 5 दिवसांचा आठवडा करणे इत्यादी प्रलंबित मागण्याकडे सातत्याने लक्ष वेधूनही राज्य शासनाचे त्याकडे दुर्लक्ष झाल्याने अधिकारी व कर्मचारी संघटनांनी याच आठवडयात दिनांक 16 डिसेंबर 2013 रोजी विधान भवनावर राज्यव्यापी मोर्चाचे आयोजन केले होते. तरी या संदर्भात राज्य शासनाने आपली भूमिका सभागृहास अवगत करावी व शासकीय अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना त्यांच्या न्याय मागण्यांसंबंधात न्याय द्यावा अशी माझी आपणास विनंती आहे.

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**भारताच्या अमेरिकेतील उपवाणिज्य दूत श्रीमती देवयानी खोब्रागडे यांना**

**अमेरिका सरकारने दिलेली वागणूक**

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, राज्याचे माननीय मुख्यमंत्री या सदनामध्ये आहेत आणि सभागृहातील बरेच सन्माननीय सदस्य सभागृहामध्ये उपस्थित आहेत. सभागृहाने देखील आपले मतप्रदर्शन करावे अशा पध्दतीचा विषय मी सभागृहासमोर आपल्या परवानगीने उपस्थित करीत आहे.

सभापती महोदय, सध्या भारतामध्ये आणि सबंध जगभरात देवयानी खोब्रागडे यांची चर्चा सुरु आहे. हा परराष्ट्र व्यवहार खात्याचा विषय आहे. तरी देखील देवयानी खोब्रागडे या आपल्या राज्याच्या सुकन्या आहेत. अमेरिकन सरकारने त्यांना ज्या पध्दतीची वागणूक दिलेली आहे त्याबाबतीत कंसर्न आहे. यासंबंधी आवश्यक असलेले जे काही शब्द वापरावयास पाहिजेत ते भारत सरकार वापरीत आहे त्यामुळे ते सभागृहाने वापरावेत की नाही याबाबत चर्चा करावी. पण या सभागृहाने याबाबतीत निश्चितपणे कंसर्न व्यक्त केला पाहिजे. डेप्युटी कौन्सिलेट जनरल देवयानी खोब्रागडे यांना ज्या पध्दतीची वागणूक मिळाली ती अतिशय चिंताजनक आहे.त्यांची चूक आहे की नाही, बेकायदेशीर आहे की नाही, गुन्हा आहे की नाही हे बाजूला राहिले. पण डेप्युटी कौन्सिलेट जनरल ह्या मुलीला शाळेत सोडायला जात असताना त्यांना रस्त्यात अटक केली. इतकेच नाही तर त्यांनी ईमेलवर स्ट्रीप्ससर्च आणि कॅव्हिटीसर्च करुन अपमानकारक वागणूक मिळाल्याचे सांगितले आहे. मला वाटते या घटनेची दखल या सभागृहाने घेतलेली आहे आणि या सभागृहाने याबाबतीत आपले मतप्रदर्शन करणे आवश्यक आहे. कौन्सिलेट जनरलला व्हिएन्ना कन्व्हेन्शन ऑन कॉन्सुलर रिलेशन्स मधील तरतुदीनुसार संरक्षण मिळाले पाहिजे. परंतु ते न मिळता या गोष्टी झालेल्या आहेत. देवयानी खोब्रागडे ह्या आपल्या देशाच्या आणि विशेषत: महाराष्ट्राच्या असून त्यांना अशा प्रकारची वागणूक दिलेले आहे ती निंद्य आहे. मी अनेक वेळा असे गमतीने म्हटलेले आहे की, नरेंद्र मोदींना व्हिसा नाकारल्यामुळे अनेकांना बरे वाटले. शेवटी ते एका राज्याचे मुख्यमंत्री आहेत. ते कोणत्या पक्षाचे आहेत याला महत्व नाही. आता ही पुढची पायरी अमेरिकेने गाठलेली आहे. जगातला कोणीही सुपर पॉवर असला तरी अशा प्रकारची वागणूक देऊन आमच्या आत्मसन्मानाला ठेच पोहोचता कामा नये.या देशाला आणि राज्याला ठेच पोहोचलेली आहे. म्हणून या सभागृहाने अमेरिकेने केलेल्या कृत्याबाबत कंसर्न व्यक्त केला पाहिजे. भारत सरकारकडे देखील याबाबत

..3..





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे...

प्रोटेस्ट केला पाहिजे. या प्रकारच्या वागणुकीमुळे लोकसभेच्या मा.अध्यक्षा मीराकुमार असतील, मंत्री महोदय श्री. सुशीलकुमार शिंदे साहेब असतील, श्री. नरेंद्र मोदीजी असतील, श्री. राहुलजी असतील यांनी या कृतिविषयी निषेध व्यक्त केलेला आहे. त्याप्रमाणे सभागृहाने देखील आपल्या भावना व्यक्त केल्या पाहिजेत असे मला प्रामाणिकपणे वाटते.

--

...4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गो-हे : सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांनी एका गंभीर प्रश्नाकडे लक्ष वेधलेले आहे. महाराष्ट्राचे अधिवेशन सुरु आहे. अमेरिकेमध्ये भारतीय समाज फार मोठ्या प्रमाणावर गेलेला असून तेथे काम करणाऱ्या भारतीय लोकांची त्या ठिकाणी अतिशय चांगली प्रतिमा आहे. एखाद्या गोष्टीमध्ये तथ्यांश आहे की नाही याबाबत वेगळी चर्चा होऊ शकते. परंतु ज्या पध्दतीने अमेरिकन सरकारने वर्तणूक केलेली आहे ती निषेधार्ह आहे. एका उच्चविद्याविभूषित महिलेच्या बाबतीत हे वर्तन असेल तर सामान्य माणसाच्या हातून एखादा प्रमाद झाला तर अमेरिका सरकार कशा पध्दतीने वागेल हाही प्रश्न आहे. उलटपक्षी एखादी अमेरिकेतील किंवा परदेशातील व्यक्ती, अगदी भोपाळसारख्या गॅसकांडातील  परदेशी व्यक्तीवर आरोप झालेले असताना त्या व्यक्तीला अटक करीत असताना किती अडचणी येतात हे समोर येते. हा जागतिक स्तरावरचा प्रश्न असला तरी महाराष्ट्राच्या विधानपरिषदेमध्ये महाराष्ट्राची आणि भारताची कन्या या नात्याने त्यांची जी अप्रतिष्ठा झालेली आहे त्याची सभागृहाने दखल घ्यावी. धन्यवाद.

----

...नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मनिष जैन : या ठिकाणी माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी जो विषय मांडला आहे, त्यास पाठिंबा देण्यासाठी मी उभा आहे. श्रीमती देवयानी खोब्रागडे ही महाराष्ट्रीची कन्या आहे. ती आयएफएस अधिकारी आहे. तिला अमेरिकेत दिनांक 12 डिसेंबर, 2013 रोजी अटक करण्यात आली आणि तिची विशेष बॉंडवर सुटका करण्यात आली आहे. त्या ठिकाणी तिच्यावर घृणास्पद पध्दतीने कारवाई करण्यात आली आहे. यूएसएसआर ॲक्टखाली तिला अटक करण्यात आली होती. तेथील मार्शल यांनी तिचे पूर्ण कपडे काढून तपासणी केली. या घटनेचा पूर्णपणे आपण निषेध केला पाहिजे. अमेरिका महासत्ता असली तरी त्या देशाचा, त्या घटनेचा या सभागृहाने निषेध केला पाहिजे. या घटनेचा निषेध म्हणून हे सभागृह पाच मिनिटांसाठी तहकूब करावे.

श्री.हेमंत टकले : सभापती महोदय, माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी आपल्या महाराष्ट्रातील एका उच्च दर्जाच्या एका अधिकाऱ्याच्या अवहेलनेबाबत मुद्दा उपस्थित केलेला आहे. वास्तविक आपणा सर्वांना माहीत आहे की, सभागृहात कामकाज करताना काही बंधने घालून दिलेली आहेत. आपण सभागृहात कोणते विषय चर्चेला घेऊ शकतो, कोणते विषय चर्चेला घेऊ शकत नाही. या पलीकडे जाऊन हा अत्यंत संवेदनशील विषय असल्यामुळे या घटनेच्या बाबतीत आपल्या भावना व्यक्त होतील, या निमित्ताने जी खंत व्यक्त होईल याची नोंद आपण केंद्र सरकारकडे जरुर व्यक्त केली पाहिजे. हा काही एका महिलेचा अपमान नाही, तर तो भारतीय नागरिकांचा अपमान झालेला आहे. हा अपमान अतिशय गंभीर स्वरुपाचा आहे. आपल्या राज्यातून त्या तिकडे अधिकारी म्हणून गेलेल्या आहेत. त्यामुळे आपल्या राज्याने त्या घटनेची दखल घेणे आवश्यकच आहे. त्यामुळे आपली खंत या सभागृहाच्या माध्यमातून केंद्र सरकारकडे व्यक्त करता आली तर ती नक्की करावी अशी मी आपणास विनंती करतो.

श्री.रमेश शेंडगे : महोदय, श्रीमती देवयानी खोब्रागडे हया अमेरिकेत आयएफएस ऑफिसर आहेत. त्यांना अमेरिकेत अटक करण्यात आली. अतिशय निषेधार्ह घटना अमेरिकेने केल्यानंतर आज या सभागृहात निषेध होत आहे. मी केंद्र सरकारला सुध्दा धन्यवाद देणार आहे. केंद्र सरकारने अमेरिकेला अतिशय कणखरपणे प्रत्युत्तर दिले. दिल्लीमध्ये असणारे अमेरिकन राजदूत कार्यालयातील सर्व सुरक्षा काढून घेऊन अमेरिकेला दाखवून दिले की, तुम्ही कितीही बलाढय असलात तरी आम्ही प्रत्युत्तर देण्यास तयार आहोत. तुम्ही कराराचा भंग केला, भारतीय अधिकाऱ्यांच्या बाबतीत चुकीचे वागलात तर आम्ही आपणास प्रत्युत्तर देण्यास तयार आहोत. या

2...

श्री.रमेश शेंडगे...

गोष्टीचा निषेध करीत असताना केंद्र सरकारला सुध्दा धन्यवाद द्यावेत व आपल्या सभागृहाच्या भावना निश्चितपणे केंद्र सरकारला कळवाव्यात अशी माझी आपणास विनंती आहे.

**सभापती** : श्रीमती देवयानी खोब्रागडे यांना अमेरिकेत अटक करुन त्यांच्यावर घृणास्पद कारवाई केली गेली त्या बाबतीत माननीय विरोधी पक्ष नेते आणि सभागृहाचे अन्य सदस्य यांनी ज्या भावना व्यक्त केल्या आहेत त्या भावनांशी मी देखील सहमत आहे. श्रीमती देवयानी खोब्रागडे पाकिस्तानमध्ये अधिकारी म्हणून कार्यरत असताना मला पाकिस्तानला जाण्याची संधी मिळाली होती. त्या ठिकाणी मी पाच दिवस होतो. श्रीमती देवयानी खोब्रागडे हया भारतीय आणि महाराष्ट्रीयन कन्या असून त्या अतिशय मुत्सद्दी होत्या. मी त्यांचे काम अतिशय जवळून बघितले आहे. त्या पाकिस्तानमध्ये काम करीत असताना त्यांनी दाखविलेल्या आपुलकीबाबत मला व कै.बाबासाहेब कुपेकर यांना आनंद झाला. आपल्या कर्तृत्वामध्ये अत्यंत विचाराने, ध्येयवादाने प्रेरीत असलेली आपली एक अधिकारी म्हणून त्यांची आणि माझी ओळख आहे. अमेरिकन सरकार बलाढय आहे की नाही, यापेक्षा या प्रवृत्तीला माझ्या देशाने प्रखरपणे उत्तर दिले त्या गोष्टीचा मला खरा अभिमान आहे. आमच्या देशातील अधिकारी असो, कर्मचारी असो किंवा आमचा नागरिक असो, त्याच्यावर अशा पध्दतीने अन्याय होत असेल तर हा देश तेवढयाच ताकदीने प्रतिकार करील असा विचार परराष्ट्र मंत्रालयाने व्यक्त केला. त्या विचारांशी मी सहमत आहे आणि आपणही सहमत आहात.

यानंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती**......

या बाबतीत औपचारिक ठराव मांडण्याची पध्दत नाही. मी सन्माननीय मंत्री श्री.शिवाजीराव मोघे यांना सांगू इच्छितो की, केंद्र सरकारकडे आमच्या व्यक्तिगत भावना आपण जरुर कळवाव्यात.

श्री.शिवाजीराव मोघे : होय.

------

..2.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पॉईंट ऑफ इन्फर्मेशनसंबंधी**

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, एका गोष्टीची सरकारकडून आम्हाला माहिती जाणून घ्यायची आहे. सकाळपासून आम्ही असे ऐकत आहोत की, आदर्श घोटाळ्याच्या संदर्भातील भ्रष्टाचाराबाबत खटला दाखल करायला माननीय राज्यपालांनी नकार दिला आहे. माननीय राज्यपालांनी जर असा निर्णय केला असेल तर तो लॉजिकल विषयाच्या आधारे घेतला असावा. आम्हाला त्याची माहिती जाणून घ्यायची आहे. संरक्षण मंत्रालयाने पक्षाच्या हायकमांडला ब्रीफ केल्यानंतर आणि हायकमांड कन्व्हीन्स झाल्यानंतर पायउतार व्हावे लागले. सीबीआयने चौकशी केल्यानंतर त्यांना या प्रकरणात तथ्य वाटले आणि त्यामुळे या प्रकरणात गुन्हा दाखल केला पाहिजे असा त्यांनी निर्णय घेतला.

श्री.भाई जगताप : सभापती महोदय, माझी हरकत आहे. सभापती महोदय, माननीय विरोधी पक्षनेत्यांना अधिकार असल्यामुळे ते केव्हाही उभे राहू शकतात आणि केव्हाही बोलू शकतात. या सभागृहात कोणत्या मुद्यावर बोलले पाहिजे याचे संकेत ठरलेले आहेत. माननीय राज्यपालांच्या निर्णयाबद्दल या सभागृहात चर्चा होते का हे कळले तर आमच्या ज्ञानामध्ये भर पडेल.

**सभापती** : मी सदनाला एवढेच सांगू इच्छितो की, माननीय राज्यपालांच्या कोणत्याही निर्णयाच्या अनुषंगाने या सभागृहात चर्चा करण्याची पध्दत नाही. सबब विरोधी पक्षनेत्यांनी या ठिकाणी जो विषय मांडला आहे त्याबाबत आपल्यालाही मर्यादा आहेत, त्या मर्यादेच्या दृष्टीने या ठिकाणी त्याची चर्चा करता येणार नाही.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, मी माननीय राज्यपाल नावाच्या इन्स्टिट्यूटचा कुठेही अवमान करु इच्छित नाही. पॉईंट ऑफ इन्फर्मेशनच्या अनुषंगाने मुद्दा मांडताना मी असे म्हटले होते की, माननीय राज्यपालांनी हा निर्णय कोणत्या लॉजिकल कायदेशीर आधारे घेतला असेल तर या सभागृहाचा सदस्य म्हणून मला ते जाणून घ्यायचे आहे. तेवढे सरकारने करावे. माननीय राज्यपालांकडून कशाच्या आधारे निर्णय झाला याबाबत सभागृहाला अवगत करावे.

श्री.भाई जगताप : सभापती महोदय, एका शब्दाचा आधार घ्यायचा आणि विश्लेषण करीत जायचे असा प्रकार होत आहे.

..3..



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे : मी उल्लेख केलेल्या वक्तव्यामधून माननीय राज्यपालांचा अवमान कुठे झाला हे सांगावे. पॉईंट ऑफ इन्फर्मेशनच्या अनुषंगाने माहिती घ्यायची नाही का?

**सभापती** : राज्यपाल ही एक संस्था आहे. या संस्थेच्या अनुषंगाने काही संकेत आपण पाळले आहेत. त्या संकेताप्रमाणे त्यांनी दिलेल्या कोणत्याही निर्णयाच्या अनुषंगाने कोणतीही चर्चा या सदनात होणार नाही हे मी विरोधी पक्षनेत्यांच्या निदर्शनास आणतो.

श्री.भाई जगताप : माननीय विरोधी पक्षनेत्यांनी जे वक्तव्य केलेले आहे ते पटलावरुन काढण्यात यावे अशी माझी विनंती आहे.

**सभापती** : मी रेकॉर्ड तपासून घेतो आणि जी काही योग्य कार्यवाही करता येईल ती मी करेन.

-------

नंतर 2एच.1...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: औचित्याचा मुद्दा

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

शैक्षणिक वर्ष सुरू झाल्यानंतर एक महिन्यामध्ये आदिवासी विद्यार्थ्यांना गणवेष व बूट दिले जातात. शाळा सुरू होऊन साडेसहा महिने झाले आहेत आदिवासी विद्यार्थ्यांना गणवेष आणि बूट दिले गेले नाहीत. पूर्वी हे गणवेष आदिवासी शाळेतच शिवले जात होते. आता त्यांना पैसे दिले जातात. ते पैसे देखील मुख्याध्यापकांपर्यंत पोहोचलेले नाहीत. त्याच बरोबर मुख्याध्यापकांनी आदिवासी मुलांची बँकेत खाती देखील उघडलेली नाहीत. सुमारे 15935 आदिवासी विद्यार्थी एकट्या अमरावतीमध्ये आहेत. येथील विद्यार्थ्यांना अद्याप पर्यंत गणेवष आणि बूट मिळालेले नाहीत. माझ्या माहिती प्रमाणे 25 ते 30 हजार विद्यार्थ्यांचे बँकेत खाते देखील उघडलेले नाही. ही रक्कम बँक खात्यावर थेट जमा होणार होती. शाळा उघडून साडे सहा महिने झालेले आहेत. तरी देखील आदिवासी विद्यार्थ्यांना गणवेष आणि बूट मिळालेले नाहीत. सदर गणवेष आणि बूट विद्यार्थ्यांना किती दिवसात मिळणार आहेत यासंबंधी शासनाला निवेदन करण्यास सांगावे.

**सभापती** : सन्माननीय श्री.शिवाजीराव मोघे हे ज्येष्ठ मंत्री आहेत. त्यांनी या प्रश्नासंबंधातील कल्पना संबंधित विभागाच्या माननीय मंत्र्यांना द्यावी. आश्रमशाळेतील आदिवासी विद्यार्थ्यांना गणवेष व अन्य सुविधा तातडीने कशा मिळतील यासाठी शासनाने व्यवस्था करावी.

श्री.शिवाजीराव मोघे : सभापती महोदय, आपले निदेश संबंधित विभागाच्या माननीय मंत्र्यांना कळविण्यात येतील.

.......



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: लेखी उत्तरे.

**मु.शी.**: तारांकित प्रश्नासंबंधी अधिक माहिती सभागृहासमोर ठेवणे

डॉ.नितीन राऊत (रोजगार हमी मंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने "मुखेड (जि.नांदेड) तालुक्यात माती नाला, बांध, बंधारे, शेततळ्यांची दुरूस्ती, विहीर पुनर्भरण या कामात झालेला गैरव्यवहार" या विषयावरील प्रा.सुरेश नवले, श्री.संजय दत्त, डॉ.सुधीर तांबे यांच्या दिनांक 20 डिसेंबर 2012 रोजी उत्तरित झालेल्या तारांकित प्रश्न क्रमांक 33906 ची अधिक माहिती सभागृहा समोर ठेवतो.

**सभापती** : अधिक माहिती सभागृहा समोर ठेवण्यात आली आहे.

( प्रेस : येथे सोबत जोडलेली अधिक माहिती छापावी )

..3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: लेखी उत्तरे.

**मु.शी.**: अतारांकित प्रश्नोत्तरांची आठवी,नववी,दहावी आणि अकरावी यादी सभागृहाच्या पटलावर ठेवणे

अतिरिक्त सचिव : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने अतारांकित प्रश्नोत्तराची आठवी, नववी,दहावी आणि अकरावी यादी सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : अतारांकित प्रश्नोत्तरांची आठवी, नववी, दहावी आणि अकरावी यादी सभागृहासमोर ठेवण्यात आली आहे.

( प्रेस : येथे सोबत जोडलेल्या याद्या छापाव्यात )

..4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: कागदपत्रे सभागृहासमोर ठेवणे.

श्री.उदय सामंत (नगरविकास राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने मे.मॉयल लिमिटेड यांचा सन 2012-2013 या वर्षाचा एकावन्नावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : वार्षिक अहवाल सभागृहा समोर ठेवण्यात आला आहे.

.....

श्री.उदय सामंत (नगरविकास राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र राज्य वित्तीय महामंडळ यांचा सन 2012-2013 या वर्षाचा एकावन्नावा वार्षिक अहवाल सभागृहा समोर ठेवतो.

**सभापती** : वार्षिक अहवाल सभागृहा समोर ठेवण्यात आला आहे.

श्री.उदय सामंत (नगरविकास राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र राज्य वित्तीय महामंडळाचा दिनांक 31 मार्च, 2012 रोजी संपलेल्या वर्षाचा स्वतंत्र लेखापरीक्षा अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : लेखा परीक्षा अहवाल सभागृहा समोर ठेवण्यात आला आहे.

.....

श्री.उदय सामंत (नगरविकास राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने विदर्भ विकास महामंडळ मर्यादित, नागपूर यांचा सन 2011-2012 या वर्षाचा एकेचाळीसावा वार्षिक अहवाल सभागृहा समोर ठेवतो.

**सभापती** : वार्षिक अहवाल सभागृहा समोर ठेवण्यात आला आहे.

.....

श्री.उदय सामंत (नगरविकास राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने मराठवाडा विकास महामंडळ मर्यादित, औरंगाबाद यांचा सन 2011-2012 या वर्षाचा पंचेचाळीसावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

.....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**(सभापती स्थानी तालिका सभापती श्री.मोहन जोशी)**

श्री.अनिल देशमुख (अन्न व नागरी पुरवठा मंत्री) : सभापती महोदय, महाराष्ट्र राज्य शेती महामंडळ मर्यादित, पुणे यांचा सन 2011-2012 या वर्षाचा एकोणपन्नासावा वार्षिक अहवाल सभागृहा समोर ठेवतो.

**तालिका सभापती** : वार्षिक अहवाल सभागृहा समोर ठेवण्यात आला आहे.

यानंतर श्री.जुन्नरे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. डी.पी.सावंत (वैद्यकीय शिक्षण राज्यमंत्री ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सोलापूर विद्यापीठाचा सन 2010-2011 व 2011-2012 या वर्षाचा सातवा व आठवा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**तालिका सभापती (श्री. मोहन जोशी ) :** वार्षिक अहवाल सभागृहापुढे ठेवण्यात आला आहे.

श्री. डी.पी.सावंत : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने कविकुलगुरु कालिदास संस्कृत विश्वविद्यालय, रामटेक यांचा सन 2010-2011, 2011-2012, 2012-2013 या वर्षाचा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**तालिका सभापती** : वार्षिक अहवाल सभागृहापुढे ठेवण्यात आले आहेत.

श्री. डी.पी.सावंत : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ यांचा सन 2008-2009,2009-2010,2010-2011 व 2011-2012 या वर्षाचा वार्षिक अहवाल सभागृहापुढे ठेवतो.

**तालिका सभापती** : वार्षिक अहवाल सभागृहापुढे ठेवण्यात आले आहेत.

श्री.डी.पी.सावंत : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र जलसंधारण महामंडळ, औरंगाबाद यांचा सन 2012-2013 या वर्षाचा तेरावा वार्षिक लेखा अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**तालिका सभापती** : वार्षिक लेखा अहवाल सभागृहापुढे ठेवण्यात आला आहे.

श्री. संजय देवतळे (सांस्कृतिक कार्य मंत्री ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने,महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळ मर्यादित यांचा सन 2011-2012 या वर्षाचा पस्तीसावा वार्षिक अहवाल सभागृहापुढे ठेवतो.

**तालिका सभापती** : वार्षिक अहवाल सभागृहापुढे ठेवण्यात आला आहे.

श्री.रमेश शेंडगे : सभापती महोदय, आता महामंडळाचे सन 2011-2012,2012-2013 पर्यंतचे अहवाल येण्यास सुरुवात झालेली आहे. माननीय सभापती महोदयांनी वारंवार निर्देश दिले तसेच यासंदर्भात संपूर्ण सभागृहाने पाठपुरावा केला. व सभागृहाच्या वतीने मी वारंवार मागणी केली त्यामुळेच सन 2012-2013 पर्यंतचे अहवाल सभागृहात सादर होऊ लागले आहेत. त्यामुळे ज्या महामंडळाचे अहवाल सादर झाले नाहीत त्यांच्यावर कडक कारवाई करण्याचे निर्देश माननीय सभापती महोदयांनी दिलेले आहेत त्यामुळे मी आपल्याला धन्यवाद देतो.

----------

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: महिला हक्क व कल्याण समितीचा अहवाल सादर करणे

श्रीमती दिप्ती चवधरी (समिती सदस्य) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महिलांचे हक्क व कल्याण समितीचा चौथा अहवाल सादर करते.

**तालिका सभापती** : महिला हक्क व कल्याण समितीचा अहवाल सभागृहाला सादर झाला आहे.

----

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** / **मु. शी.** : सोमवार दि.2 डिसेंबर,2013 रोजी सातारा येथील सोनगाव कचरा डेपोमध्ये शालेय पोषण आहार योजनेचे 400 क्विंटल धान्य फेकून दिल्याचे आढळून येणे याबाबत श्री. जयंत प्र.पाटील, वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री. अनिल देशमुख ( अन्न व नागरी पुरवठा मंत्री ) : सभापती महोदय, नियम 93 अन्वये दिलेल्या सूचनेला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**तालिका सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

...4 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, 2 डिसेंबर,2013 रोजी सातारा येथील सोनगाव येथील नगरपरिषदेतील कचरा डेपोमध्ये किती धान्य टाकण्यात आले ?यामध्ये शासकीय शिक्का असलेला माल किती होता तसेच अन्य माल किती होता व कोणता होता ? आढळून आलेल्या धान्याच्या पोत्यावर महालक्ष्मीबाई महिला गृह उद्योग बहुउद्देशीय बालविकास संस्था कोटा, राजस्थान या नावाची व महाराष्ट्र शासनाचा शिक्का असलेली जून,जुलै 2011 असा उल्लेख असलेली पोती वापरण्यात आली होती. हा माल शासकीय गोदामातून आला होता काय ?

श्री. अनिल देशमुख : सभापती महोदय, या ठिकाणी आढळून आलेला माल शासकीय नव्हता.

-----

..5..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./ मु. शी.** : भुसावळ येथील काही स्वस्त धान्य दुकानदारांनी माहे फेब्रुवारी, 2013 पासून नवीन वाढ झालेल्या एपीएल रेशन कार्डकरिता नियतन मंजूर करण्यात येणे परंतु प्रत्यक्षात वाढीव कोटा न मिळणे याबाबत ॲड.अनिल परब, वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री. अनिल देशमुख ( अन्न व नागरी पुरवठा मंत्री ) : सभापती महोदय, नियम 93 अन्वये दिलेल्या सूचनेला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**तालिका सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

**निवेदन**

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

----

...6 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.अनिल परब : सभापती महोदय, 9 रेशन दुकानांनी नवीन लाभार्थ्यांची नावे देऊन अर्ज केला. त्या लाभार्थ्यांची कोणत्याही प्रकारे शहानिशा न करता वाढीव कोटा देण्यात येतो व हा वाढीव कोटा काळया बाजारात विकला जातो. यासंदर्भात कारवाई करुन दोन दिवसात कारवाईचा अहवाल शासनास पाठविण्यात यावा असे आदेश दिलेले असतानाही संबंधितांवर कोणत्याही प्रकारची कारवाई झाली नाही.

यानंतर श्री.अजित.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

AJIT/ D/ D/ ST/ KTG/ पूर्वी श्री.जुन्नरे.. 14:30

ॲड.अनिल परब....

अशाप्रकारे काळाबाजार करणाऱ्या नऊ दुकानांवर कारवाई करुन त्यांना काळ्या यादीत टाकणार काय ? माझा दुसरा प्रश्न आहे की, आतापर्यंत किती धान्य काळ्या बाजारामध्ये विकण्यात आले आहे ? या दुकानदारांवर गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे काय ?

श्री.अनिल देशमुख : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी नऊ दुकानासंबंधी प्रश्न विचारला आहे. मी त्याबाबत सांगू इच्छितो की, त्या ठिकाणी काहीही गैरव्यवहार झालेला नाही. सन 2010-2011-2012 या तीन वर्षात 2 हजार 655 नवीन अेपीएल कार्डस देण्यात आली होती. मार्च 2013 पासून धान्य देण्यास सुरुवात झाली. त्यांना नियमानुसार कार्डस देण्यात आली आहेत. त्यामध्ये कोणताही अपहार झालेला नाही.

ॲड.अनिल परब : सभापती महोदय, आपल्या विभागाच्या अधिकाऱ्यांनी शिधावाटप अधिकाऱ्यांना त्या दुकानांवर कारवाई करण्याचे आदेश दिलेले आहेत. त्यांना दोन दिवसांत अहवाल पाठविण्यास सांगितलेले आहे. त्यांच्या आदेशाचे पत्र माझ्याकडे आहे. मी माहितीच्या अधिकाराखाली ही माहिती घेतलेली आहे. त्यांचे कोणतेही दाखले तपासलेले नाहीत. त्यांनी कोणत्याही गोष्टीची पूर्तता केलेली नाही. आपण नियमाप्रमाणे दिले असेल तर आपल्या विभागाच्या अधिकाऱ्यांनी कारवाईचे पत्र कशासाठी दिले ?

श्री.अनिल देशमुख : सभापती महोदय, माझ्याकडे जी माहिती आहे त्याप्रमाणे मी माहिती दिलेली आहे. मी अगोदर सांगितल्याप्रमाणे सन 2010-2011-2012 या तीन वर्षात 2 हजार 655 अेपीएलची कार्डस देण्यात आली. त्यानंतर रीतसर धान्य वाटपास सुरुवात झाली. या प्रकरणी कोणताही गैरव्यवहार झालेला नाही. सन्माननीय सदस्यांकडे जास्तीची माहिती असेल तर त्यांनी ती माझ्याकडे द्यावी. त्या संदर्भात निश्चितपणे चौकशी करण्यात येईल.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, हा विषय गंभीर आहे. माननीय मंत्री महोदयांचा काही दोष नाही. कारण आपणास अधिकारी जी माहिती देतात ती आपण सभागृहात देता. आपल्याच विभागाच्या अधिकाऱ्यांनी दिलेल्या पत्राची माहिती त्यांना नसेल. माननीय मंत्री महोदयांना अधिकारी चुकीची माहिती देऊन सभागृहाची दिशाभूल करण्याचा प्रयत्न करीत असतील तर ते योग्य नाही. मी या पत्राची प्रत आपल्याकडे देतो. आपण ते पत्र माननीय मंत्री महोदयांकडे

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते...

देण्याऐवजी आपणच त्या पत्राची छाननी करावी. माननीय मंत्री महोदयांना चुकीची माहिती देणाऱ्या अधिकाऱ्यावर कारवाई झाली पाहिजे अशी माझी मागणी आहे. अधिकाऱ्यांनी माननीय मंत्री महोदयांना काहीही माहिती द्यायची हे योग्य नाही. प्रशासनातील अधिकाऱ्यांना असे वाटते की, आपण कशीही माहिती दिली तरी आपल्यावर काहीही कारवाई होत नाही. तेव्हा अशी असत्य माहिती देणाऱ्या अधिकाऱ्यावर कारवाई झाली पाहिजे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य ॲड.अनिल परब यांना माझी विनंती आहे की, त्यांनी ते पत्र आपल्याकडे द्यावे. माननीय सभापतींनी या पत्राची छाननी करावी. सभागृहाची दिशाभूल करण्याची उत्तरे अधिकाऱ्यांकडून येत असतील तर अशा अधिकाऱ्यांची गय करु नये अशी माझी मागणी आहे.

ॲड.अनिल परब : सभापती महोदय, मी माहितीच्या अधिकाराचे पत्र आणि कारवाईचे पत्र आपल्याला देतो.

-----

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./ मु.शी.** : अकोला ग्रामीण भागात सुरु असलेले 16 तासांचे भारनियमन कमी करण्याची आवश्यकता या बाबत श्री.विनोद तावडे, डॉ.रणजित पाटील ॲड.आशिष शेलार, श्री.चंद्रकांत पाटील, वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना

श्री.राजेंद्र मुळक ( ऊर्जा राज्यमंत्री ) : सभापती महोदय, नियम 93 अन्वये दिलेल्या सूचनेला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**तालिका सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

..4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, सध्या कृषी पंपधारकांची मोठ्या प्रमाणावर लूट सुरु आहे. नवीन कनेक्शन बसवायचे असेल तर त्यासाठी जवळपास तीन-चार महिन्यांची वाट पहावी लागते. परवा ज्येष्ठ सन्माननीय सदस्य श्री.माणिकराव ठाकरे सुध्दा याच विषयावर बोलले. वीज कनेक्शन दिल्यानंतर रात्री-अपरात्री वीज पुरवठा होतो. एकूण दहा तास विजेचा पुरवठा होतो त्यातील दोन तास वीज गायब असते अशी विदर्भामध्ये परिस्थिती आहे.

सभापती महोदय, ट्रान्सफॉर्मर जळणे, फीडरवर जास्त ताण आल्यामुळे विद्युत पुरवठा खंडित होणे अशा तऱ्हेच्या अनेक तक्रारी माझ्याकडे आलेल्या आहेत. वीज पुरवठा सुरळीत नसताना देखील शेतकऱ्यांना भरमसाठ बिल येत आहे आणि त्या संदर्भातील अनेक तक्रारी शेतकऱ्यांनी माझ्याकडे केलेल्या आहेत. प्रत्यक्ष शेतकऱ्यांच्या शेतावर न जाता कार्यालयात बसून बिल बनविण्याचे काम केले जाते असे आपले अधिकारी मोकळ्या मनाने मान्य करतात.

सभापती महोदय, अकोला व बुलढाणा जिल्ह्यातील सब-स्टेशन्सद्वारे शेतकऱ्यांना केलेला वीज पुरवठा आणि त्या सबस्टेशनला महावितरणद्वारा झालेला सप्लाय याची बॅलन्सशीट चेक करावी म्हणजे आपणास शेतकऱ्यांचे म्हणणे किती खरे आहे याची जाणीव होईल.

यानंतर श्री.कांबळे..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे ....

विजेच्या पुरवठ्याच्या अधिक पट देयक महावितरण क्लेम करीत आहे. आपण या संदर्भात लक्ष घालणार का, आपण ते कमी करणार का, आपण या संदर्भात ऑडिट करणार का ? अकोला, बुलढाणा या जिल्ह्यांच्या संदर्भात नियम 93 ची सूचना असल्यामुळे मी त्या बाबतच विचारतो. आपण विजेची देयके कमी करून घेणार आहात का ? रोहित्रे जळाल्यास अमुक इतक्या दिवसांत ती तातडीने दुरूस्त करण्याच्या संदर्भात किंवा बदलून देण्याच्या संदर्भात शासनाचा धोरणात्मक निर्णय आहे का, ती नादुरूस्त रोहित्रे अमुक दिवसांत दुरूस्त करून देऊ, असे काही घोषित करणार का ?

श्री. राजेंद्र मुळक : सभापती महोदय, सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांनी नियम 93 च्या सूचनेच्या माध्यमातून अकोला, बुलढाणा जिल्ह्यांमध्ये रोहित्रे बिघडल्यानंतर वेळेवर मिळत नसल्याच्या संदर्भात, विजेचा व्यवस्थित पुरवठा होत नाही या संदर्भात आणि वीज बिलिंगच्या संदर्भातील विषय मांडले आहेत. शासन कृषी पंपांची कनेक्टिव्हिटी देते, ऊर्जीकरण करते. जेथे रोहित्रे आहेत, तेथे कनेक्टिव्हिटी देण्यासाठी ॲडिशल इन्फ्रास्ट्रक्चर उभारण्याची गरज नाही. आपण इन्फ्रास्ट्रक्चर असलेल्या भागात तातडीने कनेक्शन देतो. परंतु, जेथे इन्फ्रास्ट्रक्चरची आवश्यकता आहे, तेथे ते करावे लागते. सब स्टेशनपासून खांब टाकून त्या भागात रोहित्रे बसवायचे असेल, तेथून कनेक्टिव्हिटी द्यायची असेल तर त्याला इन्फ्राची कामे म्हटले जाते. आपण ती सर्व कामे पूर्ण केल्यानंतर कृषी पंपांचे ऊर्जीकरण करतो आणि त्या भागातील शेतकऱ्यांना कृषी पंपांची कनेक्टिव्हिटी देतो. मागील आठवड्यात या संदर्भात चर्चा झाली होती. मी या विषयावर अत्यंत स्पष्ट उत्तर सभागृहात दिले होते.

सभापती महोदय, आपण इन्फ्रा-1 चा प्लॅन राज्यात आणला होता आणि त्या माध्यमातून इन्फ्रास्ट्रक्चरची कामे मोठ्या प्रमाणात केली. इन्फ्रा-2 चा देखील प्लॅन आणला. अकोला, बुलढाणा या भागातील देखील मोठ्या स्वरूपाची इन्फ्रास्ट्रक्चरची कामे त्यामध्ये इन्क्यलूड केली आहेत, टेंडर झाले आहे. कनेक्शन देण्याची कामे तातडीने होतील.

सभापती महोदय, सबस्टेशनला सप्लाय होतो, त्यातून रोहित्रापर्यंत एमएसडीसीएलच्या माध्यमातून वीज जाते, यात काही डिफरन्स आहे का, असे विचारण्यात आले. मी अकोला

..2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राजेंद्र मुळक ....

बुलढाण्याची आजची परिस्थिती काय आहे, हे एकदम सांगू शकणार नाही. मी नक्की त्या संदर्भात माहिती घेतो. महावितरणला त्या भागासाठी किती वीज मिळते, महावितरण ग्राहकांना किती वीज देते, त्यामध्ये काही तफावत आहे का, बिलिंग सप्लायनुसार होते का, या सर्व बाबींची लेखी माहिती मी नक्की सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांना देईन. ट्रान्सफॉर्मर वेळेवर मिळत नाही, अशी तक्रार केली. ही बाब सत्य आहे की, अनेक भागात ट्रान्सफॉर्मर बिघडले की ते वेळेवर मिळत नाहीत, अशा तक्रारी येतात. आम्ही झोनवाईज ट्रान्सफार्मर पुरवठा करीत होतो. आता जिल्ह्यातील विशिष्ट स्थानकांमधून तालुक्यापर्यंत पोहचण्याचा प्रयत्न करीत आहोत. सबस्टेशनच्या एरियात त्या त्या भागात स्टॉक यार्ड तयार केले आहेत. ट्रान्सफार्मर तातडीने जावा, असा आमचा निर्धार आहे. इन्फ्रा-2 च्या प्लॅनमध्ये आम्ही नव्याने मोठ्या स्वरूपात ट्रान्सफॉर्मर घेत आहोत. ट्रान्सफॉर्मर खराब झाला तर तो बदलून देण्याचा निश्चित कालावधी असला पाहिजे. जेथे जागा दूर असेल तेथे 15 दिवसांच्या आत ट्रान्सफॉर्मर यावा, अशी लोकांची अपेक्षा असते. पण त्याहीपेक्षा कालावधी कमी झाला पाहिजे.

( नंतर श्री. खंदारे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राजेंद्र मुळक....

एखाद्या शेतकऱ्याकडून ट्रान्सफॉर्मर बंद पडल्याची सूचना केली तर तो 4-5 दिवसामध्ये बदलून देण्याची परिस्थिती निर्माण केली जाईल. स्टॉक यार्डमध्ये ट्रान्सफॉर्मर उपलब्ध असल्यास लगेच बदलून दिले जातात. परंतु उपलब्धता कमी असेल तर अडचण निर्माण होते.

श्री.पांडुरंग फुंडकर : बुलढाणा व अकोला जिल्ह्यामध्ये 20-20 दिवस ट्रान्सफॉर्मर बदलून मिळत नाहीत. अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचे खरिपाचे पीक गेले आहे, आता ते रब्बीचे पीक घेत आहेत. त्यासाठी पाण्याची आवश्यकता आहे. परंतु अशा वेळी ट्रान्सफॉर्मर जळतात. त्यांना 1-1 महिना ट्रान्सफॉर्मर मिळत नाही. ज्यांना ट्रान्सफॉर्मर दिले जातात ते मागणीप्रमाणे उच्च क्षमतेचे दिले जात नाहीत. त्यामुळे ते जळतात. म्हणून मागणीनंतर 4-5 दिवसात नवीन ट्रान्सफॉर्मर देण्याबाबत धोरणात्मक निर्णय घेऊन खालच्या स्तरावर आदेश दिला जाणार आहे का ?

श्री.राजेंद्र मुळक : शासनाने तसा निर्णय घेतलेला आहेउच्च क्षमतेचे नवीन ट्रान्सफॉर्मर घेतले असून ते सर्व जिल्ह्यांना दिले जाणार आहेत. इन्फ्रा-2 मध्ये विदर्भाला 1 हजार कोटी रुपये दिलेले आहेत.

-----



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: विदर्भातील संत्र्याच्या उत्पादनात होत असलेली घसरण याबाबत डॉ.नीलम गोऱ्हे, वि.प.स.यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना

डॉ.विजयकुमार गावित (फलोत्पादन मंत्री) : सभापती महोदय, नियम 93 अन्वये दिलेल्या सूचनेला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**तालिका सभापती ( श्री.मोहन जोशी)** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे. )

------

3....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ D/ KTG/

डॉ.नीलम गोऱ्हे : नागपूर शहराला ऑरेंज सिटी म्हणून ओळखले जाते. विदर्भातील संत्री संपूर्ण देशभर प्रसिध्द आहेत. या संत्र्याची उत्पादकता घसरत असल्याबाबत विदर्भातील शेतकरी आवाज उठवित आहेत. सन 2008-09 मध्ये प्रती हेक्टर 8.72 टन उत्पादन मिळत होते. अनेक कारणांमुळे सन 2013-13 मध्ये प्रती हेक्टरी ते 5.47 टनावर आलेले आहे. आंध्र प्रदेशातही संत्र्याचे उत्पादन घेतले जाते. तेथे मात्र प्रती हेक्टरी 13.5 टन उत्पादन मिळते. संत्र्याच्या उत्पादकतेत घसरण का होत आहे आणि होत असलेली घसरण थांबवून ती वाढविण्यासाठी फलोत्पादन विभागाकडून कोणत्या उपाययोजना केल्या जात आहेत ?

या निवेदनात असे नमूद केले आहे की, "जुन्या फळबागांचे पुनरुज्जीवन या कार्यक्रमांतर्गत हेक्टरी 30 हजार रुपयांच्या खर्चाच्या पॅकेजचा कार्यक्रम राबविण्यात येतो." त्यानुसार किती फळबागांचे पुनरुज्जीवन झाले आहे. पुनरुज्जीवन कार्यक्रमामध्ये काही नवीन कार्यक्रम प्रस्तावित केले आहे का ? सन 2008-09 मध्ये नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना प्रती हेक्टरी 10 हजार रुपये अर्थसहाय्य दिले. सन 2010 मध्ये 15 हजार रुपये व सन 2013-14 मध्ये 12 हजार रुपये अर्थसहाय्य दिले आहे. एका बाजूला महागाई वाढत आहे. अशा वेळी हेक्टरी मदत कमी दिली जात आहे. ती वाढवून दिली जाईल काय ?

डॉ.विजयकुमार गावित : नागपूर क्षेत्रात मोठ्या प्रमाणात संत्र्यांचे उत्पादन घेतले जाते. एकूण उत्पादनापैकी विदर्भात 40 टक्के संत्र्याचे उत्पादन होते.

नंतर श्री.शिगम.......

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. विजयकुमार गावित....

2008-2009 आणि त्यानंतर पाऊस कमी पडल्यामुळे संत्रा पिकाचा मृग बहर कमी आला. सन 2010मध्ये अतिउष्णतेमुळे संत्र्याचे पीक वेळेवर येऊ शकले नाही. तिस-या स्टेजमध्ये अतिवृष्टी झाली. अशा प्रकारे विविध संकटामध्ये शेतकरी सापडत आहे. संत्र्याची उत्पादकता कमी कमी होत आहे. त्याची कारणे मी सांगितली. आपण इंडोइस्त्राईल करार केलेला आहे. त्या कराराच्या माध्यमातून आपण नवीन तंत्रज्ञान वापरण्यास सुरुवात केलेली आहे. सहा-सात शेतकऱ्यांनी या तंत्रज्ञानाचा वापर केलेला असून हेक्टरी 20 ते 25 टन उत्पादन ते घ्यायला लागले आहेत. या नवीन तंत्रज्ञानाच्या वापरपामुळे संत्र्याची चांगली रोपे तयार झालेली आहेत. झाडे देखील चांगली तयार झालेली आहेत. या झाडांवर रोग देखील पडत नाही . रोगमुक्त अशी ही झाडे आहेत. अशा प्रकारे उत्पादकता वाढविण्याचे प्रयत्न आपण करीत आहोत. 2008-09मध्ये प्रति झाड 125 रुपये अनुदान देण्याचे ठरले होते. परंतु नंतर 2 हेक्टरपर्यंत प्रति हेक्टरी 10 हजार रुपये अनुदान देण्यात आले. त्यासाठी 56 कोटी रुपयाचे वाटप करण्यात आले. अतिरिक्त अनुदानाची गरज होती. सन 1008-09मध्ये 63 कोटी 98 लाख रुपये अनुदान देण्यात आले. 2010मध्ये संत्रा पिकाच्या झालेल्या नुकसानीबाबत 67145.22 इतक्या हेक्टरसाठी 100 कोटी 72 लाख रुपये अनुदान देण्यात आले. या अतिवृष्टीमध्ये झालेल्या नुकसानी बाबत केन्द्र शासनाच्या नॉर्म्स प्रमाणे हेक्टरी 12 हजार रुपये अनुदान दिलेले आहे.

श्री. मनिष जैन : हेक्टरी किती पैसे देण्यात आलेले आहेत ?

डॉ. विजयकुमार गावित : सुरुवातीला पडलेल्या पावसामुळे जे नुकसान झाले त्यासाठी हेक्टरी 10 हजार रुपये अनुदान दिलेले आहे.

श्री. दिवाकर रावते : प्रति झाडाला किती अनुदान येते ?

डॉ. विजयकुमार गावित : 2008-09मध्ये हेक्टरी 10 हजार रुपये याप्रमाणे अनुदान देण्यात आले. त्यानंतर हेक्टरी 15 हजार रुपये अनुदान देण्यात आले. आता केन्द्र शासनाच्या नॉर्म्स प्रमाणे हेक्टरी 12 हजार रुपये अनुदान देत आहोत. शेतकरी झाडे विविध अंतरावर लावतात. एका हेक्टरमध्ये निश्चित किती झाडे असू शकतील हे सांगता येत नाही. त्यामुळे प्रति झाड किती अनुदान येते हे सांगता येणार नाही.

...नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. विजय गावीत...

एका हेक्टरमध्ये किती झाडे आहेत, प्रत्येक शेतकरी वेगवेगळया अंतरावर झाडे लावतात. त्यामुळे एका हेक्टरमध्ये किती झाडे लावली जातात या बाबतची माहिती सांगणे कठीण आहे.

------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी. : यवतमाळ-लोहारा या मुख्य रस्त्यावरील वन विभागाचे, उप वन संरक्षक यांनी शासकीय निवासस्थान परवानगी न घेता भाडयाने देणे .

श्री. रामदास कदम ( मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

" यवतमाळ येथून अमरावती, दारव्हा, अकोला, पुसद, नांदेड येथे होणाऱ्या सागवानांच्या वाहतुकीवर नजर व नियंत्रण ठेवणे या उद्देशाने यवतमाळ-लोहारा या मुख्य रस्त्यावर यवतमाळ वनपरिक्षेत्राअंतर्गत या नियमक्षेत्रात घटक-1 शासकीय निवासस्थान सन 2005-1010 मध्ये 2,80.000/- शासकीय अनुदानातून बांधण्यात आली. सदरच्या शासनाच्या उद्देशाला बगल देऊन सदरहू इमारत यवतमाळ जिल्हा कर्मचारी पतसंस्था यांना वापराकरिता सर्व नियम धाब्यावर ठेवून कुठल्याही प्रकारचे भाडे किंवा अटी शर्ती न करता देण्यात येणे, याबाबतची चौकशी करुन सादर केलेल्या अहवालात उपवन संरक्षण यवतमाळ यांनी स्वत:ला असे निवासस्थान भाडयाने देता येत नसल्याचे अधिकार नाहीत. याबाबत कोणतीही खात्री न करता व अधिकारांचे उल्लंघन करुन किंवा शासनाची किंवा वरिष्ठांची परवानगी न घेता पत्र क्रमांक 511 दिनांक 20.10.2010 ला काही अटी व शर्तीस अधीन राहून भाडयाने दिली असल्याचे दिसून येणे. परंतु संस्थेकडून कुठलेही भाडे माननीय उपवन संरक्षक यांनी वसूल केलेले आजतागायत दिसून आले नाही. दिनांक 7.3.2013 रोजी 3 दिवसात निवासस्थान रिक्त करण्याच्या सूचना देण्यात येऊनही सदनिका रिक्त करण्यात आल्या नाही. या संदर्भात विधानसभेत प्रश्न उपस्थित केला असता मुख्य वनसरंक्षक प्रादेशिक यवतमाळ यांनी पत्र क्र.1681 दिनांक 2.3.2013 रोजी इमारत रिकामे करुन घेतलेली असल्याची खोटी माहिती देण्यात येणे. त्यानंतर दिनांक 7.3.2013 रोजी 3 दिवसांत निवासस्थान रिक्त करण्याच्या सूचना देण्यात येऊनही सदनिका रिक्त करण्यात आल्या नाही. राज्याचे अ.प्र.मु.व.स. (अर्थसंकल्प नियोजन व विकास) यांनी पत्र क्रमांक 106, मार्च, 2013 अन्वये सादर निवासस्थान ही शासकीय मालमत्ता परस्पर खाजगी संस्थेस भाडेतत्वावर देणाऱ्या अधिकाऱ्यावर कार्यवाही केल्याचा

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामदास कदम .....

अहवाल मागविला, परंतु मुख्य वनसंरक्षक यवतमाळ यांनी कोणतीही कार्यवाही न करता हे पत्र संस्था अध्यक्षांकडून मोठी रक्कम घेऊन सदरचे प्रकरण दडपण्यात येणे, तरी या संदर्भात शासनाने तातडीने सखोल चौकशी करुन संबंधित अधिकाऱ्यांवर याबाबत तातडीने शासनाने कार्यवाही करावी, अशी मी या विशेष उल्लेखाव्दारे विनंती करीत आहे.

------------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: (तृतीय पुरवणी) विनियोजन विधेयक

**L. A. BILL NO. XLIV OF 2013**

(A BILL TO AUTHORISE PAYMENT AND APPROPRIATION OF CERTAIN FURTHER SUMS FROM AND OUT OF THE CONSOLIDATED FUND OF THE STATE FOR THE SERVICES OF THE YEAR ENDING ON THE THIRTY-FIRST DAY OF MARCH 2014.)

श्री.राजेंद्र मुळक (वित्त राज्यमंत्री ) :सभापती महोदय, महाराष्ट्र विधानसभेने संमत केल्याप्रमाणे सन 2013 चे वि.स.वि. क्रमांक 44, दिनांक 31 मार्च, 2014 रोजी संपणाऱ्या वर्षाच्या कामांसाठी राज्याच्या एकत्रित निधीतून आणखी विवक्षित रकमा देणे व त्यांचे विनियोजन करणे यांस अधिकृत मंजुरी देण्यासाठी विधेयक विचारात घेण्यात यावे, असा मी आपल्या अनुमतीने प्रस्ताव मांडतो.

असे करीत असतांना मी सभागृहाच्या निदर्शनास आणू इच्छितो की, भारतीय संविधानाच्या अनुच्छेद 207, खंड (1) द्वारे महाराष्ट्राच्या राज्यपालांना प्रदान करण्यात आलेल्या शक्तींचा वापर करुन त्यांनी हे विधेयक महाराष्ट्र विधानपरिषदेसमोर मांडण्यासाठी शिफारस केली आहे.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**तालिका सभापती (श्री.मोहन जोशी )** : विधेयक विचारात घेण्यात आले आहे. आता मी विधेयक खंडशः सभागृहाला सादर करतो. शिफारशी करावयाच्या असल्यास सदस्यांनी मांडाव्यात.

(खंड 2 व 3, अनुसूची, खंड 1, संपूर्ण शीर्षक व हेतुवाक्य हे एका पाठीमागून एक याप्रमाणे विचारात घेण्यात आले. त्यांच्या बाबतीत कोणतीही शिफारस करण्यात आली नाही.)

**तालिका सभापती** : ज्याअर्थी, परिषदेस कोणतीही शिफारस करावयाची नाही, त्याअर्थी, परिषदेला कोणतीही शिफारस करावयाची नाही, अशा शिफारशींसह हे विधेयक विधानसभेकडे परत पाठविण्यात येईल.

-------



अग्रधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ABG/ D/ KTG/

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, यामध्ये काही सजेशन्स नाहीत. मला एवढीच विनंती करावयाची आहे की, काल पुरवणी मागण्यांवरील चर्चा सुरु करीत असताना माननीय मुख्यमंत्र्यांनी या सभागृहाला आस्वस्त केले आहे. या पुरवणी मागण्यांच्या बरोबर ॲन्यूअल फायनान्शियल स्टेटमेंट यावयास पाहिजे होते ते यावेळी आलेले नाही.

यानंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.तावडे............

त्यामुळे घटनाबाह्य चर्चा होत होती. माननीय राज्यपालांचे निर्देश पाळले जात नाहीत त्याबद्दल माननीय सदस्य श्री.भाई जगताप बोलत नाहीत. त्यांनी दिलेल्या निर्णयाबद्दल आम्ही माहिती जाणून घेण्याबद्दल विचारणा केल्यानंतर लगेच उठून उभे राहिले. त्यांना जर माननीय राज्यपालांची इतकी काळजी असेल तर त्यांनी घटनाबाह्य प्रकाराबद्दल बोलले पाहिजे. माननीय राज्यपालांचे निर्देश पाळलेले नाहीत त्याबद्दल न बोलता गप्प बसून राहिले.

सभापती महोदय, मंत्री महोदयांनी सभागृहाला आश्वस्त करावे. वित्त मंत्री, विधानसभा अध्यक्ष आणि सचिवांची बैठक झाली. माननीय मुख्यमंत्र्यांना माननीय राज्यपालांनी म्हटले आहे की, बजेट मांडताना पूर्वीच्या वर्षाचा जो खर्च झाला तो विभागवार कसा झाला याचे विवरणपत्र म्हणजे ॲन्युअल फायनान्शियल स्टेटमेंट द्यावे. याबाबत आश्वासन दिले तर हे विधेयक पास होण्यास उपयुक्त ठरू शकते.

श्री.राजेंद्र मुळक : सभापती महोदय, दोन दिवसांपूर्वी माननीय अध्यक्ष, विधानसभा यांच्या दालनात बैठक झाली. त्यांच्या उपस्थितीत माननीय उप मुख्यमंत्री, माननीय विरोधी पक्षनेते आणि मी स्वत: बैठकीला उपस्थित होतो. त्या बैठकीमध्ये विविध विषयाच्या संदर्भात चर्चा झाली. राज्याच्या मुख्यमंत्र्यांनी या संदर्भातील एक पत्र माननीय राज्यपालांना पाठविले असून त्यात सविस्तर माहिती दिली आहे. राज्यपाल महोदयांनी दुसऱ्याच दिवशी माननीय मुख्यमंत्र्यांना या संदर्भात मी माहिती घेऊन पुढील कार्यवाहीच्या संदर्भात कळवितो असे सांगितले. त्यानंतर पुन्हा जी बैठक झाली त्यामध्ये ज्या काही बाबी निश्चित झाल्या त्यानुसार येणाऱ्या काळात ज्यावेळी पुरवणी मागण्या असतील अथवा मुख्य बजेट असेल त्यावेळी सर्व गोष्टी कम्पाईल केल्या जातील.

श्री.दिवाकर रावते : यावेळी जी चूक झाली ती कोणामुळे झाली हे जाणून घेऊ इच्छितो. घटनात्मक विषय असल्यामुळे सभागृहाच्या दृष्टीने महत्वाचे होते. आपण माननीय राज्यपालांच्या संदर्भात निवेदन केले ते आम्ही स्वीकारले आणि चर्चेला सुरुवात केली. ती चर्चा सुध्दा बेकायदेशीर आणि अयोग्य होती. परंतु शासनाने केलेल्या निवेदनामुळे आम्ही स्वीकारली. आता आपण निवेदन केले की, पुढील वेळी सुधारणा करु. ते ठीक आहे. प्रत्येक वेळेला स्टेटमेंट दिले जाते, यावेळी चूक कोणामुळे झाली, कशी झाली याबाबत संबंधितांविरुध्द काय कारवाई करणार याची विचारणा केली होती, त्या संदर्भात उत्तर अपेक्षित आहे. आता चूक झाली, पुढे सुधारणा करु म्हणून सोडून दिले असे होता कामा नये.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राजेंद्र मुळक : सभापती महोदय, साधारणत: वर्षाच्या शेवटी अशा स्वरुपाची संपूर्ण बाबींची माहिती पुस्तिकेच्या माध्यमातून दिली जाते. तेच अभिप्रेत असते. यावेळी नेमके विरोधी पक्षनेत्यांकडून आणि खालच्या सभागृहात देखील अशा प्रकारची अपेक्षा व्यक्त करण्यात आली. म्हणून या संदर्भातील माहिती माननीय राज्यपालांना दिली, त्या संदर्भात राज्यपाल महोदयांनी काही निर्देश दिले.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, माननीय राज्यपालांनी घटनेच्या आधीन राहून निर्देश दिलेले आहेत. या ठिकाणी जे कामकाज चालते ते घटनेच्या आधीन राहून केले जाते. माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी मांडलेला मुद्दा रास्त आहे. मंत्री महोदयाना, विभागाच्या सचिवांना याची माहिती होती की नाही? केवळ राजकीय अडचण होते म्हणून जाणूनबुजून स्टेटमेंट दिले गेले नाही का या संदर्भात आम्हाला कळले पाहिजे. शासन जाणूनबुजून हा प्रकार करीत आहे. पुरवणी मागण्यांची टक्केवारी पाहिली तर ती दिवसेंदिवस वाढत आहे. अर्थसंकल्प आणि पुरवणी मागण्या यातील तफावत मोठ्या प्रमाणात दिसून येते. सभागृह कशासाठी आहे? सर्व अधिकार अर्थमंत्र्यांना देऊन टाका. विशिष्ट नेते आणि नगरपालिकेच्या ठराविक लोकांना तुम्ही निधी देत आहात. ही खाजगी मालमत्ता आहे का? विरोधी पक्षाला तुम्ही लाईटली घेत आहात. मार्चच्या अधिवेशनात काय गंभीरपणे होणार आहे? खाजगी मालमत्ता समजून कॉन्ट्रॅक्टरला पैसे दिल्याप्रमाणे वर्तन केले जात आहे. तुमची खाजगी प्रॉपटी आहे का? ही सभागृहाची प्रॉपर्टी आहे. सभागृहाच्या मान्यतेने तुम्हाला कार्यवाही करावी लागेल.

नंतर 2पी.1...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत प्र.पाटील....

सन्माननीय विरोधी पक्ष नेते तसेच सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी या विषयाच्या संदर्भात जो उल्लेख केलेला आहे त्याचे मी समर्थन करतो.माननीय राज्यपाल महोदयांचे निर्देश असतानाही ज्या अधिकाऱ्याने किंवा ज्या मंत्र्यांनी आक्षेपार्ह वर्तन केले आहे त्यासंदर्भातील माहिती पटलावर ठेवली गेली पाहिजे असे आमचे म्हणणे आहे.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, विरोधी पक्षाने आग्रह केला तरी तुम्ही काही सुध्दा ऐकत नाही. आम्ही त्या दिवशी घटनात्मकदृष्टया आपणा सर्वांना पटवून दिले होते. शेवटी ते माननीय उप मुख्यमंत्र्यांना पटले होते. त्यांनी सांगितले की, हे घटनात्मकदृष्टया हे करणे आवश्यक होते परंतु ते आमच्या खात्याने केले नाही. आमचे खाते हे करु शकत नाही असे त्या ठिकाणी तुमचे सचिव सुध्दा म्हणाले होते. माननीय राज्यपाल महोदयांनी वित्त खात्याच्या सचिवांशी चर्चा करुन ठरवले होते. घटनात्मक गरज म्हणून ते आणलेले आहे.

श्री. राजेंद्र मुळक : सभापती महोदय, माननीय राज्यपालांनी दिलेल्या निर्देशांचे पालन महाराष्ट्र शासन काटेकोरपणे करीत आहे. घटनात्मक पध्दतीने बजेट किंवा पुरवणी मागण्या सादर करावयाचे असते त्याच पध्दतीने सादर केले जाते व भविष्यातही ते करण्यात येईल.

---

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: विनियोजन (अधिक खर्च) विधेयक

**L. A. BILL NO. XLV OF 2013**

(A BILL TO PROVIDE FOR THE AUTHORISATION OF APPROPRIATION OF MONEYS OUT OF THE CONSOLIDATED FUND OF THE STATE TO MEET THE AMOUNTS SPENT ON CERTAIN SERVICES DURING THE FINANCIAL YEAR ENDED ON THE THIRTY-FIRST DAY OF MARCH 2007, IN EXCESS OF THE AMOUNTS GRANTED FOR THOSE SERVICES AND FOR THAT YEAR.)

श्री. राजेंद्र मुळक ( वित्त राज्यमंत्री ) :सभापती महोदय, महाराष्ट्र विधानसभेने संमत केल्याप्रमाणे सन 2013 चे वि.स.वि. क्रमांक 45 - दिनांक 31 मार्च 2007 रोजी संपलेल्या वित्तीय वर्षातील विवक्षित कामांसाठी व त्या वर्षासाठी मंजूर करण्यात आलेल्या रकमाहून त्या वर्षात त्या विवक्षित कामांवर ज्या अधिक रकमा खर्च करण्यात आल्या, तो खर्च भागविण्यासाठी राज्याच्या एकत्रित निधीतून केलेल्या पैशांच्या विनियोजनास अधिकृत मंजुरी देण्याकरिता तरतूद करण्यासाठी विधेयक विचारात घेण्यात यावे असा मी आपल्या अनुमतीने प्रस्ताव मांडतो.

असे करीत असतांना मी सभागृहाच्या निदर्शनास आणू इच्छितो की, भारतीय संविधानाच्या अनुच्छेद 207, खंड (1) द्वारे महाराष्ट्राच्या राज्यपालांना प्रदान करण्यात आलेल्या शक्तींचा वापर करुन त्यांनी हे विधेयक महाराष्ट्र विधानपरिषदेसमोर मांडण्यासाठी शिफारस केली आहे.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**तालिका सभापती (श्री. मोहन जोशी )** : विधेयक विचारात घेण्यात आले आहे. आता मी विधेयक खंडश: सभागृहाला सादर करतो. शिफारशी करावयाच्या असल्यास सदस्यांनी मांडाव्यात.

(खंड 2 व 3, अनुसूची, खंड 1, संपूर्ण शीर्षक व हेतुवाक्य हे एका पाठीमागून एक याप्रमाणे विचारात घेण्यात आले. त्यांच्या बाबतीत कोणतीही शिफारस करण्यात आली नाही.)

**तालिका सभापती** : ज्याअर्थी, परिषदेस कोणतीही शिफारस करावयाची नाही, त्याअर्थी, परिषदेला कोणतीही शिफारस करावयाची नाही, अशा शिफारशींसह हे विधेयक विधानसभेकडे परत पाठविण्यात येईल.

-------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: विनियोजन ( व्दितीय अधिक खर्च) विधेयक

**L. A. BILL NO. XLVI OF 2013**

(A BILL TO PROVIDE FOR THE AUTHORISATION OF APPROPRIATION OF MONEYS OUT OF THE CONSOLIDATED FUND OF THE STATE TO MEET THE AMOUNTS SPENT ON CERTAIN SERVICES DURING THE FINANCIAL YEAR ENDED ON THE THIRTY-FIRST DAY OF MARCH 2008, IN EXCESS OF THE AMOUNTS GRANTED FOR THOSE SERVICES AND FOR THAT YEAR.)

श्री. राजेंद्र मुळक ( वित्त राज्यमंत्री ) :सभापती महोदय, महाराष्ट्र विधानसभेने संमत केल्याप्रमाणे सन 2013 चे वि.स.वि. क्रमांक 46 - दिनांक 31 मार्च 2008 रोजी संपलेल्या वित्तीय वर्षातील विवक्षित कामांसाठी व त्या वर्षासाठी मंजूर करण्यात आलेल्या रकमाहून त्या वर्षात त्या विवक्षित कामांवर ज्या अधिक रकमा खर्च करण्यात आल्या, तो खर्च भागविण्यासाठी राज्याच्या एकत्रित निधीतून केलेल्या पैशांच्या विनियोजनास अधिकृत मंजुरी देण्याकरिता तरतूद करण्यासाठी विधेयक विचारात घेण्यात यावे, असा मी आपल्या अनुमतीने प्रस्ताव मांडतो.

असे करीत असताना मी सभागृहाच्या निदर्शनास आणू इच्छितो की, भारतीय संविधानाच्या अनुच्छेद 207, खंड (1) द्वारे महाराष्ट्राच्या राज्यपालांना प्रदान करण्यात आलेल्या शक्तींचा वापर करुन त्यांनी हे विधेयक महाराष्ट्र विधानपरिषदेसमोर मांडण्यासाठी शिफारस केली आहे.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**तालिका सभापती (श्री. मोहन जोशी )** : विधेयक विचारात घेण्यात आले आहे. आता मी विधेयक खंडशः सभागृहाला सादर करतो. शिफारशी करावयाच्या असल्यास सदस्यांनी मांडाव्यात.

(खंड 2 व 3, अनुसूची, खंड 1, संपूर्ण शीर्षक व हेतुवाक्य हे एका पाठीमागून एक याप्रमाणे विचारात घेण्यात आले. त्यांच्या बाबतीत कोणतीही शिफारस करण्यात आली नाही.)

**तालिका सभापती** : ज्याअर्थी, परिषदेस कोणतीही शिफारस करावयाची नाही, त्याअर्थी, परिषदेला कोणतीही शिफारस करावयाची नाही, अशा शिफारशींसह हे विधेयक विधानसभेकडे परत पाठविण्यात येईल.

-------

अग्रिम प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGJ/ D/ KTG/

**पृ.शी./मु.शी.**: विशेष हक्क समितीचा अहवाल सादर करण्याची मुदत वाढविणे.

श्री. हेमंत टकले (समिती प्रमुख) : सभापती महोदय, मी प्रस्ताव प्रस्तुत करतो की, (1)श्री.पुरुषोत्तम खेडेकर लिखित "शिवरायांच्या बदनामीची केंद्रे" या पुस्तकातील मजकुरांवर आधारित "लोकप्रभा" अंकातील प्रा.हरी नरके यांच्या "फॅसिस्ट शक्तीमुळे बहूजनांचे विभाजन" या लेखातील अवमानजनक लिखाणामुळे उद्‌भवलेले विशेषाधिकार भंग व अवमानाचे प्रकरण.

(2) त्याच प्रमाणे सन्माननीय विधानपरिषद सदस्य श्री.भाई जगताप व इतर सन्माननीय सदस्यांनी श्री. निखिल वागळे, संपादक, आयबीएन लोकमत व श्री. राजीव खांडेकर,संपादक, एबीपी माझा यांचेविरुध्द उपस्थित केलेले विशेषाधिकार भंग व अवमानाचे प्रकरण.

उपरोक्त दोन्ही प्रकरणावरील विशेषाधिकार समितीचा अहवाल सादर करण्याकरिता म.वि.प.नियम 178(1) च्या परंतुकान्वये पुढील अधिवेशनाच्या शेवटच्या दिवसापर्यंत मुदत वाढवून देण्यात यावी."

यानंतर श्री.अजित.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, हक्कभंग समितीने हक्कभंगाचा विषय गांभीर्याने घ्यावयाचा असतो. मी या ठिकाणी ज्या भावना व्यक्त करतो त्या भावना आपण गांभीर्याने घेणार की नाही असा प्रश्न देखील मी उपस्थित करतो. सन 2011 च्या पावसाळी अधिवेशनात श्री.पुरुषोत्तम खेडेकर यांच्या विरोधात मी हक्कभंगाची सूचना उपस्थित केली होती. ऑगस्ट 2011 मध्ये माननीय सभापती महोदयांच्या मान्यतेने तो हक्कभंग समितीपुढे आला.

सभापती महोदय, श्री.खेडेकर यांनी माननीय सभापतींची निर्भत्सना तसेच राज्यातील अनेक मंत्र्यांबद्दल अश्लील उद्‌गार छापले होते आणि ते मी येथे वाचून दाखविले होते. त्या शब्दांचा मी येथे पुनरुच्चार करीत नाही. माननीय सभापतींच्या संदर्भात जे शब्द वापरण्यात आले होते ते भीषण आणि भयंकर होते.

सभापती महोदय, माझ्या निलंबनानंतर माननीय सभापतींच्या दालनात उपस्थित नसलेले संसदीय कार्य मंत्री श्री.हर्षवर्धन पाटील मीडियासमोर बोलत होते की, "दिवाकर रावते असे म्हणाले, " तो शब्द मी तोंडाने उच्चारत नाही. त्या दिवसापासून मी न उच्चारलेला शब्द माझ्या कानात सांगा यासाठी त्यांचा पिच्छा करीत आहे. जेणेकरुन न उच्चारणारा शब्द कोणता आहे हे मला देखील समजेल.

सभापती महोदय, श्री.खेडेकर यांनी जे अत्यंत भयानक शब्द वापरले आहेत ते मी येथे उच्चारत नाही. त्यावेळी माननीय सभापतींचा संताप फार अनावर झाला होता आणि त्यावेळी त्यांनी अशा भावना व्यक्त केल्या की, आपण दिलेला हक्कभंग मी स्वीकारतोच, परंतु मी त्या संदर्भात अब्रुनुकसानीचा दावा करीन.

माननीय सभापतींचा अवमान हा आपल्याकडे सर्वोच्च मानला जातो. तेव्हा त्या संदर्भात जी काही कारवाई करायची ती तातडीने केली पाहिजे. आमच्याकडून काही झाले की, आम्ही दोन मिनिटात बाहेर असतो.

सभापती महोदय, सन 2011 मध्ये आपल्याकडे हे प्रकरण आले. सन 2011 च्या हिवाळी अधिवेशनात या प्रकरणास प्रथम मुदतवाढ मागण्यात आली. सन 2012 च्या अर्थसंकल्पीय, पावसाळी आणि हिवाळी अधिवेशनात मुदतवाढ मागण्यात आली. त्यानंतर सन 2013 च्या अर्थसंकल्पीय आणि पावसाळी अधिवेशनात मुदत वाढ मागण्यात आली. आता हिवाळी अधिवेशन

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते.....

2013 मध्ये पुन्हा मुदतवाढ मागण्यात आली आहे. एकूण आठ वेळा मुदतवाढ मागितलेली आहे. माननीय सभापतींचा अवमान आपल्या जिव्हारी झोंबला नाही असा त्याचा अर्थ नक्कीच होतो.

सभापती महोदय, हे प्रकरण गंभीर असताना या प्रकरणााला अडीच वर्षाचा कालावधी लागलेला आहे. मी या प्रकरणाच्या अनुषंगाने दोन-तीन वेळा समितीसमोर साक्षीसाठी आलो. समिती या प्रकरणाची गांभीर्याने छाननी करीत आहे.

सभापती महोदय, मी विधानमंडळ सचिवालयाकडे हक्कभंग सूचना दिल्यानंतर या संदर्भातील चर्चा, बैठका व मुदतवाढ इत्यादी माहिती मी दिनांक 29.9.2013 रोजीच्या लेखी पत्राद्वारे विचारली होती. त्या संदर्भात मला प्रधान सचिवांकडून दिनांक 23.10.2013 रोजीच्या पत्राद्वारे कळविण्यात आले की, माझे पत्र माननीय समिती प्रमुख, विशेष हक्क समिती यांच्यासमोर विचारार्थ ठेवण्यात येत असून त्या संदर्भातील निर्णय आपणास यथावकाश कळविण्यात येईल.

सभापती महोदय, श्री.खेडेकर यांनी त्यांच्या पुस्तकात देखील माननीय सभापतींबद्दल असभ्य लिखाण केलेले आहे म्हणून मी हक्कभंग दिला होता. मी जेव्हा हक्कभंग सूचना मांडली त्यावेळी माननीय सभापतींनी स्वत:हून जाहीर केले होते की, श्री.खेडेकर यांच्यावर अब्रुनुकसानीचा दावा करणार आहे. परंतु त्या संदर्भात पुढे काय झाले याची माहिती मला अजून मिळालेली नाही.

सभापती महोदय, समितीसमारे मी साक्षीसाठी हजर होतो त्यावेळी मला एक गोष्ट समजली.

यानंतर श्री.कांबळे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते ....

सर्व पुस्तके विशेषाधिकार समितीपुढे आली. त्याचे प्रकाशन रहात्या घरातून होत होते. ते राहते घर सरकारी होते. मी जाणून घेण्याचा प्रयत्न केला तर असे समजले की, ते निवृत्त झाले होते. सन 2006 किंवा सन 2007 मध्ये ते निवृत्त झाले. त्यानंतर चौकशी होईपर्यंत ते त्या बंगल्यातच राहत होते. त्या बंगल्याचा वापर सर्व अप्प्रचार करण्याकरिता व प्रसिध्दीचा पत्ता म्हणून करीत होते.

मला विशेषाधिकार समितीला धन्यवाद द्यायचे आहेत की, समितीने या संदर्भातील छाननी केली. खात्याने ते निवासस्थान रिकामे करण्याकरिता नोटीस दिली. निवासस्थान खाली करू नये म्हणून ते न्यायालयात गेले. न्यायालयाने त्यांना विचारले की, तुम्ही हे कशासाठी करीत आहात, तुम्ही तेथे निवृत्तीनंतर का राहत आहात ? न्यायालयाने खात्यालाही विचारले त्यावेळी खात्याने असे सांगितले की, त्यांच्या नावे 40 लाख रूपयांचे भाडे जमा झाले आहे आणि अजूनही त्यांनी दिलेले नाही. समितीच्या साक्षीत देखील हे आले आहे. खेडेकरांनी निवृत्तीनंतरही सरकारी निवासस्थान वापरले. भाड्यापोटी 1 रूपयाही दिला नाही. 40 लाख रूपयांची थकबाकी त्यांच्यावर होती. ते आपल्या सरकारी निवासस्थानाचा वापर प्रसिध्दीकरिता, बदनामीकरिता करीत होते. न्यायालयाने त्यांना सांगितले की, 40 लाख भरा आणि मग आमच्याकडे यावे. खेडेकरांनी 40 लाख रूपये दिले नाहीत. घर सोडले. संबंधित खाते इतक्या दहशतीखाली होते की, घर कधी रिकामे होते हेच ते पाहत होते. परत तिकडे कोणी येऊ नये म्हणून त्यांनी ते घरच पाडून टाकले. मी समिती प्रमुखांना त्यावेळी प्रश्न विचारला होता की 40 लाख रूपयांच्या वसुलीचे काय झाले ? मी एप्रिलच्या अधिवेशनात सदनातही हा प्रश्न विचारला होता. परंतु, त्याचे उत्तर आले नाही. खात्याने उत्तर द्यावयास पाहिजे होते. सदर प्रकरणी काहीही झाले नसेल. शेवटची साक्ष अजून झालेली नाही. पुस्तकांवर बंदी घालण्याच्या संदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली ?

मी न्यायालयाचा उल्लेख केला. त्या सर्व पुस्तकांवर बंदी घाला आणि त्या संदर्भातील अहवाल 6 आठवड्यांत कळवा, असे शासनाला सर्वोच्च न्यायालयाने फेब्रुवारीमध्ये सांगितले होते. पुरूषोत्तम खेडेकर हे सामर्थ्यवान मनुष्य आहेत. सन्माननीय सदस्य श्री. विनायक मेटे साहेबांना हे जास्त माहीत आहे. पुरूषोत्तम खेडेकर यांच्या संदर्भातील अहवाल 6 आठवड्यानंतरही गेला नाही.





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते ....

आता डिसेंबर उजाडला तरी जात नाही. पुरूषोत्तम खेडेकर या व्यक्तिमत्वाकरिता शासन न्यायालयीन अवमान सुध्दा सहन करायला तयार झाली आहे, अशी परिस्थिती निर्माण झालेली आहे. सन्माननीय सदस्यांचा वेगळा अधिकार असतो. बाहेरच्या सदस्यांनी वापरलेले शब्द महाराष्ट्रामध्ये सर्वोच्च शिवीचे शब्द आहेत, त्याच्या पलीकडे अजून कोणतीच शिवी देता येत नाही. म्हणून अशा प्रकरच्या अवमानाबाबत तातडीने निर्णय लावावा. या प्रकरणी अहवाल तयार करण्याकरिता विलंब का होत आहे, हा प्रश्न विचारण्याचा अधिकार आपला आहे. मी त्यावर बोलणार नाही. मी खुलासा मागणार नाही. मी एवढेच सांगतो की, या अधिवेशनानंतर कोणतीही मुदतवाढ देण्यात येऊ नये. पुढील अधिवेशनात या संदर्भातील अहवाल कोणत्याही परिस्थितीत आला पहिजे, अशी मी विनंती करतो. बाकीचे मी सांगत नाही. राजकारण बाहेर असते. विधिमंडळाच्या कामकाजामध्ये राजकारणाचे पडसाद उमटू नये, कोणाचाही उच्चार करू नये, अशा मताचा मी असल्यामुळे मी अत्यंत नम्रपणे हे निदर्शनास आणत आहे.

श्री. हेमंत टकले : सभापती महोदय, समितीसमोर विचारार्थ असलेल्या प्रकरणांच्या संदर्भात मुदतवाढीचा प्रस्ताव समितीने सादर केला आहे. सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी आताच निवेदन केले आहे. समितीसमोर सद्य:स्थितीत दोन प्रकरणे विचारार्थ प्रलंबित आहेत, त्यातील पहिले प्रकरण पुरूषोत्तम खेडेंकर लिखित "शिवरायांच्या बदनामीची केंद्रे" या संदर्भात आहे आणि दुसरे सन्माननीय विधानपरिषद सदस्य श्री. भाई जगताप आणि इतर सदस्यांनी श्री. निखिल वागळे आणि श्री. राजीव खांडेकर यांच्याविरूध्द उपस्थित केलेले विशेषाधिकार भंग व अवमानाचे प्रकरण या संदर्भातील आहे. श्री. पुरुषोत्तम खेडेकर यांच्या प्रकरणाबाबत मी सांगू इच्छितो की, माननीय सभापती, विधानपरिषद यांनी स्वेच्छाधिकारात सदरहू प्रकरण दिनांक 12 ऑगस्ट, 2011 रोजी परीक्षणासाठी विशेषाधिकार समितीकडे सुपूर्द केले.

( नंतर श्री. खंदारे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हेमंत टकले.....

समितीने संबंधितांचे खुलासे प्राप्त करुन सर्वश्री दिवाकर रावते, वि.प.स. विनायक मेटे, वि.प.स.,पांडुरुंग फुंडकर,वि.प.स. तथा माजी मा.विरोधी पक्ष नेते तसेच श्री.पुरुषोत्तम खेडेकर, लेखक "शिवरायांच्या बदनामीची केंद्रे", श्री.किशोर कडू, प्रकाशक/मुद्रक, जिजाई प्रकाशन, "शिवरायांच्या बदनामीची केंद्रे", श्री.प्रवीण टोकेकर, माजी संपादक, लोकप्रभा व श्रीमती वैदेही ठकार यांचा साक्षीपुरावा समितीने नोंदविलेला आहे. प्रस्तुत प्रकरणी समितीच्या एकूण 121 बैठका झ ालेल्या आहेत.

प्रस्तुत प्रकरण अत्यंत गंभीर व अत्यंत संवेदनशील असल्याने या प्रकरणी समिती अत्यंत काळजीपूर्वक विचारविनिमय करीत आहे. कारण विशेषाधिकार भंग प्रकरणामध्ये एखाद्या व्यक्तीला दोषी ठरवून त्याला दंडात्मक शिक्षा केल्यावर अशा व्यक्ती न्यायालयात या शिक्षेला आव्हान देतात, समितीची कार्यवाही तसेच शिक्षादेश स्थगित करण्याची मागणी न्यायालयाकडे करतात व न्यायालये अशी याचिका दाखल झाल्यावर सभागृहाने विशेषाधिकाराखाली दंडात्मक अधिकारिता वापरताना तो विशिष्ट विशेषाधिकार त्या वेळेस सभागृहाला होता काय याची तपासणी करु शकते तसेच न्यायालयीन प्रकरणे अनेक वर्ष प्रलंबित राहण्याची देखील शक्यता असल्याने अशा प्रकरणी सखोल विचार करुन त्यानंतरच समितीला निश्चित अशा निष्कर्षावर येता येईल.

हे प्रकरण महाराष्ट्राचे आराध्य दैवत असलेल्या छत्रपती शिवाजी महाराजांचा उल्लेख स्वत:च्या स्वार्थासाठी करुन लिहिलेल्या तसेच समाजातील विशिष्ट जातींमध्ये तेढ निर्माण करणाऱ्या विचारांनी प्रेरीत असल्याने व या प्रकरणी एखादा निर्णय घेण्यात आल्यावर समाजातील एखाद्या विशिष्ट गटामध्ये तेढ तर निर्माण होणार नाही याचा सर्वंकष विचार करुन तसेच या निर्णयाचा कोणताही प्रतिकूल परिणाम एखाद्या विशिष्ट वर्गावर तर होणार नाही याचा साकल्याने विचार करुन घेणे आवश्यक होणार आहे म्हणून या प्रकरणी जरी काही कालावधी लागत असला तरी पूर्ण विचारांतीच समिती आपला अहवाल सादर करील.

प्रस्ताव प्रस्तुत झाला.

श्री.हेमंत टकले : सन्माननीय सदस्य श्री.भाई जगताप, वि.प.स. व इतर सन्माननीय सदस्यांनी श्री.निखिळ वागळे, संपादक, आयबीएन लोकमत व श्री.राजीव खांडेकर, संपादक, एबीपी माझा यांचेविरुध्द उपस्थित केलेले विशेषाधिकार भंगाचे व अवमानाचे प्रकरणाबाबत मी सांगू

2...



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हेमंत टकले.....

इच्छितो की, समितीने सदरहू प्रकरणी एकूण 4 बैठका घेतल्या असून या संदर्भात संबंधितांचे निवेदन मागविण्याची कार्यवाही प्रगतीपथावर आहे. समितीच्या होणाऱ्या पुढील बैठकांमध्ये या प्रकरणांवर विचारविनिमय करुन आगामी अधिवेशनात अहवाल सादर करण्याचा समितीचा प्रयत्न असेल.

प्रस्ताव प्रस्तुत झाला.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, दुसऱ्या विषयाबाबत मी असे सांगितले होते की, मी सही करणार नाही. विधिमंडळाच्या आवारात घडलेल्या प्रकाराबाबत या सभागृहात चर्चा झाली आहे, हे मला मान्य आहे. परंतु या विषयावरील हक्कभंगाच्या प्रस्तावावर मी सही करणार नाही असे सांगितले होते. या सभागृहाचा त्याच्याशी काही संबंध नाही. या प्रकरणाशी विधानसभेच्या दोन सदस्यांचा संबंध आहे. त्यामुळे त्या सभागृहात याबाबत चर्चा झाल्यानंतर त्या सभागृहात हक्कभंगाचा प्रस्ताव दाखल करण्यात आला आहे. आपल्या सभागृहाचा त्याच्याशी काही संबंध नव्हता. त्या प्रकरणाबाबत येथे निषेध व्यक्त केला होता, हे तेवढ्या पुरते ठीक होते. त्या प्रकरणामुळे या सभागृहाचा हक्कभंग कसा काय होतो ते मला कळत नाही. विधानसभेच्या सदस्यांबाबत जे काही बाहेर घडले त्याबाबत त्या सभागृहाच्या व सदस्यांच्या प्रतिक्रिया होत्या. त्या सभागृहात दाखल झालेल्या हक्कभंगाच्या प्रकरणाबाबत त्या सभागृहात जी काही चर्चा करावयाची असेल ती ते करतील. हे प्रकरण पुन्हा हक्कभंग समितीपुढे चर्चेसाठी ठेवण्यापेक्षा हे प्रकरणच अयोग्य आहे असे माझे मत आहे. याबाबत मी टिप्पणीत लिहिले आहे की नाही हे मला आठवत नाही. या सभागृहाने हा हक्कभंगाचा प्रस्ताव मागे घ्यावा, कारण एका सभागृहात याच विषयाचा हक्कभंग दाखल झालेला आहे. ते सभागृह त्याबाबत निर्णय घेईलच. या सभागृहाने या प्रकरणाबाबत फक्त निषेध केलेला असल्यामुळे हे प्रकरण या ठिकाणी थांबवावे अशा प्रकारची मी आपल्याला विनंती करतो.

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी मांडलेल्या मुद्याला मी अनुमोदन देते.

3...





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हेमंत टकले : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.भाई जगताप व इतर सन्माननीय सदस्यांनी हक्कभंगाचा मुद्दा उपस्थित केला होता. या विषयाबाबतही समितीच्या वारंवार बैठका झ ाालेल्या आहेत. त्या बैठकांची माहिती माझ्याजवळ उपलब्ध आहे. आता सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी व्यक्त केलेले मत समितीच्या पुढील बैठकीत विचारार्थ ठेवण्यात येईल. त्यानंतर समिती योग्य तो निर्णय घेईल.

प्रस्ताव मतास टाकून संमत करण्यात आले.

----

नंतर श्री.शिगम.......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: शाहूवाडी (जि.कोल्हापूर) तहसील कार्यालयातील अभिलेख कक्षामध्ये काम करणाऱ्या खाजगी कर्मचाऱ्यांना काढण्याबाबत श्री. जयंत प्र.पाटील,वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

श्री. जयंत प्र.पाटील (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

"शाहूवाडी (जि. कोल्हापूर) तहसील कार्यालयामध्ये अभिलेख कक्षात महत्वाचे दस्तऐवज आहेत. या अभिलेख कक्षामध्ये शासकीय कर्मचाऱ्याव्यतिरिक्त खाजगी लोकांकडून कामकाज करण्यात येत आहे. त्यामुळे काही महत्वाचे दस्तऐवज गहाळ झालेले आहेत.

खाजगी लोकांना या कामापासून दूर करण्यासाठी दिनांक 27.6.2013 रोजी शेतकरी कामगार पक्षाच्या पुरोगामी संघटनेकडून तहसील कार्यालयासमोर उपोषण करण्यात आले आहे. परंतु याकडे तहसील कार्यालय दुर्लक्ष करीत आहे. सबब शासनाचे या गंभीर प्रकरणी लक्ष वेधण्यासाठी मी ही विशेष उल्लेखाची सूचना देत आहे."

----

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: कोल्हापूर जिल्ह्यातील रमाबाई आंबेडकर आणि अन्य सूतगिरण्यामध्ये झालेला भ्रष्टाचार याबाबत श्री. चंद्रकांत पाटील, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

श्री. चंद्रकात पाटील (पुणे विभाग पदवीधर) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□संबंधीची सूच□ मांडतो.

"सभापती महोदय, महाराष्ट्रामध्ये सूत गिरण्यांच्या नावाने जो प्रचंड भ्रष्टाचार सुरु आहे त्याकडे मी आपले लक्ष वेधित आहे. वस्त्रोद्योग संचालनालयाने हातमागाचे संवर्धन न केल्यामुळे 1970 साली 1,85,000 असलेल्या हातमागापैकी केवळ 5,000 शिल्लक असल्यामुळे राज्यातील 10 लाख रोजगार संपुष्टात येणे, महाराष्ट्र राज्यात 350 हून अधिक यंत्रमाग संस्था असून त्यातील 260 संस्था 60 लाखांच्या, 60 संस्था 2.50 कोटींच्या, 20 संस्था 4 कोटीच्या व 10 संस्था 5 कोटीच्या असून 43,600 कोटी रुपये गुंतवणुकीच्या प्रकल्पांना शासनाने 45 टक्के म्हणजे 19,600 कोटी रुपयांचे भागभांडवल आजपर्यंत पुरविणे, 80 टक्के संस्था सन 2006 सालानंतरच्या असून त्यापैकी 40 टक्के संस्था चालू होण्यापूर्वीच बंद पडल्या असून राज्यात एकूण 50 टक्के संस्था बंद असणे, कोल्हापूर जिल्ह्यातील मातोश्री रमाबाई आंबेडकर सूत गिरणीस वस्त्रोद्योग खात्याकडून 23.78 कोटी रुपये भागभांडवल, समाजकल्याण विभागाकडून 5.82 कोटी रुपये अनुदान व सभासद भागभांडवल 2.70 कोटी रुपये असे 32.30 कोटी रुपये जमा होणे. परंतु इमारत 50 टक्के अपूर्ण असणे, गिरणी इमारतींवर मंजूर दरापेक्षा रु. 6 कोटी जादा बोगस खर्च झाला असणे, जमीन डेव्हलपमेंट सदराखाली रु. 1 कोटीचा बोगस खर्च, अनियमित गैरखर्च असून 12 कोटीहून अधिक रकमेचा गैर घोटाळा झालेला असणे, परंतु रु. 2.42 कोटी रकमेची चौकशी करण्यात येणे, उर्वरित 9 कोटी रुपयाच्या घोटाळयाची चौकशी अद्याप करण्यात न येणे, भ्रष्टाचार रोखण्यासाठी वस्त्रोद्योग खात्याचा विशेष चौकशी प्राधिकरण विभाग स्थापून, सूत गिरण्यांचे उभारणीसाठी वाढवलेले प्रकल्प खर्चाचे पुनर्मूल्यांकन, रमाबाई आंबेडकर सूत गिरणी सारख्या अनेक गिरण्यांमधून झालेल्या भ्रष्टाचाराची समूळ तत्काळ चौकशी करुन दोषीवर कारवाई करण्याची आवश्यकता, याकरिता विशेष उल्लेखाद्वारे ही बाब मी सदनाच्या निदर्शनास आणत आहे."

---

..3.



MSS/ D/ KTG/ पूर्वी श्री. खंदारे 15:20

**पृ.शी./मु.शी.**: यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाने कर्करोग पीडिताना पदवी परीक्षेसाठी दिलेला प्रवेश याबाबत श्री. हेमंत टकले, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

श्री. हेमंत टकले (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, विशेष उल्लेखाच्या सूचनेद्वारे आपण नेहमी शासनाच्या उणिवा आणि बाकीच्या गोष्टीवर बोट ठेवत असतो. परंतु शासन ज्या चांगल्या गोष्टी करते त्याचा उल्लेख व्हावा अशी माझी मनापासून इच्छा आहे.

"ऐन उमेदीच्या काळात कर्करोगासारखा आजार, घरची बेताची परिस्थिती व त्यात उपचारामुळे अर्धवट राहिलेले शिक्षण अशा कर्करोग पीडितांना त्यांचे उच्च शिक्षण घेण्याचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाने पुढाकार घेऊन पदवी परीक्षेसाठी 18 विद्यार्थ्यांना प्रवेश दिला आहे. समाजाच्या अशा असंख्य उपेक्षित घटकांसाठी ज्यामध्ये तुरुंगवास भोगणारे कैदीही आहेत, हा उपक्रम अतिशय महत्वाचा असून याप्रमाणे नागरिकांचे प्रबोधन करुन ही ज्ञानगंगा सतत प्रवाही राहील यासाठी उच्च शिक्षण विभागाने सातत्याने विशेष उपक्रम हाती घ्यावेत अशी मागणी मी विशेष उल्लेखाद्वारे करीत आहे."

----

...नंतर श्री. गिते...

अमुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी : रात्र शाळांच्या शिक्षकांचे प्रलंबित प्रश्न याबाबत
अॅड.निरंजन डावखरे,वि.व.स.यांनी दिलेली
विशेष उल्लेखाची सूचना.

अॅड.निरंजन डावखरे (कोकण विभाग पदवीधर) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

मुंबईसह राज्यात सुमारे 176 अनुदानित रात्रशाळा असून या शाळांमध्ये काम करणाऱ्या शिक्षकांची संख्या सुमारे 1345 व शिक्षकेतरांची संख्या 577 इतकी आहे. या रात्र शाळांमध्ये काम करणाऱ्या शिक्षकांना अर्धवेळ कर्मचारी म्हणून गणले जात असून त्यांना अर्धे वेतन दिले जाते, परंतु घरभाडे भत्ता दिला जात नाही व त्यांचा भविष्य निर्वाह निधी कपात केला जात नाही, परिणामी, पेन्शन योजनाही लागू नसणे, त्यामुळे निवृत्तीनंतर अशा शिक्षकांना कोणत्याही प्रकारचे जीवन जगण्याचे साधन उपलब्ध होत नसल्याने प्रसंगी मिळेल ते काम करण्याची वेळ येते. रात्र शाळांच्या प्रलंबित प्रश्नांबाबत शासनाने दिनांक 15.3.2007 रोजी समिती गठीत केली होती व या समितीने आपला अहवाल दिनांक 29.7.2009 रोजी शासनास सादर केला आहे. तथापि या गेल्या चार वर्षाच्या कालावधीत सदर अहवालाच्या अनुषंगाने शासनाने कोणतीही कार्यवाही केली नाही. त्यामुळे या रात्र शाळांतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना निवृत्तीवेतन तसेच भविष्य निर्वाह निधी पासून वंचित ठेवण्यात आल्याच्या निषेधार्थ धरणे आंदोलन करण्याचा निर्णय या रात्र शाळा शिक्षक संघटनांच्या पदाधिकाऱ्यांनी घेतला आहे. तरी रात्र शाळांच्या शिक्षकांच्या प्रलंबित प्रश्नांबाबत व त्याप्रकरणी शासनाने गठीत केलेल्या समितीच्या अहवालावर तातडीने कार्यवाही करण्यात यावी,एवढीच मागणी मी या विशेष उल्लेखाच्या माध्यमातून शासनाकडे करीत आहे.

श्री.रामनाथ मोते : सभापती महोदय, राज्यातील सर्व कार्यकर्त्यांनी आणि तीन लोकप्रतिनिधींनी आंदोलन केले होते. शासनाने सांगितले होते की, याबाबतीत तातडीने बैठक घेतो. ती बैठक अजून घेतलेली नाही. यासंबंधी काहीही निर्णय घेतला गेलेला नाही. रात्र शाळेत काम करणारे काही शिक्षक दिवस शाळेत आणि रात्र शाळेत काम करतात. त्यांना पगार मिळतो आणि पेन्शनही मिळते. आमचा विषय असा होता की, जे शिक्षक रात्र शाळेतच काम करतात, त्यांना

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामनाथ मोते...

पेन्शन

योजना अथवा कोणतेही लाभ मिळत नाहीत. रात्र शाळांच्या संदर्भात अहवाल आलेला आहे. तो अहवाल चार वर्षापूर्वी आलेला आहे. त्या अहवालावर तातडीने कार्यवाही व्हावी. म्हणून सन्माननीय सदस्य श्री.निरंजन डावखरे यांनी जी सूचना केलेली आहे, त्यास मी अनुमोदन देतो आणि या बाबतचा निर्णय लवकरात लवकर व्हावा अशी मी शासनाकडे मागणी करतो.

-------

3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



ABG/ D/ D/ KTG/ प्रथम श्री.शिगम 15:25

पृ.शी./मु.शी.: निवास-न्याहरी योजनेसाठी लागणाऱ्या विविध परवानगीसाठी एक खिडकी योजना सुरु करणे याबाबत श्री.प्रकाश बिनसाळे यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

श्री.प्रकाश बिनसाळे ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

सभापती महोदय, रायगड,रत्नागिरी व सिंधुदुर्ग या जिल्हयामध्ये मागील 10 वर्षापासून पर्यटन व्यवसायात झपाटयाने वाढ होणे, सदर जिल्हयामध्ये पर्यटनास चालना मिळावी म्हणून महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाने निवास-न्याहारी योजना सुरु करणे, या योजनेमुळे सुशिक्षित बेरोजगारांना तसेच महिलांना व्यवसाय मिळून मोलाचा आधार मिळणे, परंतु नजीकच्या काळात शासनाने या व्यवसायासाठी लागणारे 1) अन्न व औषध प्रशासनाकडील आवश्यक ते नोंदणी पत्र (गेल्या सहा महिन्यापासून सदर प्रशासनाने दाखले देण्यास सुरुवात केली आहे. 2) व्यवसाय कर नोंदणी दाखला,3) व्हॅट रजिस्ट्रेशन 4) लक्झरी टॅक्स (ऐशो आराम कर) नोंदणी दाखला, 5) सेवाकर नोंदणी (आवश्यक असल्यास),6) तहसीलदारांकडील Eating Licennse 7) लॉजिंग म्हणून नोंदणी करुन घेणे, असे विविध सात परवाने येणे सक्तीचे करणे, यामुळे या भागातील या व्यवसायिकांमध्ये असंतोष पसरणे तसेच येणाऱ्या पर्यटकांना सुविधा पुरविण्यास अडचणी निर्माण होणे, या व्यवसायासाठी लागणारे वरील विविध परवाने एकाच ठिकाणी मिळावे म्हणून एक खिडकी योजना सुरु करावी, अशी मागणी मी या विशेष उल्लेखाव्दारे शासनास करीत आहे.

-------

4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.: मुंबई,पुणे,पिंपरी-चिंचवड,नाशिक महापालिकेत दुप्पट भावाने केलेली औषध खरेदी याबाबत श्री.अनिल भोसले, वि.प.स.यांनी दिलेली विशेष उल्ल्खाची सूचना.

श्री.अनिल भोसले (पुणे स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

महोदय, शासनाचे औषध खरेदीचे दर धाब्यावर बसवून मुंबई, पुणे, पिंपरी-चिंचवड, नाशिक आदि महापालिका दुप्पट भावाने औषधे खरेदी करीत आहेत. महानगरपालिकांकडून स्वत:च्या निविदानुसार औषधांची खरेदी केली जात असल्याने शासनाच्या वैद्यकीय शिक्षण विभाग तसेच सार्वजनिक आरोग्य विभागाच्या दरकरारापेक्षा कमी दराने औषधे पुरवठा करणार असल्याचे प्रतिज्ञापत्र निविदेसोबत घेणे बंधनकारक आहे, मात्र महापालिकांकडून ठराविक पुरवठादारांकडून दुप्पट तिप्पट भावाने औषधांची खरेदी केली जाते, पुणे महापालिकेत गेल्या काही वर्षापासून लक्ष्मी केमिकल्स, एस.के.सेल्स, प्रोटेक्ट, युनिव्हर्सल ट्रेडिंग अशा त्याच पुरवठादारांकडून वषानुवर्षे खरेदी केली जात आहे. उदाहरणादाखल टेमेफॉस 50 टक्के ईसी हे औषध शासन दरकरारावर 587 रुपयांना असताना पुणे महापालिकेने 1174 रुपये पिंपरी-चिंचवड 1419 रुपये तर मुंबई महापालिकेकडून 1360 रुपयांना खरेदी केले जाते. जादा भावाने व निकृष्ट दर्जाची औषधी खरेदी केली जात असल्यामुळे महापालिकाचे कोट्यवधी रुपयाचे नुकसान होत आहे. त्यामुळे शासनाने राज्यातील

महानगरपालिकांमधील औषध खरेदीतील अनियमितता व गैरव्यवहाराबाबत सखोल चौकशी करावी, अशी मागणी मी या विशेष उल्लेखाव्दारे करीत आहे.

-----

यानंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.** : मुरेंबी, ता.आंबेजोगाई, जि.बीड येथील लघुसिंचन तलावासाठी संपादित केलेल्या जमिनीचा शेतकऱ्यांना मोबदला मिळणे याबाबत श्री.धनंजय मुंडे, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

श्री.धनंजय मुंडे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

सभापती महोदय, मुरेंबी, ता.आंबेजोगाई, जि.बीड येथे लघुसिंचन तलाव असणे, या लघुसिंचन तलावाच्या उजव्या व डाव्या कालव्यासाठी सन 1997 साली शेतकऱ्यांच्या जमिनी संपादित करण्यात येणे, लघुसिंचन तलाव व उजवा डावा कालव्याचे काम पूर्ण होऊन अनेक वर्षे उलटणे, तथापि अद्यापही तलावाच्या उजव्या व डाव्या कालव्यासाठी संपादित करण्यात आलेल्या मुरेंबी, पुस, चोथेवाडी, जवळगाव आदी गावामधील 100 हून अधिक शेतकऱ्यांच्या जमिनीचा संपादनाचा मोबदला 26 वर्षे होऊनही अद्यापही न मिळणे, उत्पन्नाचे साधन असणाऱ्या जमिनी प्रकल्पाला देऊन त्याचा मोबदलाही न मिळाल्यामुळे या शेतकऱ्यांवर आलेली उपासमारीची वेळ, या शेतकऱ्यांना तातडीने त्यांच्या संपादित जमिनीचा मोबदला देण्यात यावा, अशी मागणी मी या विशेष उल्लेखाद्वारे उपस्थित करीत आहे.

-----



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.** : पुणे शहरातील विडी कामगारांना व्याजमाफी मिळणे याबाबत श्री.मोहन जोशी, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

**तालिका सभापती** (श्री.मोहन जोशी) : मी एक विशेष उल्लेखाची सूचना दिलेली आहे. माझ्या वतीने माननीय सदस्या श्रीमती शोभा फडणवीस सूचना मांडतील.

श्रीमती शोभा फडणवीस (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ाची सूच□ मांडते.

सभापती महोदय, पुणे शहरातील खराडी, येरवडा परिसरामध्ये म्हाडामार्फत 659 घरकुले विडी कामगार महिलांना देण्यात आलेली आहेत. कामगार महिलांच्या मूळ कर्जावरील व्याज माफीचा शासनाने निर्णय घेतलेला असूनही त्याची अंमलबजावणी प्रशासकीय अधिकारी करीत नाहीत. विडी कामगार आर्थिक कोंडीत सापडले असून त्यांचा रोजगार कमी होत आहे. महाराष्ट्र विधिमंडळाच्या निर्णयाप्रमाणे सोलापूरमधील विडी कामगारांप्रमाणेच पुणे येथील विडी कामगारांना पूर्णपणे व्याज माफी देण्यात यावी अशी मागणी मी या विशेष उल्लेखाच्या सूचनेद्वारे करीत आहे.

-----------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.** : नाशिक शहरातील शरणपूर भागातील खाजगी शाळा व्यवस्थापनाकडून शासनाच्या नियमांची पायमल्ली सुरु असणे याबाबत श्री.जयवंतराव जाधव, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

श्री.जयवंतराव जाधव (नाशिक स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ाची सूच□ा मांडतो.

सभापती महोदय,शिक्षण शुल्क न भरण्याच्या कारणावरुन नाशिक शहरातील शरणपूर रस्त्यावरील सिल्व्हर ओक स्कूल आणि आनंदवली येथील सिल्व्हर ओक युनिव्हर्सल स्कूलमधील अकरा विद्यार्थ्यांना शालेय व्यवस्थापनाने वर्गात बसण्यास मज्जाव करुन अमानुषपणे आठ तास शाळेबाहेर उन्हात उभे केले. या संदर्भात पालकांनी दाद मागितल्यानंतर नाशिक महानगरपालिकेच्या शिक्षण मंडळाने या स्कूल व्यवस्थापनाला नोटीस बजावली होती. या शाळेतील शिक्षकांनी वेतनवाढीची मागणी केल्यामुळे शालेय व्यवस्थापनाने अकरा महिन्याच्या करारपत्रावर स्वाक्षरी करण्यासाठी शिक्षकांवर दबाव टाकण्याचा प्रयत्न केला. यापूर्वी येथील कर्मचाऱ्यांच्या पाल्यांकडून शिक्षण शुल्क आकारले जात नव्हते. मात्र शिक्षकांवर दबाव टाकून अकरा महिन्याच्या करारपत्रावर स्वाक्षरी करुन घेण्यासाठी पाल्यांना अचानक शिक्षण शुल्क भरण्याचे फर्मान काढून ते न दिल्यामुळे शिक्षण हक्क कायदा धाब्यावर बसवून त्यांना वर्गात बसण्यास प्रतिबंध करण्यात आला. या घडामोडीच्या पार्श्वभूमीवर शिक्षण मंडळाचे प्रशासन अधिकारी या शाळेत चौकशीसाठी गेले असता येथील मुख्याध्यापिकेने त्यांच्याशी अरेरावी करुन चौकशीसाठी मज्जाव केला. शाळेच्या या मुजोरीबाबत नाशिक शहरामध्ये तीव्र संताप व्यक्त केला जात आहे. संस्था व कर्मचाऱ्यांमधील वादाची शिक्षा विद्यार्थ्यांना देऊन त्यांना घरी बसावे लागत असल्यामुळे या विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत आहे. खाजगी शाळांचा शासकीय कायदे व शासनाशी काही संबंध नाही असे समजून मुजोरपणा करणाऱ्या या शाळेच्या कारभाराची उच्चस्तरीय सखोल चौकशी करुन शालेय व्यवस्थापनावर कडक कारवाई केली जावी अशी मागणी या विशेष उल्लेखाद्वारे करीत आहे.

--------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी./मु. शी.** : मोहोळ, जि.सोलापूर येथे कृषी विद्यापीठ स्थापन करणे याबाबत श्री.दिपकराव साळुंखे, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

श्री.दिपकराव साळुंखे (सोलापूर स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ाची सूच□ मांडतो.

सभापती महोदय, महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरीचे क्षेत्र मोठे असल्यामुळे त्याचे विभाजन होणार असून विभाजनानंतर नव्याने होणारे कृषी विद्यापीठ सोलापूर जिल्हयातील मोहोळ येथे व्हावे असा ठराव सोलापूर जिल्हा परिषदेच्या कृषी समितीमध्ये करण्यात आलेला आहे. सातारा, सांगली, कोल्हापूरसाठी प्रशासकीयदृष्ट्या सोलापूर हे सोयीचे ठिकाण आहे. त्यामुळे कृषी विद्यापीठ सोलापूर येथे व्हावे. मोहोळ शहराच्या बाजूची राष्ट्रीय महामार्गालगत कृषी विभागाची 50 एकर जमीन आहे. त्या ठिकाणी कृषी विज्ञान केंद्र, कोरडवाहू संशोधन केंद्र ही शासकीय कार्यालये आहेत. त्यामुळे कृषी विद्यापीठ हे मोहोळ येथे करणे सोयीचे होईल. मोहोळ हे जिल्हयाचे मध्यवर्ती ठिकाण आहे. कोणतेही शासकीय कार्यालय होण्यापूर्वी जागेचा मुद्दा महत्वाचा असतो. परंतु मोहोळ या ठिकाणी त्याची कोणतीही अडचण येणार नाही. याबाबत शासनाने कृषी विद्यापीठ विभाजन समितीची स्थापना केली असून या समितीने सोलापूर येथे येऊन शेतकऱ्यांशी व नागरिकांशी चर्चाही केली आहे. तेव्हा शासनाने सदर प्रकरणाची तातडीने चौकशी करुन सोलापूर जिल्हयात कृषी विद्यापीठ तातडीने स्थापन करावे अशी मागणी मी या विशेष उल्लेखाद्वारे करीत आहे.

**तालिका सभापती** : सभागृहाची बैठक आता स्थगित होत आहे..........

नंतर 2डब्ल्यू.1...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अमरसिंह पंडित : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. मराठवाडयाची चर्चा केव्हा घेतली जाणार आहे ?

**तालिका सभापती (श्री. मोहन जोशी )**: जादूटोणा विधेयक पास झाल्यानंतर मराठवाडयाची चर्चा घेण्यात येईल.

आता सभागृहाची बैठक मध्यंतरासाठी स्थगित होत आहे. सभागृहाची बैठक दुपारी 4.00 वाजता पुन: सुरु होईल.

( दुपारी 3.35 ते 4.00 मध्यंतर)

---

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**(स्थगितीनंतर )**

**(सभापतीस्थानी तालिका सभापती श्री.मोहन जोशी )**

**तालिका सभापती** : माननीय मंत्री श्री.शिवाजीराव मोघे यांना मी विचारु इच्छितो की, विधानसभा सदस्यांचा एकत्रित छायाचित्रे काढण्याचा कार्यक्रम आहे. आपणास एकत्रित छायाचित्र काढण्यासाठी जायचे नाही काय ?

श्री.शिवाजीराव मोघे : सभापती महोदय, एकत्रित छायाचित्र काढण्यास जाण्याची माझी इच्छा आहे. परंतु येथे वि.स.वि.क्रमांक 35 - जादूटोणा प्रतिबंध संदर्भातील विधेयकावरील चर्चा सुरु होणार आहे. त्यामुळे मला जाता येणार नाही.

**तालिका सभापती** : ठीक आहे. मी सभागृहाची बैठक 4.15 पर्यंत स्थगित करतो.

(सभागृहाची बैठक दुपारी 4.01 ते 4.15पर्यंत स्थगित झाली. )

------

यानंतर श्री.कांबळे..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**(स्थगितीनंतर)**

**(सभापतीस्थानी तालिका सभापती श्री.रमेश शेंडगे)**

**म.वि.प. नियम 260 अन्वये दिलेल्या प्रस्तावाबाबत**

श्री.अमरनाथ राजूरकर : सभापती महोदय, मराठवाड्याच्या दृष्टीने अतिशय महत्त्वाचा असलेला म.वि.प.नियम 260 अन्वयेचा प्रस्ताव दररोज पुढे ढकलला जात आहे. मी जाणून घेऊ इच्छितो की, हा प्रस्ताव नेमका कधी चर्चेला येणार आहे.

श्री.दिवाकर रावते : महोदय, हा प्रस्ताव चर्चेला कधी घ्यावा या बाबत माननीय सभापती महोदयांबरोबर चर्चा करु या.

**तालिका सभापती** : मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, माननीय सभापतींशी चर्चा करुन हा प्रस्ताव सभागृहामध्ये चर्चेला कधी घेता येईल हे ठरविण्यात येईल. त्यानंतर आपल्याला हा प्रस्ताव नेमका कधी चर्चेला घेण्यात येणार आहे हे कळविण्यात येईल.

----------

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : नरबळी आणि इतर अमानुष, अनिष्ट व अघोरी प्रथा व जादूटोणा यांना प्रतिबंध घालण्याबाबत व त्यांचे समूळ उच्चाटन करण्याबाबत विधेयक

**L. A. BILL NO. XXXV OF 2013**

(A BILL TO BRING SOCIAL AWAKENING AND AWARENESS IN THE SOCIETY AND TO CREATE A HEALTHY AND SAFE SOCIAL ENVIRONMENT WITH A VIEW TO PROTECT THE COMMON PEOPLE IN THE SOCIETY AGAINST THE EVIL AND SINISTER PRACTICES THRIVING ON IGNORANCE, AND TO COMBAT AND ERADICATE HUMAN SACRIFICE AND OTHER INHUMAN, EVIL, SINISTER AND AGHORI PRACTICES PROPAGATED IN THE NAME OF SO CALLED SUPERNATURAL OR MAGICAL POWERS OR EVIL SPIRITS COMMONLY KNOWN AS BLACK MAGIC BY CONMEN WITH SINISTER MOTIVE OF EXPLOITING THE COMMON PEOPLE IN THE SOCIETY AND THEREBY DESTROYING THE VERY SOCIAL FIBRE OF THE SOCIETY; AND FOR MATTERS CONNECTED THEREWITH OR INCIDENTAL THERETO.) AND MOTION FOR REFERRING THE BILL TO THE JOINT COMMITTEE

(विधेयक विचारात घेण्यासंबंधीचा प्रश्न आणि विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्यासंबंधीचा प्रस्ताव पुन्हा प्रस्तुत झाला.)

**तालिका सभापती** (श्री.रमेश शेंडगे) : काल या विधेयकावरील चर्चेच्या वेळी सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते ऑनलेग होते. आता त्यांनी आपल्या भाषणास सुरुवात करावी.

श्री.दिवाकर रावते (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, या संदर्भात माननीय मंत्र्यांनी जी समिती गठीत केली होती त्या समितीतील सदस्यांची नावे मी काल सभागृहात सांगितली आहेत. त्या समितीतील संदर्भित व्यक्तींच्या संदर्भात आणि त्यांच्या संघटनांच्या संदर्भात आम्ही का वक्तव्य करीत आहोत ? कारण विधेयक बनविण्यामागे सरकारच्या वतीने ते सदस्य अधिकृत होते. सरकार त्यांच्याकडे सर्व माहिती कसे पाठवित होते, या बाबतचा उल्लेख माझ्या पुढील भाषणात होईल.

सभापती महोदय, नरेंद्र दाभोलकर यांचा आदर ठेवून मी सांगत आहे. मी काल नमूद केले होते की, नरेंद्र दाभोलकर यांचा आणखी एक ट्रस्ट आहे. त्या ट्रस्टबाबत सर्वसाधारणपणे





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते....

सर्वांना माहिती नाही असे माझे मत आहे. या संदर्भातील गंभीर बाब म्हणजे त्यांची स्वित्झर्लंड येथे एक संस्था आहे. ती जगभर काम करणाऱ्या मंडळींना डोनेशन वजा निधी देते. त्या संस्थेचे कार्य काय आहे ? त्यांच्या कार्याच्या बाबतीत असे नमूद केले आहे की, "SWISSAID is aware that real development can happen only when there is political change. This is why we are politically active, both in the Third World and Switzerland, but always on a non-sectarian basis and independent of party politics." हे फार महत्त्वाचे आहे. याचाच अर्थ त्यांच्या वेबसाईटवरील महितीवरुन असे दिसून येते की, तिसऱ्या जगतामध्ये म्हणजेच विकसनशील जगतामध्ये राजकीय बदल आल्याशिवाय बदल होऊ शकत नाही, त्यामुळे आम्ही राजकीय दृष्ट्या सक्रीय असतो. परंतु पक्षीय राजकारणात न पडता सांप्रदायिकतेच्या विरोधातील तत्त्वावर आम्ही काम करतो. महोदय, अजून एक गंभीर बाब अशी की, या संस्थेने वेबसाईटवर प्रसिध्द केलेल्या भारताच्या नकाशातून काश्मीर हा भाग वगळला आहे. ही बाब गंभीर आणि निषेधार्ह आहे. या बाबत दखल घेण्याचा अधिकार परराष्ट्र मंत्रालयाला आहे. माननीय मंत्री महोदय, आपण राज्य सरकारच्या माध्यमातून परराष्ट्र मंत्रालयाला कळविले पाहिजे की, या संस्थेने भारताच्या नकाशातून काश्मीर वगळून तो नकाशा वेबसाईटवर टाकला आहे. एकप्रकारे ही बाब जगभर भारताचा अवमान करणारी आहे. यातील महत्त्वाचा विषय म्हणजे या संस्थेकडून सांप्रदायिकतेच्या विरोधात हा निधी सर्व जगभर आणि स्वित्झर्लंडला दिला जातो.

सभापती महोदय, नरेंद्र दाभोलकर साहेबांचा 'परिवर्तन' नावाचा न्यास आहे. त्यांच्या अंधश्रध्दा निर्मूलन समितीचे अध्यक्ष केंद्रीय मंत्री श्री.शरद पवार यांचे सख्खे बंधू आहेत. या संदर्भातील नावे आपल्याकडे आहेत.

नंतर श्री.कांबळे....

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते ....

परिवर्तन संस्थेत फक्त घरातील लोक आहेत. मुख्य विश्वस्त नरेंद्र अच्युत दाभोलकर, देवदत्त अच्युत दाभोलकर हे बंधू, सौ. शैला नरेंद्र दाभोलकर, डॉ. हमीद नरेंद्र दाभोलकर, मुक्ता पटवर्धन, त्या दाभोलकर साहेबांच्या कन्या आहेत असे कळते, प्रसन्न देवदत्त दाभोलकर, ही सर्व कुटुंबातील मंडळी आहेत. पुण्याचे अंनिसचे अनिल अवचट यांच्या पत्नी देखील त्या संस्थेवर होत्या. दुर्दैवाने त्यांचे निधन झाले, ती जागा अजून भरलेली नाही. या ट्रस्टला आलेला निधी व्यसनमुक्तीच्या कार्यासाठी होता. चांगले कार्य आहे. ट्रस्टचे काम फक्त व्यसनमुक्ती करणे. या ट्रस्टला पैसे किती आले ते मी सांगतो. केंद्र शासनाकडून सन 2001-02 मध्ये 3,40,200 रूपये, सन 2005-06 मध्ये 4,32,971 रूपये मिळाले. स्विस एड इंडिया, स्वित्झरलँडकडून सन 2006-07 मध्ये 1,50,000 रूपये मिळाले. केंद्र शासनाकडून सन 2008-09 मध्ये 6,80,000 रूपये मिळाले. सन 2008-09 मध्ये स्विस एड इंडिया, स्वित्झरलँडकडून 3,00,000 रूपये मिळाले. सन 2009-10 मध्ये केंद्र शासनाकडून 9,07,200 रूपये मिळाले, स्विस एड इंडिया, स्वित्झरलँडकडून 3,03,072 रूपये मिळाले. विदेशातून इतर अनुदान 11,11,795 रूपये मिळाले. विदेशातून दुसरे अनुदान 40,43,000 मिळाले. स्विस एड इंडिया, स्वित्झरलँडकडून 10,44,000 हजार आले. व्यसनमुक्तीसाठी परदेशातून आलेले हे सर्व अनुदान आहे. मला सांगायचे आहे की, भारताच्या विरोधात नकाशे छापणारी आणि कोणत्याही देशात त्या संदर्भात ....

श्री. कपिल पाटील : सभापती महोदय, सन्माननीय ज्येष्ठ सदस्य श्री. दिवाकर रावते हे विधेयकावर बोलत आहेत. विधेयकावर बोलण्याचा त्यांना पूर्ण अधिकार आहे. पण विधेयकावरील चर्चेचे काही संकेत, नियम आणि परंपरा ठरल्या आहेत. विधेयकातील बाबींबाबत, उद्देशकांबाबत विस्ताराने कितीही बोलता येते, त्याला अडचण नाही. पण विधेयकाशी ज्याचा काडीमात्र संबंध नाही, अशा विषयाबद्दल आमचे सन्माननीय ज्येष्ठ सदस्यांनी सभागृहाचा वेळ घेणे, हे बरोबर नाही. सन्माननीय सदस्यांनी माहिती दिली आहे. माझा माहितीबद्दल कोणताही अधिक्षेप नाही. कारण त्यांनी ती माहिती दिली आहे. त्यांनी स्वत: संगितले आहे की, ती संस्था अत्यंत चांगले काम करते. भारत सरकारच्या योजनेतून तो पैसा आला आहे. भारत सरकारच्या परवानगीने अन्य निधी

..2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. कपिल पाटील ....

आला आहे. इतके स्पष्ट हे आहे. भारत सरकारच्या योजनेतून आणि भारत सरकारच्या परवानगीमुळे आलेला तो पैसा आहे. त्यामुळे त्याचा संबंध कोणत्याही नकाशाशी जोडून नरेंद्र दाभोलकरांबद्दल संशयाचे वातावरण निर्माण करणे बरोबर होणार नाही. व्यक्ती गेल्यानंतर असे बोलणेही योग्य नाही. मला असे वाटते की, नरेंद्र दाभोलकर यांच्या कामाबद्दल सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते साहेबांच्या मनातही काही शंका आहे, असे मला वाटत नाही. मी विनंती करीन की, सन्माननीय सदस्यांनी याबाबत थोडा संयम राखवा.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, मी योग्य बोलावे, अशी सूचना सन्माननीय सदस्य करीत आहेत. तेही त्या संस्थेचे कौतुक करण्याकरिता उभे राहिले आणि एक संधी घेतली, त्याबद्दल त्यांचे धन्यवाद. मी वेडावाकडा उल्लेख कधीही करणार नाही. संस्थेला दोष देण्याकरिता मी उभा नाही. आपण समजून घ्यावे. परदेशी स्विस कंपनीने त्यांना लाखो रूपये दिले आहेत. त्यांच्या उद्देशामध्ये त्यांनी म्हटले आहे की, सांप्रदायिकता आहे. आपण येथे चर्चा ती करीत आहोत. त्याला विरोध करण्याकरिता निधी देतात. परदेशातील निधी योग्य प्रकारे आला आहे का, हे केंद्र शासनाच्या संस्थांनी पहायचे आहे. हा निधी या संस्थेने कुठे वापरला ? हा निधी अंधश्रध्दा निर्मूलनाच्या माध्यमातून आला असेल. आपण सांगत आहात तर मी हा विषय येथेच थांबवितो, आपला आदर करतो. आपल्याला माहीत नसलेल्या घटनेची माहिती मी करून दिल्याबद्दल आपण माझे धन्यवाद मानावे.

( नंतर श्री. मा. शिगम ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ D/ D/ ST/ पूर्वी श्री. कांबळे 16:25

श्री. दिवाकर रावते...

सभापती महोदय, मी या ठिकाणी या विधेयकाच्या अनुषंगाने प्रश्न उपस्थित केला त्यावेळी त्यांची नावे कशाला घेता असे मला सांगण्यात आले. सन्माननीय सदस्य श्री. जयंत प्र. पाटील म्हणाले की, विधेयक आम्ही करतो. मी शासनाने केलेल्या नोटस् आणल्यानंतर लक्षात आले की, श्री. एन.डी.पाटील यांच्या नेतृत्वाखाली एक कमिटी होती.त्या कमिटीने हे विधेयक तयार केले. विधानसभेतील सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री. एकनाथराव गणपतराव खडसे (पाटील) यांनी या संदर्भात महाराष्ट्र टाईम्समध्ये जे काही म्हटलेले आहे ते योग्य आहे असे म्हणावे लागेल. आता हे विधेयक मी या ठिकाणी दळत आहे. विधानसभा आणि विधानपरिषद ही दोन सभागृहे चर्चेसाठी आहेत असे मला वाटले होते. पण ती दळण्यासाठी आहेत असा उल्लेख केलेला आहे. त्यामध्ये असे म्हटलेले आहे की, जादूटोणा प्रतिबंधक विधेयकावरुन विधानसभेत विरोधी पक्षनेते श्री. एकनाथ खडसे यांनी समाजकल्याण विभागाचे मंत्री महोदय श्री. शिवाजीराव मोघे यांच्या विरोधात हक्कभंग प्रस्ताव दाखल केलेला आहे. मंत्री महोदय श्री. शिवाजीराव मोघे यांनी सभागृहाला विश्वासात न घेता अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे संघटक श्री. श्याम मानव यांच्या मदतीने जादूटोणा विधेयकात बदल केल्याचा आरोप श्री. एकनाथ खडसे यांनी केलेला आहे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. भाई जगताप यांनी सांगितले की, विधेयकामध्ये कोठेही धर्माचा उल्लेख नाही. मग तुम्हाला हिंदू- हिंदू असे का वाटते ? असे जेव्हा वाटते त्यावेळी त्याच्या पाठीमागे काही तरी कारणे असतात. हे विधेयक तयार करताना आपल्या नजरेपुढे काय होते ? विधेयकामध्ये सुरुवातीला 29 कलमे होती. ही कलमे आता कमी झालेली आहेत. हे विधेयक बनविण्याकरिता ज्यांनी 18 वर्षे चळवळ चालविली त्या चळवळीचे प्रणेते डॉ. नरेंद्र दाभोळकर हे होते. श्याम मानव हे किती क्रियाशील होते हे मला माहीत नाही. परंतु डॉ. नरेंद्र दाभोळकर गेल्यानंतर श्री. श्याम मानव हेच जणूकाही सर्वेसर्वा आहेत असे वागत आहेत. माननीय मंत्री महोदय श्री. शिवाजीराव मोघे यांना कोणी किती कष्ट घेतलेले आहेत हे माहीत आहे. आजही विधिमंडळाच्या आवारामध्ये ते मार्गदर्शन करण्याकरिता, प्रबोधन करण्याकरिता फिरत असतात. ही चांगली बाब आहे.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते...

माझ्याकडे भरपूर माहिती आहे. ती सर्व मी येथे सांगणार नाही. तरीही गाभा हा सांगितलाच पाहिजे. डॉ. नरेंद्र दाभोळकर यांनी हिंदू धर्मावर टीका करणारी पुस्तके लिहिली आहेत. त्यामध्ये आक्षेपार्ह मत लिहिताना असे म्हटलेले आहे की, "हिंदूंच्या अध्यात्मिक, व्यावहारिक अंधश्रद्धा यांना खतपाणी घालणे, हिंदू कर्मकांड, ध्यानधारणा, होमहवन, पूजाअर्चा, तंत्रमंत्र हे अंधश्रद्धेचे दुसरे स्वरुप आहे. त्याच्याशी दोन हात करण्याची तयारी ठेवलीच पाहिजे." हे पृष्ठ क्रमांक 11लिहिलेले आहे. यज्ञात मोठ्या प्रमाणात तेल, तूप, धान्य जाळणे याला उघड व ठाम विरोध करायला हवा, वटपोर्णिमेला वडाच्या झाडाला प्रदक्षिणा घालणे व दोरा बांधणे या साऱ्या प्रकाराची खिल्ली उडवायला हवी. (पृष्ठ क्रमांक 9). धर्मशास्त्र प्रमाण मानणारे लोक ईश्वर मानतात पण हे केवळ हायपोथॅटिकल आहे (पृष्ठ क्र.9). समाजाची फसवणूक करण्यासाठी काल्पनिक मूर्तिपूजा,तीर्थयात्रा, उपासतापास वगैरे धूर्तांनी तयार केलेले मृगजळ आहे. (पृ.क्र.94) डॉ. दाभोळकरांच्या श्रद्धा आणि अंधश्रद्धा या पुस्तकाची 5वी आवृत्ती प्रसिध्द झाली. त्यामध्ये असे म्हटलेले आहे की, " ज्ञानेश्वर मोठे कवी व तत्वज्ञ होते म्हणून त्यांनी त्यांच्या पुस्तकामध्ये जे लिहून ठेवलेले आहे ते ग्रंथप्रामाण्य तसेच्या तसे मानायची गरज काय ? " असा प्रश्न त्यांनी समाजाला विचारलेला आहे. डॉ.नरेंद्र दाभोळकर यांनी "विचार तर कराल" हे पुस्तक छापले. या पुस्तकाच्या चौथ्या आवृत्तीमध्ये असे म्हटलेले आहे की, "शुभ मुहूर्त, जप, अनुष्ठाने, यज्ञयाग या कार्यकारणभावाला संपूर्ण सुट्टी देऊन करावयाच्या उपाययोजनातील फोलपणा त्यांना जाणवत नाही याचे कारण हेच की सगळयांकडे काडीमात्र तथ्यांश नाही."

...नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते..

याचे कारण सगळयांकडे काडीमात्र सारांश नाही. माझ्याकडे दाभोळकरा विषयी खूप सांगण्यासारखे आहे. परंतु ते सांगत नाही. हिंदुत्वावर फक्त आघात करणारी चार पुस्तके त्यांनी लिहिली. ती पुस्तके माझ्या वाचनात आली. त्या पुस्तकातील काही ओळी मी या ठिकाणी वाचून दाखविल्या. परंतु आमचे श्याम मानव हे प्राध्यापक आहेत. सध्या ते करते-करविते आहेत. त्यांनी पुस्तक छापले आहे. त्यांनी त्यात त्यांनी माझा उल्लेख केला की, दिवाकर रावते उभे राहिले. श्याम मानव हे प्राध्यापक आहेत. डॉक्टरानंतर मी प्राध्यापक आहे. मी देखील काही म्हटले पाहिजे. कुलकर्ण्यांचे 12 वर्षाचे पोर असे त्यांनी लिहिले आहे. त्यांचे तसे वक्तव्य आहे. थोर म्हणजे संत ज्ञानेश्वर. संत ज्ञानेश्वर भिंत काय चालवितात, रेडा वेध कसे काय बोलणार, हे सर्व थोतांड आहे. हे त्यांचे मत आहे. कुणब्याचा तुकाराम सदेह वैकुंठाला गेले. या पुस्तकातील पुढील वाक्य हे वाचण्यासारखे नाही. जी मंडळी विधेयकातील मसुदे बनवित असतात. त्यात स्पष्टपणे इंग्रजीत सांगितले आहे की, They have developed their minds and thoughts for creation of this Bill. असे आम्हाला वाटते. मी या पुस्तकातील काही गोष्टींचाच फक्त उल्लेख करणार आहे. काही गोष्टी ऐकल्यानंतर तुम्हाला मोठा धक्का बसेल.

सभापती महोदय, प्रा.श्याम मानव यांचे "बुवा बाजी ही फसवी फसवेगिरी" असे त्यांचे एक पुस्तक आहे. त्यांची सगळी पुस्तके मी या ठिकाणी आणली नाहीत. अनेकांची पुस्तके माझ्याकडे आहेत. समाजातील मध्यमवर्गीयांमध्ये नशीब आणि ज्योतिषशास्त्र ही अंधश्रध्दा मोठया प्रमाणात बोकाळलेली आहे असे त्यांचे मत होते. या कायद्यातून ज्योतिषशास्त्र हा शब्द काढून टाकलेला आहे. ज्योतिषशास्त्र हा शब्द घातला होता, परंतु तो नंतर आपण काढून टाकला. यासोबत एकूण अध्यात्मिक प्रक्रिया, साक्षात्कारापासून समाधीपर्यंत काही अदभूत कल्पना आहेत. विज्ञानाच्या पलीकडचे काही आहे असे आपल्याला वाटते. याला संमोहन शास्त्र असे म्हणतात. संमोहन शास्त्राचा अनुभव आजही आपण घेऊ शकतो.

महोदय, एखाद्या महिलेच्या अंगात देवी येते. चांगल्या शिकलेल्या, सवरलेल्या बायका हातात मडके घेतात आणि मडक्यात फुंकर मारतात. फुंकर मारल्यानंतर त्यांच्या अंगात लगेच देवी येते. संपूर्ण भारतात नवरात्रीमध्ये 15, 20, 50 लाख महिलांच्या अंगात देवी कशी काय येते ? महिलांच्या दृष्टीने शेवटचा महत्वाचा मुद्दा नजर लागणे हा आहे. हा छोटा मुद्दा आहे. देवी लागणे

2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते..

हा वेगळा विषय आहे. त्या पुस्तकात त्यांनी म्हटले आहे की, महिलांच्या दृष्टीने सर्वात शेवटचा मुद्दा आहे. म्हणजे यांचे पाहणे कोठेपर्यंत गेलेले आहे. नजर लागणे,दृष्ट लागणे. घरात महिला दृष्ट काढते हे मला काही कळत नाही. परंतु यांना धर्मशास्त्राप्रमाणे अवघड वाटते. जो जो चमत्कार करतो तो बदमाश असे म्हणून मी वाचत नाही.

महोदय, सत्य साईबाबांच्या बाबतीत लिहिले आहे. त्यात लिहिताना असे म्हटले आहे की, के.सावकार, हे जादूगार होते. ते सत्य साईबाबांची परीक्षा घेण्यास गेले होते. त्यावेळी सत्य साईबाबांनी यांना चिठ्ठी दिली. या सभागृहात पाच ते सहा मंत्री असे आहेत की, सत्य साईबाबांनी दिलेली घडयाळे अजूनही वापरत आहेत. मी पुढे काय सांगतो ते आपण ऐकून घ्यावे. के.सावकार हा जादूगार होता. त्याने सत्य साईबाबाची परीक्षा घेताना सांगितले की, आम्हाला चिठ्ठी नको आहे. आम्हाला गुलाबजाम पाहिजे आहे. सत्य साईबाबांनी हात फिरवून गुलाबजाम दिले. सत्य साईबाबांना माहिती होते काय की, ही व्यक्ती गुलाबजाम मागणार आहे. त्याचा तथ्यांश त्यांनी जाणावा. ज्या सत्य साईबाबांच्या बाबतीत प्रा.श्याम मानव, डॉ.जाधव हे उघडपणे वक्तव्य करीत होते. ते चमत्काराबाबत बोलत होते. त्या बाबतीत मला बोलण्याचा काही अधिकार नाही. ज्यावेळी सत्य साईबाबा स्वर्गवासी झाले, त्यावेळी देशातील मोठमोठी मंडळी त्यांचे अंत्यदर्शन घेण्यासाठी गेली होती. माननीय श्री.शिवाजीराव मोघे आपण हे विधेयक सभागृहात आणलेले आहे. परंतु त्या साईबाबांच्या अत्यदर्शनाला देशातील तुमच्या पक्षाच्या अध्यक्षा आल्या होत्या. तसेच या देशाचे पंतप्रधानही त्यांचे अंत्यदर्शन घेण्यासाठी गेले होते. त्या सत्यसाईबाबांची टिंगलटवाळी करणाऱ्यांचे ऐकून आपण हे विधेयक आणत आहात. तेव्हा आपण आपल्या पक्षाच्या ज्येष्ठ नेत्यांच्या भावनांशी खेळत नाही ना असा विषय निर्माण होतो. माझ्याकडे फोटो आहेत. ज्यांना पहावयाचे असतील त्यांनी ते माझ्याकडून मागून घ्यावेत.

यानंतर श्री. भोगले....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते......

महाराष्ट्रामध्ये आदरणीय सभापतीपद भूषविणाऱ्या अनेक ज्येष्ठ, श्रेष्ठ व्यक्ती होऊन गेल्या. त्यांना आपण वंदन करतो, त्यांचा आदर करतो. आजही त्यांचे नाव काढतो. विधिमंडळाचे पावित्र्य त्यांनी राखले त्याबद्दल त्यांचे कौतुक करतो. त्यांची अनेक पुस्तके छापली आहेत. प्रा.श्याम मानव यांनी बाळासाहेब भारदेंचे पुराण, सत्य साईबाबा व पी.सी.सरकार ज्युनिअर यांच्या संदर्भात त्यांनी केलेले लिखाण फार गंभीर आहे. बाळासाहेब भारदेंना आपण विद्वान माणूस मानतो. हा आपल्या सभागृहाचा अवमान आहे की नाही हे समजून घ्यायचे. ते सभापती होते. आम्ही बाळासाहेब भारदेंना विद्वान माणूस मानतो. तेव्हा आम्ही व्यंकटनाथ महाराजांचे पादाण वाजवित होतो त्या काळात आम्हाला भारदे जाहीर म्हणाले, या पोरांना श्रध्दा कळत नाहीत, अंधश्रध्दाळू आहेत. पुढे भारदेंनी त्यांना असे म्हटले की, त्याचे असे आहे मानव साहेब, कृत्रिम फुले कागदाची असतात की नाही? त्यावर सेंट टाकला तर त्याचाही वास येतो. ओरिजनल गुलाबाची फुलेही असतात. ती दोन्ही सारखीच दिसतात. त्यात फरक जाणवत नाही. म्हणून काही कृत्रिम कागदाची फुले नैसर्गिक फुलाची बरोबरी करु शकत नाही. आमचे बाबा ओरिजनल फुलातून वास काढतात. तुमची कोणती तरी सेंटेड कृत्रिम फुले आहेत. तुम्ही हातचलाखी जी करता, बाबा चमत्कार जे करतात हे त्यांनी भारदेबद्दल लिहून ठेवले आहे. एकदा मी सत्य साईबाबांना भेटायला गेलो असता त्यांनी आकाशात हात फिरवून संदेश काढून दिला. संदेश काढून दिल्यानंतर पी.सी.सरकार म्हणाले, मला संदेश आवडत नाही. मला रसगुल्ला आवडतो. मग त्यांनी रसगुल्ला काढून दिला. रसगुल्ला काढून दिल्यानंतर साईबाबांच्या लक्षात आले की, हा कोणी तरी जादूगार आलेला आहे. ही परीक्षा आहे. याच्या पुढे अत्यंत विचित्र म्हटले आहे. परंतु यांच्याकडे जेव्हा एखादा विद्वान म्हणजे बाळासाहेब भारदेंसारखा डोके न चालविणारा माणूस गेला तर त्याला बुंदीचा लाडू काढून देतात. हे दुसऱ्या एका बाबाबद्दल म्हटले आहे. पुढे भारदेंची इतकी खिल्ली उडविली आहे की, मला ते वाचवत नाही.

सभापती महोदय, ज्ञानेश्वरांनी भिंत चालविली का? फोटो छापला आहे. हरकत नाही. ते त्यांचे म्हणणे असेल. वारकरी लोकांच्या श्रध्दा आहेत. मला कोणी वारकरी भेटले नाहीत म्हणून मी त्यांच्याशी चर्चा केली नाही. ते वारकरी वेगळ्या विचाराचे असतात. त्यांच्या या श्रध्दा आहेत.

श्री.दिवाकर रावते......

त्यानंतर शंकरराव चव्हाण ज्या बाबांना मानतात ते बाबा टॉपमोस्ट बदमाश असतात....इति श्याम मानव. असे समीकरण मी मांडत असतो. नेदोदाचा बाबा असो, गुलाब बाबा असो, सत्य साईबाबा असो, हे तीनही बाबा उघड बदमाष आहेत. आमचे स्व.विलासराव देशमुख, माजी लोकसभा अध्यक्ष शिवराज पाटील चाकूरकर आणि आणखी एक माजी मुख्यमंत्री यांनी मिळून 3 कोटी रुपयांचे सत्य साईबाबांचे मंदिर लातूरमध्ये बांधायला घेतले आहे असे यांचे म्हणणे आहे.

सभापती महोदय, या श्याम मानवांबद्दल मी जास्त बोलू इच्छित नाही. विदर्भाच्या संदर्भात त्यांनी केलेला जो अवमान आहे त्याबद्दल त्यांनी माफी मागावी का, हा विदर्भातील आमदारांचा आणि जनतेचा प्रश्न आहे. शेगावचे गजानन महाराज म्हणजे मतिमंद होते, वेडे होते हे त्यांनी लिहिले आहे. शेगावच्या महाराजांबद्दल आपल्या निष्ठा असतात, श्रध्दा असतात. परंतु किती बोलायचे. ते वक्तव्य विकृत आहे ते वाचण्यासारखे नाही. त्यांनी असे म्हटले आहे की, विदर्भातील लोकांनी हे जाणून घ्यावे. आमच्या विदर्भात असा बाबा निर्मितीचा सगळ्यात मोठा कारखाना आहे. मेंटल रिटायर्डेड मुल जन्माला आले की, अनेक लोक एकत्र येऊन त्याला बाबा बनवितात. एखादी भगवी कफनी चढवितात. त्याला विदेही पुरुष म्हणून जाहीर करतात. कुठे तरी गजानन महाराज, पुंडलिक महाराज किंवा वस्तू बाबांचे अवतार म्हणतात. मग त्यांचा धंदा सुरु होतो असे यात म्हटले आहे. विदर्भातील लोक मतिमंद महाराज बनविण्याचा कारखाना आहे अशा प्रकारे विदर्भातील मंडळींची निर्भत्सना केली आहे. मी मानव यांना सांगतो, चला परभणीला या आणि गुलाब बाबांचे सगळे साहित्य वाचा. ते माझ्याही वाचण्याच्या आणि समजण्याच्या पलीकडचे आहे. ते अंध होते, परंतु त्यांनी निर्माण केलेले आध्यात्माचे साहित्य उच्च पराकोटीचे आहे.

नंतर 3डी.1..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते ...

ते आपल्या आकलनाच्या पलीकडे आहे असे मला वाटते. हे सर्व मी आता का सांगितले आहे ? या मानसिकतेतून हे विधेयक बनविले असेल तर ते आमच्या धर्मावर, संस्कृतीवर,चालीरितीवर निश्चितपणे आघात करणार आहे असे वाटले म्हणून. त्यात गैर काय आहे ? हे विधेयक बनविताना ते चार खात्यांकडे अभिप्रायासाठी पाठविण्यात आले. वित्त विभागाने असा अभिप्राय दिला की, अधिनियमाच्या मसुद्यामध्ये कोणताही आर्थिक भार अभिप्रेत नसल्यामुळे आमचा अभिप्राय निरंक आहे. महिला व बाल विकास विभागाने प्रस्तावित कायद्याशी थेट संबंध येत नसल्यामुळे त्यांनी देखील अभिप्राय निरंक दिलेला आहे. या विभागाचा या कायद्याशी संबंध नाही म्हटल्यावर प्रश्नचिन्ह निर्माण होते. आज महाराष्ट्रात, भारतात घागरी फुंकणाऱ्या लाखो महिला आहेत. त्यांना फ्रिझोमेनिया झालेला आहे असे श्री.श्याम मानव यांचे म्हणणे आहे. गृह विभागाने विधेयकाच्या प्रस्तावित विधेयकाच्या प्रारूप अहवालास संमती असल्याचा अभिप्राय दिलेला आहे. सार्वजनिक आरोग्य विभागाने देखील आपला अभिप्राय निरंक दिला आहे. त्यांना या विभागाने काहीच विचारले नाही. या सर्वांचे म्हणणे आहे की, हे सर्व वेडे लोक आहेत. भूत, पिशाच्च हा देखील एक मानसिक आजार आहे. त्यांच्यावर मानसिकदृष्ट्या उपचार केले पाहिजेत. मांत्रिकाकडे गेलात तर याद राखा. त्यांनी सांगितले पाहिजे की, आधी डॉक्टरकडे जा. म्हणूनच मी आपल्याला प्रश्न विचारणार आहे. यावर माझ्या पेक्षा डॉ.दीपक सावंतच जास्त सांगू शकतील.

सभापती महोदय, महाराष्ट्रातील लोकसंख्या 11 कोटी 69 लाख 97 हजार 774 आहे. महाराष्ट्रामध्ये ठाणे, पुणे, रत्नागिरी आणि नागपूर येथे एकूण चार शासकीय मनोरूग्णालये आहेत. या सगळ्या गोष्टीकरिता मनोरूग्णांची गरज आहे. विधेयक आणताना आपण किती विचार केला आहे हे मला आपल्याला मुद्दाम सांगावयाचे आहे. समजा हे सर्व बंद केले तर....? या लोकांचा इलाज केला पाहिजे असे त्यांचे म्हणणे आहे. या चार रूग्णालयात मिळून एकूण 5695 खाटा आहेत. त्या नेहमीच भरलेल्या असतात. मनोरूग्णालय पुणे येथे 2540, मनोरूग्णालय ठाणे येथे 1850, मनोरूग्णालय नागपूर येथे 365, मनोरूग्णालय रत्नागिरी येथे 940 रूग्ण आहेत.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते...

शासनाच्या शासकीय सर्वसाधारण रूग्णालयात अंदाजे 300 खाटा आहेत. शासकीय आणि खाजगी वैद्यकीय महाविद्यालयांमधून एकूण 26 एम.डी. डॉक्टर्स आणि अंदाजे 26 डीपीएम डॉक्टर्स दरवर्षी पास होतात. गंभीर मनोरूग्ण 1 टक्का, डिप्रेशन 10 टक्के, न्युरोसिस 10 टक्के, इतर मानसिक आजार 4 टक्के अशा प्रकारे समाजातील एकूण 25 टक्के लोक मनोरूग्ण आहेत. त्यातील काही टक्के यात आले. यात सर्वात वाईट गोष्ट कोणती आहे ? एकूण लोकसंख्येच्या 25 टक्के लोकांना मानसिक आजार असताना या महाराष्ट्रात त्यांच्यावर उपचार करण्यासाठी फक्त 500 मनोरूग्ण तज्ज्ञ आहेत. ते प्रत्येक जिल्ह्यात विखुरलेले आहेत. ठाणे जिल्ह्यात 150 मनोरूग्ण आहेत. पुण्यामध्ये 100 मनोरूग्ण आहेत. माझा संबंध डॉ.व्हाया यांच्याशी आला होता. ते जगातील सर्वश्रेष्ठ डॉक्टर होते. सध्या असलेल्या मनोरूग्णांचा आकडा पाहिला तर त्यांच्यासाठी डॉक्टरांची संख्या पुरेशी नाही. आपल्या येथे मनोरूग्णांकरिता खाजगी रूग्णालये आहेत. त्यांना आपले शासन मान्यता देत नाही.

यानंतर श्री.जुन्नरे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते ....

इतर राज्यामध्ये खाजगी मनोरुग्णालयांना एक महिन्यात मान्यता मिळते परंतु आपल्या राज्यात या प्रस्तावाला गेल्या 5-7 वर्षापासून मान्यता मिळालेली नाही. आपले पथक गेले तर ते वाटच लावून येते. आपल्याकडे जेवढे काही मनोरुग्ण आहेत त्यांना सेवा देण्याची व्यवस्था नाही असे असतांना डॉ. नरेंद्र दाभोळकर तसेच प्रा. श्याम मानव सांगतात की, या मनोरुग्णांना दवाखान्यात हलवा नाही तर तुम्हाला तुरुंगात टाकले जाईल. आम्हाला तुम्ही खुशाल तुरुंगात टाका परंतु आपल्या मनोरुग्णांची सोय तुम्ही कशा प्रकारे करणार आहात ? अशी सर्व परिस्थिती असतांना विभागाने अहवाल निरंक दिलेला आहे. त्याच्याशी आमचा काही संबंध नाही असे सांगितले आहे. केवळ आरोग्य खात्याचा प्रश्न नाही, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागाने तसेच कृषी व पदूम विभागाने सुध्दा आमचा याच्याशी काही संबंध नाही असे सांगितलेले आहे. या बिलाच्या संदर्भात केवळ गृह विभाग म्हणते की, होय हे बरोबर आहे. बाकी शासनाचे सर्व विभाग म्हणतात की, आमचा याच्याशी काही संबंध नाही, तुमचे तुम्ही पाहून घ्या. ड्रग अँड मॅजिक रेमेडीचा कायदा हा जुना कायदा आहे. या कायद्याच्या संदर्भात मी उपसूचनेवर बोलणार आहे.

सभापती महोदय, महाराष्ट्र अंधश्रध्दा निर्मूलनाच्या संदर्भात सामाजिक न्याय विभागाकडून माझ्याकडे नस्ती आलेली आहे. मसुदा शासनाने करावयाचा असतो असे माझे मत होते परंतु सामाजिक न्याय विभागाने असे लिहिले आहे की, महाराष्ट्र अंधश्रध्दा निर्मूलन समितीने सादर केलेला मसुदा कायदेशीर छाननी करता त्या विभागाकडे पाठविण्यात आला. तिसऱ्या मुद्यामध्ये म्हटले आहे की, विधेयकाच्या अंधश्रध्देच्या व्याख्येबाबत सुधारित परिशिष्ट (अ) मध्ये नमूद केलेल्या बाबी श्रध्देमध्ये मोडतात किंवा कसे ? याबाबत पुन्हा कायदेशीर तपासणी करण्यासाठी विधी व न्याय विभागाने सूचविल्या आहेत. या पूर्वीच्या परिशिष्ट (अ) मध्ये बाबी श्रध्देमध्ये मोडतात किंवा कसे याबाबत काळजीपूर्वक संपूर्ण तपासणी करण्याबाबत अंधश्रध्दा निर्मूलन समितीला 28 मार्च, 2003 च्या पत्राने कळविले होते. त्यास अनुसरुन कार्याध्यक्ष, महाराष्ट्र अंधश्रध्दा निर्मूलन समितीने श्रध्दा-अंधश्रध्देची सुधारित यादी शासनास सादर केली. त्याची तपासणी केली असता त्यातील मुख्य बाबी योग्य असल्याचे विधी खात्याने सांगितले. दि. 28/3/2003 च्या टिपणी नुसार विधी व न्याय

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते ....

विभागाने असे अभिप्राय दिले की, सदर विभागातील कलम 14 व 15 मधील तरतुदी भारतीय राज्य घटनेतील गुन्हेगारी दंड संहिता 1973 च्या कायद्याप्रमाणे असल्यामुळे भारतीय राज्य घटनेच्या अनुच्छेद 254(2) नुसार विधेयक माननीय राष्ट्रपतींच्या मान्यतेसाठी राखून ठेवणे आवश्यक आहे. तसे विधेयक विधिमंडळात मांडण्यासाठी केंद्र शासनाच्या प्रशासकीय मान्यतेची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, असे अभिप्राय दिले असताना ते या घटनेतून वगळून कसे आणावयाचे यासाठी आपली सर्व चतुराई सुरु झाली.सावकारी कायद्यासारखेच या विधेयकाची परिस्थिती होणार आहे.

सभापती महोदय, विधी व न्याय विभागाची नस्ती आहे. आदरणीय श्री. एन.डी.पाटील हे या समितीचे अध्यक्ष आहेत. श्री. एन.डी.पाटील यांच्या बद्दल आम्हाला आदरच आहे. परंतु त्यांचा उल्लेख या मध्ये असा करण्यात आला आहे की, श्री.एन.डी.पाटील ऑनरेबल एमएलए आमच्या विभागाला श्री. एन.डी.पाटील कोण आहेत हे सुध्दा माहीत नाही. याचा अर्थ अधिकारी कोणत्या प्रभावाखाली वावरत होते हे आपल्याला समजून येईल, हा महत्वाचा विषय आहे. "Shri Patil and Shri Dabholkar were a very keen that the Schedule prepared by them to the proposed law, describing therein certain acts as "Black Magic or evil practices or customs or blind faith" should be included in the definition of the said term provided in clause 2(d) of the revised draft. The Social Justice Department being the concerned administrative Department may, consider the revised draft and the said Schedule and if it meets its requirements and carries out intention adequately and may urgently further process the file."

यानंतर श्री.अजित.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

AJIT/ D/ ST/ पूर्वी श्री.जुन्नरे.. 16:50

श्री.दिवाकर रावते...

विधी व न्याय विभागाने हात झटकून संबंधित विभागाने काय करायचे ते करावे,आम्हाला काही सांगू नका, तुमचे तुम्ही पाहून घ्या, अशी भलामण केलेली आहे. मी हे सर्व का वाचून दाखवित होतो तर मी प्रसृती वेदना म्हणत होतो ती अशाप्रकारे निर्माण झालेली आहे.

सभापती महोदय, कोण सच्चा अंधश्रध्दा निर्मूलक याबाबत डॉ.दाभोळकर आणि डॉ.श्याम मानव यांच्यामध्ये वाद होता. त्या संदर्भात लेखी छापून आलेले आहे. मी ते वाचत नाही. डॉ.श्याम मानव म्हणतात मी श्रेष्ठ आहे डॉ.दाभोळकर बरोबर नाहीत.

सभापती महोदय, प्रत्येक वेळेला उपसूचना मांडा आणि त्यावर भाषण करा त्यानंतर त्या मताला टाका ही पध्दत टाळण्याकरिता आणि वेळ वाचविण्याकरिता मी दिलेल्या उपसूचना मांडलेल्या आहेत, आपण त्या स्वीकारावयाच्या की नाहीत हा नंतरचा भाग आहे.

सभापती महोदय, या विधेयकाच्या खंड 2 मधील उप खंड (2) मध्ये अशी तरतूद आहे की. "यात वापरलेल्या परंतु व्याख्या न केलेल्या शब्दांना व शब्दप्रयोगांना, औषधिद्रव्ये व जादूटोण्याचे उपचार (आक्षेपार्ह जाहिराती) अधिनियम 1954 व संहितेमध्ये जे जे अर्थ नेमून देण्यात आले आहेत, ते ते अर्थ असतील." हा खंड वगळण्यात यावा अशी मी मागणी केलेली आहे. कारण औषधिद्रव्ये व जादूटोण्याचे उपचार (आक्षेपार्ह जाहिराती) अधिनियम 1954, युनानी पध्दतीने औषधिद्रव्ये वापरावयाची की नाहीत या संदर्भातील उच्च न्यायालयात खटला दाखल झाला होता. हा केंद्र सरकारचा कायदा आहे. केंद्र सरकारने कायदा केला परंतु त्यामध्ये कोणती औषधिद्रव्ये नसावीत याचा उल्लेख नव्हता. या संदर्भातील कायदा करण्याचा अधिकार संसदेला आहे. उच्च न्यायालयाने या खटल्यामध्ये निर्णय दिला की, विधिमंडळाचा अधिकार अधिकाऱ्यांना हातात घेता येणार नाही म्हणून या खटल्यामध्ये गुन्हा दाखल केलेला आहे तो मी पारीत करीत नाही, तो फेटाळून लावतो. न्यायालयाने संसदेला आदेश दिले की, आपणाला कोणती औषधिद्रव्ये नको आहेत त्या संदर्भात संसदेने निर्णय घ्यावा.. जवळपास 54 औषधे आहेत त्या औषधांची यादी मी वाचत नाही. ती त्या कायद्याअंतर्गत येतात जे आपण येथे नमूद केलेले आहे.

..2..

श्री.दिवाकर रावते...

सभापती महोदय, या विधेयकाच्या अनुसूचीमध्ये म्हटलेले आहे की, "व्यक्तीवरील अमानुष कृत्ये, व्यक्तीच्या तोंडात जबरदस्तीने मूत्र किंवा विष्ठा घालणे किंवा यासारख्या कोणत्याही कृती करणे," म्हणजे आपण अधिकाऱ्यांना मुक्तता दिलेली आहे. किंवा म्हटल्यानंतर मागील सर्व भाग तेथेच राहतो आणि पुढे सर्व नवीन येते म्हणजे अधिकाऱ्याला वाटेल ते.

सभापती महोदय, विधेयक मंजूर होत असताना कोणतीही व्याख्या पूर्ण असली पाहिजे. कशावर कारवाई करावी हे विधिमंडळाने ठरविले पाहिजे आणि त्यानुसार कायदेशीर कारवाई झाली पाहिजे असे अभिप्रेत आहे. या विधिमंडळाचा तो अधिकार आहे. एका खटल्याच्या निमित्ताने न्यायालयाने दिलेला निर्णय मी येथे सांगितलेला आहे.

यानंतर श्री.बोर्डे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते....

सभापती महोदय, कलम-6 हे प्रवेश करणे, झडती घेणे, इत्यादीचे अधिकार देण्यासंदर्भातील आहे. या कलमातील पोटकलम (1) मध्ये नमूद केले आहे की, "राज्य शासनाने, याबाबत वेळोवेळी दिलेल्या सर्वसाधारण किंवा विशेष आदेशांना अधीन राहून दक्षता अधिकाऱ्याला....." महोदय, या ठिकाणी पुन्हा तोच कायदा लागू होतो. मुळात या बाबतचा अधिकार हा विधिमंडळाचा आहे. विधिमंडळाला जे काही ठरवायचे आहे ते येथे ठरविले पाहिजे. महोदय, या कलमातील "राज्य शासनाने, याबाबत वेळोवेळी दिलेल्या सर्वसाधारण...." येथपर्यंत ठीक आहे. परंतु पुढे "किंवा विशेष आदेशांना अधीन राहून" असे नमूद करुन त्यांना मोकळीक दिली. यावरुन दिसून येते की, सभागृहापुढे न येता, कायद्यामध्ये तरतूद न करता सभागृहाचा अधिकार प्रशासकीय अधिकाऱ्यांना बाहेर वापरण्यासाठी मोकळा करुन दिला जात आहे. मी पुन्हा एकदा सांगतो की, अशा प्रकारे सभागृहाचे अधिकार प्रशासकीय अधिकाऱ्यांना देता येणार नाहीत. महोदय, या विधेयकात औषधांच्या बाबतीत जे नमूद केलेले आहे ते वगळण्यासाठीच मी ही उप सूचना आवर्जून मांडलेली आहे. त्या बाबत गांभीर्याने विचार करावा. अन्यथा या विधेयकाच्या बाबतीत येथे कितीही आनंद मानला तरी सुध्दा कोणी तरी केजरीवाल उठेल आणि विधिमंडळात मंजूर झालेले विधेयक कसे चुकीचे आहे हे सांगेल. त्यानंतर विधिमंडळाने केलेला कायदा गोत्यात येईल. कायद्यामध्ये त्रुटी ठेवून विधिमंडळाचे अधिकार प्रशासकीय अधिकाऱ्यांपर्यंत पोहोचविणार असाल तर तो विधिमंडळाच्या कामात हस्तक्षेप होईल, त्याचा विक्षेप होईल. म्हणूनच मी या विषयी आपल्याकडे सूचना दिली आहे. मी पुन्हा एकदा विनंती करतो की, या विधेयकातील कलम-3 च्या तरतुदी वगळण्यात याव्यात.

महोदय, ओळ क्रमांक-2, पृष्ठ क्रमांक-3, जाहिरात साहित्य किंवा लेखन या संदर्भात दिलेली उप सूचना न मांडता ती मी मागे घेतो.

महोदय, कलम-3, पोटकलम-1, ओळ क्रमांक-11 या अनुषंगाने मी अशी सूचना मांडत आहे की.....

सभापती महोदय, मी सभागृहाच्या निदर्शनास आणून देतो की, सभागृहामध्ये आवश्यक ती गणसंख्या नाही. सभागृहामध्ये पुरेसा कोरम ठेवण्याची जबाबदारी सरकारची आहे. आम्ही सुध्दा सर्वजण सभागृहातून निघून जातो. हे विधेयक सरकारने मांडले आहे. शिवाय सरकारला हे





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते....

विधेयक मंजूर करुन घ्यावयाचे आहे. सभागृहात कोरम ठेवण्याचे उत्तरदायित्व केवळ आमचेच आहे काय ?

**तालिका सभापती** : मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, आपण या स्टेजला उप सूचना न मांडता विधेयकातील तत्त्वे आणि उद्देश या बाबत विचार व्यक्त करावेत.

श्री.दिवाकर रावते : असे असेल तर मी नंतर उप सूचना मांडतो. त्यावेळी मला पुन्हा विधेयकावर बोलता येईल. वास्तविक पाहता मी सभागृहाची सोय बघत आहे.

**तालिका सभापती** : सन्माननीय सदस्य, आपण विधेयकावर बोलत असताना आपण वारंवार उप सूचना मांडत असल्याचे सांगत आहात. विधेयक विचारात घेतल्यानंतर ज्यावेळी विधेयक खंडशः विचारात घेण्यात येईल त्यावेळी आपल्याला उप सूचना मांडता येतील.

श्री.दिवाकर रावते : ठीक आहे. प्रत्येक उप सूचना मांडून मी त्यावर भाषण करण्यास तयार आहे. मी प्रत्येक उप सूचना मांडेन, माननीय मंत्र्यांकडून उत्तर घेईन आणि मतदानाची मागणी करेन. प्रत्येक उप सूचनेच्या वेळी हीच पध्दत अवलंबेल. मुळात मी सरकारला सहकार्य करण्याचा प्रयत्न करीत आहे.

**तालिका सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते साहेब, मी आपल्याला केवळ सुधारणा मांडण्याची प्रोसीजर सांगितली आहे. सुधारणा मांडण्याची ही स्टेज नाही.

श्री.दिवाकर रावते : महोदय, आपले आदेश मला मान्य आहेत.

नंतर श्री.कांबळे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**तालिका सभापती** : सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते, आपण विधेयकावर बोलावे.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, आपण सचिवांचा सल्ला घ्यावा. उप सूचना विधेयकाचा भाग आहे की नाही हे पहावे. मला आता घुसमटल्यासारखे होत आहे. कारण आपले अज्ञान प्रकट करण्यासारखा मी गुन्हा करीत आहे, असे मला वाटू लागले आहे. मी तसे वाटून घेत नाही. माननीय सभापतींच्या निर्णयाच्या बाबतीत आपल्याला अपील नसते.

सभापती महोदय, मी एक उप सूचना मांडली आहे. मी नंतर या संदर्भात बोलेनच. मी अशी एक उप सूचना मांडली की, कलम 3 मधील पोट कलम 1 मध्ये, असे म्हटले आहे की, "कोणतीही व्यक्ती एकतर स्वत: किंवा इतर कोणत्याही व्यक्तीमार्फत, या अधिनियमास जोडलेल्या अनुसूचीमध्ये नमूद किंवा वर्णन केलेल्या, नरबळी आणि इतर अमानुष, अनिष्ट व अघोरी प्रथा व जादूटोणा करणार नाही किंवा त्यांचे प्रचालन किंवा प्रचार ...." येथपर्यंत ते बरोबर आहे. "किंवा आचरण", असे येथे म्हटले आहे. इंग्रजीचे मराठीत भाषांतर करताना काहीतरी गडबड झाली आहे. आचरणाचा अर्थ आमच्या हिंदू धर्मभाषेत वेगळा आहे. दैनंदिन जीवनामध्ये ज्या धार्मिक गोष्टी करण्यात येतात, त्याला आम्ही आचरण म्हणतो. "किंवा आचरण", असे म्हटल्यानंतर ते आचरण वेगळे झाले. मग त्या सर्व आचरणांवर बंधन निर्माण झाले. वाक्याची मांडणी अशी झाल्यामुळे असा अर्थ 100 टक्के त्यामध्ये निघतो. मी तुम्हाला विनंती करतो की, "किंवा आचरण" हे शब्द काढले तर आपल्याला अभिप्रेत असलेले नरबळी आणि इतर अमानुष, अनिष्ट व अघोरी प्रथा व जादूटोणा या संदर्भातील अर्थ हा तेथे बरोबर लागू पडेल. "किंवा आचरण", हे शब्द आले तर ते व्यापक होईल आणि हे सर्व बाजूला जाईल. आपण ज्या यंत्रणा या संदर्भात नेमणार आहात, त्यांच्यावर आपला ताबा नसणार आहे.

सभापती महोदय, डॉ. श्याम मानव साहेब सभागृहाच्या गॅलरीमध्ये बसले आहेत. त्यांची पहिली बैठक मला आठवते. या विधयेकाच्या पहिल्या बैठकीत त्यांनी माननीय मुख्यमंत्र्यांना सांगितले की, आपण हे विधेयक मंजूर करावे, उद्याच्या उद्या 500 लोकांना अटक करतो. ते माननीय मुख्यमंत्र्यांना विधेयकाची ताकद सांगत होते. ते काय करणार, हे सांगत नव्हते. हे विधेयक मंजूर झाल्यावर मी काय करू शकतो हे सांगत नव्हते. ते फार कमी आले. त्यांना

..2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते ....

सहकार्य केले की नाही, हे मला माहीत नाही. आता विधेयकातील बरेच विषय कमी आले आहेत, नखे-दात काढलेले हे विधेयक आहे, असे लोक म्हणतात, मला माहीत नाही. "किंवा आचरण" हे शब्द काढून टाकावे, अशी मी विनंती करतो. माझी उप सूचना विचारात घ्याल, तेव्हा त्यावर भाषण करायचे की नाही, हे ठरवीन. आपण अवश्य या बाबतीत मार्गदर्शन करावे, अशी मी आपल्याला विनंती करतो. प्रचार करणे .... याचा अर्थ .... नरबळी आणि इतर अमानुष, अनिष्ट व अघोरी प्रथा व जादूटोणा या सबंधित किंवा त्या विषयी हे असल्यामुळे माझ्या लक्षात आले. आपण उगाचच साहित्य या संदर्भातच जात आहोत. इंग्रजी भाषांतर वाचल्यानंतर लक्षात आले की, हे तेवढ्यापुरतेच मर्यादित आहे. मी आताच सांगतो की, मी ती उप सूचना मांडणार नाही.

सभापती महोदय, विधेयकाच्या कलम 3 मधील पोट कलम 2 मध्ये "आचरण" असा शब्द आहे. इंग्रजीमध्ये त्याचा अर्थ जोडला तर तो बरोबर येतो. "आचरण" हा शब्द काढल्यानंतर यावर काहीही परिणाम होणार नाही. पोट कलम 1 मधील "आचरण" हा शब्द काढला तर येथे हा प्रश्न निर्माण होईल, असे वाटत नाही.

( नंतर श्री. मा. शिगम ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ D/ KTG/ पूर्वी श्री. कांबळे 17:05

श्री. दिवाकर रावते....

सभापती महोदय, नरबळी हा या विधेयकाचा मूळ विषय आहे. कलम 3(4)मध्ये असे म्हटलेले आहे की, "पोट कलम (2) खालील शिक्षापात्र अपराध हे दखलपात्र व अजामीनपात्र असतील." मला असे सुचवायचे आहे की सर्वच्या सर्व एकाच तराजूमध्ये मोजता येत नाही. यामध्ये 7 वर्षाची तरतूद आहे. नरबळीला प्रतिबंध घालणे हा मूळ उद्देश आहे. अनन्वित छळातून माणसाचा जीव जातो हे महत्वाचे आहे. नरबळी आणि अघोरी कृत्य हे अपराध दखलपात्र व अजामीनपात्र असले पाहजेत. म्हणून यामध्ये दुरुस्ती होणे आवश्यक आहे. कारण हे विधेयक कशासाठी आहे आणि नेमकी कुणाला शिक्षा व्हावी हे समजू शकेल. अन्यथा सब घोडे बारा टक्के असे होईल. नरबळीला प्रतिबंध करण्यासाठी अंधश्रद्धा निर्मूलन समितीने वर्षानुवर्षे पाठपुरावा केलेला आहे. हा त्यांचा उद्देश कदाचित असफल होईल आणि नको त्या गोष्टी घडतील. म्हणून मला असे सुचवावेसे वाटते की, नरबळी आणि अघोरी कृत्य हे अपराध अजामीनपात्र झाले तर या कायद्याला ताकद मिळू शकेल.

सभापती महोदय, मला या विधेयकाच्या अत्यंत महत्वाच्या विषयाकडे जायचे आहे. या विधेयकाच्या पृ.क्र.5 ओळ क्रमांक 22 नंतर सेव्हिंग क्लॉज टाकलेला आहे. त्यामध्ये असे भासविण्याचा प्रयत्न केलेला आहे की, हे विधेयक धर्माकरिता नाही, हिंदू धर्माकरिता तर नाहीच नाही. हे विधेयक नरबळी आणि अघोरी कृत्यासाठी आहे. ओळ क्रमांक 22 नंतर जे दाखल झाले ते 12वे व्यावृत्त आहे. त्यामध्ये "दिवंगत संतांचे चमत्कार" असे शब्द वापरण्यात आलेले आहेत. मंत्री महोदयांना "दिवंगत संतांचे चमत्कार" हे शब्द पटतात काय ? पटत असेल तर त्यांनी होय म्हणावे. माझे असे म्हणणे आहे की, मागील संतांनी चमत्कार केले, आजही चमत्कार करणारे संत आहेत आणि भविष्यात देखील चमत्कार करणारे संत होतील. सन्माननीय सदस्य श्री. भाई जगताप यांनी सांगितलेले आहे की, संत हे हिंदू धर्मामध्ये असतात. पण खिश्चन धर्मामध्ये चमत्कार सिद्ध झ ाल्यानंतरच संतपद मिळते. संतांचे चमत्कार सांगणे, त्याचा प्रचार, प्रसार, साहित्य वितरित करणे तसेच शारीरिक आणि आर्थिक नुकसान न करणा-या धर्मगुरुचे चमत्कार सांगणे हे यातून वगळले तर बरे होईल. कारण अशा प्रकारचे संत काल होते, आजही आहेत आणि उद्याही असणार आहेत.या संबंधीचा भाग देखील विधी विभागाने नाकारलेला आहे. मी सांगत होतो की, "In this

..2..

श्री. दिवाकर रापते....

connection it is pointed out that section 13 of that Bill, as it stands reads as under." मी सांगत होतो की, 13वे कलम वगळावे. त्याबाबतीत विधी विभागाने असे म्हटलेले आहे की, "as such the act specifies, the schedule which does not affect any person mentally, physically or financially cannot be construed as an offence under the Bill or in other words, the act specifies in the schedule to the Bill involving the religious rights and rituals which adversely affects any person mentally, physically or financially shall be an offence under the Bill."

विधी खात्याने असे म्हटलेले आहे की, शारीरिक आणि मानसिक अशा प्रकारचे शब्द टाकले तर गुन्हा ठरेल. मी हे सर्व मांडत असताना माझ्यापुढे मोठा प्रश्न निर्माण झालेला आहे.

...नंतर श्री. गिते...

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ABG/ D/ KTG/ प्रथम श्री.शिगम 17:10

श्री.दिवाकर रावते....

आपण कलम 3 मधील "दिवंगत" हा शब्द काढून टाका असे मी म्हणत होतो. मी अत्यंत नम्रपणे सांगू इच्छितो की, मंदिरामध्ये विधी चालतात. होम, यज्ञ असे कार्यक्रम होतात. मी यजुर्वेद सोबत आणलेले आहे. यजुर्वेदाचे संदर्भ दिले तर मला अजून एक ते दोन तास वेळ लागेल. यज्ञ संस्था सांगते की, सूर्याचे तेज आपल्याला यज्ञ सांगते. हा अध्यात्मातील विषय आहे.तो सभागृहाचा विषय नाही. गीतेने यज्ञाचे महत्व सांगितले आहे. गीता हा हिंदुंचा धर्म आहे. गीता हा मानव धर्मच सांगतो. गीता ज्यावेळी सांगितली गेली, त्यावेळी या भूतलावर कोणताही धर्म नव्हता. ते हजारो वर्षानंतर प्रस्तापित झाले हे सत्य आहे. कोणत्या धर्माला दोष देण्याचा हा विषय नाही. त्यावेळी भगवान श्रीकृष्णाने सांगितले होते की,

अन्नाद्भवन्ति भूतानि पर्जन्यादन्नसंभवः
यज्ञाद्भवति पर्जन्यो यज्ञः कर्मसमुद्भवः

ही निसर्गाची सायकल आहे. ही गोष्ट त्यावेळीच सांगून टाकली होती. आम्ही देवळात यज्ञ करतो. हे करीत असताना काही इजा झाली काय? आपण या ठिकाणी "दिवंगत" संताबाबत म्हटले आहे. मला एक गोष्ट या ठिकाणी निदर्शनास आणून द्यावयाची आहे. सन्माननीय मंत्री महोदय, आपल्याला हे विधेयक मांडण्याचा नैतिक अधिष्ठान आहे काय असा माझा विषय आहे. काल मी माननीय उप सभापती यांच्या कार्यालयातील दूरदर्शनवरील वेबसाईट पहात होतो. आपण तेथे येऊन गेलात आणि काय पाहता ही गोष्ट मला विचारुन गेलात. मी तुम्हाला बसावयास सांगितले, पण तुम्ही निघून गेलात. मार्च, 2013 रोजीचे "अम्माचे चमत्कार" पहात होतो. माझ्याकडे त्याची सी.डी.आहे. अम्माच्या फोटोमधून मोती येत होते. या अम्मा भगवान कोण आहेत. ते महाराष्ट्रातील नाहीत. अम्मा भगवान हे आमच्या माननीय मंत्री महोदयांचे दैवत आहे. ते त्यांना पुजतात. मी त्यांच्या श्रध्देचा आदर करतो. विधिमंडळाचे अधिवेशन चालू होण्यापूर्वी ते त्यांचा आशीर्वाद घेऊन येतात. सरकार सत्तेवर आल्यापासून यशस्वीपणे तेच सामाजिक न्याय विभागाचे काम करु शकतात हे सिध्द झाले आहे. त्यांच्यावर अम्मा भगवानचे आशीर्वाद आहेत. म्हणून त्यांनी त्यांच्या कार्यालयामध्ये अम्मा भगवानचा आजही फोटो लावलेला आहे. जे संत चमत्कार घडवित आहेत. त्यांचे जे पुजारी असतील. चमत्कार बंद करण्याचे विधेयक त्यांनीच या सभागृहात आणलेले आहे. हा नैतिक अधिष्ठानाचा विषय आहेच. माझ्याकडे त्यासंबंधीचा देखील फोटो आहे, तो आपण

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते....

सर्वांनी बघून घ्यावा.

मला काल माननीय मंत्र्यांनी आल्याबरोबर विचारले की, तुम्ही सी.डी. कुठली आणली आहे मला त्यांचे दैवत माहिती आहे.त्यांची मला सिध्दी माहिती आहे. मी काल भैयू महाराजाच्या बाबतीत उल्लेख केला. भैयू महाराज सामाजिक काम प्रचंड करतात. आध्यात्मिक क्षेत्रात त्यांचा एक आपला अधिकार आहे. म्हणून मी तुम्हाला म्हटले की, ही गोष्ट तुम्ही स्वीकारा. "दिवंगत संत " हा शब्द काढून टाका. एवढाच माझा आग्रह आहे. पूर्वीच्या काळात चमत्कार करणारे संत होते. आजही काही संत चमत्कार करणारे आहेत. महाराष्ट्रातही असे संत आहेत. मी काल त्या कार्यालयात बसलो होतो, त्याने मला एक फोन आणून दिला. मला सांगितले की, सर दूरध्वनीवर गुरुजी बोलत आहेत....

यानंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते......

आता तुम्ही बाहेर आलात तरी मी सांगेन. काय बोलता? तुमचा फोटो त्यांच्या पुढ्यात होता. त्या फोटोवरुन ते मला सांगायला लागले. तुम्ही अमुक आहात का, तुम्ही तमुक आहात का असे सांगत होते. जवळजवळ 70 ते 80 टक्के ते बरोबर बोलत होते. त्यांना ते फोटोवरुन दिसत होते. आता तुम्ही बाहेर आलात तर ज्यांनी त्यांना फोन लावला होता त्यांना फोन लावायला सांगतो. त्यांना सांगतो, यांचा फोटो पुढ्यात ठेव. हे करणारे लोक आहेत.

सभापती महोदय, म्हणून मी सांगत होतो की, दिवंगत शब्द काढावा. असलेल्या संतांवर अन्याय होऊ नये अशी माझी प्रामाणिक इच्छा आहे. मी सत्तेचा आदर करतो. ती कुणाचीही असो. या विधेयकामध्ये तुम्ही घर, मंदिर, दर्गा, गुरुद्वारा, पॅगोडा, चर्च याचा समावेश केलेला आहे. हा विधेयकाचा सर्वात महत्वाचा भाग आहे. या सभागृहात बसलेले सर्व या बाबत सहमत होतील असे मला वाटते. चर्च किंवा इतर प्रार्थना स्थळे या ठिकाणी उघडपणे किंवा व्यवस्थापनाला शारीरिक वा आर्थिक नुकसान न करणाऱ्या.........म्हणजे नुकसान न करणाऱ्यांना सूट दिली आहे. नुकसान करणाऱ्यांना सूट नाही. पॅगोडामध्ये असे काही घडते का? सध्याच्या परिस्थितीत सर्व धर्माना एकत्र आणून त्यांनी विपश्यना निर्माण करुन वेगळ्या जगामध्ये घेऊन जाण्याचे सामर्थ्य पॅगोडामध्ये आहे. तुम्ही पॅगोडाचा अंतर्भाव केल्यामुळे तो पॅगोडाचा अवमान ठरतो असे मला वाटते. मी उपसूचना दिली आहे. विपश्यनेचा प्रकार पॅगोडामध्ये चालतो. गुरुद्वारामध्ये काय चालते याची मला माहिती नाही. परंतु त्या ठिकाणी शस्त्रे ठेवलेली असतात. दर्ग्याचा उल्लेख केला आहे. मंदिराचा उल्लेख केला आहे. मंदिरात होमहवन केले जाते. म्हणून मी गीतेचा श्लोक वाचून दाखविला. या संदर्भात आपण आर्थिक नुकसान म्हटले आहे. मला या ठिकाणी स्पष्ट शब्दात सांगावेसे वाटते की, दिवाकर रावते भाषण करुन अपप्रचार करतात असे श्याम मानव म्हणतील अशी मला भीती वाटते. उद्या सिध्दीविनायक मंदिरात भक्तांच्या रांगा लागल्या आहेत. तेथे बोर्ड लावला आहे. सकाळचा अभिषेक, दुपारचा अभिषेक, मध्यंतराचा अभिषेक, पहाटेचा अभिषेक अमुक अमुक रुपयांमध्ये करता येईल. आमचे श्याम मानव एखादा कार्यकर्ता पाठवतील. जा अभिषेकासाठी पैसे देतो. 5 रुपये, 50 रुपये घेतले म्हणजे आर्थिक शोषण केल्याचा गुन्हा दाखल होईल असे मला वाटते.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते......

सभापती महोदय, घर कशासाठी अंतर्भूत केले आहे? घर हे आपले व्यक्तिगत आहे. कालचा देशातील आकांत आपण पाहिला असेल. 125 कोटी लोकसंख्या असलेल्या देशात समलिंगी संबंधात सर्वोच्च न्यायालयाने निर्णय दिला. त्यांची संख्या 25 लाख एवढी नाही. परंतु संपूर्ण देशात सोनिया गांधी, राहुल गांधीपासून सर्व नेत्यांनी क्रिया प्रतिक्रिया दिल्या. आमच्या बेडरुममध्ये बघणारे न्यायालय आणि केंद्र सरकार कोण? तुम्ही विकृतीला मानणारे असलात तरी पूजा अर्चा याबाबत गैरसमज नको. तुम्ही घर का समाविष्ट केले?

नंतर 3 एल.1...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते...

यात आपण घराचा का समावेश केला आहे हेच मला कळत नाही. घरामध्ये व्यक्ती कडून किंवा व्यवस्थापनांद्वारे शारीरिक व आर्थिक नुकसान न करणारे अशा प्रकारचे केले जाणारे, प्रार्थना, उपासना.... असा उल्लेख आपण विधेयकामध्ये केला आहे. त्याचा अर्थ काय आहे ? शेवटी, प्रत्येकाचे घर हे खाजगी असते. तो त्याच्या घरी विधी करतो. आपण पुढे म्हटले आहे की, एखादी गोष्ट घरामध्ये घडली व त्याने त्यासंबंधी तक्रार केली तर ती नोंदवली जावी. अशी तरतूद या विधेयकामध्ये आहे. त्यावरून किती तरी हलकल्लोळ झाला होता. यात आपण घराचा उल्लेख केला आहे तो मला बरोबर वाटत नाही. तेव्हा यासंबंधी आपण गांभीर्याने विचार करावा अशी मी आपल्याला विनंती करतो. पॅगोडा काय आहे हे सांगितले आहे.

श्रीमती विद्या चव्हाण : सभापती महोदय माझा हरकतीचा मुद्दा आहे. विधेयकातील पान क्र.5 वर स्पष्ट दिले आहे की, शंकानिरसनार्थ असे घोषित करण्यात येते की, या अधिनियमातील कोणतीही गोष्ट पुढील बाबींना लागू असणार नाही. त्यात पॅगोडा, सिद्धिविनायक, प्रार्थना इत्यादीचा उल्लेख केला आहे. त्यांना हे लागू होत नाही. तरी देखील तोच तोच खोटा प्रचार का केला जात आहे ? तेव्हा माझी सन्माननीय सदस्यांना विनंती आहे की, पान क्र.5 वरील खंड 12 नीट वाचावे. त्यात सगळे स्पष्टीकरण देण्यात आले आहे.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, माझे मराठी कच्चे असल्यामुळे दुर्दैवाने ते अर्थ कच्चे वाटतात. मी खंड 12 वाचतो. तो आपण समजून घ्यावा. अशा ठिकाणी व्यक्तींकडून किंवा व्यवस्थापनांद्वारे शारीरिक व आर्थिक नुकसान न करणारे अशा प्रकाराला माफी आहे. नुकसान करणाऱ्याला माफी नाही. शुद्ध मराठीत असा अर्थ आहे की, जेथे असे प्रकार घडतात त्यांना माफी नाही. पुढे असे म्हटले आहे की, प्रार्थना, उपासना व सर्व धार्मिक विधी. सन्माननीय सदस्या श्रीमती विद्या चव्हाण यांनी तोच खंड वाचला आहे. ही तरतूद अगदी स्पेसिफिकपणे त्यात समाविष्ट करण्यात आली आहे.

श्रीमती विद्या चव्हाण : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी खंड 12 मधील तरतूद पहावी. त्यात घर, मंदिर, दर्गा, गुरूद्वारा, पॅगोडा, चर्च किंवा इतर प्रार्थनास्थळे याचा उल्लेख आहे.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, मी देखील तेच वाचत आहे.

..2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती विद्या चव्हाण : त्याच्या पुढे असे म्हटले आहे की, अशा ठिकाणी व्यक्तीकडून किंवा व्यवस्थापनांद्वारे शारीरिक व आर्थिक नुकसान न करणारे अशा प्रकारचे केले जाणारे, प्रार्थना व उपासना व सर्व धार्मिक विधी.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, न करणारे म्हणजे करणारे यात आहेत.

श्रीमती विद्या चव्हाण : सभापती महोदय, म्हणजे तेथे एखाद्या महिलेला चाबकाने फोडून काढले तर तो गुन्हा होणार नाही काय ?

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, यात नवरा-बायकोच्या भांडणाचा इथे काय संबंध ? मी घराबद्दल बोलत आहे. आपणाला पटल्याबद्दल धन्यवाद. माझे काय म्हणणे आहे हे आपणाला कळले आहे. करणाऱ्याबद्दल हा क्लॉज लागू आहे. मंदिराच्या संदर्भात आर्थिक नुकसान हा जो विषय आहे तो देखील महत्त्वाचा आहे. या सर्वां वरून एक वाद निश्चित होणार आहे. तो गुन्हा पात्र करण्याकरिता जाणीवपूर्वक प्रयत्न केले जातील, असे मला ठामपणे वाटते आहे. श्री.श्याम मानव यांनी भविष्यात माझा अप्रचार करून छापले तरी ते माझे ठाम मत आहे. हे विधेयकामध्ये असणे म्हणजे पूर्णत: सर्व धर्मांना मारक असणारे आहे. म्हणून या संदर्भात आपण गांभीर्याने विचार करावा. मी जी उप सूचना केली आहे तिचा आपण आदर केला तर फार बरे होईल. सन्माननीय सदस्या श्रीमती विद्याताई चव्हाण यांनी स्वीकारल्याबद्दल मी त्यांना धन्यवाद देतो.

श्रीमती विद्या चव्हाण : सभापती महोदय,......

**तालिका सभापती** : माझी सन्माननीय सदस्या श्रीमती विद्याताई चव्हाण यांना विनंती आहे की, त्यांनी सन्माननीय सदस्यांच्या भाषणामध्ये अडथळा आणू नये.

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, सन्माननीय सदस्या श्रीमती विद्याताई चव्हाण यांनी हरकतीचा मुद्दा उपस्थित केला होता. त्यावर आपण काहीच निर्णय दिलेला नाही. तो आपण द्यावा अशी माझी विनंती आहे.

**तालिका सभापती** : सन्माननीय सदस्या श्रीमती विद्याताई चव्हाण यांची हरकत आपण नोंद करून घेतली आहे. त्यावर सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनीच खुलासा केला आहे.

यानंतर श्री.जुन्नरे...

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी घेतलेली हरकत योग्य होती की, अयोग्य होती यासंदर्भात आपण रुलींग देण्याची आवश्यकता आहे.

**तालिका सभापती ( श्री. रमेश शेंडगे )** : यासंदर्भात मी माझे मत व्यक्त करणार आहे.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, मी सन्माननीय सदस्यांच्या विचाराचे स्वागतच करतो. मी त्यांना माझे म्हणणे पटवून देण्याचा प्रयत्न केला परंतु त्यांना ते पटले नाही तो त्यांचा प्रश्न आहे.

सभापती महोदय, विधी कोठे होतात तर घर, मंदिर, दर्गा, पॅगोडा यांना तुम्ही सूट देणार असाल तर या विधेयकामध्ये मठ आणि आश्रम हे दोन शब्द सुध्दा येणे आवश्यक आहे. साधू-संत मठ आणि आश्रमातच राहतात. त्यामुळे विधेयकात मठ आणि आश्रमांचा उल्लेख होणे फार आवश्यक आहे. तुम्ही विधेयक करणार असाल तर ते व्यवस्थीतच करा. या विधेयकामुळे आपल्याला चाबकाने फोडले जात आहे असे जनतेला वाटता कामा नये.

सभापती महोदय, जादूटोणा विधेयक आपल्याच राज्यात होत असल्यामुळे शाहू,फुले,आंबेडकरांचा महाराष्ट्र आता क्रांती करावयास निघाला आहे अशा अविर्भावामध्ये गेल्या दोन तीन महिन्यापासून चर्चा सुरु आहे परंतु तसे काही नाही. हा कायदा बिहारमध्ये प्रथम अस्तित्वात आला. बिहारमध्ये हा कायदा प्रिव्हेन्शन ऑफ विच प्रॅक्टीस ॲक्ट म्हणून अस्तित्वात आला होता. झारखंड राज्यात हा कायदा ॲन्टी विच क्राफ्ट ॲक्ट या नावाने अस्तित्वात आला. छत्तीसगढमध्ये जास्तीत जास्त आदिवासी असल्यामुळे त्या ठिकाणी मोठया प्रमाणात अंधश्रध्देचा विषय असल्यामुळे त्या ठिकाणीही हा कायदा अस्तित्वात आला. राजस्थानमध्ये हा कायदा अस्तित्वात आलेला आहे. 1999 पासून बिहार मधील जादूटोणा विरोधी कायदा येऊन 15 वर्षाचा काळ लोटला आहे. बिहार मधील संघटना किंवा सरकारी पातळीवर झालेल्या कार्यक्रमामध्ये लोकजागृती केली परंतु या कायद्याच्या अंमलबजावणीची अवस्था पाहून रुरल लिटीगेशन ॲण्ड एन्टायटलमेंट इंस्टिटयूट या संघटनेने सन 2010 मध्ये सुप्रीम कोर्टात धाव घेतली. बिहार, झारखंड किंवा छत्तीसगढ किंवा हा कायदा जेथे जेथे अस्तित्वात आहे तेथे तेथे राज्य सरकारने हा कायदा अंमलात आणण्यासाठी काही ठोस उपाययोजना करावी, मात्र श्री.के.जी.बालकृष्णन, श्री.दीपक शर्मा आणि श्री.टी.एस.ठाकूर यांच्या खंडपीठाने त्यांचा अर्ज फेटाळून लावला. यासंदर्भात सुप्रीम कोर्टाचा जो निर्णय आहे तो मी आपल्या पुढे मांडला.

...2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते.....

सभापती महोदय, या कायद्याच्या संदर्भात या ठिकाणी तळमळीने जे काही बदल सुचवले जात आहे ते हे विधेयक फेटाळले जाऊ नये यासाठी सांगत आहोत. सुप्रीम कोर्टाने चारही राज्यातील कायदे अंमलबजावणी बाबत फेटाळून लावले ते मी मुद्दाम आपल्या निदर्शनास आणीत आहे.

सभापती महोदय, निर्मूलन समितीच्या संदर्भात पोलिसांवर खूपच विश्वास ठेवण्याचे धोरण आता आपण बदलले आहे. या कायद्याच्या संदर्भात एक अँटी चमत्काराचा मुद्दा मांडून मी माझे भाषण पूर्ण करणार आहे. श्री. गिरीष प्रभुणे यांनी "पारधी" हे पुस्तक लिहिले असून ते पुस्तक मी 10 वर्षापूर्वी वाचले होते. या पुस्तकात त्यांनी पारधी समाजाच्या संदर्भातील परंपरा, चालीरिती,धार्मिक विधीच्या संदर्भात सर्व माहिती सविस्तर दिलेली आहे. पारधी समाज हा ठराविक दिवशी एकत्रित येतो त्यासंदर्भात त्यांनी जे म्हटले आहे ते आकलनाच्या पलीकडे आहे. ते योग्य की, अयोग्य हे मला माहीत नाही. त्यातील धार्मिक आणि मांत्रिक शक्ती काय आहेत हे मी सांगू शकणार नाही.

यानंतर श्री.अजित.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

AJIT/ D/ D/ KTG/ पूर्वी श्री.जुन्नरे.. 17:30

श्री.दिवाकर रावते...

तेलामध्ये हाताने पुऱ्या तळायच्या आणि बाहेर काढायच्या असा एक विधी असतो. तो विधी झाल्याचे त्यांनी नमूद केले आहे. त्या घटनेचे त्यांनी चित्रण केलेले आहे. श्री.गिरीष प्रभुणे यांनी असे म्हटलेले आहे की,

"पावसाचा वाढणारा जोर, घोंघावणारं वारं, साऱ्या पालात वरच्या भोकाभोकामधून पाणी पडू लागलं होतं. महादेवराव तशातही जागा पाहून पसरले होते. गाढ झोपी गेले होते. माझी धावपळ चालली होती. प्रत्येक कृती मला पाहायची होती. टिपायची होती. छायाचित्रित करायची होती. ध्वनिमुद्रित करायची होती.

तेलाला आता चांगलीच उकळी फुटली होती. त्या दोघींची सर्व तयारी झाली होती. त्यातल्या एकीनं नाकात मोठी चमकी घातली होती. काळ्या-सावळ्या वर्णाची, घाऱ्या डोळ्यांची, धारदार नाकाची, चमकी घातलेली ती... अंबाबाईचे छोटे रुपच जणू ! चपळाईने सर्व हालचाली करत होती. तिनं एक कणकीची पुरी तयार करुन विश्वनाथच्या हातात दिली. विश्वनाथं तोंडानं काहीतरी पुटपुटत तेलात सोडली. हाताच्या बोटानं चुरचुर करत तळली जाणारी ती पुरी तो खाली-वर करु लागला. एका पाठोपाठ पाच-सहा पुऱ्या त्यानं तळून काढल्या. मी स्तब्ध होऊन पाहात होतो. अंगावर शहारे येत होते. सर्वत्र नि:शब्द शांतता होती. उकळणाऱ्या तेलात आणि पुरीत- हातात एक लयबध्दता आली होती. तेलातून बोट काढताच तो कणकीत बोट खुपसायचा.

त्याचं झाल्यावर धनाजीनं त्याचप्रमाणे केलं. मी त्याचा हात हातात घेतला. चटका बसावा, तसा मी हात सोडला. बोटं पुऱ्या तळून लाललाल झाली होती. पुऱ्या फुगत होत्या. कणीक मळून ती मुलगी पुऱ्या त्याच्या हातात देत होती आणि ते तळत होते. त्याचा हात मात्र जशाच्या तसा शाबूत होता." हे जे काही धार्मिक सामर्थ्य असेल ते मला माहीत नाही.

सभापती महोदय, या विधेयकाच्या माध्यमातून आपण कशावर आघात करतो, कशावर आघात करीत नाही ते सांगायचे असते. हे सर्व मांडत असताना मी भगवद गीतेतील श्लोक येथे नमूद करु इच्छितो.

"बलं बलवतां चाहं कामरागविवर्जितम !
धर्माविरुध्दो भूतेषु कामोऽस्मि भरतर्षम !!

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते...

सभापती महोदय, आमचा विचाराला विरोध नाही. विधेयकाच्या गाभ्याला विरोध नाही. प्रबोधनकारांनी सांगितलेल्या अंधश्रध्देला आमचा विरोध नाही. परंतु तरी सुध्दा हजारो वर्षाच्या धार्मिक परंपरावर आक्रंदन येणार असेल, निर्बंध येणार असतील तर ते जपण्याकरिता अंधश्रध्दा न ठेवता श्रध्दाळू लोकांच्या श्रध्दा सांभाळण्याचे काम प्रामाणिकपणे करण्याचा प्रयत्न केलेला आहे.

सभापती महोदय, माझी प्रकृती समाजजीवनातील आहे. अध्यात्मिक गुरु महर्षी धोंडीराज विनोद हे जागतिक तत्त्वज्ञ होते. त्यांचा अशंतः माझ्यावर प्रभाव आहे. त्यांच्या भावनेतून समाजामध्ये काम करताना जगत असतो.

निघे जिथे जिथे मंद करुनी श्वास तेथे माझा वास असू द्यावा,
उसासे दु:खाचे जेथे वातावरणी तिथे गीतवाणी नमो माझे,
वारुळाची वाट मुंगीस ठावूक हळूहळू एक पाय टाकी,
मी जन्मांतरी माझ्या वारुळात जाईन राऊळा अनंततेच्या,
न्हाहले जरी चित्त माझे मूर्ती अंतरी दिसायची
परित्यक्त, त्रस्त, दु:खार्थ मानव तेवढाच देव मला ठाव
चित्त भलकारे तयाचे चित्र सर्वदा सर्वत्र ध्यान त्याचे
पाहिला प्रसाद त्या क्षणापासून तुझी इच्छा मनी आली नाही
जीविताचे व्हावे लहानसे फूल पूजिले पाऊल तुझे देवा
कालची आजची उद्याची सदाची जात नाही माझी देवराया
नको दिव्य, नको स्वर्ग सुख, नको भक्ती मोक्ष नको मला,
जीवेच्या यातना, विश्वेच्या वेदना, मला भोगू द्या ना देवराया
दीन दु:खीचे अश्रू मी गाळावे आनंदात न्हावे जीवेभावे

एवढे बोलून मी माझे भाषण पूर्ण करतो.

जय हिंद ! जय महाराष्ट्र !

--------

यानंतर श्री.बोर्डे..

अमुद्रित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे (विरोधी पक्ष नेते) : सभापती महोदय, सन 2013 चे वि.स.वि.क्रमांक-35, नरबळी आणि इतर अमानुष, अनिष्ट व अघोरी प्रथा व जादूटोणा यांना प्रतिबंध घालण्याबाबत व त्यांचे समूळ उच्चाटन करण्याबाबतच्या विधेयकावर चर्चा करण्यासाठी मी उभा आहे.

महोदय, हे विधेयक गेल्या अनेक वर्षांपासून विधिमंडळात चर्चेसाठी येत होते. या विधेयकाच्या बाबतीत बैठका होत असत. त्या काळात तत्कालीन सन्माननीय सदस्य डॉ.अशोक मोडक हे आमचे समन्वयक होते. त्यांच्या सदस्य पदाच्या दोन टर्म संपल्या तरी हे विधेयक संमत झाले नाही. आता सन्माननीय सदस्य श्री.चंद्रकांत पाटील हे समन्वयक म्हणून काम करीत आहेत.

महोदय, राज्य शासनाने अंतिमत: हे विधेयक का आणले, कशासाठी आणले, कोणत्या गोष्टी लपविण्यासाठी आणले ? राज्य शासनाने दिनांक 24 ऑगस्ट, 2013 रोजी या संदर्भातील वटहुकूम काढला. मूळच्या विधेयकामध्ये एकूण 27 कलमे होती. परंतु ती कमी कमी होत आता 12 पर्यंत आलेली आहेत. सन्माननीय सदस्य सर्वश्री देवेंद्र फडणवीस, गिरीष बापट आणि मी, अंधश्रध्दा निर्मूलन समितीचे पदाधिकारी नरेंद्र दाभोलकर, श्याम मानव यांच्यासोबत या विषयी वारंवार चर्चा करीत होतो. हे सर्व करीत असताना समाजातील अघोरी मृत्यू थांबले पाहिजेत असे प्रत्येकाचे मत होते. या बाबतीत वेगळे मत असण्याचे कारण नाही. परंतु अंधश्रध्दा निर्मूलनाच्या बाबतीत अशा प्रकारचे विधेयक आणून रोगापेक्षा औषध तर जहाल नाही ना, याची काळजी घेण्याची जबाबदारी स्वाभाविकपणे आमची आहे असे मानून आम्ही काही गोष्टींविषयी आग्रह धरत होतो. आम्ही धरलेला आग्रह अंधश्रध्दा निर्मूलन चळवळीमध्ये काम करणाऱ्यांना पटत होता. त्यांच्या सोबत आम्ही मांडलेल्या प्रत्येक मुद्यावर चर्चा होत होती. समाजामध्ये या वि**धेयका**चा आग्रह धरणारी माणसे जशी फिरतात तसेच आम्ही सुध्दा फिरतो. त्यामुळे या अनुभवातून निदर्शनास येणारे प्रश्न मांडून काही बदलांचा आग्रह धरत होतो.

महोदय, 'श्रध्दा' आणि 'अंधश्रध्दा' या दोन शब्दांमध्ये एक पुसटशी रेषा आहे. सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी आपल्या भाषणात सांगितले की, माननीय मंत्र्यांची एक श्रध्दा आहे. कोणत्याही माणसामध्ये एक शक्ती आहे. त्या शक्तीच्या आधारावर तो काही गोष्टी करण्याचा प्रयत्न करीत असतो.





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे....

महोदय, व्यायाम शाळेच्या ठिकाणी मारुतीची मूर्ती असते. कारण ती शक्तीची देवता आहे. शाळेमध्ये ईशस्तवन, झाले तर सरस्वती पूजन होत असते. शेवटी सामान्य माणसाला कळले पाहिजे की, त्यावेळी अशा काही पध्दती निर्माण केल्या होत्या. त्या सामान्य माणसाला शक्ती किंवा आधार देण्यासाठी केल्या होत्या. त्या पध्दती अघोरीसाठी नव्हत्या. परंतु अशा गोष्टींचा ज्यावेळी अतिरेक होतो, चुकीचा उपयोग केला जातो किंवा अशा प्रवृत्तीची माणसे वाढतात ते घातक असते. मुळात श्रध्देपोटी अशा गोष्टी होतात असे नाही. अशा वेळी समाजामध्ये विज्ञान विषयक शिक्षण नसेल तर उपयोग नाही. संध्याकाळी घराची दारे उघडी ठेवली तर लक्ष्मी येते असे पूर्वीपासून समजले जाते. आज सुध्दा तसे समजले जाते. आपल्याला माहीत आहे की, घराच्या अंगणात तुळशीचे रोपटे लावले जाते. कारण तुळस ही 24 तास ऑक्सीजन देते. संध्याकाळी घराचे दरवाजे उघडे ठेवल्यामुळे तुळशीपासून मिळणारा ऑक्सीजन घरात जावा असे वैज्ञानिक कारण त्या मागे असेल. घराचे दरवाजे उघडे ठेवल्याने खरोखरच लक्ष्मी येते असे नाही. लोकांना काही बाबी सहज सोप्या भाषेत समजाव्यात म्हणून श्रध्देपायी या सर्व गोष्टी केल्या जातात. चातुर्मासमध्ये कांदा खाऊ नये असे सांगितले जाते आणि ही बाब वैद्यकीयदृष्ट्या सिध्द होत आहे.

नंतर श्री.कांबळे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे ....

त्या काळातील वातावरणात अशा वातुळ गोष्टी डायजेशनला खूप जड असतात. आपण त्याला कुठे धर्माचा आधार दिला ? धर्माच्या आधारे केले, बरोबर असेल, चूक असेल, ज्याला पटले त्याने तसे केले. मला वाटते की, अशा सर्व गोष्टी आहेत. शेवटी धर्म आहे, श्रध्दा आहे. धर्म हा वे ऑफ लाईफ आहे, जीवनपध्दती आहे आणि हे सुप्रीम कोर्टाने मान्य केले आहे. सुप्रीम कोर्टाच्या जज्जमेंट आहेत, हिअरिंगच्या वेळी डेलिबरेशन झाली, ती सगळी आपण वाचली तर आपल्याला समजेल. सुप्रीम कोर्ट कन्व्हिन्स झाले की, शेवटी जीवनपध्दती म्हणजेच धर्म आहे. लाईफस्टाईल म्हणता येणार नाही. पण वे ऑफ लिव्हिंग म्हणून धर्माकडे पाहिले पाहिजे. तो धर्म हिंदू आहे. त्यामध्ये असणारी कर्तव्ये, सर्व विषय वेगळे आहेत. मी त्यामध्ये जात नाही. मला विधेयकाच्या अनुषंगाने बोलायचे आहे. ही श्रध्दा आहे. ही श्रध्दाच व्यक्तीला, स्त्रीला ताकद देत असते. एखादी गोष्ट करण्यासाठी श्रध्देमुळे शक्ती मिळत असते. कोणते तरी शक्तीचे स्थान, श्रध्देचे स्थान आपल्या प्रत्येकाच्या आयुष्यात, जीवनात असते.

आपण अनेक वेळा पाहिले आहे की, आपल्या पक्षाचे ज्येष्ठ नेते येतात आणि ते प्रोटोकॉलमध्ये नसतील तर ते त्या प्रोटोकॉलच्या खुर्चीत बसत नाहीत. आपलाही नेता त्याच्या खुर्चीत बसत नाही. तो बाजूला जाऊन बसतो. ही त्या नेत्यापोटीची श्रध्दा असते. हा प्रोटोकॉल असतो, नियम असतो. मी भाजपामध्येच नव्हे तर शिवसेना, राष्ट्रवादी, काँग्रेस या पक्षांत हे पाहिले आहे. आपला शीर्षस्थ नेता प्रोटोकोलमध्ये बसत नसेल आपणही त्या खुर्चीत न बसता बाजूला बसतो. आपण अनेक वेळा असे करतो. मग आपण तसे का करतो, आपण हा प्रोटोकॉल मोडतो का ? कारण आपल्या मनात श्रध्दा असते. चुकीच्या प्रवृत्ती श्रध्देचा लाभ घेणाचा प्रयत्न करतात, श्रध्देला अंधश्रध्देकडे वळविले जाते. मला असे वाटते की, कायदा करताना कोणतीही चुकीची गोष्ट करणार नाही, श्रध्देला धक्का पोहचणार नाही, हे पाहिले पाहिजे. जादूटोणा विधेयक काहीही करून आणायचे अशी काही जणांची श्रध्दा होती, तशी श्रध्दा आपली असता कामा नये. आपण हे विधेयक जनतेचे हित करायचे आहे, या श्रध्देनेच, विचारानेच आणले पाहिजे. आपण सर्व गोष्टी मोकळ्यापणाने मान्य केल्या पाहिजेत. डॉ. दाभोलकर किंवा इतर बाकीची मंडळी काही गोष्टी स्वीकारीत होते. अगोदर माननीय श्री. चंद्रकांत हंडोरे हें या खात्याचे

श्री. विनोद तावडे ....

मंत्री होते. आता श्री. शिवाजीराव मोघे साहेब या खात्याचे मंत्री आहेत. दोघांनीही या विधेयकात अधिक-वजा गोष्टी केल्या आहेत. सर्वात मोठा मुद्दा म्हणजे आम्हाला बाहेर जाऊन लोकांना कन्व्हिन्स करण्याची गरज आहे. कारण आमचा या चौकटीत येणारा फॉलोअर जास्त आहे. आम्ही तसा प्रयत्नही केला आहे. आपल्याकडे पोलिटिकल फॉलोअर, वोट बँक आहे. मते देत आहेत म्हणून ते ऐकतील असे नाही. गेले साडे तीन महिने आमच्या 7-8 मंडळींनी सर्व संघटना, संस्था, समाज यांना भेटून या विषयावर चर्चा केली आहे. शेवटी त्यांचे एक लॉजिकल थिंकिंग असते की, या कायद्यात काही गोष्टी आल्या पाहिजेत. सर्व मंडळी म्हणाले की, इंडियन पिनल कोडमध्ये यातील सर्वच गोष्टी आहेत. त्यावेळी मी म्हटले की, असे काही नाही, त्यातील काही गोष्टी त्यामध्ये असतात.

( नंतर श्री. मा. शिगम ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे...

ते म्हणाले की, या गोष्टी आयपीसीमध्ये आहेत. त्यांनी डीजीला पत्र लिहिले होते. या गोष्टी आयपीसीमध्ये कोठे कोठे आहेत ? त्या पत्राचे त्यांना उत्तर आलेले आहे. या गोष्टींसाठी आयपीसीमध्ये कोणत्या ना कोणत्या कलमाखाली तरतूद आहे. भूत उतरविण्याच्या बहाण्याने एखाद्या व्यक्तीला दोराने किंवा साखळीने बांधून ठेऊन तिला मारहाण करणे, काठीने किंवा चाबकाने मारणे, तिला पादत्राणे भिजवलेले पाणी प्यायला लावणे, मिरचीची धुरी देणे, त्या व्यक्तीला छताला टांगणे, दोरा किंवा केसानी बांधणे याबाबत आरटीआयखाली डीजींना विचारणा करण्यात आली असता त्यांनी जे उत्तर दिले त्यामध्ये म्हटलेले आहे की, कलम 323 इच्छापूर्वक दुखापत, कलम 324 घातक हत्या, 325 इच्छापूर्वक जबरदस्ती, दुखापत, कलम 326, 337, 338, 342, 376 अशी विविध गुन्ह्यासाठी विविध कलमे आयपीसीमध्ये आहेत.

अलौकिक शक्तीची कृपा मिळविण्याच्या हेतूने, ज्यामुळे जीवाला धोका निर्माण होतो किंवा शरीराला जीवघेण्या जखमा होतात अशा अमानुष, अनिष्ट व अघोरी प्रथांचा अवलंब करणे आणि अशा प्रथांचा अवलंब करण्यास इतरांना प्रवृत्त करणे, उत्तेजन देणे किंवा सक्ती करणे या कृत्यासाठी आयपीसीमध्ये कलम 324, 325, 326 खाली शिक्षेची तरतूद आहे.

मौल्यवान वस्तू, गुप्त धन आणि जलस्त्रोत यांचा शोध घेण्याच्या बहाण्याने वा तत्सम कारणाने करणी, भानामती या नावाने कोणत्याही अमानुष, अनिष्ट व अघोरी कृत्यासाठी आयपीसीमधील कलम 302 आणि 304मध्ये शिक्षेची तरतूद आहे. विविध समाजातील मंडळींशी आम्ही चर्चा केली. कुत्रा, साप किंवा विंचू चावल्यास एखाद्या व्यक्तीला वैद्यकीय उपचार घेण्यापासून रोखून किंवा प्रतिबंध करुन त्याऐवजी मंत्रतंत्र, गंडेदोरे किंवा यासारखे उपचार करणे या कृत्यासाठी ड्रग्ज आणि मॅजिक ॲक्टमध्ये तरतूद आहे. अशा सर्व गोष्टींसाठी वेगवेगळया कायद्यामध्ये शिक्षेची तरतूद असताना पुन्हा वेगळया अशा कायद्याची गरज आहे का ? आपण समाजामध्ये वावरताना अनेक गोष्टी पहातो, अनुभवतो. काही भागामध्ये मूल जन्माला आल्यानंतर ठराविक महिन्याचे झाले की त्याला त्या समाजाच्या देवाच्या मंदिराच्या कळसावरुन खाली फेकले जाते आणि खाली झेलले जाते. असे केले की त्याचे आयुष्य सुकर जाते असा समज आहे. या कृत्यासाठी आयपीसीमध्ये तरतूद आहे का ? तर ती नाही. असे सगळे बारकावे काढत त्या समाजातील लोकांशी आम्ही चर्चा केली. जवळ जवळ तीन ते साडेतीन महिने हे काम आम्ही केले.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे...

या गोष्टी चुकीच्या आहेत, त्या थांबण्यासाठी हे काम आम्ही केले. मूल खाली पडून काही झाले तर शिक्षा आहे आणि ते झेलले गेले आणि काही झाले नाही तर शिक्षा नाही. परंतु या कृत्यामध्ये त्या लहान बाळाला जो मानसिक धक्का पोहोचतो तो वरकरणी दिसत नाही. ही प्रथा चुकीची आहे. म्हणून अशा प्रकारच्या कोणकोणत्या गोष्टी या कायद्यामध्ये येऊ शकतात हे वटहुकूम निघाल्यानंतर समजल्यावर समाजातील लोकांना कायद्याची भीती वाटते. ते पॅनिक होतात.

सभापती महोदय, अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे 8-10 वर्षापूर्वीचे कार्य हे विशिष्ट धर्माच्या कृत्यावर बोट ठेवणारे होते. पण नंतर ते चित्र बदलले. या कायद्यामध्ये गंडा, दोरा याचा उल्लेख करण्यात आलेला आहे. मग तावीजचा उल्लेख का केलेला नाही. तीर्थाचा उल्लेख विधेयकात करण्यात आलेला आहे. मग होली वॉटर हा शब्द का नाही. लोकराज्यामध्ये आलेली रेखाचित्रे ही हिंदू बुवाबाजीचीच आलेली आहेत. त्यामुळे हे विधेयक हिंदू धर्माच्या विरुध्द आहे असा समज होतो.

...नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे...

सरकार ज्यावेळी अशा प्रकारचा नाजूक कायदा करते, त्यावेळी बारीक बारीक गोष्टींची काळजी घेतली गेली पाहिजे. ती काळजी कोठे तरी कमी दिसून येते. दिनांक 15 ऑक्टोबर, 2013 रोजी बाबा आदिलशा बंगाली या नावाने "दैनिक सकाळ" या वृत्तपत्रात जाहिरात देण्यात येते. या जाहिरातीमध्ये आजार 100 टक्के बरा होतो अशा प्रकारची ग्वाही देण्यात आली आहे.खरे तर लोकांना भुलथापा देऊन फसविण्याचा हा प्रकार आहे. यासंबंधीचा अध्यादेश निघाल्यानंतर संबंधित व्यक्तीने पोलीस स्टेशनमध्ये त्या बाबांच्या विरोधात तक्रार केली, परंतु पोलिसांनी त्या तक्रारीची दखल घेतली नाही. श्री.दिलीप दिवटे यांनी ,लक्ष्मीपूर,कोल्हापूर येथील पोलीस स्टेशनमध्ये जाऊन रीतसर तक्रार केली. परंतु पोलिसांनी असे ठरविले आहे की, हिंदू धर्मियांच्या बाबतीत अशा प्रकारच्या तक्रारी असतील तर त्यांच्या विरुध्द कारवाई करावयाची आणि इतर समाजाच्या बाबतीत मात्र त्या अनुषंगाने कारवाई करावयाची नाही. पुणे, दापोडी येथे विनियार चर्चच्या बाबतीत अंधश्रध्देच्या बाबतीत पोलिसांनी तक्रार केली. आधी त्यांनी तक्रारच घेतली नाही. फादर हे पवित्र आत्मा आहेत. कॅन्सर, ब्रेन टयूमर, पोटदुखी असे दुर्धर आजार तेलामुळे बरे होतात असा प्रचारही तो करतो. या फादरच्या तेलामुळे खरोखरच फरक पडतो काय, हे बघण्यासाठी श्रीमती उषा फडतरे यांनी तेलाच्या बाटल्या विकत घेतल्या. परंतु त्या तेलामुळे श्रीमती फडतरे यांना काही फरक पडला नाही. ॲड.मनिष ननावरे यांना सोबत घेऊन त्यांनी भोसरी पोलीस स्टेशनमध्ये तक्रार दाखल केली. परंतु भोसरी पोलीस स्टेशनकडून या तक्रारीच्या बाबतीत कोणत्याही प्रकारची कारवाई झ ालेली नाही.

हा अध्यादेश निघाल्यानंतर राज्यात 24 ते 25 ठिकाणी कारवाया झालेल्या आहेत अशा प्रकारची माहिती सन्माननीय सदस्य श्री. भाई जगताप यांनी दिली आहे. परंतु अशा प्रकारच्या तक्रारी नोंदवून सुध्दा संबंधित पोलीस स्टेशनकडून कारवाया झालेल्या नाहीत. त्यामुळे असे वाटू लागते की, या बाबतीत पक्षपातीपणा होतो आहे काय? ठराविक ठिकाणी तक्रार नोंदविली गेली तर त्या अनुषंगाने कारवाई करावयाची, ठराविक समाजात, किंवा धर्मात घटना झाली तर त्या अनुषंगाने कारवाई करावयाची नाही अशी मानसिकता आहे काय असा समज निर्माण झालेला आहे. आम्हाला वारकरी संप्रदायातील लोक येऊन भेटावयाचे. धर्मक्षेत्रात काम करणारी मंडळी आम्हाला येऊन भेटत होती. धारावीमध्ये सगळे आजार बरे करतो अशा लोकांचा मोठा मेळावा घेण्यात आला होता.

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे...

त्या मेळाव्यास जॉनी लिव्हर आणि कॉग्रेसची कार्यकर्ती नगमा यांनी जाहिरात केली की, या ठिकाणी प्रकृती दाखविल्या नंतर बरेचसे दुर्धर आजार बरे होतात. या बाबतीत धारावी पोलीस स्टेशनमध्ये तक्रार करण्यात आली आहे, परंतु त्यांनी कोणत्याही प्रकारची कारवाई केली नाही. हा कायदा ठराविक धर्मासाठीच लागू करावयाचा आहे काय अशी शंका येऊ लागलेली आहे. कायदा हा सर्वांना समान असतो. या कायद्याच्या बाबतीत लोकांमध्ये अशा प्रकारच्या भावना का निर्माण होतात व झालेल्या आहेत याचा सखोलपणे शोध घेतला गेला पाहिजे. आपले लोकराज्य असेल, या बाबतीत पोलिसांकडून होत असलेली कृती पाहिली तर स्वाभाविकपणे सामान्य माणूस जो आपल्या श्रध्देच्या नावाने दोन,चार गोष्टी करीत असतो त्याला अशा गोष्टींच्या बाबतीत शंका येत असते. म्हणून या कायद्याच्या मसुद्यापासून ते प्रेझेंटेशनपर्यंत लोकांमध्ये जागृती करणे गरजेचे आहे.

महोदय, या कायद्यात सुरुवातीला भोंदू शब्द होता. तो काढून तेथे भोंदू वैद्य हा शब्द टाकला जाण्याची गरज आहे. त्यानंतर भोंदू लोक असा सर्वसमावेशक शब्द या कायद्यामध्ये आला. भोंदू बाबा, भोंदू वैद्य यातून आघोरी कृत्य होण्याची शक्यता आहे. भोंदू लोक असा वायडर शब्द टाकला गेला. भोंदू लोक या शब्दामुळे पोलिसांना कोणालाही अडविता येते. अंधश्रध्देच्या माध्यमातून अघोरी कृत्य करणाऱ्या व्यक्तीस भोंदू लोक या शब्दात अडकविता येत असेल तर भोंदू बाबा, भोंदू वैद्य हे शब्द देखील चालले असते. भोंदू लोक शब्दाची खरोखरच गरज होती हा खरा त्यातील महत्वाचा प्रश्न आहे.

महोदय, मी एक मुद्दा मांडणार असून त्यासंबंधी मी दुरुस्ती दिलेली आहे. डॉ.दाभोळकरांची व इतर समविचारांच्या लोकांची भेट झाली. त्यात थर्ड पार्टीच्या तक्रारीची आवश्यकता आहे. कारण त्या कुटुंबातील व्यक्ती हे त्या श्रध्देने आणि अधश्रध्देने भारावलेले असतात. त्यामुळे त्या व्यक्तीच्या कुंटुंबीयांकडून तक्रार करण्यात येत नसते. ही मंडळी तक्रार करीत नाही म्हणून अशा प्रकारची आघोरी कृत्ये येत असतात, त्यामुळे थर्ड पार्टी असली पाहिजे असा आग्रह आग्रह नरेंद्र दाभोळकर आणि त्यांच्या जवळील मंडळीचा होता....

यानंतर श्री. भोगले... ,

अशुद्धित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे....

पण या थर्ड पार्टी तक्रारीच्या आग्रहाचा गैरफायदा घेतला जाऊ शकतो. ज्याप्रमाणे आरटीआय किंवा अॅट्रॉसिटी अॅक्टबाबत काही ठिकाणी कमी जास्त प्रमाणात गैरफायदा घेतला जातो. त्यासाठी माननीय मुख्यमंत्री आणि सामाजिक न्यायमंत्री यांना सांगितले होते. फेसबुकवरील घटनेच्या तक्रारीबाबत अटक न करता आय.जी.दर्जाच्या अधिकाऱ्याकडून त्या संदर्भातील सत्य काय आहे हे समजून मान्यता घ्यायची आणि नंतरच कारवाई करायची असा एक रायडर टाकून करता आले असते, असे मी सुचविले होते. ते मान्यही झाले होते. अंनिस आणि सरकारला मान्य झाले होते. परंतु विधेयकामध्ये का आले नाही हे कळलेले नाही.

सभापती महोदय, अंनिसचे अध्यक्ष, डॉ.दाभोळकरांचे चिरंजीव हमीद दाभोळकर हे मला येऊन भेटले. त्यांनी म्हटले की, तुम्ही दुरुस्तीबाबत आग्रह धरु नका. अन्यथा हे बिल दुरुस्तीसह पुन्हा खालच्या सभागृहात जाईल आणि तिथे मंजूर झाले नाही तर अडचण होईल. सुरुवात होत आहे त्यामुळे दुरुस्तीचा फार आग्रह धरु नका अशी त्यांनी विनंती केली. सामाजिक न्यायमंत्र्यांनी सुध्दा या संदर्भात आमच्या नेत्यांशी बोलून हे बिल पारित करुन अंमलबजावणी सुरु व्हावी, पुढे मागे दुरुस्ती आणण्याचा विचार करु असे सांगितले आहे. अंनिस आणि दाभोळकर कुटुंबीय असा आग्रह धरत असतील तर सध्या तुम्ही दुरुस्तीचा आग्रह धरु नका अशी विनंती केल्यामुळे त्यांचा सन्मान करावा असे स्वाभाविकपणे वाटल्यामुळे या गोष्टीचा आग्रह मी धरीत नाही.

सभापती महोदय, या संदर्भातील काही गोष्टींची लोकांना स्पष्टता होणे गरजेचे आहे. ज्यात चमत्काराची व्याख्या म्हणजे काय किंवा दिव्यशक्ती म्हणजे काय हे स्पष्ट झाले पाहिजे. एखाद्या गावामध्ये एक वैद्य आणि त्याच गावामध्ये रेकी करणारा आहे. तो रेकीवाला पैसे घेऊन लोकांचा आजार बरा करतो. रेकीचा शास्त्रामध्ये समावेश केलेला नाही. परंतु वैद्याचा धंदा बसला त्यामुळे जो रेकी घेऊन बरा झाला त्याच्याविरुध्द तो तक्रार करणार आणि असे वैमनस्य किंवा शत्रुत्व गावातील समाजात इतकी आहेत की त्यांच्या हातात हे नवीन कोलीत तर आपण देत नाही ना याची काळजी ड्राफ्टिंगमध्ये घेण्याची गरज आहे. हा त्यातील आमचा आग्रह राहिलेला आहे.

सभापती महोदय, दक्षता अधिकाऱ्याला अतिरिक्त अधिकार दिले आहेत. तो कुठेही, केव्हाही जाऊन झडती घेऊ शकतो. कोणत्याही सहाय्यकाची मदत घेऊ शकतो. आपल्या

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे....

अधिकाराचा वापर करीत असताना वैयक्तिक शत्रुत्व काढण्याचे प्रकार होऊ शकतात अशी शक्यता व्यक्त केली जाते. दक्षता अधिकाऱ्याने दिलेली तक्रार खरी आहे की नाही हे तपासण्यासाठी दोन-तीन लोकांची एक समिती असली पाहिजे. तक्रार आल्यानंतर तो थेट जाऊन ॲक्शनमध्ये घेऊ शकतो. अशा ॲक्शनमध्ये येण्याचे काम त्याने डायरेक्ट करावे की दोन-तीन लोकांची समिती करुन करावे? अघोरी कृत्य असेल तर ते थांबविले पाहिजे. ते कायद्यानुसार केलेच पाहिजे. ते वगळता या विषयामध्ये प्रथा परंपरा चालली आहे ती थांबविली पाहिजे. ती लगेच आज न करता समितीच्या माध्यमातून करता येईल का याचा विचार केला पाहिजे.

सभापती महोदय, या विधेयकामध्ये अंधश्रध्दा, बळी देण्याचे हजारो प्रकार घडतात असा उल्लेख केलेला आहे. हजारोंच्या संख्येने होतात का? मोठया संख्येने होत असतील. ती संख्या छोटी नाही. आकडेवारी न वापरता खरेच असे प्रकार होत असतील तर आपण अध्यादेश काढल्यानंतर किती केसेस झाल्या? 15 ते 32 वगैरे केसेस झाल्या आहेत. तरी एक गोष्ट खरी आहे की, हे प्रकार थांबले पाहिजेत.

नंतर 3 टी.1...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे....

सभापती महोदय, अमुक धर्मामध्ये आलात तर तुमचे आजार दूर होतील अशा भूलथापा देऊन धर्मांतर करण्याचे प्रकार सुरू आहेत. ते देखील या कायद्यात समाविष्ट करता आले असते. भूलथापा देऊन लोकांना जाणीवपूर्वक धर्मांतर करण्याला भाग पाडले जाते ते देखील या विधेयकामध्ये दाखविण्याची गरज आहे असे मला वाटते. धर्मांतर करताना देखील अंधश्रद्धेचा आधार घेतला जातो. तेव्हा त्यास विरोध करणारी व्यवस्था या कायद्यामध्ये घातली पाहिजे. हे सर्व दाखले देत असताना मी एका गोष्टीकडे आपले लक्ष वेधणार आहे. अशी काही शक्ती आहे की, त्या विषयी संशोधन चालले आहे. ते खरे आहे की खोटे आहे हे मला माहीत नाही. माझा अशा गोष्टींवर विश्वास नाही. काही जण ठामपणे सांगतात की, शास्त्रोक्त पद्धतीने संशोधन चालले आहे. त्या बाबी यामध्ये नाहीत ना ? ती शक्ती म्हणजे श्रद्धा-अंधश्रद्धा नव्हे. पण ती एक सम पॉवर असेल.
यात अघोरी कृत्य असेल तर ते चुकीचे आहे. असे संशोधन वेगवेगळ्या विद्यापीठांमध्ये, मठांमध्ये, आश्रमांमध्ये करण्यात येत आहे. त्यात जर अघोरी काही नसेल, इजा पोहचणारे नसेल तर अशा संशोधनासंबंधी आपली भूमिका काय आहे हे समाजाला कळले पाहिजे. खरे म्हणजे हा कायदा एकमताने पारित व्हावा म्हणून डॉ.नरेंद्र दाभोळकर 17 वर्षे थांबले. विधान सभेत माननीय मुख्यमंत्री, माननीय उप मुख्यमंत्री, माननीय विरोधी पक्ष नेते नसताना घाईघाईने हे विधेयक का पारित करण्यात आले ? यापूर्वी देखील शासनाने विधेयके ठोकून पारित केलेली आहेत. मग हे विधेयक आपणाला आधी पण पारित करता आले असते. खुल्या चर्चेसाठी आपण थांबलो होतो. एवढेच नव्हे तर डॉ.दाभोळकर सुद्धा 17 वर्ष थांबले होते. पुरोगामी महाराष्ट्रामध्ये असे विधेयक पारित होत असताना ते वेगळ्या डिग्नीटीने पारित होणे अपेक्षित होते. ते राज्याला निश्चितच भूषणावह वाटले असते. काही गोष्टी ठोकूनच करावयाच्या असल्याने बहुधा त्या दिवशी तसे झाले असेल. आम्ही सुधारणा दिलेल्या आहेत. त्यासंबंधी आमचे मत योग्य वेळी मांडू. हा अतिशय नाजूक विषय आहे. श्रद्धा-अंधश्रद्धा या विषयातील बायफरकेशन अतिशय धुसर आहे. श्रद्धेचा

..2

श्री.विनोद तावडे....

गैरवापर काही जण अंधश्रद्धेच्या माध्यमातून करतात. तसा या कायद्याचा देखील गैरवापर करण्यात येईल. कायदा बनल्यानंतर पुढच्या डायरेक्टीव्हज बनत असतात. त्याची अंमलबजावणी मग सिस्टीम करते. त्या सिस्टिमपर्यंत सर्व भाग पोहोचणे अत्यंत आवश्यक आहे. ती काळजी हे विधेयक पारित होत असताना सर्वांनी घेतली पाहिजे. काल मला पत्रकारमंडळी म्हणाली की, विधेयक पारित करायचे असल्यामुळे एवढी कशाला चर्चा करत बसता. ज्यावेळी डान्स बार वर चर्चा झाली त्यावेळी याच सभागृहात सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी म्हणाले होते की, आपण फाईव्ह स्टार हॉटेलला एक नियम लावता आणि रेस्टॉरंटला एक नियम लावत आहात. हा नियम घटनेच्या इक्वॅलिटीमध्ये टिकणार नाही. त्याच मुद्यावर सर्वोच्च न्यायालयाने आपला कायदा फेटाळून लावला.

यानंतर श्री.जुन्नरे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे .....

विधेयकाच्या चर्चेच्या निमित्ताने छोटया छोटया गोष्टींचा उल्लेख होत असतो व त्याचा फायदा विधेयकासाठी होत असतो. त्यामुळे यासंदर्भातील सर्व काळजी या विधेयकाच्या निमित्ताने घेणे आवश्यक आहे असे मला वाटते. या विधेयकाचा उद्देश सफल होण्यापर्यंत आपण जाऊ शकतो. कोणाच्याही धार्मिक स्वातंत्र्यावर गदा येणार नाही याची काळजी घेतली गेली पाहिजे. जो धर्माचे आचरण करतो तो अंधश्रध्दा करतो असा माणणारा मोठा समाज आहे. तो समाज स्वत:ला पुरोगामी समजतो. धर्म स्वातंत्र म्हणून जो काही गोष्टी करु इच्छितो त्याची एक श्रध्दा असते आणि त्याला कळणाऱ्या भाषेत तो करीत असतो. त्यामुळे तो जे करतो ते विज्ञानवादी नसल्यामुळे तो प्रतिगामी व आम्ही एकदम पुरोगामी आहोत या थाटात जे चालले असते त्यामुळे अशा बदलांना कधी कधी थोडा ब्रेक लागतो. परंतु त्याऐवजी खुल्या मनाने जे चांगले आहे ते ॲक्सेप्ट करणे, जे वाईट आहे ते दूर करणे महत्वाचे आहे. परंतु मला कोणी तरी पुरोगामी म्हणावे यापेक्षा मला या समाजाचे हित साधावयाचे आहे या मानसिकतेमधून जे काम करतात त्या व्यक्तींच्या अशा मांडण्याने कायद्याचा ॲक्सेप्टन्स अधिक वाढेल असे मला वाटते. त्यामुळे त्या पध्दतीची मानसिकता समाजामध्ये निर्माण व्हावी यासाठी आपण सर्वजण मिळून प्रयत्न करु या एवढेच मी विधेयकाच्या निमित्ताने सांगून मी माझे दोन शब्द पूर्ण करतो.

-------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हेमंत टकले (विधानसभेने निवडलेले) :सभापती महोदय, महाराष्ट्र नरबळी आणि इतर अमानुष,अनिष्ट व अघोरी प्रथा व जादूटोणा यांना प्रतिबंध घालण्याबाबत व त्यांचे समूळ उच्चाटन करण्याबाबत विधेयकाची या सभागृहात चर्चा सुरु आहे. या विधेयकामुळे आपल्या राज्यामध्ये एका मोठया परिवर्तनाच्या चक्राला सुरुवात होणार आहे. या परिवर्तनाच्या मोहिमेमध्ये, या विधेयकाच्या चर्चेच्या निमित्ताने आपण सारेजण सामील होत आहोत. खूप वर्षापूर्वी मी एक इंग्रजी चित्रपट पाहिला होता. चित्रपटाचा आणि जादूटोण्याचा किंवा धर्माचा त्यामध्ये काही एक संबंध नव्हता. या चित्रपटाचे नाव होते "ब्रिज ऑन दि रिव्हर क्वाय." दुसऱ्या महायुध्दात जपानमध्ये प्रिझनर्स ऑफ दि वॉर मध्ये दोस्त राष्ट्रांचे जे सैनिक अडकवले होते त्यांना काही तरी काम द्यावे म्हणून क्वाय नदीवर एक पूल बांधण्याचे काम त्यांना देण्यात आले. ब्रिटीश सेनेतील एक कर्नल प्रिझनर्स ऑफ वॉर मध्ये जेवढे प्रिझनर्स होते त्यांचा प्रमुख म्हणून काम करीत होता. आपण युध्द कैदी आहोत, आपण काम केले पाहिजे, हे काम शत्रू राष्ट्राचे जरी असले तरी ते निष्ठेने केले पाहिजे या भावनेने त्यांनी ब्रिज तयार केला असता त्यांच्याकडे एक निरोप येतो की, तुम्ही जो ब्रिज तयार केलेला आहे त्यावर दोस्त राष्ट्राचे सैनिक छुपा हल्ला करुन तो उध्वस्त करणार आहेत. ज्यावेळेस जपानी सैनिकांची आगगाडी पुलावरुन जाईल त्यावेळेस दोस्त राष्ट्रातील सैनिक हा पूल उध्वस्त करतील असा निरोप होता. युध्द कैदी असलेला ब्रिटीश कर्नल प्रिझनर्सने स्वत: बांधलेल्या रेल्वेच्या पुलावरुन तो येरझरा घालतांना दाखवलेला आहे. या कर्नलच्या तोंडचे एक प्रसिध्द वाक्य असे आहे की, Is it the beginning of the end or is it the end of the beginning? अनिष्ट प्रथा दूर करण्याची जी मोहीम आहे त्या मोहिमेचा अंत करण्यासाठी This is the beginning of that end या उद्देशाने हे विधेयक आज आपल्या समोर चर्चेला आले आहे. या विधेयकावर माननीय विरोधी पक्ष नेते म्हणाले त्या प्रमाणे काही विषय असे आहेत की, ते सारे विषय आपण सर्वांनी उघडया डोळयांनी, आपल्या अवतीभवती जे काही घडत असते त्याची चांगली पारख करुन जे जे अनिष्ठ आहे, जे जे समाज विरोधी आहे त्याला आपण सर्वमिळून विरोध करु शकलो तर एक प्रकारच्या परिवर्तनाची नांदी सुरु होत असतांना आपण सर्व एकत्र आहोत हा महाराष्ट्रातील जनतेला संदेश जाण्याची गरज आहे.

यानंतर श्री.अजित.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हेमंत टकले...

सभापती महोदय, हा कायदा एखाद्या धर्माच्या विरोधात आहे काय असा उल्लेख येथे करण्यात आला. आपल्या देशात आणि राज्यात एका धर्माची सर्वात मोठी संख्या असल्यामुळे अशा प्रकारचा कोणताही कायदा तयार करण्यात येतो त्यावेळेला असे वाटणे साहजिकच आहे. त्याबद्दलची भीती निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

सभापती महोदय, सर्व धर्म यामध्ये हिंदू धर्म देखील आला. हे कशापासून सुरु झाले, कशापासून निर्माण झाले याचा आपण मागोवा घेतला तर आपणास सहजपणे लक्षात येईल की, एक प्रोसेस ऑफ सिव्हीलायझेशन चालू असते. अनादि काळापासून माणूस ज्या पध्दतीने राहत होता. त्यांचे एकत्रिकरण होत होते. समूह म्हणून ते रहायला शिकत होते, गाव वसवत होते, शेती करीत होते. त्यामध्ये एक सुसूत्रता असावी, एक सोशल ऑर्डर असावी, या उद्देशाने या सर्व लोकांना आवडतील अशा गोष्टींतून धागे तयार करुन त्या सर्वांना एकत्रितपणे विणण्याचे काम करण्याची नितांत आवश्यकता होती. आपण कोणत्याही धर्माची पुस्तके वाचा. कोणत्याही धर्माची शिकवण पहा. आपल्या लक्षात येईल की, आपण ज्या गोष्टींना धर्म म्हणून पूज्य मानतो त्या सर्व गोष्टी निसर्गाशी निगडित आहेत. म्हणजे सूत्रच असे सांगते की, धर्म तुम्हाला पंचमहाभूतांची आराधना करायला सांगतो. आपणास एकत्रितपणे पुढे जायचे असेल तर आपल्यापेक्षा या निसर्गामध्ये काहीतरी वेगळे आहे,निसर्ग म्हणजेच देव आहे, त्या निसर्गातूनच आपल्याला सर्व काही मिळत आहे या भावनेतून आपण त्याच्याकडे पाहिले तर आपणास निश्चितपणे त्याबद्दलचा अधिक प्रकारचा एक मागोवा घेता येतो.

सभापती महोदय, येथे अनेक धर्मग्रंथांचा उल्लेख करता येईल. काही परंपरांचा उल्लेख करता येईल. सर्वांना गीतेतील वचन सांगण्याची खूप इच्छा असते. "यदा यदा हि धर्मस्य ग्लानिर्भवती भारत" आता समाजाची अवस्था अशी झालेली आहे. कोणीतरी अवतारी पुरुषा ऐवजी विज्ञानावर आधारित काही तरी नवीन समाजरचना, ज्याच्यामध्ये दोष काढलेले असतील अशी रचना करणारा येतो. गीतेमध्ये सुध्दा हेच सांगितलेले होते.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हेमंत टकले...

सभापती महोदय, आपण नेहमी सांगतो की, रामायण आणि महाभारत हे एका धर्माचे फार महत्वाचे ग्रंथ आहेत. आपणा सर्वांना ते मान्य आहे. आपण या दोन ग्रंथातील फरक पाहायचे ठरविले तर महाभारत आपणास जगायचे कसे हे शिकवते. आपण महाभारतातील अनेक कथा वाचतो त्यातून आपणास हेच दर्शन होते. महाभारतातील दैवताचे आपण वर्णन करतो ती मनुष्य सृष्टीत आली तर ती कशी वागली असती. मी आपणास एक छोटेसे उदाहरण देतो. इरावती कर्वे यांच्या युगान्त पुस्तकातील आहे. आपल्या जीवनाचे वेगवेगळे टप्पे केलेले आहेत. धर्मशास्त्राप्रमाणे शेवटचा टप्पा वाण प्रस्थानाचा असतो. सर्वांना शेवटाला वाण प्रस्थानाकडे कूच करायचे असते. या शेवटच्या प्रवासाला पांडव निघतात त्यांचा प्रवास हिमालयात सुरु असतो, ते वर वर जात आहेत त्यांचे मार्गक्रमण सुरु आहे.

यानंतर श्री.बोर्डे..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हेमंत टकले....

त्यांचे मार्गक्रमण सुरु असताना त्या भागात अधिक ऊन असते. तेव्हा त्या विषयी असे वर्णन करण्यात आलेले आहे की, मार्गक्रमण करीत असताना भीम अशा पध्दतीने चालला आहे की, त्याच्या महाकाय शरीराची सावली ही द्रौपदीवर कायमची राहील. याचाच अर्थ स्त्रीचा अखेरपर्यंत सन्मान करावा हे सांगणारा हा धर्म असतो. यामध्ये कोणतीही अघोरी प्रथा किंवा परंपरा नाही. स्त्रीचा मान राखणारा भाग हा महाभारतातून आपल्या निदर्शनास येतो.

महोदय, हिंदू धर्माच्या बाबतीत बोलून चालणार नाही. 2013 हे वर्ष संपत आले आहे. जगातील सर्वात मोठा देश असलेल्या अमेरिकेतील 'Time' नावाचे साप्ताहिक हे दरवर्षी मासिकाच्या माध्यमातून 'मॅन ऑफ दि इयर' घोषित करीत असते. अमेरिका, रशिया, पाश्चात्य देश, त्यांचे संशोधन, त्यांची वैज्ञानिक शक्ती, त्यांची संहारक शक्ती, त्यांच्या इतर मोहिमा, चंद्रावरील मोहिमा यासाठी पुढे असले तरी, या वर्षी त्या देशातील वाचकांकडून आलेल्या प्रतिसादावरुन या वर्षी मॅन ऑफ दि इयर हे ख्रिश्चन धर्माचे प्रमुख 'पोप' ठरले आहेत. याचाच अर्थ समाज पुढे जात असला तरी तो धर्म आणि पोपला नाकारत नाही. किंबहुना नाकारण्याचे कारण देखील शिल्लक नाही. कारण पोपनी रुढी, परंपरेमध्ये अडकलेल्या ख्रिस्ती धर्माला बाहेर काढण्याचा प्रयत्न केला. अशा प्रकारची परिवर्तनाची दिशा आपल्याला अनेक शतकांपासून जगभर चालत आल्याचे दिसते.

काल या विधेयकावर बोलताना एका सन्माननीय सदस्यांनी सांगितले की, अंधश्रध्दा निर्मूलनाचे विधेयक चर्चेला आणण्यासाठी सरकारने आजचा दिवस मुहूर्त म्हणून शोधला आहे काय ? कारण त्या दिवशी दत्त जयंती होती. दत्त जयंतीच्या मुहूर्तावर हे विधेयक चर्चेसाठी आणले काय अशा पध्दतीची सभागृहात चर्चा झाली.

महोदय, या विधेयकावर बोलताना मी गेल्या वर्षी प्रदर्शित झालेल्या 'देऊळ' या मराठी सिनेमातील एका दृश्याची आठवण करुन देतो. तो सिनेमा आपल्यापैकी किती जणांनी बघितला हे माहीत नाही. त्या सिनेमामध्ये एक गाणे होते. त्या गाण्याचा माध्यमातून प्रसार सुरु झाला, त्यावेळी त्या गाण्यावर अनेक जणांनी आपला विरोध नोंदविला आणि सांगितले की, त्या सिनेमातून ते गाणे वगळावे. देऊळ सिनेमामागील भावना आणि या विधेयकाची सांगड घालण्याचा प्रयत्न केला तर ही सर्व भूमिका समजून घेणे सोपे होईल. त्या सिनेमामध्ये एक दृश्य असे दाखविले आहे की,

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हेमंत टकले....

गावातील एक व्यक्ती आपल्या गुराला चरायला जंगलात घेऊन जाते. दुपारच्या वेळी त्याला थोडीशी विश्रांती हवी असते. तो न्याहारी करण्यासाठी झाडाखाली थांबतो. त्याची गाय बाजूला फिरते. मुळात ती व्यक्ती आपली गाय चरायला नेण्यासाठी त्या ठिकाणी नियमित जायचा. त्याच दरम्यान त्या ठिकाणी जागेचा सर्व्हे करण्यासाठी एक सरकारी चमू जाते. ती चमू परिसराचा सर्व्हे करते आणि आपण कोठपर्यंत सर्व्हे केला हे लक्षात राहावे म्हणून एका झाडावर तीन रेघांची खूण करुन ठेवते. दुसऱ्या दिवशी गुराखी गायीला तेथे घेऊन जातो आणि झाडाखाली झोपतो. त्याची गाय कुरण शोधण्यासाठी त्या भोवती प्रदक्षिणा घालते. गुराखी उठल्यानंतर त्याचे लक्ष प्रदक्षिणा घालणाऱ्या गाईकडे जाते. तितक्यात पुन्हा त्याचे लक्ष झाडावरील तीन रेघांकडे जाते. त्याला झाडावरील तीन रेघा दिसल्यानंतर अचानक काही तरी साक्षात्कार झाल्यासारखे वाटते. त्याला वाटते की, हे दत्ताचे जागृत स्थान आहे. तो गावात येऊन सर्वांना अद्‌भूत चमत्कार आणि फार मोठी स्थित्यंतरे घडणारी गोष्ट सांगतो. त्यावेळी गावातील काही हुशार मंडळी त्याने जी गोष्ट सांगितलेली असते तिचा व्यापार करण्याचे ठरवितात. श्रध्देचा बाजार कसा मांडला जातो, अशा प्रकारचे विदारक चित्र देऊळ सिनेमाच्या माध्यमातून पहावयास मिळते.

नंतर श्री.कांबळे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हेमंत टकले ....

आपण मागे जाऊन कितीही शतकांचा इतिहास पहा. धर्मसत्ता व राजसत्ता यांच्यामधील संघर्ष कायम उभा राहिला आहे. अगदी पाश्चिमात्य परंपरा घ्या किंवा आपल्याकडीलही परंपरा घ्या. धर्माचरणातील अनिष्ट गोष्टी कोणी काढण्याचा प्रयत्न केला आणि धर्मसत्ता जर त्याला थांबवत असेल तर, धर्मसत्तेच्या बाजूने उभे राहणारा एक मोठा समुदाय असतो. त्यावेळी आपल्याला फार मोठा मानसिक आधार लागतो. आपण नेहमी संत वचने, अभंग या सर्वांचा उल्लेख करीत असतो. आपण संत तुकारामांच्या अभंगांचा वारंवार उपयोग करून घेतो. संत तुकाराम म्हणतात की, "वृक्षवल्ली आम्हा सोयरे वनचरे". हा सृष्टीसाठी रचलेला अभंग आहे, निसर्गासाठी रचलेला अभंग आहे. वन खात्यामार्फत मोठ्या प्रमाणात उपक्रम राबविले जातात. आम्ही 1 लाख झाडे लावू, अमुक करू, तमुक करू, असे सांगण्यात येते. पण संत म्हणतात की, "वृक्षवल्ली आम्हा सोयरे वनचरे". धर्माचे आचरण, माणुसकीचे आचरण हेच शिकवत असते. आपल्याला त्या निमित्ताने सोशल ऑर्डर तयार करायची असते. आपल्याला पिचलेल्यांना, बळी पडलेल्यांना वाचवायचे असेल तर अशी काही यंत्रणा आपल्याकडे निश्चितपणे असण्याची आवश्यकता आहे. मी बराच मागोवा घेतला. मी व माझा मित्र गाडीतून जात होतो. मागील सीटवर आम्ही दोघेजण बसलो होतो. कुठेही देऊळ, गुरूद्वारा, मशिद असे काही दिसले की तो आपले हात जोडायचा. सभापती महोदय, ही एक अत्यंत स्वाभाविक प्रवृत्ती आहे. त्यामुळे लगेच काही लाभ होतो, तो अंधश्रध्दाळू आहे, अशातील काहीही भाग नसतो. एक मानसिकता असते की, कुठली तरी अदृश्य शक्ती आपल्या पाठीशी कायम उभी रहावी आणि याच सद्‌भावनेने तो काही गोष्टी स्वत:च्या आचरणात आणत असतो.

सभापती महोदय, आम्ही कॉलेजमध्ये शिकत असताना पहाटे अभ्यासातून उठून पुण्याच्या रस्त्यावर कुठे लक्ष्मी टी हाऊस किंवा अमृततुल्य टी हाऊस शोधण्यास सायकलवरून जायचो. पहाट होत असताना उघडणाऱ्या चहाच्या दुकानात गेल्यानंतर चहावाला आम्हाला 5-10 मिनिटे उभे ठेवायचा आणि पहिला चहाचा कप बाहेर येऊन रस्त्यावर टाकायचा. ही पध्दत कोणाला अपायकारक नाही आणि कोणावर आघात करणारीही नाही. हा कायदा कोणत्याही प्रकारे तुमच्या मनात असलेल्या श्रध्देवर आघात करण्यासाठी आणलेला नाही, हा त्या मागील संदेश आहे आणि





असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हेमंत टकले ....

तो आपण लक्षात घ्यायचा आहे. तुम्हाला इतके समाजावून सांगायचे असेल तर त्यासाठीही माझी जरूर तयारी आहे. मला विरोधी पक्षातील सन्माननीय सदस्यांसारखे लांबलचक बोलायचे आहे, असेही मी म्हणत नाही. मी तशी पुस्तके बरीच आणलेली आहेत. आपण प्रबोधनकारांचा वारंवार उल्लेख करता. काल सन्माननीय सदस्य श्री. भाई जगताप या संदर्भात सांगणार होते. पण तो विषय थांबवला. प्रबोधनकारांचे "ज्वलंत हिंदुत्व" नावाचे पुस्तक आहे. आपल्यापैकी प्रत्येकाच्या संग्रही ते असेल, आपण ते उघडतही असाल, वाचतही असाल, यावर माझी श्रध्दा आहे. खोट्या श्रध्दा, रूढी यांच्या गोत्यात फसलेल्या मराठी जणांची सुटका व्हावी, त्यांच्या स्वाभिमानाचा अंगार फुलावा, तो अत्याचाराला खाक करण्यासाठी भिडावा, याकरिता प्रबोधनकारांनी आपल्यातील सुधारक जागवला. तो वाणी, लेखनी, करणीतून प्रकट झाला. ते वक्ता, पत्रकार नाटककार, इतिहासकार, चरित्रकार, चित्रकार, नाट्य चित्रपट कलाकार, चळवळ्या, आंदोलक अशा विविध भूमिकेत वावरले.

( नंतर श्री. खंदारे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ D/ D/ ST/ पूर्वी श्री.कांबळे 18:25

श्री.हेमंत टकले....

प्रत्येक भूमिकेत त्यांनी सर्वोत्कृष्टतेचे टोक गाठले. पण त्यासाठी त्यांनी खूप सोसले. परंतु कधी सामाजिक अन्यायाच्या विरोधात योग्य त्या भूमिकेनिशी तुटून पडण्याचे व्रत त्यांनी अखेरपर्यंत म्हणजे वयाच्या 89 वर्षापर्यंत सोडले नाही. सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी आत्महत्या केलेल्या राज्यातील शेतकऱ्यांना श्रध्दांजली वाहून आपल्या भाषणाची सुरुवात केली होती. माझ्याही मनात इच्छा उत्पन्न झाली आहे. अशा प्रकारची व्यवस्था नसल्यामुळे, अंधश्रध्देमुळे, जादुटोण्यामुळे, करणीमुळे हजारो लोक बळी पडलेले आहेत, जे नरबळी गेलेले आहेत त्या सर्वांना या विधेयकाच्या निमित्ताने श्रध्दांजली अर्पण केली पाहिजे असे मला वाटते.

श्री.भाई जगताप : सभापती महोदय, माझा पॉईन्ट ऑफ इन्फर्मेशन आहे. मी काल माझ्या भाषणामध्ये प्रबोधनकार ठाकरे यांचा वारंवार उल्लेख केला होता हे खरे आहे. प्रबोधनकारांच्या अनेक पुस्तकांपैकी एका पुस्तकाचा मी दाखला दिला होता. अर्थात सन्माननीय सदस्य श्री.हेमंत टकले यांनी त्यांच्या दुसऱ्या पुस्तकाचा संदर्भ दिला आहे. त्यांनी वाचलेल्या पुस्तकातील विचार खूप मवाळ आहेत, पण दुसऱ्या पुस्तकातील विचार अत्यंत जहाल आहेत. त्या समाजसुधारकांनी आपले व्रत सोडले नव्हते. त्यांची जिवंतपणी प्रेत यात्रा काढली गेली. तरीही त्या समाजसुधारकाने आपले व्रत सोडले नव्हते. त्यांच्या नावाचा वारंवार उल्लेख करणाऱ्यांनी त्यांचा आदर्श ठेवला पाहिजे, सर्व समाजाने, वारसा सांगणाऱ्यांनी तो जपला पाहिजे. खऱ्या अर्थाने समाजाला एक वेगळी दिशा देणाऱ्या या कायद्यासंबंधी बोलत असताना जी काही वक्तव्ये केली ती तितकीशी चांगली नाहीत. हे मी माझ्या वक्तव्यातही सांगितलेले आहे.

श्री.राम पंडागळे : सभापती महोदय, माझा पॉईन्ट ऑफ इन्फर्मेशन आहे. समोरच्या बाकावरील सन्माननीय सदस्यांनी प्रबोधनकार ठाकरे यांच्या नावाचा वारंवार उल्लेख केला आहे तो फार जड अंत:करणाने केलेला आहे एवढेच मी सांगतो.

श्री.भाई जगताप : मी प्रबोधनकारांना समाजसुधारक म्हटलेले आहे. कारण या राज्यात पुरोगामी विचारांचे अनेक नेते आहेत, त्यात त्यांचा वरचा क्रमांक आहे.

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ D/ D/ ST/

श्री.हेमंत टकले : सभापती महोदय, काल पासून सुरु झालेल्या या चर्चेनंतर या सभागृहात परिवर्तनाचे वारे हळूहळू येऊ लागले आहे असे मला जाणवू लागले आहे. त्याचा मी आदराने स्वीकार करुन आपल्याला अधिक चांगला एकोपा कसा निर्माण करता येईल याबाबत मी बोलत आहे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी वारकऱ्यांचा वारंवार उल्लेख केला होता. तो एक पंथ आहे. तो पंथ या राज्यात एक चांगली परंपरा घेऊन पुढे चालला आहे. संत गाडगे महाराज हे आयुष्यभर पंढरीच्या वारीला जात होते. पण गाडगे महाराज पांडुरंगाच्या दर्शनासाठी कधीही आत गेले नाहीत. लोकांनी खराब केलेले चंद्रभागेचे वाळवंट ते साफ करीत असत आणि त्या वाळवंटामध्ये लोकांसमोर स्वत:चे कीर्तन करीत असत.

नंतर श्री.शिगम.......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हेमंत टकले....

लोकांना ते असे विचाराचे की देव पाहिला का देव ? लोकांना आश्चर्य वाटायचे. त्यावेळी ते तितके प्रख्यात नव्हते. हा वेडा माणूस पंढरीच्या वारीला आलेल्या लोकांना विचारतो की देव पाहिला का ? लोक म्हणायचे हो पाहिला जी, गाडगे महाराज म्हणायचे, तुमचा देव कोठे रहातो, लोक मनात म्हणायचे की, याला काहीच कळत नाही. ते म्हणायचे की आमचा देव मंदिरात रहातो त्याचे हात कटीवर आहेत. गाडगे महाराज म्हणायचे, तुमचा देव देवळात रहातो, कमाल आहे. माझा देव माझ्या मनात रहातो. तरी लोकांना काही कळायचे नाही. गाडगे महाराज पुढे असे विचारायचे तुम्हाले देवाले आंधोळ करते की नाही ? लोक म्हणायचे करते जी, गाडगे महाराज विचाराचे तुम्हाले देवाले आंधोळ कोण घालते, लोक म्हणायचे आम्हीच घालतो जी, गाडगे महाराज पुढे म्हणायचे, असा कसा रे तुमचा देव ज्याला स्वत:ची आंघोळ स्वत: करता येत नाही, तो तुम्हाला तुमच्या भाग्याची आंघोळ काय घालणार ? गाडगे महाराजांचा पुढचा पुश्न असायचा की तुम्हाले देवाले कपडे नेसवते की नाही ? लोक म्हणायचे नेसवते जी, गाडगे महाराज म्हणायचे तुम्हाले देवाले कपडे कोण नेसवते ? लोक म्हणायचे, आम्ही नेसवतो जी. अरे तुमचे देवाले स्वत:चे नेसून स्वत: नेसता येत नाही ते तुमच्या भाग्याचे वस्त्रे काय नेसवणार ? ही समाज परिवर्तनाची शिकवण आहे आणि समाजाला अंधश्रद्धेतून बाहेर काढण्यासाठी केलेला हा फार मोठा प्रयत्न आहे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. भाई जगताप यांनी सांगितले की, धर्म प्रत्येकासाठी आहे, तो वेगळा असू शकतो, त्याची धर्मावर श्रद्धा असू शकते, तो धर्म पाळतो, तो धर्म मानतो आणि म्हणून त्यांनी सांगितले की, न्यायपालिकेमध्ये आपण धर्मग्रंथावर हात ठेवून शपथ घेत असतो कारण त्या बाबतीत आपली डोळस श्रद्धा असते. अनिष्ट रुढी, प्रथा यामुळे जी समाजरचना तयार होते आणि त्याचे जे बाजारीकरण होते, ते नष्ट झाले पाहिजे, या कुरुप पध्दती या सुंदर जीवनातून कायमच्या नष्ट व्हाव्यात या दृष्टीने आपण प्रयत्न करीत आहोत. आपण अनेक दुरुस्त्या सुचविलेल्या आहेत. डॉ. नरेंद्र दाभोळकरांना जे अभिप्रेत होते त्यापेक्षा खूप कमी प्रमाणामध्ये आपण हे करण्याची सुरुवात करीत आहोत. यासाठी त्यांनी आयुष्यभर संघर्ष केला, चळवळी उभारल्या, लोकांमध्ये जाऊन प्रबोधन केले.सन्माननीय सदस्यांनी सांगितल्या प्रमाणे त्यांनी त्यांच्या कामावर निष्ठा ठेवलेली होती. त्यामुळे आपल्यावर जे काही संस्कार होतात, जे काही

..2..

श्री. हेमंत टकले....

आपण वाचतो, ऐकतो, अनुभवतो त्यामधून आपल्याला जी शिकवण मिळते त्या शिकवणीला या जादूटोण्याचा, या अमानुष, अनिष्ट आणि अघोरी परंपरांचा अजिबात संबंध नसतो. हा संबंध कायमचा नष्ट व्हावा यादृष्टीने आपण या गोष्टींकडे बघितले पाहिजे.

सभापती महोदय, आमच्या लहानपणी ग्रहण लागणे म्हणजे अपूर्व काही तरी घडते असे समजले जात होते आणि त्यालाही दैवी चमत्काराच्या पातळीवर नेऊन ठेवले जात होते. त्यावेळी असे म्हटले जात होते की, जेव्हा ग्रहण सुरु होते त्यावेळी परातीमध्ये पाणी ठेवून त्यामध्ये मुसळ ठेवले तर ते ग्रहण संपेपर्यंत तसेच्या तसे रहाते. हा प्रयोग अनेकजण करुन बघायचे. कदाचित त्या वेळची पृथ्वीची रचना अशी होत असेल की गुरुत्वाकर्षणाच्या नियमामुळे आणि काही प्रवृत्तीमुळे अशा प्रकारचा चमत्कार झाल्याचा भास त्यावेळी निर्माण होत असे. परंतु तो भास होता. आपण विज्ञानाकडे न जाता फक्त दे दान, सुटे गि-हाण हे लक्षात ठेवतो. जी चुकीची गोष्ट आहे ती आपण कायम लक्षात ठेवण्याचा प्रयत्न करीत असतो. सगळया समाजसुधारकांना समाजपरिवर्तन करताना वेगवेगळया संकटांना सामोरे जावे लागलेले आहे. कारण धर्माच्या नावावर एकत्र झालेली जी समूहशक्ती असते तिच्यामध्ये केव्हांही आणि कुणालाही उद्ध्वस्त करण्याची ताकद निर्माण होत असते. मग हे लोक प्रयत्न सोडतात का ? हे लोक प्रयत्न सोडत नाहीत. प्रसिद्ध तत्ववेत्ता गॅलिलिओ यांनी काही निष्कर्ष मांडले. त्यावेळी गॅलिलिओची सुध्दा वेड्यात गणना करण्यात आली होती.

...नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हेमंत टकले...

आणि त्याला धर्मपीठापुढे उभे राहून जाहीर माफी मागावी लागली होती. तो एक वेडा माणूस आहे, अशा प्रकारची संभावना त्या काळात केली गेलेली होती. श्रध्दा आणि अंधश्रध्देच्या सीमा रेषा खूप अस्पष्ट आहेत. सन्माननीय सदस्स श्री. तावडे यांनी मघाशी सांगितली, ती गोष्ट तर खरीच आहे. असे म्हणतात की, आपल्या संसाराची सुरुवात होते तेथेपासून ते मृत्यूपर्यंत अनेक संस्कार आपल्यावर होत असतात. आपल्या काही शास्त्रग्रंथामध्ये असे सांगितले आहे की, हे योनीचक्र आहे. आपल्याला कित्येक लक्ष योनीमधून प्रवास करत करत पुन्हा जन्मास यावयाचे आहे. यातून तुम्हाला सुटका हवी असेल तर तुम्ही या धर्माचे अशा अशा पध्दतीने आचरण करा हे आपल्यावर बिंबवले जाते. त्याबद्दलची एक कथा फार प्रसिध्द आहे. एक खूप मोठी दैवी शक्ती असणारा महान ऋृषी होता. त्याला कळत होते की, आपला मृत्यू कधी होणार आहे. त्याने घरच्या लोकांना सांगून ठेवलेले होते की, मला या योनीच्या चक्रातून वाचवावयाचे असेल तर मला मृत्यू येण्याच्या अगोदरच तुम्ही माझा शिरच्छेद करा. माझे पुढचे सस्कार करु नका, कारण मला पुन्हा या मनुष्य जन्माला यावयाचे नाही. मला पुन्हा या योनीच्या चक्रात अडकायचे नाही. त्याप्रमाणे ते सगळे होते. त्याचा दृष्टांत खरा ठरतो. त्याचा मृत्यू होतो. त्यांनेच आधी सांगून ठेवलेले असते की, मी मनुष्य म्हणून नाही, कदाचित पुढच्या जन्मामध्ये डुक्कर म्हणून जन्म मिळण्याची शक्यता आहे. त्याप्रमाणे तो डुक्कर म्हणून जन्माला येतो. त्याने सांगितलेले असते की, त्या जीवात मी सापडलो तर त्याची तुम्ही तातडतोब हत्या करा. म्हणजे तेथे हे चक्र थांबेल. घरच्या लोकांना त्याच्या मृत्यूच्या विधीमध्ये तीन ते चार दिवसांचा वेळ उलटून गेला. त्यांनी ओळखले की, आपल्याच घरातील माणून त्या योनीमध्ये जाऊन डुक्कर झालेला आहे. त्याच्या कुटुंबीयांनी त्याला मारावयाचे ठरविले तेव्हा त्याने सांगितले की, तुम्ही आता मला मारु नका. मी दोन-तीन दिवस डुक्कराचे जीवन जगलेलो आहे आणि मला ते जगावेसे वाटावयास लागले आहे. संस्कारांनी आपण इतक्या झापडपट्टया बांधून घेऊ शकतो अशा प्रकारची अनेक उदाहरणे आपल्यासमोर येतील.

सभापती महोदय, ज्ञानेश्वरी या ग्रंथांचा अनेक सन्माननीय सदस्यांनी उल्लेख केला. ज्ञानेश्वरीने काय केले. जे संस्कृतात अडकलेले होते, ते प्राकृतात आणले. ते सामान्य माणसांना समजावे, त्याचा अन्वयार्थ अतिशय चांगल्या पध्दतीने लावून आपल्या आचरणात आणावे, यामुळे तो धर्मग्रंथ हा एका वेगळया प्रकाराने जपला गेला. आजही आपण आळंदीला गेलात तर

2....



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हेमंत टकले....

ज्ञानेश्वरीची प्रत भिंतीवर सुवर्णाक्षरात लावलेली आहे. हे असे होते, त्यास कारण असे आहे की, जे आपल्याला समजण्यासाठी अवघड होते, काही मुठभरांची स्वत:ची अशी जी काही दुकानदारी धर्माच्या नावावर सुरु होती त्याला कोठे तरी पायबंद घालण्यासाठी हा एक प्रयोग त्यावेळी संत ज्ञानेश्वरांनी केला आणि त्यामधून समाज प्रबोधन झाले, अशा प्रकारची गोष्ट आपल्याला निश्चितपणे लक्षात येते.

सभापती महोदय, इंडियन पीनल कोड आहे, इतर कायदे आहेत, तरी देखील आपल्याला अशा प्रकारचा कायदा का करावा लागला. या चळवळीचा रेटा आला, दाभोळकरांचे मारेकरी सापडत नाहीत. दाभोळकरांसाठी आपण हा कायदा आणला काय, श्याम मानवांसाठी हा कायदा आणला काय, त्यांनीच तयार करुन दिलेल्या मसुद्यावरुन हा कायदा करण्यात आला आहे काय, अशी शंका घेतली गेली. चळवळीच्या माध्यमातून बांधिलकी असेल, त्यांनी त्या चळवळींच्या अनुभवातून आणि आपल्या संघर्षातून ते काही निष्कर्षाप्रत आले असतील तर त्यामधील चांगले जे आहे, त्या गोष्टींचा कायदा करताना स्वीकार केला असेल तर त्याबद्दल सरकारचे मला मनापासून अभिनंदन करावयाचे आहे. कारण ही सुरुवात होण्यासाठी कोठे तरी चांगले पाऊल उचलणे गरजेचे आहे. सन्माननीय सदस्य श्री. रावते यांनी इतर खात्यांच्या बाबतीत शब्द वापरला. तो शब्द थोडा अवघड आहे. कृषी आणि पणन खात्या संदर्भात "निरंक"असे म्हणाले. निरंक हा शब्दाचा अर्थ काय हे मराठीतच आपल्याला विचारलेले आहे.

यानंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ D/ ST/ 18:40

श्री.हेमंत टकले....

त्याला मराठीमध्ये पर्यायी शब्द 'काही नाही' हा आहे. कृषी व पणन खात्याला काही म्हणावयाचे नाही असा त्याचा अर्थ आपण काढला.

श्री.दिवाकर रावते : मूळ नस्ती त्या विभागाची आहे. त्यांनी कोणाकोणाला काय पाठविले ते त्यांनी म्हटले आहे. मी म्हटलेले नाही.

श्री.हेमंत टकले : त्यांनी का म्हटले मला माहिती नाही. परंतु आपले स्पष्टीकरण मला अधिक मान्य होत आहे. त्यातून स्पष्ट खुलासा बाहेर येतो आणि जवळीक वाटते. आपल्या भाषणाचा सूर आणि नूर खूप बदललेला आहे हे वारंवार जाणवते, त्याबद्दल मला निश्चितपणे या ठिकाणी समाधान व्यक्त करावेसे वाटते.

सभापती महोदय, मी मोठ्या धाडसाने बोलत आहे. धर्म हा सुधारणेच्या आड येतो त्यावेळेला सर्व समाज सुधारकांना फार मोठया त्रासातून जाण्याचा इतिहास बघावयास मिळतो. त्यावेळेला ज्योतिबा फुले जो सामाजिक बदल घडवू इच्छित होते तो बदल न रुचणारा, पटणारा नव्हता. त्या काळात स्त्रियांना शिक्षण देणे त्यांनी सुरु केले. पुण्यामध्ये लग्न झालेल्या स्त्री पुरुषांपैकी स्त्रीने आपल्या पतीबरोबर चालण्यास सुध्दा परवानगी नव्हती. घरातील पुरुष चपला घालून बाहेर जात असेल तर तिने पायात काहीही न घालता चालायचे अशी अनिष्ट परंपरा होती. त्या काळात महात्मा फुल्यांनी पत्नीच्या सहाय्याने मुलींसाठी शाळा सुरु करणे हे खूप मोठे परिवर्तन होते. त्यामुळे त्यांनाही विरोध झाला. चिखलफेक झाली. त्यांनी तो नाद केव्हाही सोडला नाही. म्हणून तर कवि कुसुमाग्रज त्याबद्दल म्हणतात की,

जेव्हा ज्योतिराव चंद्र सूर्य मावळतात
तेव्हा या धनांग काळोखात काजव्यांनाही प्रकाशदाते म्हणावे लागते.
तुमच्या हातातला आसूड असा क्रोधाने उगारु नका
तुमचे सारे सत्यशोधन गावागावातल्या भिंतींवरती
कोळीष्टकासारखं चढून बसलं आहे
मान्य आहे जातियतेवरचा पहिला वज्र फूल प्रहार करणारं तुमचं महर्षि पद
आम्ही माळ्यांच्या जमातीत रेजलं आहे.

...2...

श्री.हेमंत टकले....

आपली महापुरुषांबद्दलची संकल्पना ही अशाप्रकारे जर चुकीची ठरणार असेल तर या समाजाला काहीतरी शिकविण्याची जबाबदारी केवळ सरकारची, कायद्याची किंवा पोलिसांची नसून आपल्या सगळ्यांनी एकत्रितपणे येऊन काहीतरी नवीन करण्याची जबाबदारी आहे. म्हणून मी सुरुवातीला म्हटले की, "This is the beginning of the end of the very disastrous social order that could be set in if this is not stopped in good time and at right time." त्यासाठीच या सगळयाची आवश्यकता असते. त्यामुळे आपण हे जे करीत आहोत हा एक माणुसकीचा यज्ञ आहे. यज्ञाची उपमा कदाचित अधिक जवळची वाटते. या यज्ञामध्ये आपलाही सहभाग यशस्वीतेसाठी असणे आवश्यक आहे. हा कायदा एकमताने पास होण्याची आम्हा सगळ्यांची मनापासून इच्छा आहे. तुमच्याकडून सहकार्य आम्हाला निश्चितपणे अपेक्षित आहे. म्हणून ज्ञानेश्वरांनी पसायदानामध्ये मागितले आहे,

आता विश्वात्मके देवे येणे वाग्यज्ञे तोषावे
तोषोनि मज द्यावे पसायदान हे
दूरितांचे तिमीर जावो विश्वस्य स्वधर्मे सूर्ये पाहो
जो जे वाच्छिल तो ते लाहो प्राणीजात.

या कायद्याची आवश्यकता आपल्याला पटलेली आहे.

डॉ.दीपक सावंत : हा कायदा पटवून देण्याचा आपण दुर्दैवी प्रयत्न करीत आहात.

नंतर 4सी.1...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हेमंत टकले : सभापती महोदय, श्री.दिवाकर रावते साहेब या डिबेटचा पहिला नियम असा आहे की, आपल्यात जे मतभेद आहेत ते कमी कसे करता येतील. यासाठीच आपण आपापसातील विचारांची देवाणघेवाण करीत असतो. आपण देखील या विधेयकाच्या कलमांमधून चुकीचे अर्थ निघू शकतील किंवा त्याचा दुरूपयोग होऊ शकतो याची काळजी घेण्याची सूचना केली आहे. मला वाटते की हा आपला मोठेपणा आहे, असे मी म्हटले तर ते वावगे ठरू नये. मी या कायद्याचे समर्थन करीत आहे. आपणा सर्वांचीच खरोखर इच्छा आहे की, हे विधेयक एकमताने पारित व्हावे. हे विधेयक ऐतिहासिक आहे. या विधेयकाला ऐतिहासिक म्हटले की, पुन्हा वेगळा वास यायला नको. विज्ञानाधिष्ठित समाजनिर्मितीसाठी डॉ.नरेंद्र दाभोळकर सारख्या माणसाने केलेले कार्य समाजामध्ये अधिक चांगल्या प्रकारे जावे, समाजातील अनिष्ट रूढी, परंपरा नष्ट व्हाव्यात या दृष्टीने शासनाने टाकलेले हे एक दमदार पाऊल आहे. आपण देखील आमच्या या वारीमध्ये सहभागी व्हावे आणि समाजाचे कल्याण करण्याच्या कार्यक्रमामध्ये आपण सर्वजण एकत्र नांदू या अशा प्रकारची विनंती करतो. या विधेयकाला मनापासून समर्थन देतो आणि येथेच थांबतो.

.........

..2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.हेमंत टकले यांनी या यज्ञामध्ये सर्वांनी सहभागी व्हावे असे म्हटले. योगायोगाने या यज्ञात पोलीस खात्याने सहभागी झाले पाहिजे. आज गृह विभागाकडे पुरेसे पोलीस बळ आहे काय ? आता जे पोलीस बळ आहे त्यांना हा नाजूक विषय हाताळता येणार आहे काय ? नेहमी आम्ही माननीय गृह मंत्र्यांचे उत्तर ऐकतो की, आमच्याकडे पोलीस बळ कमी आहे.

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी यज्ञामध्ये पोलिसांनी सहभागी व्हावे असे म्हटले आहे. या यज्ञाची पूर्ण जबाबदारी पोलीस घेण्यास तयार आहेत. एक छोटी बातमी आहे. यासंबंधी कालच निर्णय झालेला आहे. कॅबिनेट उशिरा झाल्याने आम्ही निर्णय घोषित करू शकलो नाही. ती संधी आता मला मिळत आहे. कालच 61494 नवीन पदे निर्माण करण्याचा निर्णय महाराष्ट्र सरकारने घेतला आहे. त्यातील साडेबारा हजार पदे या वर्षी पहिल्या टप्प्यामध्ये भरली जाणार आहेत. राज्यामध्ये नवीन 122 पोलीस ठाणी स्थापन करण्यात येणार आहेत. 384 कंट्रोल रूम्स तयार केल्या जाणार आहेत. हरवलेली मुले, महिला यांच्या कक्षासाठी सात हजार पोलीस महाराष्ट्रात भरले जाणार आहे. सहा हजार पोलीस वाहतूक शाखेसाठी भरले जाणार आहेत. हा कायदा ज्यावेळी होईल त्यावेळी 100 टक्के त्याची अंमलबजावणी करण्यात येईल. तेथे जाण्यासाठी पोलीस नाहीत ही तक्रार येऊ देणार नाही. याची जबाबदारी आम्ही पूर्णपणे प्राधान्याये घेऊ. त्यामुळे आपण काळजी करण्याचे कारण नाही.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, माननीय गृहमंत्र्यांनी आताच पदे भरण्यासंबंधातील घोषणा सभागृहात केली आहे. सातत्याने अशी मागणी करण्यात येत आहे की, पोलीस दलातील कर्मचाऱ्यांच्या मुलांसाठी भंरतीमध्ये 10 टक्के पदांचे आरक्षण असावे. अशी काही तरतूद आपण केली आहे काय किंवा करणार आहात काय ?

..3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, यासंबंधी राज्यातील सर्व पोलिसांची तीव्र मागणी आहे. आपण आपल्या राज्यात पोलीस भरतीमध्ये माजी सैनिकांसाठी आरक्षण ठेवतो. पण वयामध्ये ते बसत नसल्यामुळे ती पदे भरली जात नाहीत. अपंगांसाठी देखील आरक्षण आहे. ते निकषात बसत नाहीत. त्यामुळे ती पदे भरले जात नाही. अशा प्रकारे आमच्या कडे राखीव पदे मोठ्या प्रमाणावर भरली जात नाहीत. पोलिसांच्या मुलांसाठी पोलीस भरतीमध्ये 10 टक्के पदे राखीव असली पाहिजेत अशी गृह मंत्री म्हणून माझी देखील भूमिका आहे. त्यास माझ्या विभागाने मान्यता दिलेली आहे. सामान्य प्रशासन विभाग हा प्रस्ताव तपासून पहात आहे. लवकरच यासंबंधातील निर्णय घेतला जाईल. पोलीस भरतीमध्ये पोलीस कर्मचाऱ्यांच्या मुलांसाठी किमान पाच टक्के पदे तरी भरली जातील.

यानंतर श्री.जुन्नरे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.सुरेश नवले (नामनियुक्त) : सभापती महोदय, सन 2013 चे वि.स.वि.क्रमांक 35 वर बोलण्यासाठी मी उभा आहे. आदरणीय सभापती महोदय, या अध्यादेशाचे रुपांतर कायद्यामध्ये व्हावे आणि महाराष्ट्रातील सामाजिक रुढी परंवरेचे गढूळ वातावरण निर्मळ व्हावे ही महाराष्ट्रातील समाज धुरिणांची इच्छा, भावना, आकांक्षा आहे. महाराष्ट्राचे माननीय मुख्यमंत्री, सामाजिक न्याय मंत्री व संपूर्ण मंत्री मंडळाने परिवर्तनाच्या दिशेने एक क्रांतिकारक पाऊल टाकल्यामुळे मी त्यांना मनापासून धन्यवाद देतो. महाराष्ट्रामध्ये अफवांचे पीक पसरवून महाराष्ट्रातील वारकऱ्यांमध्ये संभ्रम निर्माण करण्याचा प्रयत्न राजकारणातील कोणत्या शक्ती करीत आहेत हे महाराष्ट्रातील जनतेला माहीत आहे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या जयंतीमध्ये राजकारण करणारे काही लोक आहेत. (अडथळा) मी तर असे म्हणेन की, प्रबोधनकार ठाकरे नंतर नव प्रबोधनकार डॉ.नरेंद्र दाभोळकर महाराष्ट्राला लाभले आहेत. हिंदू धर्मावर प्रचंड असा डोंगर कोसळलेला आहे असे भासविले जात आहे. माझी सर्व हिंदूत्ववाद्यांना विनंती आहे की, हिंदू धर्मातील पालापाचोळा जाळण्याचा प्रयत्न आपण प्रामाणिकपणे केला पाहिजे. स्वातंत्र्यवीर सावरकर हे राष्ट्रभक्त, या देशावर प्रेम करणारे आणि अंदमान कारागृहामध्ये आयुष्य घालवणारे स्वातंत्र्य सैनिक, स्वातंत्र्यवीर, राष्ट्रनिष्ठ होते त्यांचे आपल्या हिंदू धर्माबद्दल काय मत होते ते मी या ठिकाणी वाचून दाखवणार आहे. हे वाचून दाखवल्यानंतर आपल्या डोळयात झणझणीत अंजन घातल्यासारखे होईल.

"तीच गोष्ट लाख दुर्वांची, तास तासभर परडयातून, खिंडारातून गवताची एक एक काडी खुडत वेळ गमवायचा आणि तो भार गणपतीच्या डोक्यावर द्यावयाचा.

यानंतर श्री.अजित.....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.सुरेश नवले...

पुढे त्यांनी असे म्हटले आहे की, त्या भाराखाली गणपतीची मूर्ती गुदमरुन जाते." महाराष्ट्रामध्ये जी भोंदूगिरी आहे, ज्या अघोरी प्रथा आहेत त्या नष्ट करण्यासाठी, गणपतीला दूध पाजणारे आणि तसे जाहीर करणाऱ्यांचे वस्त्रहरण करण्यासाठी अध्यादेशाचे रुपांतर कायद्यामध्ये व्हावे असा प्रयत्न करणारे हे राज्य आहे.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य विधेयकातील कोणत्या तरतुदीवर बोलत आहेत ? मी विधेयकाच्या कलमावर आधारित बाबी वाचून दाखविल्या होत्या.

प्रा.सुरेश नवले : सभापती महोदय, महाराष्ट्र नरबळी आणि इतर अमानुष, अनिष्ट अघोरी प्रथा व जादूटोणा प्रतिबंध या विधेयकातील खंड 2 वर मी बोलत आहे. मी सर्व विधेयक वाचलेले आहे. न वाचता बोलण्याची सवय मला नाही. प्राचार्यांचा मी विद्यार्थी आहे. जे कसदार आहे, ज्यामध्ये कस आहे ते वाचावे ही शिकवण आम्हाला गुरुंनी दिलेली आहे. स्वातंत्र्यवीर सावरकरांनी पुढे काय म्हटले आहे ते वाचतो " गणपती गवत का खातो ? असे सांगणारे सावरकर आपणाला परवडणार आहेत काय ? गणपती गवत का खातो ? गवताचा भार वाहायचा तर तो गाईला वाहा. स्वातंत्र्यवीर सावरकरांचे विज्ञानवादी विचार आहेत. त्या विचारांवर प्रेम करणारा मी कार्यकर्ता आहे. देवळात जाणे हा श्रध्देचा भाग आहे. आम्ही अंदमान येथील कारागृहास भेट दिली त्यावेळी सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी स्वातंत्र्यवीर सावरकर ज्या खोलीमध्ये राहिले होते त्या खोलीच्या बाहेर आपले जोडे बाहेर काढून त्या खोलीचे दर्शन घेतले. आपणास सावरकरांचे विचार पटणार आहेत काय ? सावरकरांनी पुढे असे म्हटले आहे की, गवत खाऊन गाय प्रसन्न होईल आणि दूध देईल हा सर्व भ्रम आहे. चंद्र, सूर्य, शनि, मंगळ हे ज्योतिर्गोल नसून देव आहेत मनुष्याच्या स्तुतीने ते प्रसन्न होतात आणि निंदेने संतापतात अशी पूर्वी जगभर समजूत होती. पण आता प्रयोगाने सिध्द झालेले आहे की, हे ज्योतिर्गोल निर्जीव पदार्थ असून त्यांची गती व स्थिती गणिताच्या कठोर नियमांनी होत असते. त्यांच्या प्रकाशाचे आणि घर्षणाचे मनुष्यावर होणारे परिणाम हे मनुष्याच्या स्तुतीनिंदेने, दगडास तेल, शेंदूर फासल्याने, शनिवार, रविवार उपाशी राहिल्याने, एखाद्या पोथीच्या पारायणाने लेशमात्र बदलू शकत नाही.

प्रा.सुरेश नवले...

सभापती महोदय, आदरणीय शिवसेना प्रमुखांचे पिताश्री प्रबोधनकार ठाकरे हे महाराष्ट्रातील समाजसुधारक, आपल्या बुलुंद वाणीने महाराष्ट्रामध्ये जागरुकता आणणारे, गाडगे महाराजांवर त्यांनी लेख लिहिले. आजवरच्या अनेक साधुसंतांनी देवदेवता,धर्म, व्रते, तीर्थयात्रा यांचे प्रचंड बंड माजवून लोकांना खुळे आणि धर्मवेडे बनविले. मोक्षाच्या भरमसाठ कल्पनांनी कोटी कोटी अडाणी स्त्री पुरुषांना संसारातून उठवून भिकेला लावले त्यांच्यासाठी हे विधेयक आहे. अशा लोकांना तुरुंगाची वारी घडावी आणि अशिक्षितांची त्यांच्यापासून मुक्तता व्हावी म्हणून हे विधेयक आणले आहे आणि त्या विधेयकावर मी बोलत आहे.

यानंतर श्री.बोर्डे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SJB/ D/ ST/ KTG/ पूर्वी श्री.अजित.... 19:00

प्रा.सुरेश नवले....

प्रबोधनकार ठाकरे पुढे असे म्हणतात की, " मोक्षाच्या भरमसाठ कल्पनांनी कोटीकोटी अडाणी स्त्री पुरुषांना संसारातून उठवून भिकेला लावले, दगड, माती, धातूंच्या मूर्तीचे भजन पूजनाचे लोकांना वेड लावून त्यांना माणसांतून उठवले. माणुसकीला पारखे कले. माणसांपेक्षा दगड धोंडेच भाग्यवान ठरले. अन्न-अस्तर-आसऱ्याला आंचवलेल्या माणसांसाठी त्यांची तरतूद करण्याऐवजी, देव देवळांच्या उभारणीसाठी आणि ऐदी-बैरागी, गोसावी, भट, भिक्षुकांना निष्कारण पोसण्यासाठी अब्जावधी रुपयांची खैरात चालू झाली. माणसांपेक्षा फत्तरी देवदेवतांची आणि त्या परान्नपुष्टांची प्रतिष्ठा वाढली. तिरस्करणीय बुवाबाजीचा जन्म येथेच झाला." अशा प्रकारे समाजातील बुवाबाजीवर प्रबोधनकार ठाकरे यांनी प्रचंड प्रहार केला आहे.

महोदय, नरहर कुरुंदकर हे एक विचारवंत आहेत. त्यांनी आपल्या वाणीने संपूर्ण महाराष्ट्राला प्रभावित केले आहे. नांदेड येथील महाविद्यालयात ते प्राध्यापक होते, त्यानंतर ते प्राचार्य झाले. चमत्काराच्या विषयी ते असे म्हणतात की, "एखाद्या वर्षी पाऊस न पडल्यामुळे प्रचंड दुष्काळ असतो. अशा वेळी पाण्याशिवाय माणसे तडफडून मरण्याची वेळ असते. कुणाही साधुसंताने दुष्काळग्रस्त प्रदेशात जाऊन आपल्या सिद्धीच्या जोरावर कोरड्या विहिरी पाण्याने भरुन दिल्याचा दाखला नाही. अति पावसामुळे पिके वाहून जातात, कोणत्याही संताने अशा वेळेला येऊन पाऊस थांबविल्याची उदाहरणे नाहीत, किंवा पिकेही वाचविलेली दिसत नाहीत. असल्या प्रकारच्या चमत्काराच्या नोंदी पुराणातच आढळतात. वर्तमानकाळात अशा कोणत्याही नोंदी दिसत नाहीत. कधी या चमत्कार करणाऱ्या मंडळींनी आपले सामर्थ्य समाजाच्या अगर देशाच्या कल्याणासाठी वापरलेले आढळून येत नाही. कारण त्यांच्याजवळ असे कुठलेही सामर्थ्य नसते. म्हणून अशा भोंदूंच्या नादी लागण्यात व्यक्तींचा किंवा समाजाचा कुठलाही फायदा नसतो. तसेच हे खरे धर्माचरणही नव्हे." अशा प्रकारे या ठिकाणी अनेक विचारवंतांचे विचार सांगता येतील. परंतु प्रबोधनकार ठाकरे, स्वातंत्र्यवीर सावरकर आणि नरहरी कुरुंदकर या विचारवंतांचा मी केलेला उल्लेख पुरेसा आहे असे मला वाटते. महाराष्ट्राला आपल्या विचारांनी प्रभावित करणाऱ्या या व्यक्ती आहेत. एका अर्थाने राष्ट्रप्रेम वाढविणारे, राष्ट्राची एकता, अखंडता, अभंगता कायम ठेवण्यासाठी आपापल्या परीने प्रयत्न करणारे ते राष्ट्रपुरुष होते.





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SJB/ D/ ST/ KTG/ पूर्वी श्री.अजित.... 19:00

प्रा.सुरेश नवले....

**(सभापतीस्थानी तालिका सभापती श्री.मोहन जोशी)**

सभापती महोदय, आज स्वातंत्र्यवीर सावरकर असते तर त्यांनी सन्माननीय सदस्यांना सांगितले असते की, या विधेयकाच्या बाबतीत विरोधकांकडून जो तर्कहीन आणि निरर्थक विरोध सुरु केला आहे, तो काढून टाका. महोदय, समाजातील वाटमारी करणारे हे भोंदू आहेत. समाजाच्या भावनांशी खेळणारे हे मम्माजी आहेत.

"मठो मठी मम्माजींना कीर्तने करु द्या
विठू का बेईमानांना पावणार आहे ?"

अशा बेईमानांच्या नादी आपण लागतो हे दुर्दैव आहे. महोदय, शाहीर संभाजी भगत काय म्हणतात,

"आले आले हो, आगलावे,
आग विझवाया,
राख-राख झाली, मढे सजवाया,
सुभेदाराच्या सुनेचा, काळ शिवाचा होता बाई,
आणि आज नाक्या नाक्यावर उभे भाई"

नंतर श्री.कांबळे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. सुरेश नवले ....

भाई म्हणजे भोंदू. भोंदू या अर्थाने होते आहे. आपण सन्माननीय सदस्यांना भाई म्हणतो, बंधू या अर्थाने ते भाई आहेत. भाई या शब्दाचा अन्वयार्थ भोंदू आहे. माझ्या मनात कधी कधी शंका निर्माण होते की, 50 वर्षांनतर मंगळावर मनुष्यप्राणी गेला तर हे भोंदू तेथे देखील येतील. भोळया-भाबड्या लोकांच्या भावनेशी खेळून त्यांचे शोषण करणारी समाजामधील ही विकृती नष्ट करण्यासाठी हे विधेयक आहे.

संत तुकाराम महाराज म्हणतात की, "नवसा सायासे पोरे होती, का करावा लागतो पती." हा विज्ञानवादी रोकडा संत होता.

"अंतरी निर्मळ, वाचेचा रसाळ, त्याच्या गळा माळा असो नसो, आत्मा, अनुभवे चोखाळील्या वाटा, त्याच्या माथा जटा असो नसो, परे निंदेशी जो मुखा, तोचि संत देखा, तुका म्हणे"

सभापती महोदय, आमच्या कोणत्या वारकऱ्यांच्या मनामध्ये संभ्रम आहे ? 99.99 टक्के वारकऱ्यांच्या मनामध्ये कोणतीही शंका नाही. पण जे पोटार्थी आहेत, ज्यांना पांडुरंगाच्या नावाने स्वत:चे कुटुंब चालवायचे आहे, असे लोक समाजात बुध्दीभ्रंश, बुध्दीभेद करून स्वत:चा उदारनिर्वाह चालविण्यासाठी विधेयकाला विरोध करीत आहेत. मी अनेक वारकऱ्यांशी चर्चा केली आहे. आपण फडकरी वगैरे काही सांगितले. मी वारकरी संप्रदायाचे राष्ट्रीय अध्यक्ष बोदले महाराजांशी चर्चा केली. त्यांनी संगितले की, आमचा विधेयकाला काहीच विरोध नाही. विरोध करा, असे वारकऱ्यांना सांगितले जात आहे. काही लोक त्यांना सांगतात की, विधेयक संमत झाल्यास आपल्याला वारी करता येणार नाही, गळ्यात माळ घालता येणार नाही, विठोबाचे नामस्मरण चंद्रभागेच्या काठावर करता येणार नाही. मी विचारतो की, कोण निरोप देणार आहे ?

सभापती महोदय, आपल्याला आठवत असेल की, सतीची प्रथा लॉर्ड माऊंट बेटनने बंद केली. त्यावेळी समाजातील धर्मवंत तत्कालीन अलाहाबाद हायकोर्टात गेले आणि त्यांनी सांगितले की, ब्रिटिश कंपनीला आमच्या धर्मामध्ये हस्तक्षेप करण्याचा अधिकार नाही. ब्रिटिश कंपनी हिंदू धर्मातील अनिष्ट, अघोरी सतीची प्रथा बंद करावी म्हणून प्रयत्न करीत होती. राजा राममोहन रॉय यांनी सती प्रथा बंदीच्या संदर्भातील कायदा होण्यासाठी अहोरात्र प्रयत्न केले. पण त्याही काळात

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. सुरेश नवले ....

समाजातील धर्मवंत हिंदू धर्मात हस्तक्षेप करता येणार नाही, हे सांगण्यासाठी अलाहाबादच्या हायकोर्टात गेले होते. मी हिंदू आहे आणि त्याचा मला अभिमान आहे. अहिंसा, सत्य, अस्तेय, ब्रह्मचर्य, अपरिग्रह, क्षोच, तप, ईश्वर प्रनिधान या सर्व यम नियमांवर विश्वास ठेवणार मी हिंदू आहे.

सभापती महोदय, बौध्द धर्म पाठीमागून येऊन जगामध्ये विस्तारला आणि तेव्हा आम्ही सांगत होतो की, समुद्र ओलांडता येणार नाही. आपण थोडे आत्मपरीक्षण करा. आपण हिंदू धर्मातील जळमटे दूर करण्याचा प्रयत्न करणार की नाही ? खरे तर हे धर्मवंतांचे काम आहे. परंतु, दुर्भाग्याने धर्म कुंठीत करण्याचा प्रयत्न काही कर्मठ करीत आहेत. आपण हे विसरू नका की, डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे हिंदू धर्मातील अनिष्ट रूढी, प्रथा, परंपरा, अस्पृश्यता यांना कंटाळून बाहेर गेले. सभापती महोदय, अजूनही धर्मांतर होत आहे. बीडमधील हनुमंत उपरे व त्यांच्या बरोबरीचा 16 हजार कार्यकर्त्यांचा गट धर्मांतर करणार आहे.

( नंतर श्री. खंदारे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.सुरेश नवले....

किती धर्मवंतांनी त्यांच्याकडे जाऊन मतपरिवर्तन करण्याचा प्रयत्न केला होता. आमच्या हातून चूक झाली असेल तर आम्ही क्षमापार्थी आहोत असे म्हटले होते. पण राजकारणासाठी धर्माचा वापर करावयाचा ? छत्रपती शिवाजी महाराजांची जयंती साजरी करण्यासाठी समिती नेमण्यात आली होती. त्या समितीमध्ये श्री.प्रमोद नवलकर आणि श्री.साबीर शेख होते. दिनांक 19 फेब्रुवारी रोजी शिवजयंती साजरी करण्याचे सर्वानुमते ठरले होते. त्यातही राजकारण करण्यात आले. महाराजांच्या जयंतीमध्ये राजकारण केले जाते. म्हणून या विधेयकाच्या निमित्ताने मला सन्माननीय सदस्यांना विनंती करावयाची आहे की, धर्म सातासमुद्राच्या पलीकडे घेऊन जाण्यासाठी धर्मातील जे तण आहे ते काढून टाका. सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांच्या धर्मनिष्ठे विषयी मला पराकाष्ठेची श्रध्दा आहे. ते हातात खुरपे घेऊन हे तण काढतील असे वाटले होते. मातीचा हा गुणधर्म आहे. ज्या मातीमध्ये गहू, तांदूळ उगवितो त्या मातीत तण सुध्दा उगवते. ते तण काढण्याचे काम त्यांच्याकडून अपेक्षित आहे.

स्वामी विवेकानंदांनी तेच केले. सर्वधर्म परिषदेमध्ये मानवतेचा पुरस्कार करीत असताना वेदान्ताद्वारे आमच्या धर्मातील जे सत्व आहे ते त्या अमेरिकन बांधवांसमोर ठेवले, त्यानंतर टाळ्यांचा प्रचंड कडकडाट झाला होता. असे स्वामी विवेकानंद आपल्याकडे किती आहेत ? विवेकानंदांची माझ्या सारख्याला अपेक्षा आहे.

माझ्या एका मित्राने व्हॉटस्अप् वर एक चित्र पाठविले आहे. तंत्र विद्येविषयी जैन हे चांगले सांगू शकतात. अतिरेक्यांनी एका व्यक्तीला दाबून धरले. त्यानंतर त्याचा गळा चिरला. त्याचा गळा त्याच्या धडावर ठेवला. तो डोळे किलकिल करीत होता. त्याने आपला बचाव व्हावा म्हणून प्रयत्न केला होता. पण तोंड बांधून आलेल्या अतिरेक्यांनी त्याचा गळा चिरुन ते धडावर ठेवले. त्यावेळी रक्ताचा पाट वाहत होता. ते अतिरेकी व समाजात काम करणारे जे ढोंगी आहेत, नरबळी देणारे आहेत तेही अतिरेकी आहेत. अशा अतिरेक्यांचा बंदोबस्त करण्याचे काम या कायद्याने करणे आवश्यक आहे. राज्य शासनाची ती जबाबदारी आहे. ती जबाबदारी सरकार पार पाडत असेल तर माझ्या सारखा कार्यकर्ता राजकारणात यश येईल ना येईल पण त्याचे

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ D/ KTG/

प्रा.सुरेश नवले....

निश्चित समर्थन करणार आहे. आपल्या सारख्यांकडून त्या समर्थनाची अपेक्षा होती, पण दुर्दैवाने अतिंद्रिय शक्तींचा उल्लेख केला जातो. अतिंद्रिय शक्तीला काय आधार आहे ? शरीरातील कोणत्या भागात अतिंद्रिय शक्ती संचार करीत असते ? शास्त्रीय दृष्टीकोनातून अतिंद्रिय शक्तीची व्याख्या काय आहे ? हे सर्व निराधार आहे. पण अतिंद्रिय शक्तींचा संचार झाल्यावर पोटावरुन हात फिरविल्यानंतर मुलीचा मुलगा होतो. कुंडलिनाचा योग मी वाचलेला आहे. यम, नियम, आसन, प्राणायाम, प्रत्याहार, धारणा, ध्यान, समाधी हा वेगळा विषय आहे. ज्या भोंदूने चार शब्द वाचले नाहीत, त्यांना योग माहीत नाही. त्यांच्यामध्ये अतिंद्रिय शक्तींचा संचार होतो. हा सर्व बुध्दीभेद आहे. समाजाला बहकवण्याचा प्रयत्न होत आहे. समाजाला जागेवर आणण्यासाठी, गोरगरिबांची लूट थांबविण्यासाठी जर राज्य शासन प्रयत्न करीत असेल तर राज्य शासनाचे समर्थन करणे हा आमचा धर्म आहे. म्हणून या सभागृहातील सर्वांना, जाणत्यांनी, जे जाणते असतील त्यांनी या विधेयकाला पाठिंबा द्यावा.

सभापती महोदय, ग्रामीण भागामध्ये विदारक चित्र आहे. आदिवासी भागात चेटूक केले म्हणून अनेक महिलांची धिंड काढली जाते.

नंतर श्री.शिगम.......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. सुरेश नवले...

तिला शेंदूर फासला जातो, तिच्या शरीराची विटंबना केली जाते. यांची जागा कुठे आहे ? यांची जागा तुरुंगामध्ये असणे आवश्यक आहे. यांना तुरुंगात डांबण्यासाठी या विधेयकाचे रुपांतर कायद्यात होणे आवश्यक आहे. म्हणून माझी सर्व सन्माननीय सदस्यांना विनंती आहे की हा कायदा एकमताने पारित करुन महाराष्ट्रामध्ये असा संदेश देऊ की पक्षातीत भूमिकेतून, मग शिवसेना असेल, भारतीय जनता पार्टी असेल, भारतीय कॉंग्रेस असेल, किंवा आमचा भारतीय राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष असेल, रिपाईचे सदस्य असतील, आम्ही सर्वांनी एकमताने हे विधेयक संमत केलेले आहे असा संदेश जनतेमध्ये जाऊ द्या.

सभापती महोदय, मी माझे भाषण थोडक्यात आटोपते घेणार आहे. आपण विचारवंत आहात, प्रज्ञावंत आहात. आपल्या ज्ञानाविषयी माझ्या मनात कोणत्याही प्रकारची शंका नाही. मी एक वाचक आहे. कालचा विद्यार्थी आहे आणि शेवटपर्यंत विद्यार्थीच रहावे असा माझा प्रयत्न आहे. विंचू उतरविला जाणे, साप उतरविला जाणे, आश्चर्य आहे. मी 10वीमध्ये शिकत असताना आमच्याकडे केरबा नाना होते. ते साप उतरवित होते. मी केरबा नानाला विनंती केली आणि सांगितले की, मला साप उतरविण्याचा मंत्र द्या. तो गरीब असल्यामुळे आणि गावामध्ये आमचे घर बऱ्यापैकी असल्यामुळे तो म्हणाला, मी तुला विंचू आणि साप उतरविण्याचा मंत्र देतो, पण तू मला थालीपीठ खाऊ घातले पाहिजे. मी घरातून चोरुन थालीपीठ आणून केरबा नानाला खाऊ घातले. केरबा नाना म्हणाला, विंचू, साप उतरविणे सोपे आहे. चापटया मारायच्या आणि म्हणायचे की, काळा विंचू गोरे पाय उतरत उतरत तळात जाय. हा काय मंत्र आहे ? हा यमक जुळवण्याचा प्रयत्न आहे. गावामधील उद्धवचे आणि माझे जमत नाही. त्याला जर विंचू चावला तर तो चढविण्याचा मंत्र काय आहे असे त्याला विचारले असता तो म्हणाला, काळा विंचू गोरे पाय चढत चढत माथ्यावर जाय. हे मंत्र आहेत. मी आव्हान देतो. महाराष्ट्रातील साप, विंचू उतरविणारे जे आहेत त्यांचे मंत्र यापेक्षा वेगळे असले तर मी पुन्हा सभागृहामध्ये पाऊल ठेवणार नाही. फक्त यमक जुळविलेला आहे. सभापती महोदय, या सगळया गोष्टींचा विचार करणे आवश्यक आहे. त्यादृष्टीने हे विधेयक अतिशय महत्वाचे आहे. या विधेयकामधील 6व्या पानावर धार्मिक विधीमध्ये मुलांचे कान व नाक टोचणे, जैन धर्मियाद्वारा करण्यात येणारे केशलोचन यासारखे जे धार्मिक विधी

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. सुरेश नवले....

आहेत त्यामध्ये एक बाब अंतर्भूत करावी अशी माझी नम्र विनंती आहे. धार्मिक विधीनुसार लहान मुलांचे कान व नाक टोचणे, जैन धर्मियांद्वारा करण्यात येणारे केशलोचन व मुस्लिम धर्मियांच्या धार्मिक विधीनुसार लहान मुलांना करण्यात येणारा खत्ना, सुंता याचा अंतर्भाव केला तर मनामध्ये ज्या काही शंका कुशंका राहिल्या आहेत त्या निघून जातील. महाराष्ट्रातील वारकऱ्यांच्या मनामध्ये या कायद्याविषयी भीती आहे असे जे बोलले जाते त्याबद्दल अशी कोणतीही भीती महाराष्ट्रातील वारक-यांच्या मनामध्ये नाही याची मला खात्री आहे. चराचराला मानवतेचा धर्म सांगणारा आणि मानव्यावर विश्वास ठेवणारा,

दुरितांचे तिमीर जावो, विश्व स्वधर्म सुर्ये पहावो,
जो जे वांछिल तो ते लाहो प्राणिजात

असे म्हणणा-या चिमुरडया जीवांची आर्त हाक आपणाला घालते. महाराष्ट्रामध्ये कुठे तरी कानाकोपऱ्यात जादूटोण्याचे प्रयोग होतात, माणसांचे शोषण करण्याचा प्रयत्न माणसे करतात, अघोरी विद्या आहे असे दाखवून माणसांची लूट करतात अशा लुटारुंना कारागृहामध्ये बंदीस्त करण्यासाठी या विधेयकाला मी पाठिंबा देतो आणि माझे भाषण संपवितो.

----

..नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.कपिल पाटील ( मुंबई विभाग शिक्षक ) : सभापती महोदय, या विधेयकाचे समर्थन व स्वागत करण्यासाठी मी उभा आहे. 17 वर्षे या विधेयकाने वाट पाहिली. या राज्यात अशा प्रकारचे विधेयक यावे म्हणून डॉ.नरेंद्र दाभोळकर व विद्वान नेते आग्रह धरत होते. या सभागृहात हे विधेयक पास व्हावे म्हणून त्यावेळचे शिक्षक आमदार श्री.दस्तुरकर सरांनी ठराव मांडला होता. तो ठराव या ठिकाणी बहुमताने मंजूर झाला होता. त्या विधेयकाचे आज कायद्यात रुपांतर होत आहे, याचा मला जरुर आनंद झाला आहे. या विधेयकासाठी ज्यांनी बलिदान दिले, त्या डॉ.नरेंद्र दाभोळकरांना संसदेच्या दोन्ही सभागृहाने श्रद्धांजली वाहिली. या सभागृहात शोक प्रस्ताव आला. पण या विधेयकाच्या निमित्ताने शासनाने श्रीमती दाभोळकरांना जो शब्द दिला होता, तो शब्द शासनाने पूर्ण केला त्याबद्दल मी समाधान व्यक्त करतो आणि माननीय मुख्यमंत्र्यांना धन्यवाद देतो.

महोदय, डॉ.दाभोळकरांचे पार्थिव अंत्यदर्शनासाठी ठेवले होते. या राज्याचे माननीय मुख्यमंत्री, राज्याचे गृहमंत्री श्रीमती दाभोळकरांचे सांत्वन करण्यासाठी गेले होते. मारेकऱ्यांना लवकर पकडू असे म्हणाले. तेव्हा ती माऊली अशी म्हणाली की, मारेकऱ्यांना पकडाल तेव्हा पकडाल, परंतु तुमच्या दारात गेली 17 वर्षे दाभोळकर उभे होते. त्यांना तुम्ही कधी न्याय देणार आहात, ते विधेयक तुम्ही कधी पास करणार आहात. जर तुम्ही प्रामाणिक असाल तर आपण वटहुकूम काढा असे आर्जव त्या माऊलीने केले. त्या क्षणाला निश:ब्द शांतता पसरली होती. दुसऱ्या दिवशी राज्य सरकारने वटहुकूम काढला. या विधेयकामध्ये तेव्हा धर्माबद्दल आणि श्रद्धेच्या बाबतीत काहीही नव्हते. नंतर कंड्या पिकविण्यात आल्या की, हे विधेयक आमच्या धर्माविरुद्ध आहे, आमच्या श्रद्धेविरुद्ध आहे. या भारताचे संविधान धर्म आणि श्रध्देचे स्वातंत्र्य देते. मूलभूत हक्काचे स्वातंत्र्य संविधान देते. ते संविधान स्वातंत्र्याच्या विरोधात कोणतेही विधेयक पास करु देत नाही. त्यामुळे तो प्रश्न तेव्हाही नव्हता आणि आताही नाही. तरी ज्याला यात देशाचे राजकारण करावयाचे होते त्यांनी देशाचे, राज्याचे वातावरण कलुषित केले. हे विधेयक पास व्हावे, एक पाऊल पुढे पडावे म्हणून आपण ते विधेयक पातळ, पातळ, पातळ करीत आणले आहे.

यानंतर श्री.भोगले..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ D/ D/ KTG/ 19:25

श्री.कपिल पाटील....

सभापती महोदय, सरकारने विधेयक आणले ते विधानसभेत मंजूर केले. आपण डॉ.दाभोळकरांना खरी श्रध्दांजली अर्पण करणार असू तर या विधेयकामध्ये जे वैगुण्य ठेवले आहे ते काढून टाकले पाहिजे. व्यावृत्तीच्या सूचीबद्दल मला बोलायचे नाही. पीडित व्यक्ती असते त्या व्यक्तीने किंवा तिच्या कुटुंबीयांनी तक्रार केली तर त्याची दखल घ्यावी असे हे विधेयक म्हणते. अंधश्रध्देपोटी ज्या अघोरी प्रथांना ती पीडित व्यक्ती बळी पडते त्यामध्ये बाहेरचा कोणी सामील नसतो. भोंदू बाबाची फूस असली तरी त्यामध्ये घरची मंडळी सामील असतात. त्यामुळे तक्रार कोण करणार? सामाजिक न्याय मंत्री या ठिकाणी उपस्थित आहेत. त्यांच्या मतदारसंघात जी घटना घडली त्या घटनेमध्ये सख्ख्या आजीने घरातील कुटुंबीयांनी आपल्या नातीला जिवे मारले आणि ते तिचे रक्त प्यायले. गावात वैभव यावे आणि शांतता नांदावी म्हणून पोटच्या पोरीचा बळी दिली गेला. कुटुंबीय तक्रार करतील आणि मग सरकार कारवाई करणार असेल तर या विधेयकाचा अर्थ काय होईल?

सभापती महोदय, महाभारतामध्ये द्रौपदीचे वस्त्रहरण होत होते तेव्हा धर्मराज युधिष्ठिर मान खाली घालून, हाताची घडी घालून बसला होता. सदैव द्रौपदीवर सावली रहावी म्हणून ज्या बलदंड भीमाचा उल्लेख केला जातो तो भीमही हाताची घडी घालून बसला होता. ज्या धुनर्धारी अर्जूनाचे आपण कौतुक करतो तो अर्जूनही शांतपणे बसला होता. आपल्या पत्नीचे वस्त्रहरण पाचही पांडव खाली मान घालून पहात होते. दु:शासन वस्त्र फेडत होता आणि ते पहात होते. द्रौपदीने कृष्णाचा धावा केला. कृष्ण आला नसता तर द्रौपदीची अब्रू जाणार होती. तक्रार कृष्णाला करावी लागते. या विधेयकामध्ये कृष्णाला स्थान नाही. तिस-या माणसाला स्थान नाही. धर्मराजाने तक्रार करावी, भीमाने तक्रार करावी, अर्जुनाने तक्रार करावी, सहदेव नकुलाने तक्रार करावी असे विधेयक म्हणते. तक्रार कृष्णाला करता येणार नाही. .मग या बिलाला काय अर्थ राहतो. किमान एक दुरुस्ती प्रामाणिकपणे या बिलाशी निगडित असेल तर ती केली पाहिजे. ते वैगुण्य ठेवणार असू तर दाभोळकरांना श्रध्दांजली अर्पण करतो हे अभिमानाने म्हणता येणार नाही. 17 वर्षे लावली याबद्दल राग नाही. दाभोळकर यांचा बळी गेला. सनातनींनी बळी घेतला असला तरी तुम्ही त्याला तितकेच जबाबदार आहात. त्याचे प्रायश्चित कसे घेणार आहात? .......(अडथळा)....या सनातनी प्रवृत्तीबद्दल प्रबोधनकारांनी खूप लिहिले आहे. त्याबद्दल आक्षेप घ्या.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, शासनाने न्यायालयात शपथपत्र करुन दिले आहे. या खूनाशी सनातनी प्रवृत्ती किंवा कोणत्या धर्माचा संबंध नाही. तुम्ही बाहेर काहीही म्हणा, या विधिमंडळामध्ये म्हणू नये.

श्री.कपिल पाटील : काय म्हणायचे ते बोलायचा मला अधिकार आहे. सरकार काय म्हणते याच्याशी मला देणे घेणे नाही.

श्री.दिवाकर रावते : सरकारने न्यायालयात शपथपत्र दिलेले आहे. या संदर्भात माननीय गृहमंत्र्यांनी सुध्दा सांगितले आहे की, आरोपींचा शोध सुरु असला तरी आणि उद्या ते लोक सापडले तर त्यांना माफ करावे असा भाग नाही. शासनाने जाहीरपणे न्यायालयात शपथपत्र देऊन सांगितले आहे. त्यामुळे माननीय सदस्यांना काय वाटते हे त्यांनी पटलावर ठेवू नये एवढी विनंती आहे.

श्री.कपिल पाटील : मी आपला आभारी आहे. आपण ज्येष्ठ सदस्य आहात. आठवण करुन दिल्याबद्दल जास्त आभारी आहे. हे शासन ॲफिडेव्हीट कसे काय करु शकते? जर तुमच्याकडे कोणताही पुरावा नाही. अमुक याच्यात नाही, तमुक याच्यात नाही हे कसे काय म्हणू शकता? आम्हाला अजून काही सापडलेले नाही असे म्हणू शकता. पण अमुक नाही, तमुक नाही असे सांगण्याचा सरकारला किंवा गृह खात्याला अधिकार नाही.

नंतर 4एल..1..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.कपिल पाटील..

त्यांच्या आरोपीला पकडत का नाही हा माझा प्रश्न आहे. आपण एकमेकांना सामील आहात काय हे देखील सांगावे. ते देखील आपण सांगत नाही. आपण कशाला धुळफेक करीत आहात. सनातनी प्रवृत्तींच्या विरोधात प्रबोधनकार आयुष्यभर लढले. येथे स्वातंत्र्यवीर सावरकरांचा उल्लेख केला आहे. संत गाडगे महाराजांचा उल्लेख केला. सनातनी शक्तींच्या विरोधात केवळ प्रबोधनकार किंवा संत गाडगे महाराज लढले असे नाही. भिंत चालविण्याचा उल्लेख येथे करण्यात आला. ते संत ज्ञानेश्वर देखील सनातनी लोकांच्या विरोधात लढले होते. त्या सनातन्यांनी श्री निवृत्तीनाथ, संत ज्ञानेश्वर व त्यांच्या सर्व भावंडांचा अनन्वित छळ केला. तुम्हाला यज्ञोपवित घालता येणार नाही, कारण तुम्ही संन्याशाची पोरं आहात असे सांगितले. लहानग्या मुक्ताईचा छळ केला. ती सनातनी वृत्ती आजही जागी आहे, जिवंत आहे याचे दुःख आहे. या सनातन्यांनी महात्मा गांधीजींचा खून केला. महात्मा गांधीजींनी काय केले होते की, त्यांचा बळी घेतला. त्यांचा बळी घेताना असे कारस्थान केले होते की, पुन्हा धर्मद्वेषाची आग लागावी. त्याच सनातनी शक्तींनी डॉ.नरेंद्र दाभोळकरांचा बळी घेतला असेल तर त्यांचे नाव का घ्यायचे नाही ? लढाई ही तर त्या शक्तींशी आहे. माझा सरकारला प्रश्न आहे की, त्या शक्तींशी दोन हात करायला तुम्ही समर्थ आहात काय की तडजोडी करत हातात हात मिळविणार आहात ? याचे उत्तर सरकारने दिले पाहिजे. याचे उत्तर देण्यास सरकार तयार नाही.

या बिलामुळे आमच्या धर्मश्रद्धेला धक्का लागतो अशी ओरड केली गेली. हे बिल आणता येते किंवा नाही यासंबंधी या सभागृहामध्ये विवाद देखील झाला. पण आज ते बिल आणले आहे. सभागृहात वारकऱ्यांचे पुन्हा पुन्हा नाव घेण्यात आले. या सभागृहात कामकाज नसताना सादरीकरण करण्यात आले. तेव्हा मी वारकरी कुठे आहेत हे पहात होतो. त्यावेळी श्री.तनपुरे महाराज, कैकाडी महाराज, फडकरी, आळंदी व देहूच्या पालखीचे चोपदार आले नव्हते. या सर्वांना आपण बोलाविले नव्हते. मी पंढरपूरला जाऊन आलो आहे. ही सर्व मंडळी बिलाच्या बाजूने आहेत. श्री कैकाडी महाराज तर या बिलाचे समर्थक आहेत. ते आपल्या कीर्तनातून श्री गाडगे महाराजांचे उदाहरण देतात. या बिलाच्या समर्थनासाठी जी परिषद झाली त्यात श्री तनपुरे महाराज कडाडले. ते म्हणाले की, हे बिल पातळ आहे. आम्ही

..2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.कपिल पाटील..

वारकरी या बिलाच्या पुढे आहोत. आम्ही तुकारामाचा वारसा सांगणारे आहोत. श्री.तनपुरे महाराजांच्या आश्रमामध्ये श्री.साने गुरूजींनी विठ्ठलाची दारे खुली व्हावीत म्हणून उपवास केला. त्या साने गुरूजींना पाठिंबा देण्यासाठी फक्त श्री.अत्रे आणि प्रबोधनकार पुढे होते. वारकऱ्यांच्या नावाने राजकारण करण्यात आले. जटा,पटा आणि भगवी वस्त्रे नेसून तंत्र, मंत्र खेळतात त्यांचा निषेध संत ज्ञानेश्वरांपासून संत तुकारामांनी केला आहे. तेच आज भगवी वस्त्रे नेसून आम्ही वारकरी आहोत असे सांगून येथे बसले आहेत आणि सांगत आहेत की, आमच्यावर आघात होत आहे. येथे प्रत्येकाला आपले विचार मांडण्याचा अधिकार आहे. तो अधिकार आपणाला कोणी मांडू देत नसेल तर मी नक्की आपल्या बाजूने उभा राहीन. पण आम्ही वारकरी आहोत असा असत्य दावा करता येणार नाही. आपण पंडित आहोत, सनातनी आहोत, आमच्या धर्मश्रद्धांवर हल्ला होतो, आम्ही या बिलाला विरोध करतो असे सांगावे. तो आपला अधिकार आहे. वारकरी अबीर गुलाब लावतो. येथे एकाच्याही कपाळावर अबीर गुलाल नव्हता. आपण असत्य सांगून द्वेष कशासाठी पसरविला आहे ? मी जेव्हा जेव्हा चहापाण्याच्या कार्यक्रमाला हा मुद्दा काढायचो तेव्हा मला वारकऱ्यांमध्ये वातावरण बिघडले आहे, ते दुरूस्त करावे लागेल असे सांगितले जायचे. आपण कशासाठी असत्य सांगत होता. आपण असत्य कथन केले नसते तर कदाचित श्री.नरेंद्र दाभोळकर हे बिल पास होत असताना हयात असते. त्यांना वाटले असते की, आपली चळवळ आपल्या आयुष्यामध्ये यशस्वी झाली. त्यांना मनोमन आनंद घेता आला असता. सामाजिक चळवळीमध्ये, धर्म सुधारण्याच्या चळवळीमध्ये काम करणाऱ्यांना आपले आयुष्य बलिदानाच्या रूपाने द्यावे लागते. ते आपले घरदार सोडतात. ते कोणत्याही सुखाच्या मागे लागत नाहीत. ते वेड्या सारखे मागे लागलेले असतात. त्यांच्यावर आम्ही आरोप करतो की, इकडून फंड मिळाला, तिकडून फंड मिळाला.

यानंतर श्री.जुन्नरे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. कपिल पाटील ....

त्या परिग्रहाचा त्यांनी उल्लेख केला आहे. अशा पध्दतीने आयुष्य जगणारी ही माणसे आहेत. केवळ समाजातील माणसांचे शोषण होऊ नये, लहानशा बाळांचा नरबळी जाऊ नये, काही गुन्हा नसतांना स्त्रियांचे शोषण होऊ नये यासाठी ही मंडळी आयुष्यभर लढत असतात असे असतांना आपण त्यांना तगवत बाहेर उभे करीत असतो. सनातनी तर उघड उघड शत्रू आहेत. परंतु तुम्ही तर पुरोगामी भाषा करणारे आहात ना ? मग तुम्ही त्यांना बाहेर उभे का करीत होता ? 17 वर्ष त्यांना का तिष्ठत ठेवले ? 28 युगे आम्ही विठ्ठलाला उभे ठेवले आहे. आणखी किती वर्ष तुम्ही या सुधारणांना बाहेर ठेवणार आहात, तंगवत ठेवणार आहात ?

जे जे या सुधारणांना विरोध करतात त्यांना असे वाटत असेल की, आम्हाला यश मिळेल. परंतु तुम्हाला यश मिळणार नाही हे आपण लक्षात ठेवा. आपण हे लक्षात ठेवा की, आज आसाराम जेलमध्ये आहे. आसारामला वाचविण्यासाठी फार प्रयत्न झाले. देशाच्या सर्वोच्च सत्तेचे स्वप्न पाहणारे, एकमेकात भांडणारे एकत्र येत आहेत. आसारामच्या वाढदिवसाचा केक एकत्र येऊन कापतात आणि दुसऱ्या दिवशी आसारामचे वकीलपत्र घेतात. या देशाचा मोठा वकील ज्याने मंजुश्री सारडाचा बळी गेल्यानंतर ज्यांनी तिचा बळी घेतला त्यांची केस हातामध्ये घेतली होती. या वकिलाला मुंबईकरांनी पराभूत केले हा इतिहास आहे. आसारामच्या वाढदिवसाचा केक दिग्गज नेते एकत्र कापतात अशा लोकांच्या हातामध्ये देशाची सत्ता द्यावयाची काय ? या फॅसिस्ट शक्तींच्या हातामध्ये देशाची सत्ता द्यावयाची काय ? या शक्तींनी डॉ.नरेंद्र दाभोळकरांच्या हत्त्येचे समर्थन केलेले आहे. सनातनची वृत्तपत्र वाचली तर आपल्या ते लक्षात येईल आणि त्यांना पाठीशी घालणाऱ्या नेत्यांच्या पाठीमागून चालणारी कुजबूज आणि वक्तव्य ऐकली तर ते आपल्या लक्षात येईल. डॉ.नरेंद्र दाभोळकराच्या हत्त्येचे समर्थन आजही होत आहे त्यामुळे गृह खाते काय करते याचे मला दु:ख आहे. कदाचित हेमंत करकरे असते तर डॉ.नरेंद्र दाभोळकरांचे मारेकरी गजाआड झाले असते. आज हेमंत करकरे नाहीत त्यामुळे तुम्ही गप्प बसलात. परंतु तुमच्या नाकावर टिच्चून राजधानीमध्ये नथूरामची जयंती साजरी करणाऱ्या लोकांना तुम्ही का अडवत नाही ? कोणी तुमचे हात रोखले ? असे असतांना आपण सांगता की, आम्ही सनातनी जातीशी लढणार आहोत.त्यांच्याशी तुम्ही कसे लढणार आहात ? अधिच कमजोर करुन



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. कपिल पाटील ....

बिल घेऊन यावयाचे आणि स्वत:ची पाठ थोपटून घ्यावयाची आणि नथूरामचे उघड समर्थन करणाऱ्यांना काहीही करावयाचे नाही हे बरोबर आहे काय ? हे कोण लोक आहेत ते तुम्हाला माहिती नाही ?

आदिवासींच्या शोषणाविरुध्द लढणाऱ्यांना तुम्ही नक्षलवादी ठरवता, कामगारांसाठी संघर्ष करणाऱ्यांच्या पाठीमागे लाठया-काठया लावता, पोलीस लावता. जर्मनीमध्ये हिटलरच्या समर्थनावर बंदी आहे. महात्मा गांधीच्या हत्याऱ्यांची जयंती साजरी केली जाते. त्याला तुम्ही रोखत नाही. कोणाच्या बाजूने हे सरकार आहे ते सरकारने एकदा स्वच्छ सांगावे. तुम्ही हे सांगत नसाल तर या बिलासाठी आम्ही मोठा प्रयास केला हे अभिमानाने सांगण्याचा तुम्हाला अधिकार नाही. या बिलामुळे जे काही परिवर्तन होणार आहे त्यात वैगुण नसला तरी स्वागत यासाठी करतो की, अंधश्रध्देपोटी ज्या ज्या विकृती आम्ही शतकानुशतके जोपासल्या त्या विकृतींना दूर करण्याच्या कामाला एक कायदेशीर आधार या विधेयकामुळे मिळणार आहे. या चळवळीमध्ये काम करणारी मंडळी जेव्हा पोलिसांकडे जातात तेव्हा पोलीस त्यांना कायदे दाखवतात, यामध्ये तशा प्रकारची तरतूद नाही, ज्याला मारले असेल त्याची दखल घेऊ असे सांगतात. यामध्ये आयपीसीच्या कलमांचा आधार घेतला जातो. परंतु आयपीसीची कलमे पुरेशी ठरत नाहीत. परंतु मंत्र तंत्राबद्दल आम्ही यादी वाढवत गेलो. यादी वाढवण्याचा आपल्याला जरुर अधिकार आहे. श्रध्दा आणि परंपरेला घटनेने स्वातंत्र दिले आहे. परंतु माणसाचे स्वातंत्र हिरावून घेण्याचे स्वातंत्र कोणालाही दिलेले नाही. भागवत पंथांच्या परंपरेने या सगळ्या विकृतींचा सातत्याने विरोध केलेला आहे.

यानंतर श्री.अजित.....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.कपिल पाटील...

संत ज्ञानेश्वर म्हणतात "मंत्रेची वैरे मरे तरी बांधावी का कटारे" परंतु आपल्याकडे असे समर्थन केले जाते की, मूत्र कसले, ते ठेवायचे की नाही त्यावर व्याख्या केल्या जातात. यज्ञोपवित घालायचे की नाहीत त्याबाबत संरक्षण मागितले जाते. माणसाला विकृत बनविणारे, त्याच्यात भेद करणारे, त्यांचा छळ करणारे, शोषण करणारे कोणतेही कृत्य असेल आणि ते धर्माचरणाशी निगडित असेल तर ते बदलले पाहिजे. घटनेने धर्माला स्वातंत्र्य दिलेले आहे. धर्माचरणाबद्दल कायदे करता येतात. माणसाला त्रास देणारे, त्यांचे मूलभूत स्वातंत्र्य हिरावून घेणारे धर्माचरण असेल तर ते रोखता येते. अन्यथा सतीचा कायदा झाला नसता. आपल्या लहान वहिनीला चितेवर चढताना पहिल्यानंतर आणि तिच्या किंकाळ्या ऐकल्यानंतर राजा राममोहन रॉय यांनी सतीच्या विरोधात आवाज उठविला. आमच्याकडे सतीचे समर्थन करणारे लोक आहेत. एका महाराणीने सतीचे समर्थन केले होते. त्या एका मोठ्या पक्षाच्या महाराणी आहेत, त्यांनी उघडपणे समर्थन केले होते. पण हा महाराष्ट्र शिवाजी महाराजांचा आहे. शिवाजी महाराजांनी आपल्या आईला सती जाऊ दिले नाही. जिजाऊ माता सती जाण्यासाठी निघाल्या होत्या पण शिवाजी महाराजांनी त्यांना अडविले म्हणून स्वराज्य निर्माण झाले. जिजाऊ सती गेल्या असत्या तर स्वराज्य निर्माण झाले नसते. महाराजांना ते कळत होते. महाराजांचा हा महाराष्ट्र आहे. शाहू-फुले-आंबेडकरांचा तर आहेच आहे. त्यांनी इतके उभे केले म्हणून आम्ही इथपर्यंत आलो.

सभापती महोदय, अशा प्रकारचा कायदा करुन आपले काम संपले असे आपणास वाटत असेल तर आपण चूक करीत आहोत. सामाजिक न्याय मंत्री महोदयांच्या बाजूला शिक्षण मंत्री बसले आहेत. आपल्या दोघांवर फार मोठी जबाबदारी आहे. कारण शिक्षणामधून ज्या अंधश्रध्दा परंपरेने जोपासल्या जात आहेत त्या बदलण्याची गरज आहे. अगोदर कायदा नव्हता. आता कायद्याने आपणास मोठी शक्ती मिळेल. त्यामुळे अभ्यासक्रमामध्ये प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षपणे ज्या ज्या वाईट गोष्टी जोपासल्या जात आहेत त्या दूर करण्यासाठी आपणास पण करावा लागेल आणि हिमतीने उभे रहावे लागेल. आपण दोघेजण ते करता याबद्दल माझ्या मनात शंका नाही.

सभापती महोदय, माननीय मंत्री श्री.शिवाजीराव मोघे साहेबांबद्दल सांगू इच्छितो की, त्यांनी ज्या प्रामाणिकपणे या बिलाच्या मागे ताकद लावली, श्रम घेतले, कष्ट घेतले त्याला तोड नाही. श्री.शिवाजीराव मोघे सामाजिक न्याय विभागाचे मंत्री झाले त्यावेळी त्यांनी मला बोलावून

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.कपिल पाटील...

घेतले. हे विधेयक आणायचे आहे असे मला त्यांनी सांगितले. त्यावेळी मी चकीत झालो. कारण मी पूर्वीपासून श्री.मोघे साहेबांना ओळखत होतो. अत्यंत सहृदयी माणूस आहे. पण त्यांनी हिमतीने सांगितले की, मला हे विधेयक आणायचे आहे. हे विधेयक आणण्यासाठी ते न्या.चंद्रशेखर धर्माधिकारी यांना जाऊन भेटले. त्यांची कमिटी नेमली. त्यांनी अत्यंत प्रामाणिकपणे या विधेयकाच्या बाबतीत काम केले त्याबद्दल त्यांना शतश: धन्यवाद दिले पहिजेत. आपणास राजकीय परिस्थिती साथ देत नव्हती हा भाग वेगळा. आपण ज्या सत्ताधारी पक्षात असतो त्याठिकाणी आपल्या एकट्याचे ऐकले जाते असे होत नाही. आपणास अनेक गोष्टींना, दडपणांना तोंड द्यावे लागते. आपणास मंत्रिमंडळात आणि स्वपक्षात त्रास झाला. इतकेच नव्हे तर संयुक्त चिकित्सा समितीमध्ये रेड्याला बोलविण्याचा प्रसंग आला होता. त्या समितीमध्ये प्रा.बी.टी.देशमुख होते. ते म्हणाले रेड्यालाही बोलवू मग सर्व मंडळी गप्प बसली. कारण ज्ञानेश्वर काय म्हणाले हे त्यांना माहीतच नव्हते. आपणाला फक्त रेडाच माहीत असतो. "मंत्रेची वैरे मरे तरी बांधावी का कटारे" असे संत ज्ञानेश्वर म्हणतात. अविवेकाचा अंधार दूर केला आणि ज्ञानाचा दीप उजळलात तर आपल्या घरी रोज दिवाळी साजरी होईल असेही ज्ञानेश्वर सांगतात. अविवेकाचा अंधार दूर करण्यासाठी ज्ञानाचा दिवा लावावा. हे विधेयक त्या दृष्टीने अतिशय दमदार पाऊल आहे. त्यामध्ये काही वैगुण्ये आहेत. हे विधेयक खंडश: पारित करण्यास सुरुवात होईल त्यावेळी किमान ती दुरुस्ती स्वीकारावी अशी माझी विनंती आहे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य प्रा.सुरेश नवले असे म्हणाले की, आपण धार्मिक परंपरेच्या दृष्टीने एक भली मोठी यादी जोडलेली आहे. मग त्यामध्ये आमचा कोकणातील गुरवाला सोडून द्यावे. तो फक्त गाऱ्हाणे घालतो. तो देवदेवस्की करत नाही. मुजावरला सोडून द्या तो फक्त दर्ग्यामध्ये प्रेयर करतो. गद्दीनशेनला सोडून द्या तो प्रेमाचा संदेश देतो तो सुफी पंथातून आलेला असतो. तो काही चमत्कार करीत नाही. सुफींनी तर हिंदू-मुस्लिम ऐक्याचा मंत्र जपला आहे.

यानंतर श्री.बोर्डे..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.कपिल पाटील....

गद्दीनशेन, मुजावर ही मंडळी भागवत धर्म आणि इस्लाम धर्माच्या ऐक्याचा मंत्र जपत असतात. त्यांना या विधेयकाच्या तरतुदीतून वगळावे, नाही तर त्यांना या विधेयकाच्या तरतुदीन्वये उद्या फाशी दिली जाईल. चर्चमध्ये फादर विश्व शांतीची प्रार्थना करतात. त्यांना सुध्दा या विधेयकातून वगळावे. ज्या ज्या धर्मातील पुरोहित आहेत, ज्यांच्यामुळे बाधा येत नाही, शोषणाला साथ मिळत नाही त्या सर्व बाबींना या विधेयकाच्या तरतुदीतून वगळावे अशी माझी आपल्याला प्रार्थना आहे.

महोदय, मूळ विधेयकातील अनेक तरतुदी कमी झाल्या असल्या तरी हे विधेयक आज पारित होत आहे, हीच एक मोठी गोष्ट आहे. अंधश्रध्दा निर्मूलनासाठी नरेंद्र दाभोलकर यांनी बलिदान दिले आहे. त्यांनी निर्माण केलेल्या हजारो कार्यकर्त्यांना या विधेयकाच्या माध्यमातून मोठी ताकद मिळणार आहे. अनेक वर्षे सरकार, पोलिसांची, कुटुंबाची, समाजाची त्यांना साथ मिळत नव्हती. हे विधेयक संमत झाल्यानंतर त्यांना एक मोठी ताकद मिळणार आहे. त्या ताकदीपेक्षाही आपला समाज अधिक उन्नत होणार आहे, अधिक सभ्य होणार आहे. तेथपर्यंत आपला समाज पुढे घेऊन जाण्यासाठी जे जे करणे आवश्यक होते किंबहुना त्या दिशेने जाण्यासाठी या विधेयकाची फार मदत होणार आहे. त्यामुळे या विधेयकाचे स्वागत करुन, या विधेयकाला समर्थन देतो.

महोदय, आपण मला बोलण्याची संधी दिल्याबद्दल आपले आभार मानतो व माझे भाषण संपवितो.

------------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती शोभा फडणवीस (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, सन 2013 चे वि.स.वि. क्रमांक-35 वर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभी आहे.

महोदय, श्रध्दा आणि अंधश्रध्दा याचा विचार करीत असताना मी सभागृहाच्या निदर्शनास आणून देते की, 70 टक्के लोक आजही अडाणी आहेत. ते ग्रामीण भागात राहत असून, त्यांच्यामध्ये शिक्षणाचा अभाव आहे. हे विधेयक आणत असताना अडाणी माणसाला शिक्षण देऊन या विधेयकाचा प्रचार आणि प्रसार करुन त्या लोकांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्याची आवश्यकता होती.

महोदय, हा धर्म सहिष्णू आहे. सर्व-धर्म-समभाव हा त्याचा विचार आहे. हे राज्य पुरोगामी आहे. सर्व धर्माला समानतेने वागविणारे हे राज्य आहे. आम्हाला घटनेने मूलभूत अधिकार दिलेला आहे. त्यानुसार वागण्याचा आम्हाला अधिकार आहे. त्या संदर्भात या ठिकाणी विचार होण्याची आवश्यकता आहे. महोदय, माझे लहानपण मुस्लीम समाजामध्ये गेलेले आहे. त्या समाजाच्या प्रथा पाहण्यासाठी आम्ही लहानपणी जात होतो. सवारी अंगात येणे, खिळे ठोकलेल्या पलंगावर झोपणे, निखाऱ्यावर चालणे अशा प्रथांबाबत आम्हाला खूप नवल वाटायचे आणि आम्ही ते बघायला जायचो. महोदय, निखाऱ्यावरुन चालणाऱ्या व्यक्तीच्या पायाला फोड येऊन तो आजारी पडल्याचे मला कधीही दिसले नाही. महोदय, ही श्रध्दा आहे की, अंधश्रध्दा आहे ? मी तर म्हणेन की, ती मुस्लीम समाजाची श्रध्दा आहे. यातून अनिष्ट परिणाम होऊ शकतो याची सर्वांना कल्पना आहे. परंतु या बाबतचा विचार विधेयकामध्ये केला गेला नाही. नरबळी, इतर अमानुष अनिष्ट अघोरी प्रथा आणि भोंदू लोकांकडून केले जाणारे जादूटोण्याचे, भूतपिशाच्चाचे प्रयोग यामुळे सर्वसामान्य लोकांचे शोषण होण्याच्या घटना सातत्याने उघडकीस येतात. महोदय, कान टोचणे हा भाग विधेयकातून वगळण्यात आला आहे. परंतु आदिवासी महिलांना तोंडावर आणि हातावर गोंदून घेण्याची आवड असते. त्यांची ही आवड आपण कायद्याने बंद करणार आहात काय ? मी विचारु इच्छिते की, शरीरावर जखमा होतात म्हणून आदिवासींची ही प्रथा अनिष्ट होणार नाही काय ? याचे स्पष्टीकरण होणे आवश्यक आहे. गोंदून घेणे हे आदिवासी महिलांच्या सौंदर्याचे प्रतीक आहे. आजही माझ्या आदिवासी महिलेच्या अंगावर अर्ध वस्त्र आहे. आपल्या अंगावर पूर्ण वस्त्र घालण्याची त्यांची आर्थिक परिस्थिती नाही. त्या शिक्षण आणि परिस्थितीने मागासलेल्या

..3..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती शोभा फडणवीस....

आहेत. एवढेच नव्हे तर आर्थिकदृष्ट्या देखील त्या मागासलेल्या आहेत. त्यांची आर्थिक क्षमता वाढविण्याचे काम, त्यांच्यासाठी रोजगार निर्माण करण्याचे काम, त्यांना समाजाच्या विकासामध्ये आणण्याचे काम करण्यासाठी हे विधेयक आले असते तर मी त्याचे निश्चितच स्वागत केले असते.

नंतर श्री.कांबळे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती शोभा फडणवीस ....

यवतमाळ जिल्हा माननीय मंत्र्यांचा जिल्हा आहे. पुरोगामी महाराष्ट्रातील यवतमाळ जिल्ह्यात प्रौढ कुमारिकांचे पुनर्वसन करून एक वस्ती उभी केली जात आहे. त्या महिला कोणाच्या बळी आहेत ? त्या महिला श्रीमंतांच्या, मोठ्या लोकांच्या बळी आहेत. एखाद्या जिल्ह्यात अशी वस्ती उभी राहत असेल तर ही आपल्याला मोठ्या अभिमानाची गोष्ट आहे का ? आपण त्यांच्याकरिता काय केले, त्यांच्या अनौरस संततीचे पुढे काय होणार आहे, आपण त्यांना कोणती मदत देणार आहात ? आपण या सर्व गोष्टींचा विचार करून प्रौढ कुमारिकांच्या पुनर्वसनाचे, त्यांच्या मुलांच्या आयुष्याच्या गोष्टी संदर्भातील विधेयक आणले असते तर मी निश्चितच आपले स्वागत केले असते. कारण हाही एक बलात्काराचा प्रकार आहे. शासनाने त्याचा विचार करण्याची गरज होती. आवश्यकता असणाऱ्या गोष्टी पहिल्यांदा केल्या पाहिजेत, आवश्यकता नसलेल्या गोष्टी नंतरही होऊ शकतात, अशी माझी मानसिकता आहे. नरबळीची अनिष्ट, अघोरी प्रथा बरोबर नाही. त्या प्रथेचे मी कदापि समर्थन करणार नाही. नरबळी म्हणजे माणसाचा खून. नरबळीमध्ये लहान मुलांनाच बळी दिले जाते. आदिवासींची ही एक श्रध्दा आहे. आदिवासी समाजामध्ये एक प्रथा आहे की, नरबळी देऊन त्याच्या रक्तात खिळे भिजवून ते वाळवून ठेवले जातात.

श्री. कपिल पाटील : सभापती महोदय, माझी हरकत आहे. अमरावती जिल्ह्यामध्ये असे होत नाही.

श्रीमती शोभा फडणवीस : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी माझ्या भाषणात व्यत्यय आणू नये. मी त्यांच्या भाषणात व्यत्यय आणलेला नाही. हा हरकतीचा मुद्दा होत नाही. मी प्रथा सांगत आहे. सन्माननीय सदस्यांना असत्य आहे असे वाटत असेल तर त्यांनी माझ्याबरोबर यावे, मी त्यांना सिध्द करून दाखविते. ही प्रथा अमरावतीमध्ये नसेल तर गडचिरोलीत आहे. माडी समाजामध्ये, माडिया समाजामध्ये आहे. प्रत्येकाची प्रथा वेगवेगळी असते.

श्री. हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांनी या विधेयकाला पाठिंबा असल्याचे सांगितले आहे. आता सन्माननीय सदस्या म्हणत आहेत की, आमचा विधेयकाला पाठिंबा नाही.

..2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती शोभा फडणवीस : सभापती महोदय, विधेयकाला पाठिंबा नाही, असे मी म्हटलेले नाही. हा प्रश्न पक्षाचा आहे. पक्ष जो निर्णय घेईल त्यामागे मी राहणार आहे. माडिया समाजामध्ये लग्नाच्या मंडपामध्ये हा खिळा ठोकल्यानंतर लग्न लावले जाते, या खिळ्याची किंमत 2 हजार रूपयापर्यंत असते. त्यांची ही श्रध्दा आपल्याला अंधश्रध्दा वाटते. पण ती त्यांची श्रध्दा आहे. त्यामुळे त्यांच्या विचारांमध्ये, मानसिकतेमध्ये बदल करण्याची आवश्यकता आहे. नरबळी रोज दिले जात नाहीत. काही ठराविक काळातच नरबळी दिले जातात. आम्ही नरबळीचे समर्थन कदापि करणार नाही. परंतु, नरबळीसाठी फौजदारी कायदा आहे, कलम 302 अन्वये या गुन्ह्यासाठी शिक्षा दिली जाऊ शकते. एखाद्याचा खून गंभीरतेने झाला असेल तर त्याला जन्मठेप होऊ शकते, त्याला फाशीची शिक्षा होऊ शकते, 7 किंवा 12 वर्षांची शिक्षा होऊ शकते. नरबळीच्या गुन्ह्याच्या संदर्भात कायद्यात ऑलरेडी शिक्षेची तरतूद आहे. त्यामुळे पुन्हा त्याच गुन्ह्यासाठी दुसरे विधेयक आणायचे का, असा मला प्रश्न पडतो. नरबळीचा गुन्हा झाला तरी त्या संदर्भातील चौकशी पोलीसच करणार आहेत. या विधेयकात 6 महिने ते 7 वर्षे अशी शिक्षेची अट घातली आहे. पण कोर्ट त्यापेक्षाही जास्त शिक्षा करू शकते. एकाच वेळी दोन कायद्याच्या रेट्याने निर्णय देता येऊ शकेल का, हा माझ ा प्रश्न आहे. एका गुन्ह्यात दोन प्रकारची शिक्षा होऊ शकत नाही. शिक्षा कोणत्याही एकाच कायद्याने होणार आहे, मग ती नरबळीचा कायदा असो वा खुनाचा कायदा असो. आपण या संदर्भात स्पष्टीकरण द्यावे. मी नरबळीचे समर्थन करीत नाही.

सभापती महोदय, समाजामध्ये आणखी एक अंधश्रध्दा आहे की, एड्स झालेल्या माणसाने अल्पवयीन मुलीवर बलात्कार केला तर एड्स बरा होतो. त्यामुळे 5 वर्षांत 3 ते 10 वर्षे वयोगटातील मुलींवरील बलात्काराचे प्रमाण प्रचंड वाढले आहे. आपण या संदर्भात विशेष कायदा करणार आहात का ?

( नंतर श्री. खंदारे ....

असुधारित प्रत/प्रसिध्दीसाठी नाही

श्रीमती शोभा फडणवीस...

या अंधश्रध्देपायी मुलींचे खून होत आहेत, शासन विशेष कायदा करणार आहे काय, याचाही खुलासा होणे आवश्यक आहे. गुप्तधन शोधण्यासाठी नरबळी दिले जातात. आदिवासी किंवा मागासलेल्या विभागात गुप्तधन शोधण्याचे प्रमाण जास्त आहे. अकरा नखांचा कासव असेल तर त्याला 12 हजार रुपये किंमत मिळते. त्यामुळे गुप्तधन मिळते अशी अंधश्रध्दा आहे. ही अंधश्रध्दा दूर करण्यासाठी कायद्याचा उपयोग होणार नाही. कायदा आवश्यक आहे, पण त्याचा परिणामकारक उपयोग होणार नाही. त्यासाठी लोकांचे प्रबोधन करणे आवश्यक आहे. जनजागरण करणे आवश्यक आहे. या राज्यात सध्या कायदे खूप आहेत. महिलांवरील अत्याचार विरोधी कायदा आहे. रोज नवीन नवीन कायदे अस्तित्वात येत आहेत. पण या कायद्यांमुळे काही फायदा झाला आहे का ? दरवर्षी महिलांवरील अत्याचारांची संख्या प्रचंड वाढत आहे, महिलांचे खून होत आहेत. जर कायद्यामुळे हे होत नसेल तर मोठ्या प्रमाणात वैचारिक क्रांती करण्याची गरज आहे आणि ती केली पाहिजे असे माझे मत आहे.

सभापती महोदय, कुत्रा, साप, विंचू यांचा या अंधश्रध्देशी काहीही संबंध नाही. कुत्रा चावल्यानंतर वैद्यकीय मदत घेतली पाहिजे असे आपण म्हणतो. परंतु कुत्र्याला मारण्याची शासनाने परवानगी दिलेली नाही. मुंबईत पिसाळलेल्या कुत्र्यांमुळे अनेक लोक मरण पावतात. त्यासाठी कायदा आणून या कुत्र्यांना प्रतिबंध करावा. आदिवासी विभागात एक प्रथा आहे. कुत्रा चावल्याबरोबर वैदूच्या माध्यमातून औषधे देण्याची प्रथा आहे. आदिवासी क्षेत्रामध्ये कुत्रा चावून मरणाऱ्यांची संख्या कमी आहे. वैद्यकीय मदत घेऊन कुत्रा चावल्यानंतर मरणाऱ्यांची संख्या मुंबईत जास्त आहे. कुत्रे वाढले पाहिजेत, कुत्रेही चावले पाहिजेत, कुत्रा चावल्यावर सरकारी दवाखान्यात गेले पाहिजे असे म्हणणे योग्य नाही.

सापाच्या बाबतीमध्ये मी सांगेन की, आदिवासी भागात साप चावल्यावर औषध आहे. मी आदिवासी भागातील जंगलात फिरत असताना त्या लोकांनी मला लाकडाची एक डबी दिली होती. आदिवासी लोक गोटा म्हणतात. आई, तू जंगलात फिरत असल्यामुळे तुझ्या सोबत हा गोटा राहू दे. मी त्यांना असे विचारले की, त्यामुळे काय होणार आहे ? साप चावल्यावर हा गोटा घासून

2...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ D/ KTG/ ST/

श्रीमती शोभा फडणवीस...

त्याचे चंदन घेतले तर तुझ्या अंगामध्ये विष चढणार नाही. मी त्यांना विचारले की, हा गोटा कशापासून बनविलेला आहे ? जे आदिवासी लोकांना कळते ते लॉजिक आरोग्य विभागाला कळत नाही. मुंगूस व सापाची लढाई जेथे होते तेथे मुंगूस ज्या झाडाचा पाला खातो त्या झाडापासून तयार केलेला हा गोटा आहे असे मला त्यांनी सांगितले. सर्पदंशावर इतके चांगले औषध असताना सरकारी दवाखान्यात जाण्याचा सल्ला देत असताना तेथे तरी सर्पदंशावर लोकांना उपचार मिळतात का ? आदिवासी आश्रमशाळेत सर्पदंशामुळे 3-3 मुले मरतात. त्यांना औषध वेळेवर मिळत नाही. वसतिगृहातील विद्यार्थ्यांना सर्पदंश झाल्यानंतर त्यांनाही औषध देऊ शकत नाही. परंतु आदिवासी भागात सर्पदंशाने मरण पावलेल्यांची संख्या कमी आहे. त्यामुळे कुत्रा, साप, इंगळी हा प्रश्न उरत नाही. म्हणून याचाही थोडासा विचार करण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, मेळघाटामध्ये कुपोषणाचे प्रमाण अधिक आहे. तेथील लोक मुलांना सरकारी दवाखान्यात नेण्यासाठी तयार नसतात. ते त्यांच्या पध्दतीने औषधे घेतात. त्या मेळघाटात मोठ्या प्रमाणात कुपोषण वाढले होते. आदिवासी लोक सरकारी दवाखान्यात आणण्यास तयार नव्हते. याच सरकारने त्या ठिकाणी वैद्यांना आणून बसविले होते. एकाच वेळी डॉक्टरांचे औषध व वैद्याचा गंडा दोरा बांधण्याचा प्रयोग सरकारनेच केला होता. वैद्याचा गंडादोरा बांधून उपचार केले जात होते तर त्याला अंधश्रध्दा म्हणावयाची काय ? साप चावल्यानंतर सर्वात प्रथम आपण काय करतो ?

नंतर श्री.शिगम.......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**तालिका सभापती** : सभागृहाची वेळ कामकाज संपेपर्यंत वाढविण्यात येत आहे.

श्रीमती शोभा फडणवीस : या सगळया गोष्टीबाबत विचार करण्याची आवश्यकता आहे. अंधश्रध्दा या विषयामध्ये सर्वात जास्त गरीब लोकांची पिळवणूक होत असते. आपण मोठ्या दवाखान्यामध्ये डॉक्टर्स देत नाही, ग्रामीण भागातील दवाखान्यामध्ये औषधे देत नाही, ग्रामीण भागामध्ये रस्तेही झालेले नाहीत, आदिवासी भागामध्ये अजूनही 50 टक्के रस्ते झालेले नाहीत. म्हणजे साप, विंचू चावल्यानंतर रुग्णाला खाटेवर टाकून 20 कि.मी. अंतरावरील दवाखान्यामध्ये नेईपर्यंत तो रुग्ण मध्येच गचकतो. अशी ग्रामीण भागातील परिस्थिती आहे. आदिवासी भागातील लोकांची आर्थिक परिस्थिती चांगली नाही.

श्री. राम पंडागळे : सन्माननीय सदस्या श्रीमती शोभाताई फडणवीस यांनी गरिबांचा उल्लेख केला. आपण टी.व्ही.वरचे बाबा बघतो. त्या ठिकाणी श्रीमंत लोक असतात. कोणीही गरीब दिसत नाही. गरीब हे अंधश्रद्धेचे कमी शिकार झालेले आहेत. श्रीमंत लोकच अंधश्रद्धेचे जास्त शिकार झालेले आहेत.

श्रीमती शोभा फडणवीस : ग्रामीण भागामध्ये आर्थिक कमजोरी आहे, अज्ञान आहे, पैसा नाही, दवाखान्यात पोहोचू शकत नाही अशा ठिकाणी वैद्य त्यांना औषध देतात.

श्री. राम पंडागळे : सन्माननीय सदस्या श्रीमती शोभाताई फडणवीस यांनी सांगितले की, गरीब लोक जास्त भरडले जातात, त्याला माझा आक्षेप आहे.

**(सभापतीस्थानी माननीय उप सभापती)**

श्रीमती शोभा फडणवीस : कुत्रा चावला तर जवळच्या घरातून हळद आणि तेल आणून कुत्रा चावल्याच्या ठिकाणी लावले जाते. ते लावल्या नंतर कुत्र्याचे विष चढत नाही असा समज आहे. हळद हे औषध आहे, ते ॲण्टिबायोटिक आहे. कुत्रा चावणे, साप चावणे इत्यादी गोष्टी या विधेयकातून वगळण्यात याव्यात अशी माझी विनंती आहे. कुत्रा चावून मरणाऱ्यांमध्ये डॉक्टर पासून सगळे लोक आहेत. मला या ठिकाणी सांगावेसे वाटते की, हा कायदा आणण्यापूर्वी गंडेदोरे बांधणे ही अंधश्रद्धा होती. परंतु आपण आपल्या हृदयावर हात ठेवून विचार करा, आमदार असो, खासदार असो, सवसामान्य माणूस असो, व्यापारी असो, श्रीमंत असो हे मंदिरातून धागा बांधल्या शिवाय बाहेर पडत नाहीत.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती शोभा फडणवीस...

जारणमारण, करणी किंवा चेटूक केल्याच्या नावाखाली एखाद्या व्यक्तीला मारहाण करणे, तिची नग्नावस्थेत धिंड काढणे या गुन्ह्यासाठी केंद्र सरकारने कडक कायदा केलेला असून त्या कायद्याच्या कलम 354 (अ), (ब), (क) आणि (ड) मध्ये शिक्षेची तरतूद आहे.

अलौकिक शक्तीद्वारे मूल होण्याचे आश्वासन देऊन लैंगिक संबंध ठेवणे हा लैंगिक गुन्हा आहे. परंतु आता सरोगेट मदरची नवीन कल्पना पुढे आलेली आहे. स्त्रीमधील दोष काढण्याकरिता होमिओपॅथीची औषधे आहेत. अशा गोष्टीसाठी ॲलोपॅथीबरोबरच होमिओपॅथीची मदत होते. स्वातंत्र्याच्या 66 वर्षामध्ये शिक्षणाच्या माध्यमातून जनतेमध्ये जागृती निर्माण झालेली नाही हे या पुरोगामी महाराष्ट्राचे अपयश आहे. ही प्रथा अत्यंत जुनी आहे. जनतेमध्ये याबाबतीत जागृती करुन या कायद्याचा विचार करण्याची आवश्यकता आहे असे मला वाटते. एवढे बोलून मी माझे भाषण संपविते.

---

...नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ABG/ D/ ST/ प्रथम श्री.शिगम 20:05

डॉ.नीलम गोऱ्हे ( विधानसभेने निवडलेल्या ) : सभापती महोदय, या विधेयकाच्या अनुषंगाने शिवसेना पक्षाचे जे मतभेद आहेत त्याबाबतीत अतिशय थोडक्यात माझे विचार मांडणार आहे. अंधश्रध्देच्या विरोधामध्ये अनेक संस्था, अनेक संघटना काम करीत आहेत. या विधेयकाच्या अनषंगाने मी छोटी छोटी उदाहरणे देणार आहे. गुजरातमध्ये एक महिला होती, तिने गरोदर महिलेच्या पोटाला हात लावला तर त्या महिलेस मुलगा होईल असे ती सांगत होती. शेकडो गरोदर महिला गुजरात मध्ये जाऊन त्या महिलेचे आशीर्वाद घेत होत्या. आम्ही स्वत: प्रयत्न करुन तिच्यावर केस केली होती. त्यानंतर त्या महिलेला पोलिसांनी अटक केली. अशा परिस्थितीमध्ये सुध्दा एका ज्योतिषी नाडीपरीक्षा पाहणाऱ्या व्यक्तीने एका महिलेचे शोषण केल्यावर त्या नाडी परीक्षा पाहणाऱ्या ज्योतिषाला अटक व्हावी म्हणून संबंधित पोलीस स्टेशनमध्ये आम्ही गुन्हा दाखल केलेला आहे. प्रबोधनकार ठाकरे यांचे नाव घेत असताना हिंदू हृदयसम्राट माननीय बाळासाहेब ठाकरे यांनी आम्हाला वारंवार असेच सांगितले आहे की, सती प्रथा, बाल विवाह यांना नेहमी विरोध करा. या गोष्टींना विरोध करण्यातच शिवसेनेची वाटचाल चाललेली आहे.

सभापती महोदय, मी सुध्दा आयुर्वेदाची पदवीधर आहे. चरत, सुश्रुत,जैन तत्वज्ञान, बौध्द तत्वज्ञान, चारवाक ही सहा तत्वज्ञाने आम्हाला अभ्यासाला होती. कोणत्या आजारावर कोणता आहार द्यावयाचा आणि कोणती औषधे दिली पाहिजेत यासंधीच्या परीक्षेमध्ये प्रत्येक वर्षी मी 60 ते 75टक्के गूण मिळवून पास झालेली आहे. मला असे सांगावयाचे आहे की, लघु सिध्दांत कौमुदी कॉमिनी या परीक्षेत मी मुंबई विद्यापीठात पहिली आलेली आहे. त्यामुळे अभ्यासाचा विषय आला की माझा गुरुजींशी वादविवाद व्हावयाचा. मला असे वाटावयाचे की, आत्मा हा अस्तित्वातच नसतो. आत्मा जर अस्तित्वात नसतो तर त्यांचा पुनर्जन्म कसा होऊ शकतो. अनेक लोकांना भीषण संकटात पाहतो. त्यावेळेला तुम्ही लोकांची खरी श्रध्दा पाहता. लातूरला भूकंप झाला.मी स्वत: अस्तिक असले तरी कधी धार्मिक कामात सहभागी होत नव्हते. लातूर येथील दीड ते दोन हजार महिला बरोबर काम करीत असताना त्या महिला आम्हाला सांगू लागल्या की, आम्हाला आत्महत्या करावयाच्या आहेत. त्या सांगत होत्या की, आमच्या घरातील माणसे दगावलेली आहेत. त्यावेळी मी त्यांना प्रश्न विचारला की, तुम्हाला कोठली तरी इच्छा आहे की, त्यासाठी तुम्हाला जगावेसे वाटते. लातूर, औसा, उमरगा भागातील महिलांनी मला सांगितले की, आम्हाला एक वेळा

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ABG/ D/ ST/ प्रथम श्री.शिगम 20:05

डॉ.नीलम गोऱ्हे...

विठ्ठलाची वारी करावयाची आहे. म्हणून आम्हाला जगावयाचे आहे. मी त्या महिलांना 1994 साली विठ्ठलाची वारी करण्यास घेऊन गेले. मला या निमित्ताने असे सांगावयाचे आहे की, आपण अतिशय सापेक्ष शब्द या वियेयकात वापरले आहेत. डॉ.नरेंद्र दाभोळकर यांच्या बरोबर काही काळ मी काम केलेले आहे. परंतु माझे काही बाबतीत त्यांच्याबरोबर मतभेद होते. मतभेदाचे कारण मी सांगू इच्छिते. धुळे येथून अंधश्रध्दा निर्मूलनाची एक पत्रिका निघत होती व पत्रिका आजही निघते. मी त्याबाबतीत पुण्याच्या शृभांगी शहा व त्यांच्या कार्यकत्यांना मुद्दाम म्हटले.त्यांनी पत्रिकेत शब्दश: असे म्हटले होते की, वाढदिवसाचा केक मुद्दाम रात्रीच्या वेळी स्मशानात जाऊन रात्री 12.00 वाजता कापला. मी म्हटले की, तुमची अंधश्रध्दा निर्मूलनाची काय प्रथा आहे. अंधश्रध्दा निर्मूलनामध्ये कोणाच्या भावनाची, कोणाच्या सन्मानाची, कोणाची कुचेष्टा होणे हे बरोबर नाही. मग मुद्दा असा उपस्थित होतो की, ज्यांची श्रध्दाच नाही, त्यांनी श्रध्दा कोणावर ठेवावयाची याचे नियम इतर कसे ठरवू शकतात. आपल्याला जे हास्यास्पद वाटते, ते त्या माणसाला चांगले वाटते. मी एक सामाजिक कार्यकर्ती होती म्हणून एक नियम लावला आणि आता विधान परिषद सदस्य म्हणून दुसरा नियम लावला. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी जी घटना लिहिलेली आहे, त्याच्यामध्ये समता, बंधुता आणि स्वातंत्र्य असे नमूद केलेले आहे. प्रत्येक व्यक्तीला धर्म स्वातंत्र्य जरुर आहे. परंतु समानता आणि बंधुता याला बाधा आणणारी श्रध्दा असेल, समता आणि बंधुता याच्या स्वातत्र्यावर गदा आणणारी श्रध्दा असेल तर त्यामध्ये समाजाला हस्तक्षेपाचा अधिकार आहे. महिलांना चेटकिणीची लागण होणे, अंजनाबाईच्या केस मध्ये तिने 9 मुलांचे नरबळी दिले होते. महिलांच्या समस्या दूर करण्याससाठी मी पूर्वीपासून काम करीत आहे आणि आताही करीत आहे. मला या ठिकाणी असा प्रश्न विचारावयाचा आहे की, अलौकिक शक्तीच्या संदर्भात तुम्ही म्हटलेले आहे. अलौकिक शक्ती हा शब्द एकदाच वापरला तर मग जनाबाईचे कष्ट करण्यासाठी विठ्ठल धावून आला. विठ्ठलही अलौकिक शक्तीने धावून आला.

अमुद्रित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

यानंतर श्री. भोगले...

डॉ.नीलम गोऱ्हे.....

त्याचबरोबर मला हेही सांगितले पाहिजे की, हिंदू धर्मामध्ये ज्या ज्यावेळी बदल झाले त्या त्यावेळी कायम हा वादविवाद झालेला आहे. महात्मा ज्योतिराव फुले यांनी निर्मिकाची संकल्पना अखंड वाङ्मयामध्ये मांडली आहे. महात्मा फुले नास्तिक नव्हते. सत्यशोधक विचारांचे मंत्र सांगून लग्ने लावली जात होती. निर्मिकाची कल्पना त्यांनी मांडली आहे. श्रध्दांवर आघात करण्यासाठी ....(अडथळा)....पोलिसांना देवघरात आणू नका. कोथरुडमध्ये काही माकडे फिरत होती. ती मोबाईल चोरत होती. मोबाईल चोरायला लागले की लोक माकडांना पकडण्यासाठी पोलिसांना बोलवत होते. चोरांना पकडण्याबरोबर माकडांना पकडणे, गांधील माशांना हलविणे, विहिरीत पडलेले रेडे शोधून काढणे ही कामे पोलिसांनी करायची? आता कोण श्रध्देने करतो आणि कोण अंधश्रध्देने करतो हे सुध्दा पोलिसांनी शोधायचे आहे. पोलिसांना आपण घरामध्ये उभे केले तर मला तरी वाटते की, निम्मे पोलीस तरी स्वत: रांगेत जाऊन अगोदर नमस्कार करुन येतील एवढे पोलीस आस्तिक आहेत.

सभापती महोदय, हे जे विधेयक आहे या विधेयकाला आमचा या कारणासाठी विरोध आहे की, आमचा अंधश्रध्दा, नरबळी याला अजिबात पाठिंबा नाही. डॉ.नरेंद्र दाभोळकरांचे हत्यारे सापडले पाहिजेत. त्यांना न्याय मिळाला पाहिजे ही आमची स्पष्टपणाची भूमिका आहे. डॉ.दाभोळकर जर का आज असते तर त्यांनी या विधेयकाला कधी मान्यता दिली नसती. याचे कारण असे की, या विधेयकामध्ये तुम्ही जी यादी अंतर्भूत केली आहे त्या यादीमध्ये भोंदूगिरी झाली आहे, पोलिसांच्या मनावर तुम्ही जनतेला सोडून दिले आहे. म्हणून आमचा याला विरोध आहे. कृपा करुन गैरसमज करुन घेऊ नका. संतांची वाङ्मय वापरत असताना जनतेची कुठेतरी वेगळ्या पध्दतीने दिशाभूल होईल आणि जनता सुध्दा तुम्हाला याबद्दल जाब विचारेल एवढे मला सांगायचे आहे. धन्यवाद.

------------

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती विद्या चव्हाण : सभापती महोदय, मी वि.स.वि.35............

श्री.राम पंडागळे : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. आता मला बोलण्याची संधी मिळणे अपेक्षित आहे. आपण आमच्या पक्षाची यादी तपासून पहावी.

**उप सभापती** : मी यादी तपासली आहे.

श्री.राम पंडागळे : सभापती महोदय, पक्ष प्रतोदांनी कळविल्यानुसार माननीय सदस्य श्री.हेमंत टकले यांचे भाषण झाल्यानंतर आमच्या पक्षातर्फे मी बोलणार होतो.

**उप सभापती** : मी त्यावेळी सभागृहात नव्हतो.

श्री.राम पंडागळे : आपण सदासर्वकाळ असता. आपल्याला तिसरा डोळा असल्यामुळे आपल्याकडून अन्याय होत असेल तर ते चुकीचे आहे. चुकीचे संकेत जात आहेत. माझे नाव पुकारले जाणे आवश्यक होते. मी सिनियर आहे.

श्रीमती विद्या चव्हाण : सभापती महोदय, सभागृहात उपस्थित असणाऱ्या तीनही महिला सदस्यांना पहिल्यांदा बोलण्याची संधी द्यायची असे ठरले होते.

श्री.राम पंडागळे : माझे नाव अगोदर असावयास पाहिजे. हे चुकीचे आहे.

**उप सभापती** : माननीय सदस्य श्री.हेमंत टकले यांच्या मी निदर्शनास आणू इच्छितो की, आपण आपल्या पक्षाच्या सदस्यांना शिस्त पाळण्यास सांगावे. मला या आसनावरुन हे बोलावे लागत आहे. I am sorry.

श्री.हेमंत टकले : सभागृहात चर्चा सुरु झाल्यानंतर तीनच महिला सदस्या आहेत त्यांना प्रथम बोलू द्यावे असे ठरले, या सूचनेला आम्ही मान्यता दिली. त्यानुसार माननीय सदस्या श्रीमती शोभा फडणवीस यांचे भाषण झाल्यानंतर माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांना संधी देण्यात आली. आता माननीय सदस्या श्रीमती विद्या चव्हाण यांना संधी देण्यात यावी.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

नंतर 4यू.1...

**(सभापतीस्थानी तालिका सभापती श्री.रमेश शेंडगे)**

श्रीमती विद्या चव्हाण (नामनियुक्त) : सभापती महोदय, महाराष्ट्र नरबळी आणि इतर अमानुष, अनिष्ट व अघोरी प्रथा व जादूटोणा यांना प्रतिबंध घालण्याबाबतचा कायदा अंमलात आणला आहे. मी पहिल्यांदा समस्त स्त्री वर्गाकडून आपले आभार मानते. गेली अनके वर्षे किंबहुना कित्येक हजार वर्षांपासून आम्ही स्त्रिया या अहंकारी पुरूषी वर्चस्वाखाली, त्यांच्या अत्याचारांनी, छळांनी, परंपरागत अमानुष, अनिष्ट, अघोरी प्रथांच्या खाली गाडले गेलेलो आहोत. अगदी रामायणातील सीता असो किंवा महाभारतातील द्रौपदी किंवा अनेक वर्ष शीळा होऊन पडलेली अहिल्या असो. काहीही चूक नसताना शिक्षा मात्र स्त्रियांनीच भोगायची. विज्ञानाचा अभ्यासपूर्ण आणि शास्त्रीय दृष्टिकोनातून बदल झालेली स्त्री आता अहिल्येसारखी शीळा होऊन प्रभु रामचंद्राच्या पदस्पर्शाची प्रतीक्षा करत बसणार नाही. विज्ञानात इतकी प्रचंड शक्ती आहे की, आपल्या कुटील कारस्थानांना आणि अंध:काराला आता आम्ही भीक घालणार नाही हे सूर्यप्रकाशा इतके स्वच्छ आहे. अंध:कार आपोआपच नष्ट होणार आहे. आपण कितीही धरून ठेवण्याचा प्रयत्न केला अगदी हजारो हातांनी, लाखो हातांनी धरायचा प्रयत्न केला तरी ते होणार नाही. आपण मात्र विज्ञानाच्या विरोधी आहात, विकासाच्या विरोधी आहात, महिलांच्या विरोधी आहात हे यातून निश्चितच लोकांच्या समोर आलेले आहे. आता लोक खाडकन जागे झालेले आहेत. आपला ढोंगीपणा आता लोकांनी ओळखला आहे. एका दिवसामध्ये हे झालेले नाही. मानवी इतिहासाकडे आपण वळून बघितले तर दिसून येईल की, हजारो वर्षापूर्वी आदिमानव रोज नित्यनियमाने उगवणाऱ्या सूर्य आणि चंद्राला दैवी शक्ती मानून पूजत होता. इ.स.पूर्व नऊ हजार ते चार हजार वर्षापूर्वी शेतीला नुकतीच सुरूवात झाली. दिशा, ऋतू, ज्ञान, ...... (अडथळा) ...... माननीय विरोधी पक्ष नेत्यांना सांगू इच्छिते की, मी भाषण वाचत नसून जे मुद्दे काढले आहे त्यावर माझे विचार मांडत आहे. वैदिक वाङ्मय आणि प्राचीन ऋग्वेद मानतो. त्यामध्ये सुद्धा नास्तिकांचा पुष्कळ उल्लेख आढळतो. यामध्ये ऐकण्यासारखा उल्लेख आहे. रामायणामध्ये जबाला हा रामाचा मंत्री होता. रामाला वनवासापासून परावृत्त करताना रामाला चार्वाक वाद सांगितला होता. त्याचा सारासार विचार

..2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती विद्या चव्हाण....

करावा. दान,धर्माची माहिती सांगणारे ग्रंथ लबाडांनी निर्माण केले आहेत. पिता-पुत्र नात्याला मर्यादेपर्यंत किंमत द्यावी. वचनबद्ध गोष्टी किती प्रमाणात पाळाव्यात हा जबालीचा व्यवहारवाद आजच्या काळामध्ये प्रसिद्ध आहे. महाभारतात भारद्वाज भूतवाद सांगतो. सर्व प्रकारचे गुण-दोष असताना वर्णक्रम कशासाठी हा सुद्धा प्रश्न विचारण्यात आला आहे. महावीर, गौतमबुद्ध यांनी अनुक्रमे जैन आणि बौद्ध धर्माची स्थापना केली. तत्कालीन कर्मकांड, यज्ञप्रदान आणि हिंसक ब्राह्मणी धर्मा विरूद्ध त्यांनी क्रांती केली.

यानंतर श्री.जुन्नरे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती विद्या चव्हाण .....

प्राचीन काळापासूनचा इतिहास सांगण्याचे उद्दिष्ट एवढेच आहे की, आज जो वारकरी संप्रदाय आहे त्या वारकरी संप्रदायाने महाराष्ट्राच्या सामाजिक, धार्मिक संस्कृतीच्या जीवनात क्रांतिकारक बदल घडवून आणले आहेत. ही परंपरा 700-800 वर्षापूर्वीची आहे. संत नामदेव, संत एकनाथ, संत तुकाराम, संत ज्ञानेश्वर हे या सांप्रदायाचे प्रमुख प्रसारक होते. सहाव्या शतकातही "पांडुरंग वल्ली" असा उल्लेख आढळतो. गळयात तुळशी माळ, खांद्यावर पताका, टाळ मृदुंग, भागवत धर्म,कीर्तन, भजन निरपेक्ष बुध्दीने केले पाहिजे अशी भावना त्यावेळेसही कीर्तनातून सांगितली जात होती. "जेथे कीर्तन करावे, तेथे अन्न ना शिवावे,तुका म्हणे द्रव्य घेती, देती, तेही नरकात जाती." हा फार महत्वाचा संदेश त्या काळी दिलेला आहे. वारकरी सांप्रदायात कुणबी, माळी, कासार, वाणी असे बहुसंख्य समाज सामील झाले होते. या भक्तिमार्गापासून महाराष्ट्रातील मुसलमानही दूर राहू शकले नाही. हुसेन अंबरखान या मुस्लीम संत कवीने गीतेवर भाष्य केले आहे. सतराव्या शतकात शेख मोहम्मद संत कवी होऊन गेले होते. त्यानी म्हटले आहे की, "सच्चा पीर कहे मुसलमान, मराठे म्हणतो सद्गुरु पूर्ण, परि दोन्हीत नाही भिन्नपण ऑंख खोल देख भाई." असे असतांनाही आपले डोळे अजूनही उघडत नाही. शहा नवरंगी,सय्यद मोहम्मद,लतीफ शहा,बुऱ्हाण शाह अशा अनेक कवींवर सतराव्या व अठराव्या शतकात भक्तिमार्गाचा प्रभाव झाल्याचे त्यांच्या काव्यातून दिसून येते. प्रसिध्द लेखिका आणि समाज शास्त्रज्ञ डॉ. इरावती कर्वे यांनी "ऑन दि रोड ऑफ महाराष्ट्रीयन पिलग्रिमेज 1988" यामध्ये पंढरीच्या वारीचे महत्व विशद केले आहे. पाच शतकातील अभंग व त्यातील विविधता आणि संत वाणीचे वर्णन त्यांनी आपल्या पुस्तकात केलेले आहे. या वारकऱ्यांना पुढे करुन आपण या बिलाला विरोध केला की, हा पांडुरंगाचा विरोध आहे, वारकऱ्यांच्या विरोधात हे बिल आहे असे कुटील कारस्थान यातून केले गेले आहे. परंतु आता ही गोष्ट वारकऱ्यांच्या लक्षात आलेली आहे.

सभापती महोदय, महाराष्ट्रामध्ये समाज सुधारकांची परंपरा आहे. थोर राष्ट्र पुरुषांच्या पराक्रमी आणि विचारवंत, बुद्धिवंत,क्रांतीकरकांच्या कार्यानेच महाराष्ट्राची ओळख पुरोगामी महाराष्ट्र म्हणून झालेली आहे. महात्मा जोतिबा फुल्यांनी तळागाळातील शोषित स्त्री, शूद्रातिशूद्र यांना

...2..

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती विद्या चव्हाण .....

"ब्रिटिशांच्या गुलामगिरीपेक्षाही श्रेणीबध्द समाजाच्या हाडात मुरलेली गुलामगिरी आहे" असे म्हटले आहे. महात्मा फुले यांच्यानंतर अनेक समाज सुधारक होऊन गेले आहेत. मला एक गोष्ट सारखी जाणवते की, हे सर्व समाज सुधारक नसते तर आज आम्ही स्त्रिया आणि शूद्रांना शिक्षणाची संधी मिळाली नसती. आज आम्ही कोठे असतो त्याची कल्पना सुध्दा करवत नाही. स्त्रीचे आयुष्य कायम परावलंबी होते. लहानपणी पिता, भाऊ, पुत्र व म्हातारपणी मुलांवर त्यांना अवलबून रहावे लागत होते.

यानंतर श्री.अजित.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती विद्या चव्हाण...

सभापती महोदय, या विधेयकावर बोलतांना काही सन्माननीय सदस्यांनी आरोप केलेले आहेत त्या विषयी मला बोलायचे आहे...

**तालिका सभापती (श्री.रमेश शेंडगे )** : मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, या विधेयकावर अजून 17 सन्माननीय सदस्यांना बोलायचे आहे. तेव्हा आपण आपले भाषण लवकर पूर्ण करावे.

श्रीमत विद्या चव्हाण : सभापती महोदय, माझी अजून दहा मिनिटे झालेली नाहीत. तेव्हा आपण मला बोलू द्यावे. ज्यांनी आयुष्यभर भोळ्याभाबड्या लोकांसाठी स्वखर्चाने महाराष्ट्रात व देशात अनेक ठिकाणी प्रत्यक्ष जाऊन भोंदूगिरी उघडी पाडली, महिलांवर होणारे अत्याचार मग त्यामध्ये चेटकीण, चुडैल, डायण अशाप्रकारे स्त्रियांची वाताहत लावली हे सर्व प्रकार ज्यांनी उघडकीस आणले (अडथळा)... महिलांवर किती अत्याचार होत आहेत त्या संदर्भात मला बोलायचे आहे. त्याशिवाय मला काही उदाहरणे द्यायची आहेत.

सभापती महोदय, आपण हा विषय गांभीर्याने घेणार नसाल तर या विधेयकावरील चर्चा उद्या सकाळी सुरु करावी.

**तालिका सभापती** : माझी सन्माननीय सदस्यांना विनंती आहे की, त्यांनी त्यांचे मुद्दे लवकर मांडावेत. इतर सन्माननीय सदस्य काय बोलत आहेत त्याकडे त्यांनी लक्ष देऊ नये.

श्रीमती विद्या चव्हाण : सभापती महोदय, माझ्या भाषणात अडथळा येत असेल तर मला भाषण करता येत नाही. आपण आधीच्या वक्त्यांना दोन-तीन तास बोलू देता. विधेयकावर कोणी बोललेले नाही. या ठिकाणी इतका गोंधळ होत असेल तर मी भाषण कसे करणार ? माझ्या हातात भरपूर उदाहरणे असून मला त्यावर बोलायचे आहे.

सभापती महोदय, आईवडिलांच्या अंधविश्वासामुळे विक्रोळी येथील सात वर्षाच्या निरपराध मुलीचा बळी गेला. अंबरनाथ येथे स्वत:च्या घरातील कलह नष्ट व्हावा म्हणून अनिल सिंग नावाच्या माणसाने शेजारच्या घरातील नऊ वर्षाच्या मुलीचा गळा चिरुन बळी दिला. दर दिवशी अशा घटना घडत आहेत. आपण मुंबईतील लोकल ट्रेनमधून प्रवास करतो त्यावेळी भोंदूगिरी करणाऱ्या बाबांच्या

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती विद्या चव्हाण...

जाहिराती खुलेआम लावलेल्या पाहतो. हे भोंदू बाबांचे पराक्रम आहेत. विरोधी पक्ष भोंदूगिरी करणाऱ्या बाबांना पाठीशी घालत आहेत आणि महिलांवर अन्याय करत आहेत हे महाराष्ट्रातील सर्व महिलांना समजले पाहिजे. आज जे बाके वाजवित आहेत ते सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांना मला विचारावयाचे आहे की, त्यांनी दलाल हा शब्द कोणासाठी वापरला होता ? "दलाल मरतो कधी आणि पिंडाला कावळा शिवणार कधी" आयबीएन लोकमतचे श्री.निखिल वागळे यांना मला धन्यवाद द्यायचे आहे. कारण ते दिवसभर श्री.दिवाकर रावते यांच्या मागे लागले. त्यामुळे त्यांना टी.व्ही.समोर मूग गिळून माफी मागावी लागली. डॉ.श्याम मानव किंवा डॉ. दाभोळकर हे पिंड वगैरे गोष्टी मानत नव्हते. असे असताना आपण त्यांच्या पिंडाला कशाला शिवत होता, तुम्ही आपला विचार करायला पाहिजे होता...

**तालिका सभापती** : माझी सन्माननीय सदस्यांना विनंती आहे की, त्यांनी विधेयकावर बोलावे.

श्रीमती विद्या चव्हाण : सभापती महोदय, मला आणखी दोन महत्वाचे मुद्दे मांडायचे आहेत. त्यांनी देणगी घेतात म्हणून आरोप केलेला आहे. ते कोणावर आरोप करीत आहेत, त्यांना अधिकार आहे काय ? त्यांनी जे चॅरिटेबल ट्रस्ट उघडले, त्या चॅरिटेबल ट्रस्टला धर्मदाय आयुक्तांनी मान्यता दिलेली आहे. धर्मदाय आयुक्त त्यांना हिशोब विचारतील. या खंडणीखोरांना कोणी विचारायला सांगितले. त्यांना ते अधिकार कोणी दिले, त्यांनी अनधिकृत शाखा कुठे बांधल्या, त्यासाठी पैसा कोठून आणला, पक्ष कसा चालतो याचा हिशोब त्यांनी दिला पाहिजे.

(विरोधी पक्षातील अनेक सन्माननीय सदस्य एकाचवेळी बोलण्याचा प्रयत्न करीत असतात. )

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी आता जे वक्तव्य केले ते आपण कामकाजातून काढून टाकावे.

( विरोधी पक्षातील काही सन्माननीय सदस्य वेलमध्ये येतात.)

**तालिका सभापती** : सन्माननीय सदस्या श्रीमती विद्या चव्हाण यांनी कृपया खाली बसावे. आपले भाषण पूर्ण झालेले आहे.

यानंतर श्री.बोर्डे..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**तालिका सभापती**....

मी सन्माननीय सदस्या श्रीमती विद्या चव्हाण यांना सांगतो की, त्यांनी आता खाली बसावे.

आता सन्माननीय सदस्य श्री.राम पंडागळे यांनी आपल्या भाषणास सुरुवात करावी.

(विरोधी पक्षाचे सदस्य वेलमध्ये येऊन सन्माननीय सदस्यांनी केलेले वक्तव्य रेकॉर्डवरुन काढून टाकण्याची मागणी करतात.)

**तालिका सभापती** : मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, कृपया त्यांनी आपापल्या जागेवर जाऊन बसावे.

सन्माननीय सदस्या श्रीमती विद्या चव्हाण यांच्या ज्या वक्तव्यावर आपला आक्षेप आहे ते तपासून नंतर कामकाजातून काढून टाकण्यात येईल. मी पुन्हा एकदा सांगतो की, सन्माननीय सदस्यांचे वक्तव्य अगोदर तपासून बघितले जाईल. त्यानंतर ते रेकॉर्डवरुन काढून टाकण्यात येईल.

(विरोधी पक्षाचे सदस्य वेलमध्ये उभे राहून सन्माननीय सदस्यांचे वक्तव्य कामकाजातून काढून टाकण्याबाबत मागणी करीतच असतात.)

मी सन्माननीय सदस्यांच्या भावना समजू शकतो. मी पुन्हा सांगतो की, सन्माननीय सदस्यांचे वक्तव्य तपासून बघितल्यानंतर ते काढून टाकू या. मी सन्माननीय सदस्यांना सांगतो की, सन्माननीय सदस्या श्रीमती विद्या चव्हाण यांनी माफी मागण्याचा प्रश्न नाही. आपला ज्या वक्तव्याबाबत आक्षेप आहे, त्या बाबत....

(विरोधी पक्षाचे सदस्य वेलमध्ये उभे राहून सन्माननीय सदस्यांचे वक्तव्य कामकाजातून काढून टाकण्याबाबत मागणी करीतच असतात.)

मी पुन्हा एकदा सन्माननीय सदस्यांना सांगतो की, कृपया सर्वांनी आपापल्या जागेवर जाऊन बसावे. आपले म्हणणे मी ऐकून घेतले आहे. मी स्पष्टपणे सांगितले आहे की, ज्या वक्तव्यावर तुमचा आक्षेप आहे ते तपासल्यानंतर कामकाजातून काढून टाकण्यात येईल. या व्यतिरिक्त मी अजून काय सांगणार ?

नंतर श्री.कांबळे....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

(विरोधी पक्षातील अनेक सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊन घोषणा देत असतात.)

**तालिका सभापती** : मी सन्माननीय सदस्यांशी या संदर्भात बोलतो, मी त्यांना सांगतो.

(विरोधी पक्षातील अनेक सन्माननीय सदस्य, सन्माननीय सदस्यांनी माफी मागितलीच पाहिजे, असे मोठ्याने बोलत असतात.)

**तालिका सभापती** : मी आपल्याला सांगितले आहे की, आपण ज्या वक्तव्यावर आक्षेप घेतला आहे, ते वक्तव्य तपासून पाहून कामकाजातून काढून टाकण्यात येईल.

(विरोधी पक्षातील अनेक सन्माननीय सदस्य, सन्माननीय सदस्यांनी माफी मागितलीच पाहिजे, असे मोठ्याने बोलतच असतात.)

**(सभापतीस्थानी माननीय सभापती)**

**सभापती** : मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, आपण आपल्या जागेवर जाऊन बसावे.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, काल-परवापासून या विधेयकावर चर्चा सुरू आहे. सन्माननीय सदस्य आपापले मुद्दे मांडत आहेत. काही विचारांमध्ये टोकत देखील आहेत. श्रध्दा, अंधश्रध्दा, धर्मिक रूढी या विषयाला धरून सर्व सन्माननीय सदस्य विचार मांडत आहेत.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्या श्रीमती विद्या चव्हाण या, पिंडाला कावळा वगैरे काही बोलल्या. आम्ही श्रध्दा, अंधश्रध्दा समजून बोलल्या असतील असे म्हणून रिॲक्ट झालो नाही. पण अमुक एक पक्ष खंडणी गोळा करतो, अनधिकृत शाखा बांधतो, असे त्यांनी वक्तव्य केले.

श्रीमती विद्या चव्हाण : सभापती महोदय, मी कोणत्याही पक्षाच्या नावाचा उल्लेख केलेला नाही.

(गोंधळ)

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी पक्षाचे नाव घेतले आहे. सन्माननीय सदस्य असत्य बोलत असतील तर सभागृहाचे कामकाज थांबवावे आणि आपण सभागृहात झालेले कामकाज काढून पहावे. आता सन्माननीय सदस्यांनी माफी मागितलीच पाहिजे.

(विरोधी पक्षातील अनेक सन्माननीय सदस्य मोठ्याने बोलण्याचा प्रयत्न करून घोषणा देत असतात.)

..2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** : सन्माननीय सदस्यांनी खाली बसावे. मी माझ्या रिपोर्टर्स किंवा सचिवांना सांगतो की, याबाबत प्रत्यक्ष रेकॉर्ड काय आहे, ते मला 5 मिनिटांत आणून द्यावे, त्यानंतर या संदर्भात निर्णय घेण्यात येईल. मी सभागृहाची बैठक 10 मिनिटांकरिता स्थगित करतो.

(सभागृहाची बैठक रात्री 8.31 वाजता 10 मिनिटांसाठी स्थगित झाली.)

----

( नंतर श्री. खंदारे ....

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**( स्थगितीनंतर )**

**( सभापतीस्थानी माननीय सभापती )**

**सभापती** : या सभागृहात अत्यंत महत्वाच्या विधेयकावर कालपासून दोन्ही बाजूच्या सन्माननीय सदस्यांकडून चांगल्या पध्दतीने चर्चा सुरु आहे. सन्माननीय सदस्या श्रीमती विद्या चव्हाण ह्या नेहमी भाषण करीत असताना अतिशय संयमी भाषेत बोलत असतात असा माझा अनुभव आहे. सभागृहात भाषणे सुरु असताना मी माझ्या कार्यालयात प्रत्येक सन्माननीय सदस्यांची भाषणे जवळपास 80 ते 90 टक्क्यांपर्यंत ऐकत असतो. सन्माननीय सदस्या श्रीमती विद्या चव्हाण यांनी मघाशी भाषणाच्या वेळी सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांचा उल्लेख केला होता. त्यावेळी त्यांनी 'खंडणी' असा शब्दप्रयोग केला आहे तो मी कामकाजातून काढून टाकत आहे. सन्माननीय सदस्यांना माझी विनंती आहे की, या विधेयकावर अत्यंत चांगल्या पध्दतीने गेली दोन दिवस दोन्ही बाजूने चर्चा सुरु आहे. या विधेयकावर आणखी काही सन्माननीय सदस्यांना आपले विचार व्यक्त करावयाचे आहेत. यानंतर बोलू इच्छिणाऱ्या सन्माननीय सदस्यांनी कृपया आपले विचार तीन मिनिटांमध्ये मांडावेत. त्यानंतर सर्वांच्या संमतीने हे विधेयक मंजूर करण्याच्या दृष्टीने आपण प्रयत्न करु.

------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ D/ ST/

श्री.चंद्रकांत पाटील ( पुणे विभाग पदवीधर ) : सभापती महोदय, नरबळी आणि अनिष्ट प्रथा विरोधी विधेयक चर्चेला समोर आलेले आहे. राज्यातील दोन्ही बाजूच्या लोकांना सांभाळण्याचा प्रयत्न सरकारने केलेला आहे. तथाकथित पुरोगामी म्हणणाऱ्यांचे समाधान करण्याचा यातून प्रयत्न केलेला आहे. त्यांनाही असे वाटत आहे की, आम्ही कायदा केला आहे. तसेच जे वर्षानुवर्षे आपल्या धर्मावर श्रध्दा ठेवून आपापल्या धर्मातील गोष्टी करीत आहेत. त्यांनाही सांभाळण्याचा प्रयत्न केलेला आहे. त्यामुळे कोणाचेही समाधान न करणारा कायदा आपल्यासमोर आलेला आहे. अनेक प्रकारची दडपणे आल्यानंतर या विधेयकात 12कलम आलेली आहेत. त्या कलमान्वये कडकलक्ष्मीलाही परवानगी दिलेली आहे. जैन, साध्वी....

श्री.भाई जगताप : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.चंद्रकांत पाटील यांनी तथाकथित पुरोगामी असा शब्दप्रयोग केलेला आहे.

**सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.भाई जगताप यांना मी सांगू इच्छितो की, आपण बोलण्यासाठी उभे राहत असताना आशय सुध्दा कणखर पाहिजे. सन्माननीय सदस्य श्री.चंद्रकांत पाटील यांनी पुरोगामी विचार या शब्दांचा उच्चार केला आहे, त्यामध्ये आक्षेप घेण्यासारखे काय आहे ?

श्री.भाई जगताप : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.चंद्रकांत पाटील यांनी तथाकथित पुरोगामी असा शब्दप्रयोग केलेला आहे.

नंतर श्री.शिगम.......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

चंद्रकांत पाटील : सभापती महोदय, दोघांनाही सांभाळण्याचा प्रयत्न या विधेयकामध्ये करण्यात आलेला आहे. डॉ. नरेंद्र दाभोळकर यांच्या कल्पनेतील हा कायदा आहे असे मला वाटत नाही. त्यामुळे कोणाचेही समाधान न करणारा असा हा कायदा आहे. कलम 12मध्ये ज्यांचा विरोध आहे त्यांचे समाधान करता करता कडकलक्ष्मीला देखील परवानगी देण्यात आली आहे. मग यामुळे शारीरिक इजा करण्याचा प्रश्न निर्माण होत नाही काय ? जैनसाध्वी जेव्हा धर्मप्रचारासाठी बाहेर पडते त्यावेळी केस उपटून काढण्याची पध्दत आहे. या कृत्यालाही परवानगी दिलेली आहे. मोहरमच्या मिरवणुकांना परवानगी दिलेली आहे. मुस्लिम धर्मामध्ये सुंता होते त्यावेळीही शारीरिक इजा होते. म्हणजे ज्या ठिकाणी शारीरिक इजा होते त्या ठिकाणी या कायद्याचा अंमल होईल असे म्हणत असताना काहींचे समाधान करण्याचा प्रयत्न केलेला आहे...(अडथळा)..

**सभापती** : सन्माननीय सदस्य कायद्यातील तरतुदींचा उल्लेख या ठिकाणी करीत आहेत.

श्री. चंद्रकांत पाटील : आमच्या पक्षाचा आणि आमचा अशा प्रकारच्या अंधश्रद्धांना आणि नरबळीला कधीच पाठिंबा असणार नाही. पण आम्ही सर्वजण नरबळीच्या विरोधात आहोत आणि समोरचे लोक हे रोज नरबळी करुन सभागृहामध्ये येतात अशा प्रकारचे वातावरण निर्माण करण्याचा जो प्रयत्न झालेला आहे तो योग्य नाही. मी हे स्पष्ट करु इच्छितो की, या विधेयकाला आमचा पाठिंबा आहे. हा पाठिंबा देत असताना वर्षानुवर्षे ज्या गोष्टी केल्या जातात त्या गोष्टी करण्यासाठी स्वातंत्र्य असावे. एका बाजूला आपण भाषणाचे, लिखाणाचे स्वातंत्र्य मानतो. या कायद्यामध्ये प्रचार साहित्याला विरोध केलेला आहे. याचा अर्थ भाषणाच्या आणि लिखाणाच्या स्वातंत्र्यांवर या विधेयकामुळे निर्बंध आलेले आहेत. नरबळी संबंधीचे साहित्य असेल तर त्याला बंदी असली पाहिजे. परंतु एखाद्या गोष्टीतून एखादी निर्मिती होत आहे असे मला वाटले आणि त्यासंबंधी मी माझे विचार प्रकाशित केले तर तो गुन्हा कसा काय ठरु शकतो ? या कायद्यामुळे आपण नेमके काय साधणार आहोत. एकीकडे नरबळीला विरोध करीत असताना, प्राण्यांची हत्या करण्यास विरोध करीत असताना दुसरीकडे सर्व जत्रांच्या ठिकाणी बकरी, कोंबडी कापली जातात. बकरी- कोंबड्यामध्ये देखील प्राण आहे. मग त्यांच्या हत्येला देखील विरोध करावयास पाहिजे. आपण माणसाला शारीरिक इजा झाल्यानंतर कळकळीने बोलत असू तर मग या प्राण्यांच्या हत्येबाबतही तितकेच कळकळीने बोलूया. या विधेयकाला विरोध करणारे आणि विरोध न करणारे

..2..



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. चंद्रकांत पाटील....

असे वातावरण निर्माण करण्याचा प्रयत्न होत आहे. या बाबतीत स्पष्टता यावयास पाहिजे की, कोणत्याही परिस्थितीमध्ये अशा प्रकारच्या अनिष्ट प्रथांना कोणाचाही पाठिंबा असणार नाही. ज्यांना व्यक्तिगत समाधानासाठी काही गोष्टी करायच्या असतील तर त्या करण्याची त्यांना मुभा असावी. मघाशी सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी सांगितले की, मंदिरामध्ये जाऊन मला अभिषेक करायचा असेल तर अभिषेकासाठी पैसे द्यावे लागतील आणि आर्थिक फसवणूक केल्यासारखे होईल. म्हणून सर्व गोष्टींची स्पष्टता करुन कायदा आणावा. केवळ कोणाचे तरी समाधान करीत असताना त्यातून वेगळे काही निर्माण व्हायला नको असे माझे मत आहे, एवढे बोलून मी माझे भाषण संपवितो.

--

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



MSS/ D/ ST/ KTG/ पूर्वी श्री. खंदारे 20:55

श्री. राम पंडागळे (नामनियुक्त) : सभापती महोदय, नरबळी आणि अनिष्ट व अघोरी प्रथा याबाबत जे विधेयक सभागृहासमोर आलेले आहे त्याचे समर्थन करण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, या ठिकाणी आमच्या समोरच्या मित्रांची भाषणे ऐकल्या नंतर मला असे वाटू लागले आहे की, जेव्हा डॉ. बाबासाहेब आंबेडकरानी पार्लमेण्टमध्ये हिंदू कोड बिल मांडले होते आणि त्यामध्ये ज्या काही सुधारणा सुचविण्यात आल्या होत्या त्या सुधारणांना विरोध करण्यात आला. त्या सुधारणा स्वीकारल्या नाहीत. त्यावेळच्या पंतप्रधानांनी ते बिल फेटाळले आणि म्हणून डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी मंत्रीपदाचा राजीनामा दिला.

..नंतर श्री. गिते..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ABG/ D/ ST/ KTG/ श्री शिगम नंतर 21:00

श्री राम पंडागळे......

या बिलाच्या निमित्ताने डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी मांडलेल्या हिंदू कोड बिलाची आठवण होते. आज काय चित्र आहे ते आपण पाहतो. येथे बसलेल्या श्रीमती निलमताई गो-हे,श्रीमती शोभाताई फडणवीस,श्रीमती विद्या चव्हाण यांच्याकडे आपण पहातो. या देशाच्या पंतप्रधान महिला झालेल्या आम्ही पाहतो. या देशाच्या राष्ट्रपती एक महिला झालेल्या आहेत असे चित्र आपण पाहतो. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी ज्या सुधारणा मांडल्या त्यातून हे निष्पन्न झाले. आज जरी आपण या बिलाला विरोध करीत असलो तरी सुध्दा कालांतराने तुम्हाला हे मान्य करावे लागेल. ज्या सभागृहात आपण बसलेले आहात, त्या सभागृहाचा तुम्हाला अभिमान वाटेल की, या सभागृहाने, ज्या अनिष्ट प्रथा आहेत, अनिष्ट रुढी आहेत, ज्यामुळे नरबळी सारखी प्रथा निर्माण होते, त्या प्रथेला आपण पायबंद घातला. हे मला मुद्दाम नमूद करावेसे वाटते.

या बिलात कुठल्या धर्मावर आक्षेप आहे ? जे वाईट आहे, जी अंधश्रध्दा आहे, सर्वसामान्य माणूस जे मान्य करीत नाही, त्या रुढी, प्रथा बंद केल्या पाहिजेत. ज्या धर्मामध्ये अशा प्रथा आहेत, मग तो मुस्लीम धर्म असो, ख्रिश्चन धर्म असो किंवा तो हिंदू धर्म असो. ज्या धर्मात अशा चालीरिती आहेत, प्रथा आहेत, त्या प्रथा कायद्याने बंद केल्या पाहिजेत. असे केल्यास त्या धर्मावर आक्षेप नसून त्या धर्माचा सन्मान आहे असे मी समजतो. मग तो कुठलाही धर्म असो. संतांनी आपले विचार मांडले की, अनिष्ट प्रथा बंद झाल्या पाहिजेत, मग ते ज्ञानेश्वर असो किंवा इतर संत असो, ज्ञानेश्वर महाराजांचा उल्लेख आदरणीय श्री रावते साहेबांनी केला. ज्ञानेश्वर महाराजांनी काय सोसलं ? या जगाचा निरोप घेऊन त्यांना 21 व्या वर्षी समाधी घ्यावी लागली. सबंध कुटुंबांनी यातना सहन केल्या. त्यांचे तुम्ही नाव घेता. परंतु त्यांच्या पाठीमागे त्यांना ज्या यातना झाल्या त्याचा देखील उल्लेख झाला पाहिजे. छत्रपती शिवाजी महाराजांचा उल्लेख येथे सन्मानाने झाला. शिवाजी महाराजांचे नाव घेतल्यावर आमच्या अंगावर देखील शहारे येतात, अंगात ताकद येते. ज्या छत्रपती शिवाजी महाराजांनी बहिरजी नाईक मुसलमान झाले असताना त्यांना आपल्या धर्मामध्ये घेतलं, हिंदू धर्मामध्ये घेतलं. इतकेच नव्हे तर आपल्या पोटची पोरगी त्याच्या कुटुंबात दिली. हा सन्मान छत्रपती शिवाजी महाराजांनी घडवून आणला. शिवाजी महाराजांचे उद्दिष्ट आपल्या

...2.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री राम पंडागळे......

मंडळींनी जर आपल्या डोळयासमोर ठेवले असत आणि त्याप्रकारे आपला धर्म पुढे नेला असता तर आपल्या महाराष्ट्राचं जे चित्र आहे, जवळपास 20 कोटी मुस्लीम हिंदुस्थानात आहेत, हे घडलं नसतं, हे तुम्ही घडू दिले नाही. शिवाजी महाराजांना अभिप्रेत असलेला धर्म तुम्ही स्वीकारला नाही, त्यावेळच्या लोकांनी मान्य केला नाही. एकदा शिवाजी महाराज पक्तींला बसले होते. त्यावेळी काही धर्मांध मंडळी आली आणि असे म्हणाले की, या पक्तींमध्ये महार, मांग बसलेले आहेत, या पक्तींमध्ये आम्ही बसणार नाही. शिवाजी महाराजांनी सांगितले की, ही शूरा-वीरांची पंगत आहे. ज्यांना बसायचे आहे त्यांनी बसा. नाही तर उठून जा. होता जिवा म्हणून वाचला शिवा. पददलित, गोरगरीब जनता शिवाजी महाराजांच्या पाठीशी उभी राहिली म्हणून शिवाजी महाराज इतिहास घडवू शकले.

सभापती महोदय, एक जोगवा चित्रपट आला. जोगवा चित्रपटाला सगळे अवार्ड मिळाले. राजीव पाटील यांनी तो चित्रपट निर्माण केला आणि मुक्ता बर्वे यांनी नायिकेची भूमिका केली. आपण जर हा चित्रपट पाहिला नसेल तर पाहा. ती किती अनिष्ट प्रथा आहे ? ताई, तुमच्या अंगावर शहारे यायला पाहिजेत. किती अनिष्ट प्रथा आहे. डोक्यात काही तरी उगवलं म्हणून तिने देवदासी व्हायचं. पददलित, गरीब समाजाला धर्माच्या नावाखाली तुम्ही नागवलं. आपण त्या चित्रपटामध्ये बघा की, ते चित्र किती विदारक आहे. असे विदारक चित्र जर कोई नष्ट करु पाहात असेल तर त्याला आपण पाठिंबाच दिला पाहिजे, असे मला म्हणावयाचे आहे.

..यानंतर श्री भोगले

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राम पंडागळे.....

शैले शैले न माणिकम् मोतिकम् न गजे गजे

सज्जनम् न मिळती सर्वत्रम् चंदनम् न वने वने

आपल्याला अर्थ कळला नसेल म्हणून अर्थ सांगतो. प्रत्येक शिंपल्यामध्ये मोती असेलच असे नाही. प्रत्येक हत्तीच्या गंडस्थळावर मोती असेलच असे नाही. प्रत्येक चांगला दिसणारा माणूस हा सज्जन असेलच असे नाही आणि प्रत्येक वनामध्ये चंदन मिळेल असे नाही.

सभापती महोदय, माननीय मुख्यमंत्री, माननीय उप मुख्यमंत्री, माननीय संसदीय कार्यमंत्री आणि माननीय सामाजिक न्यायमंत्री यांच्यासारखे सज्जनं न मिळती सर्वत्रम्. त्यांनी हे जे बिल मांडले त्याबद्दल त्यांना महाराष्ट्राची जनता कधीही विसरणार नाही अशी खात्री देतो आणि या बिलाला समर्थपणे पाठिंबा देतो. समाजातील अंधश्रध्दा घालविण्यासाठी आपण देखील सहभागी व्हाल अशी अपेक्षा व्यक्त करुन माझे भाषण संपवितो. जय हिंद, जय भिम, जय महाराष्ट्र.

---------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.अनिल परब (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, महाराष्ट्र नरबळी, इतर अमानुष, अनिष्ट व अघोरी प्रथा व जादूटोणा यांना प्रतिबंध घालण्याबाबत व त्यांचे समूळ उच्चाटन करण्यासाठी मांडलेल्या विधेयकावर माझे विचार मांडण्यासाठी मी या ठिकाणी उभा आहे.

सभापती महोदय, गेले दोन दिवस या विधेयकावर सभागृहात चर्चा सुरु असून माननीय सदस्यांकडून अगदी विस्तृतपणे विचार मांडले जात आहेत. या विधेयकाचे वाचन केल्यानंतर त्यात असलेल्या त्रुटी सभागृहासमोर आणण्याचे काम सदस्य या नात्याने मला करावयाचे आहे. गेले दोन दिवस ज्या पध्दतीने या विधेयकावर चर्चा झाली ती लक्षात घेतली तर त्यात श्रध्दा व अंधश्रध्दा यामधील पुसटशी रेषा आहे तिची नेमकी व्याख्या करणे कठीण असल्यामुळे नंतर शासनाने या विधेयकाचे नाव बदलून नरबळी, अनिष्ट प्रथा असे झाल्याचे सांगितले गेले. तरी देखील झालेल्या चर्चेमध्ये अधिकाधिक श्रध्दा आणि अंधश्रध्दा यावर भाष्य केले गेले.

सभापती महोदय, माननीय सदस्य श्री.हेमंत टकले यांनी सांगितलेल्या उदाहरणांमध्ये गाडगे महाराजांचे एक उदाहरण दिले गेले. त्यांनी लोकांना विचारले, तूझा देव आंधोळ करतो का? जो देव स्वत: आंधोळ करु शकत नाही तो तुला काय स्नान घालणार, तुझे काय भले करणार? अशा प्रकारचे पुरोगामी महाराष्ट्राचे त्यांनी उदाहरण दिले. त्यांनी आमचे फार प्रबोधन केले. माननीय मुख्यमंत्री आषाढी एकादशीच्या दिवशी पंढरपूरला जातात आणि विठ्ठलाला आंघोळ घालतात, त्या विठ्ठलाचे कपडे बदलतात. उप मुख्यमंत्री कार्तिकी एकादशीला पंढरपूरला जाऊन विठ्ठलाची पूजा करतात. माननीय सदस्य श्री.हेमंत टकले यांनी आमचे जे प्रबोधन केले तसेच प्रबोधन मुख्यमंत्री आणि उप मुख्यमंत्री यांचे देखील करावे अशी मी त्यांना विनंती करतो.

सभापती महोदय, श्रध्दा आणि अंधश्रध्दा हा अतिशय नाजूक विषय आहे. त्याची व्याख्या कोणी करायची हे विधेयकामध्ये नमूद केले आहे. अनुसूची वाचली असता त्यातील प्रत्येक बाबीचा संदर्भ द्यायचा झाला तर किमान एक ते दीड तासाचा अवधी लागेल. आज इंडियन पिनल कोड अस्तित्वात असताना देखील हे विधेयक का आणले? या विधेयकाच्या 17 वर्षाच्या ऐतिहासिक प्रवासाबद्दल माननीय ज्येष्ठ सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी भाष्य केले आहे. माननीय सदस्य श्री.कपिल पाटील यांनीही या विधेयकाचा प्रवास कशाप्रकारे झाला हे सांगितले आहे.

नंतर 5डी.1....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.अनिल परब...

हा प्रवास होताना श्रद्धा-अधंश्रद्धा यावरच जास्त चर्चा झाली. आम्ही प्रबोधनकारांचा वारसा सांगणारे आहोत. त्यामुळे आमचा देखील अनिष्ट प्रथा, नरबळी व जादूटोण्याला विरोध आहे. हिंदू किंवा कुठल्याही धर्माच्या भावना या विधेयकाच्या आड येता कामा नयेत. या विधेयकाच्या माध्यमातून कोणाच्याही श्रद्धेवर घाला घालता कामा नये. कारण हा देश श्रद्धेवर चालणारा आहे. त्यामुळे यात जी तरतूद केली आहे ती अपूर्ण आहे असे मला वाटते. कारण यात कोणत्या प्रतिबंधात्मक उपाययोजना आहेत, कोणत्या कलमाने आपण प्रतिबंधात्मक कारवाई करणार आहात ? आपण म्हटले आहे की, हा कायदा मूळ कायद्याला पूरक आहे.

काल-परवा मी सांताक्रूझला एका भागामध्ये गेलो होतो. तेथे पेटते निखारे टाकले होते. त्या पेटत्या निखाऱ्यावरून लोकांना चालायला सांगत होते. लोकांबरोबर मी देखील स्वत: चाललो. मला कठलीही शारीरिक इजा झाली नाही. त्या माणसाला आपण कुठल्या कायद्याने अडविणार आहात ? जे लोक त्यावरून चालत गेले त्यांची तक्रार नाही मग आपण त्यांना कसे अडविणार आहात. मला कुठलीही शारीरिक इजा झाली नाही. त्याने पैसे देखील घेतलेले नाहीत. तेव्हा त्या भोंदू माणसाला या कायद्याने कशी काय अटक करणार आहात ते मला सांगावे. कलम 151, 155 खाली आपण काही ना काही प्रतिबंधात्मक कारवाई करतो. या कायद्याच्या तरतुदीनुसार त्या माणसाला कसा प्रतिबंध करणार आहात ते मला सांगावे. कारण हा पूरक कायदा आहे. एखाद्या माणसाचा बळी गेल्यानंतर आपला कायदा लागू होणार आहे. माणूस मेल्यानंतर कलम 302 देखील आहेच. या विधेयकामध्ये आपण 7 वर्षाची तरतूद केली आहे. ती कुठल्या कायद्याने केली आहे. कारण आपण रिड विथ असे म्हटले आहे. आपण डान्स बारच्या बिलामध्ये पळवाटा ठेवल्या होत्या हे माननीय विरोधी पक्षनेत्यांनी सांगितले आहे. तशा पळवाटा यापुढे या बिलामध्ये येण्याची शक्यता आहे. त्यामुळे हे बिल अपूर्ण आहे असे मला वाटते. आपण परिपूर्ण बिल आणले पाहिजे. आम्ही या बिलासंबंधी काही सुधारणा दिलेल्या आहेत. हा कायदा एखाद्याचा बळी गेला, त्रास झाला त्यानंतर लागू होणार आहे. त्यामुळे या कायद्याचा नंतर धाक दाखवून काहीच उपयोग होणार नाही. या कायद्याचा धाक दाखवायचा असेल तर एखादी गोष्ट होण्यापूर्वीच माणसाला उचलून आतमध्ये टाकला किंवा त्याच्यावर कडक



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.अनिल परब...

कारवाई झाली तरच आपले अघोरी कृत्याला प्रतिबंध करण्याचे स्वप्न पूर्ण होईल. अन्यथा केवळ तोंडाला चुना लावण्याचे काम करू नका. ज्या सूचना केल्या आहेत त्यात कोणती धार्मिक चर्चा झाली. हे विधेयक हिंदू धर्मावर प्रेरित आहे म्हणून त्यावर एवढी मोठी चर्चा झाली आहे. जो कोणी माणूस अशा प्रकारचे कृत्य करील त्या माणसाला सजा होणार आहे. त्यामध्ये मंत्र-तंत्र, गंडे-दोरे, इत्यादी हिंदू धर्माशी संबंधित असलेल्या गोष्टी दाखविल्या गेल्या आहेत. यात शारीरिक इजा असे म्हटले आहे. नाक-कान टोचले तर चालतील. केस काढले तर चालतील. परंतु, सुंता केलेली चालणार नाही. मी उद्या एखाद्याची सुंता केल्याची तक्रार केली तर त्यासंबंधी आपण काय करणार आहात ? हे बिल अपूर्ण नाही काय ? तेव्हा या गोष्टी कोण लक्षात घेणार आहे ? एका धर्मासंबंधी एक संस्था उभी राहते आणि दुसरी विरोध करते. त्याची कारणे देखील शोधली पाहिजेत. हे बिल सर्व धर्मांसाठी असले पाहिजे. एका धर्मासाठी असता कामा नये. या बिलाद्वारे कुठल्या एका धर्मावर घाला येणार नाही, संकट येणार नाही हे आपण पहावे. पी.आय.हा डेझिग्नेटेड ऑफिसर आहे. तो कुठल्या रंगाचा आहे, त्याची मानसिकता काय आहे, हे पाहिले पाहिजे. तोच उद्या भगताकडे जाऊन बसणार असेल तर या विधेयकाची अंमलबजावणी कोण करणार ? आपण डेझिग्नेटेड ऑफिसरचा दर्जा पी.आय.ला दिला आहे.

यानंतर श्री.जुन्नरे..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.अनिल परब ....

सभापती महोदय, या विधेयकामध्ये इन्व्हेस्टीगेशन ऑफिसरचा आणि डेसिगनेटेड ऑफिसरचा जो दर्जा दिलेला आहे तो पीआयचा दिलेला आहे. त्यामुळे यांचा किमान दर्जा डीआयजी लेव्हलच्या अधिकाऱ्याचा असला पाहिजे. ज्या अधिकाऱ्याला हे बरोबर आहे की, नाही हे कळते अशा अधिकाऱ्यांकडे ही जबाबदारी दिली गेली पाहिजे. या विधेयकामध्ये जो सेव्हींग क्लॉज आहे त्यामध्ये जी अनुसूची लावली आहे त्याचा निर्णय घेण्याचा अधिकार त्या अधिकाऱ्याला राहणार आहे. म्हणून अधिकारी सक्षम असला पाहिजे. त्या अधिकाऱ्याला चूक काय आणि बरोबर काय हे कळले पाहिजे. नाही तर गावभरच्या भानगडी आणि राजकारण या कायद्याच्या माध्यमातून संपवण्याचे किंवा उठवण्याचे काम होऊ शकते. सगळयात महत्वाचा विषय असा आहे की, लोकांवर ॲक्शन घेण्यापूर्वी त्यांचे प्रबोधन करणे गरजेचे आहे. आज काही विशिष्ट भाग आहेत की, ज्या ठिकाणी आपण कोणालाही पाठवा हे लोक त्यांचे ऐकणार नाही परंतु भगत,भोंदू यांचेच ऐकतात व ते लोक त्यांचे दुकान चालवतात. या लोकांचे दुकान बंद करण्यासाठी शासनाने काही योजना आणलेली आहे की नाही ? या लोकांना रोजगार द्या, त्यांच्यासाठी काही तरी योजना आणा. हे लोक जेव्हा सांगतील की, बाबा माझ्याकडून तुझे मूल बरे होणार नाही, तुझ्या मुलाला डॉक्टरकडे घेऊन जा, त्यावेळेला हे खऱ्या अर्थाने संपूर्ण बिल होऊ शकते. खरे म्हणजे हे अपूर्ण बिल आहे. या बिलाच्या संदर्भात अनेक कायदेशीर बाबीवर मी बोलणार होतो परंतु वेळेअभावी जास्त काही बोलत नाही. माझे म्हणणे आपण समजून घ्याल असे मानून या अपूर्ण बिलाला विरोध करुन मी माझे भाषण पूर्ण करतो.

------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** : मला असे वाटते की, या बिलावर सलग 10 तास चर्चा झालेली आहे. गेल्या दोन तीन दिवसापासून आपण चर्चा करीत आहोत. माझी सन्माननीय सदस्यांना विनंती आहे की, या बिलावर बरीच चर्चा झालेली असल्यामुळे आपण खाली बसावे. आता सन्माननीय मंत्री महोदय बिलाच्या उत्तराला सुरुवात करतील.

श्री. शिवाजीराव मोघे (सामाजिक न्याय मंत्री) : सभापती महोदय, हे विधेयक ऐतिहासिक असून हे विधेयक परिपूर्ण असतांनाही इतकी वर्षे ते येऊ शकले नाही हे आपले दुर्दैव आहे.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, या विधेयकावर बोलण्यासाठी सर्व सन्माननीय सदस्य अभ्यास करुन आले आहेत. आता केवळ 3-4 सन्माननीय सदस्य या विधेयकावर बोलावयाचे राहिले आहे. आपला आदर ठेवून अनेक सन्माननीय सदस्यांनी 5-5 मिनिटात आपले भाषण पूर्ण केले आहे. असे असतांनाही त्यांना बोलू दिले जात नाही हे योग्य नाही.

श्री. शिवाजीराव मोघे :सन्माननीय सभापती महोदय, या बिलावर या सभागृहात तसेच विधानसभेतही चांगली चर्चा झाली आहे. या विधेयकावर सन्माननीय सदस्य सर्वश्री रामदास कदम, भाई जगताप,दिवाकर रावते,विरोधी पक्ष नेते श्री. विनोदजी तावडे, श्री. हेमंत टकले,प्रा.सुरेश नवले, ॲड.जयदेव गायकवाड, श्री. कपिल पाटील, श्रीमती शोभाताई फडणवीस, डॉ.नीलम गोऱ्हे,श्रीमती विद्याताई चव्हाण, श्री. चंद्रकांत पाटील, श्री. राम पंडागळे अशा अनेक सन्माननीय सदस्यांनी या विधेयकावर आपले विचार व्यक्त केलेले आहेत.

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, आम्ही आपला रिप्लाय येथे ऐकत बसण्यापेक्षा शांतपणे लॉबीमध्ये जाऊन ऐकतो. आम्ही बहिष्कार करतो.

(विरोधी पक्षाचे सन्माननीय सदस्य सभा त्याग करतात.)

श्री. शिवाजीराव मोघे : सभापती महोदय, या चर्चेमध्ये अनेक सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला आहे. या बिलावर गेल्या 17 वर्षापासून चर्चा होत आहे. या विधेयकाच्या संदर्भात ज्या मंडळीचे सहभाग आहे त्यामध्ये दिवंगत श्रीमती मृणाल गोरे,प्रा.एन.डी.पाटील, महाराष्ट्र अंनिसचे अध्यक्ष कै.डॉ.नरेंद्र दाभोळकर,ऑल इंडिया अनिसचे अध्यक्ष प्रा.श्याम मानव, डॉ. श्रीराम लागू या मंडळीचा या विधेयकाच्या निमित्ताने खूप मोठा सहभाग लाभलेला आहे.

यानंतर श्री.अजित.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.शिवाजीराव मोघे...

डॉ.श्रीराम लागू यांच्या नावाचा देखील उल्लेख करावा लागेल. वारकरी सांप्रदायाचे माणुसकीचे धोरण आहे त्यांनी देखील खूप सहकार्य केले. न्या.चंद्रशेखर धर्माधिकारी, न्या.पी.सी.सावंत, सर्वोच्च न्यायालयाचे माजी न्यायमूर्ती, सन्माननीय सदस्य सर्वश्री.गणपतराव देशमुख, देवेंद्र फडणवीस, चंद्रकांत हंडोरे, भाई जगताप, डॉ.नीलम गोऱ्हे, सर्वश्री गिरीष बापट, कपिल पाटील, श्रीमती विद्या चव्हाण, सर्वश्री नरसय्या आडम, बाळा नांदगावकर,अशोक मोडक अशा आजी व माजी सन्माननीय सदस्यांनी या विधेयकासाठी खूप सहकार्य केले. विधी व न्याय विभागाच्या अधिकाऱ्यांनी देखील अतिशय चांगल्या प्रकारे काम केले.

सभापती महोदय, या विधेयकावर मागील तीन दिवसांपासून अतिशय चांगली चर्चा झाली. काही सन्माननीय सदस्यांनी या विधेयकावर बोलण्यासाठी जास्त वेळ घेतल्यामुळे काही सन्माननीय सदस्यांना भाषण करता आले नाही. या विधेयकावर अनेक सन्माननीय सदस्यांनी अभ्यास केला होता परंतु वेळेअभावी त्यांना भाषण करता आले नाही.

सभापती महोदय, शाहू-फुले-आंबेडकर आणि प्रबोधनकार ठाकरे यांनी जी भूमिका घेतली होती त्या भूमिकेच्या बाजूने हे विधेयक आहे त्या पलीकडे हे विधेयक नाही हे मी येथे सांगू इच्छितो.

सभापती महोदय, हे विधेयक संयुक्त समितीकडे गेल्यानंतर 1 लाख 17 हजार 816 सजेशन्स आल्या होत्या. त्यातील विधेयकाच्या बाजूने 78 हजार 871 होत्या तर 38 हजार 878 विधेयकाच्या विरोधात होत्या.

सभापती महोदय, हा कायदा कोणत्याही जाती धर्माच्या विरोधात नाही. हा कायदा वैधानिक दृष्टीकोनातून केलेला आहे. हा कायदा सर्वांना समान न्याय देणारा आहे. हा कायदा गुन्हेगारांच्या विरोधात केलेला आहे.

सभापती महोदय, आपण या विधेयकातून श्रध्दा, अंधश्रध्दा असे अनेक शब्द काढून टाकलेले आहेत. आपण आता नरबळी, आणि इतर अमानुष कृत्य, अनिष्ट व अघोरी प्रथा व जादूटोणा यांना प्रतिबंध इतके शब्द ठेवले आहेत आणि या गोष्टींच्या पलीकडे हा कायदा नाही.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.शिवाजीराव मोघे...

सभापती महोदय, एक कन्फ्युजन होते की, नरबळी झाला म्हणजे 302, फाशी द्यायला पाहिजे की जन्मठेप व्हावयाला पाहिजे. या कायद्यामध्ये सात वर्षाची लिमिट आहे. मग असे सांगण्यात आले की, आपण त्याला जन्मठेप न देता सात वर्षाची शिक्षा कशी देता ? मला वाटते ते त्यांचे अज्ञान आहे. जे काही स्पेशल कायदे आहेत ते सर्व कायदे इंडीयन पीनल कोडसोबत वाचले जातात आणि त्याप्रमाणे शिक्षा असते. ती मॅक्झीमम शिक्षा असते. कमीत कमी शिक्षेसाठी हा कायदा आहे.

सभापती महोदय, तंत्रमंत्र हे लोकांचे दु:ख दूर करण्यासाठी करतात. मी तंत्र मंत्रांचे औषध देतो म्हणून एखाद्याच्या घरासमोर कॉन्फरन्स झाली काय ? हे सर्व अंदाजे सांगितले जाते. त्याच्यावर लोक विश्वास ठेवतात. या कायद्यामध्ये तंत्रमंत्राला विरोध नाही. प्रार्थनेला विरोध नाही,सत्यनारायणाला विरोध नाही, कोणत्याही प्रवचनला विरोध नाही. जर कोणी लुबाडणूक करीत असेल, फसवणूक करीत असेल तर त्यांच्या बाबतीत हा कायदा लागू आहे.

सभापती महोदय, या विधेयकाचा फायदा कोणाला आहे असे जर मला कोणी विचारले तर मी सांगेन की, हा कायदा राज्यातीलच नव्हे तर देशातील महिलांना फायदेशीर आहे. आमच्या महिला भगिनींवर फार अन्याय झालेला आहे. घरातील पुरुष व्यक्ती आजारी पडली तर ती लगेच डॉक्टरकडे जाते. परंतु महिला लगेच डॉक्टरकडे जात नाही. गरीब माणसे, अज्ञानी माणसे मग शॉर्टकट पाहतात. ते तंत्रमंत्र करणाऱ्याकडे जातात. त्यांना वाटते तंत्रमंत्र करणाऱ्याने एक फुक्की मारल्यावर बरे होता येते. काहीजण बरे होतात. पण त्यावर विश्वास ठेवून अनेक लोकांचे जीव गेलेले आहेत. सांगण्याचे तात्पर्य असे की, हा कायदा जीव वाचविण्यासाठी करण्यात आलेला आहे.

यानंतर श्री.बोर्डे..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.शिवाजीराव मोघे....

महोदय, हा जादूटोणा प्रतिबंधक कायदा आहे. हा कायदा सर्वात जास्त महिलांवरील छळ थांबविणारा आहे. एवढेच नव्हे तर वाईट रुढींच्या वणव्यात सापडलेल्या मानव समूहाला मुक्त करण्यासाठी हा कायदा आहे. या विधेयकाचा ज्यांनी बारकाईने अभ्यास केला असेल त्यांच्या लक्षात आले असेल की, या विधेयकामध्ये 12 कृती अंतर्भूत करण्यात आल्या आहेत. त्या सुध्दा 'जर-तर' वर आधारित आहेत. या कायद्यान्वये भूत उतरविणे हा गुन्हा ठरणार नाही. परंतु भूत उतरवित असताना मारहाण करणे, मिरच्यांची धुरी देणे, चटके देणे, तोंडात मूत्र किंवा विष्ठा घालणे हा या कायद्यान्वये गुन्हा आहे. अशा प्रकारची कृती करणाऱ्यांवर कारवाई करण्यासाठी हा कायदा आहे. मंत्र केले, पूजा केली, प्रार्थना केली, गंडे बांधले, ताईत बांधले, दोरा बांधला तर तो गुन्हा ठरणार नाही.

महोदय, या ठिकाणी विधेयकातील 'दिवंगत' शब्दावर हरकत घेण्यात आली. या निमित्ताने मी सांगू इच्छितो की, कोणत्याही चमत्काराला हा कायदा लागू होत नाही. परंतु चमत्कारामुळे कोणाचा जीव जात असेल किंवा लुबाडणूक होत असेल तर त्या चमत्काराला हा कायदा विरोध करणार आहे.

महोदय, जैन धर्मातील केस लोचन ही प्रथा विधेयकाच्या तरतुदीतून विथ्ड्रॉ केली आहे. या ठिकाणी मी नरबळी बाबत भरपूर सांगितले आहे. या विधेयकात 'अतिंद्रिय शक्ती' हा एक शब्द आहे. अतिंद्रिय शक्तीबाबत अनेक सन्माननीय सदस्यांनी भाषणे केली. काहींनी सांगितले की, सरकारने हे सर्व काही गुपचूप केले आहे. मी त्यांना सांगू इच्छितो की, असा शब्द टाकून राज्य सरकारने काहीही गुपचूप केलेले नाही. देवी अंगात येणे किंवा मी देवाचा अवतार आहे असे सांगणे हा या कायद्यान्वये गुन्हा ठरणार नाही. परंतु देवी अंगात आल्यानंतर अमुक माणसाने करणी केल्याचे सांगून त्याला लोकांनी बदडणे, मारुन टाकणे हा मात्र गुन्हा ठरणार आहे. मी पुन्हा एकदा सांगतो की, देवी अंगात येणे हा गुन्हा ठरणार नाही. पण दुसऱ्याच्या जीवावर उतरेल अशा गोष्टी करणे हा गुन्हा ठरणार आहे. स्वत:मध्ये अतिंद्रिय शक्ती आहे असे सांगून इतरांना फसविणे, ठगविणे हा मात्र गुन्हा ठरणार आहे. एखाद्याची धिंड काढणे, एखाद्यावर बहिष्कार टाकणे

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.शिवाजीराव मोघे....

हा सुध्दा या कायद्यान्वये गुन्हा ठरणार आहे. आयपीसीमध्ये सुध्दा तो गुन्हा ठरविण्यात आलेला आहे. मंत्राच्या साहाय्याने दुसऱ्यांना धमकी देणे, मूठ मारुन अपंग करणे, ताबडतोब मारुन टाकीन, तुझ्या मुलाला मारुन टाकीन अशी धमकी देणे हा सुध्दा या कायद्यान्वये गुन्हा ठरणार आहे.

महोदय, आजही आपल्याकडे एखाद्या व्यक्तीला साप चावल्यानंतर त्याला उपचारासाठी दवाखान्यात जाण्यास सांगण्याऐवजी मंदिरात जाण्यास सांगितले जाते. विरोधी पक्षाच्या सदस्यांनी सांगितले की, दवाखान्यामध्ये सर्पदंशावरील औषधे, इंजेक्शन्स उपलब्ध नाहीत. परंतु यात तथ्य नाही. महोदय, साप चावल्यानंतर त्याचे विष उतरविण्यासाठी अघोरी उपाय करण्यावर या विधेयकान्वये प्रतिबंध करण्यात आला आहे. साप चावल्यानंतर ती व्यक्ती उपचारासाठी दवाखान्यात जावी, हाच त्यामागील उद्देश आहे. अशा प्रकारे इतरही अनेक गुन्ह्याचा या विधेयकात समावेश आहे. परंतु वेळे अभावी मी त्यांचा उल्लेख करणार नाही.

महोदय, खंड 12 मध्ये एक कलम नव्याने अंतर्भूत केले आहे. मठ, आश्रम, सुंता असे शब्द विधेयकात अंतर्भूत करायचे चुकून राहिले असेल तर ते शब्द टाकण्याचा अधिकार या कलमान्वये शासनाला देण्यात आला आहे. कालांतराने असे शब्द जसे जसे शासनाच्या निदर्शनास येतील तसे तसे ते विधेयकामध्ये अंतर्भूत करण्याचा शासनाला अधिकार आहे.

नंतर श्री.कांबळे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. शिवाजीराव मोघे ....

एखादी व्यक्ती मानसिक विकलांग असेल तर लोक त्याला देव मानून, देव धर्माच्या नावाने पैसे लुबाडण्याचे काम करतात. हा गुन्हा आहे. आपण या सर्व गोष्टींचा अंतर्भाव विधेयकात केला आहे. असे गुन्हे का होतात, हे देखील आपण समजणे गरजेचे आहे. एखाद्याच्या अंगात आले की, तो तंत्र-मंत्र करतो. त्याच्याकडे जाणाऱ्या माणसाच्या डोळ्यांत लिंबू टाकल्याने तो आंधळा झाला तरी तक्रार करीत नाही. आपण हे गुन्हे सुध्दा यामध्ये अंतर्भूत केले आहेत. मानव समाजाला कमी वेळात न्याय द्यायचा असेल तर चळवळ होणे आवश्यक आहे. नुसता कायदा करून चालणार नाही. सर्वांनी त्या दृष्टीने सहकार्य करावे आणि हे विधेयक एकमताने संमत करावे, अशी माझी विनंती आहे. या विधेयकाच्या संदर्भात आघाडी शासनाचा उद्देश शुध्द आहे.

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील : सभापती महेदय, मला एक मुद्दा सातत्याने भेडसावत आहे. देवदेवतांचे फोटो लावण्यात येऊन धार्मिक भावनेने लोक तेथे उदबत्त्या लावतात. त्यामुळे तो त्यामधील एक प्रकार होऊ नये, अशी सन्माननीय सदस्यांनी भीती व्यक्त केली आहे. विधेयकात त्या संदर्भात काळजी घेण्याची आवश्यकता आहे.

श्री. शिवाजीराव मोघे : सभापती महोदय, विधेयकात धार्मिक सर्व गोष्टी एक्सक्लूड केल्या आहेत. आपण अगरबत्ती जास्त लावू नका. आघाडी शासनाचा विधेयकाचा हेतू शुध्द आहे.

श्री. कपिल पाटील : सभापती महोदय, विधेयक मंत्रिमंडळात मंजूर झाल्यानंतर माननीय मंत्र्यांनी सभागृहात उभे राहून सूचना करणे आणि संभ्रम निर्माण करणे, हे बरोबर होणार नाही. माननीय मंत्र्यांनी त्यांची सूचना मागे घ्यावी नाही तर समाजामध्ये वाईट मेसेज जाईल.

श्री. राम पंडागळे : सभापती महोदय, माननीय मंत्री सन्माननीय सदस्यांचे म्हणणे सांगत आहेत.

श्री. कपिल पाटील : सभापती महोदय, मला ते समजले. पण माननीय मंत्र्यांनी असे सांगू नये.

श्री. शिवाजीराव मोघे : सभापती महोदय, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे वाक्य आणि तुकारामांचा अभंग सांगून मी माझे भाषण संपवितो. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी एका सभेत त्यांच्या भाषणात असे सांगितले होते की, "माणसाला जगण्यासाठी दोन गोष्टींची आवश्यकता

..2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. शिवाजीराव मोघे ....

असते. पहिली गोष्ट म्हणजे भाकर आणि दुसरी गोष्ट म्हणजे श्रध्दा. भाकर माणसाला जगविते आणि श्रध्दा माणसाला कसे जगले पाहिजे यासाठी मार्ग दाखविते; परंतु ही श्रध्दा डोळस असली पाहिजे, ती अंध असता कामा नये." तुकाराम महाराजांनी त्यांच्या अभंगात असे म्हटले आहे की, "शुध्द बीजापोटी फळे रसाळ गोमटी". या कायद्याला चांगली फळे येतील, याबाबत माझ्या मनात शंका नाही. सर्वांनी हे विधेयक मान्य करावे, अशी मी विनंती करतो.

**सभापती** : सन्माननीय सदस्य श्री. रामदास कदम सभागृहात उपस्थित नसल्यामुळे आता मी विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्यासंबंणीचा प्रस्ताव मतास टाकतो.

प्रस्ताव मतास टाकून असंमत झाला.

**सभापती** : आता मी विधेयक विचारात घेण्यांसबंधीचा प्रश्न मतास टाकतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

( नंतर श्री. खंदारे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** : विधेयक विचारात घेण्यात आले आहे. आता विधेयक खंडश: विचारात घेण्यात येईल.

खंड 2, विधेयकाचा भाग झाला.

**सभापती** : खंड 3 ला सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी सुधारणा सुचविलेली आहे. तथापि, ते सभागृहामध्ये उपस्थित नाहीत.

खंड 3 व 4 विधेयकाचा भाग झाला.

**<u>खंड-5, दक्षता अधिकारी</u>**

**सभापती** : खंड 5 ला सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील यांनी सुधारणा सुचविलेली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री.कपिल पाटील (मुंबई विभाग शिक्षक) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील सुधारणा मांडतो.

"खंड 5
पृष्ठ क्रमांक 3 -
ओळ क्रमांक 35 "अशा कृत्यास बळी पडलेल्या कोणाही
व्यक्तीने अथवा तिच्या कुटुंबातील कोणत्याही सदस्याने"
या मजकुरानंतर "अथवा अन्य कोणत्याही व्यक्तीने अथवा
अन्य संबंधित अधिकाऱ्याने" हा मजकूर दाखल करण्यात यावा."

सभापती महोदय, मंत्री महोदयांच्या उत्तरामुळे मी समाधानी आहे. परंतु मी मघाशी माझ्या भाषणाच्या वेळी असे सांगितले होते की, अशा घटनांमध्ये कुटुंबच सामील असते. नाशिकमध्ये घडलेली घटना जर शेजाऱ्यांनी पाहिली नसती तर त्या मुलाचा नरबळी गेला असता. त्या शेजाऱ्याने त्यांना रोखले अन्यथा स्वत:च्या कुटुंबीयांनी आपल्या सख्या मुलाचा नरबळी दिला असता. हे विधेयक आज मंजूर झाले पाहिजे अशी माझी भावना आहे. नजीकच्या काळामध्ये मी सुचविल्याप्रमाणे या विधेयकात दुरुस्ती करण्यात येईल असे मंत्री महोदयांनी मला आश्वासन द्यावे.

सुधारणा प्रस्तुत झाली.

श्री.शिवाजीराव मोघे : सभापती महोदय, मूळ विधेयकामध्ये तिसऱ्या व्यक्तीचा समावेश होता. परंतु असे कोणीही करु शकले असते. या संदर्भात सांगोपांग चर्चा झालेली आहे. त्यामुळे



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ D/ KTG/

श्री.शिवाजीराव मोघे....

सध्या कुटुंबीयांपुरती ही तरतूद केलेली आहे. पुढील काळामध्ये सन्माननीय सदस्यांनी सुचविलेल्या सुधारणेबाबत विचार करण्यात येईल. सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील यांनी आपली सुधारणा मागे घ्यावी अशी मी त्यांना विनंती करतो.

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, मी सुचविलेल्या दुरुस्तीसाठी मंत्री महोदय 17 वर्षे वाट पहावयास लावणार नाहीत असा मी विश्वास व्यक्त करतो. सभापती महोदय, मी माझी सुधारणा सभागृहाच्या अनुमतीने परत घेऊ इच्छितो.

सुधारणा सभागृहाच्या अनुमतीने परत घेण्यात आली.

खंड 5 विधेयकाचा भाग झाला.

खंड 6 ते 11 (दोन्ही सम्मिलित) विधेयकाचे भाग झाले.

<u>**खंड-12, व्यावृत्ती**</u>

**सभापती** : खंड 12 ला सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील यांनी सुधारणा सुचविलेली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री.कपिल पाटील (मुंबई विभाग शिक्षक) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील सुधारणा मांडतो.

"खंड- 12, पृष्ठ क्रमांक 5

ओळ क्रमांक 31 मध्ये "अशा ठिकाणी व्यक्तींकडून"
या मजकुरानंतर "किंवा गुरव, मुजावर, गद्दीनशेन,
फादर, पुरोहित यांच्याकडून" हा मजकूर दाखल
करण्यात यावा."

सभापती महोदय, मी यासाठी आग्रह धरला होता की, या विधेयकयातून परंपरेने येणाऱ्या अनेक गोष्टींना वगळण्यात आलेले आहे. मी सुचविलेले लोक चमत्कार करणारे किंवा बुवाबाजी करणारे नाहीत, परंपरेने श्रध्दा जपणारे आहेत. या लोकांना संरक्षण मिळावे. कलम 12, पोट कलम 8 नुसार या संदर्भात शासनाला दुरुस्ती करता येईल. भविष्यात तशी दुरुस्ती करण्यात येईल अशा प्रकारचे मंत्री महोदयांनी ठाम आश्वासन द्यावे.

सुधारणा प्रस्तुत झाली.

नंतर श्री.शिगम...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. शिवाजीराव मोघे : सन्माननीय सदस्यांनी सुचविलेल्या सुधारणेचा अवश्य विचार करण्यात येईल. तरी आता सन्माननीय सदस्यांनी त्यांची सुधारणा मागे घ्यावी अशी माझी त्यांना विनंती आहे.

श्री. कपिल पाटील : सभापती महोदय, मी माझी सुधारणा सभागृहाच्या अनुमतीने परत घेऊ इच्छितो.

सुधारणा सभागृहाच्या अनुमतीने परत घेण्यात आली.

**सभापती** : खंड 12 ला सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी सुधारणा सुचविलेली आहे. त्यांनी ती मांडावी.

(सन्माननीय सदस्य अनुपस्थित)

खंड 12 विधेयकाचा भाग झाला.

खंड 13 विधेयकाचा भाग झाला.

खंड 1, संपूर्ण शीर्षक व हेतुवाक्य विधेयकाचे भाग झाले.

श्री. शिवाजीराव मोघे : सभापती महोदय, सन 2013 चे वि.स.वि.क्र. 35 संमत करण्यात यावे असा मी आपल्या अनुमतीने प्रस्ताव मांडतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**सभापती** : सन 2013चे वि.स.वि. क्रमांक 35 संमत झाले आहे.

---

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : सहकारी संस्था (दुसरी सुधारणा) विधेयक.

**मु. शी.** :

**L.A. BILL NO. XLIII OF 2013**

**( A BILL FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA CO-OPERATIVE SOCIETIES ACT, 1960.)**

श्री. हर्षवर्धन पाटील (सहकार मंत्री ) : सभापती महोदय, विधानसभेने संमत केल्याप्रमाणे, मी आपल्या अनुमतीने सन 2013 चे वि. स. वि. क्रमांक 43 महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, 1960 यात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक मांडतो.

**सभापती** : विधेयक मांडण्यात आले आहे.

श्री. हर्षवर्धन पाटील : महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2013 चे वि. स. वि. क्रमांक 43, महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, 1960 यात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक विचारात घेण्यात यावे असा प्रस्ताव मांडतो.

सभापती महोदय, महाराष्ट्रातील सहकारी संस्थांच्या निवडणुका घेण्याकरिता 31 डिसेंबर 2013 पर्यंत मुदत होती. या मुदतीमध्ये निवडणुका घेणे शक्य होत नसल्यामुळे ही मुदत 31.12.2014 पर्यंत वाढविण्यासाठी हे विधेयक आणलेले आहे.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**सभापती** : विधेयक विचारात घेण्यात आले आहे. आता विधेयक खंडशः विचारात घेण्यात येईल.

खंड 2 ते 9 (दोन्ही सम्मिलित) विधेयकाचे भाग झाले.

खंड 1, संपूर्ण शीर्षक व हेतुवाक्य विधेयकाचे भाग झाले.

श्री. हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2013चे वि.स.वि. क्रमांक 43 संमत करण्यात यावे, असा प्रस्ताव मांडतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**सभापती** : सन 2013चे वि.स.वि. क्रमांक 43 संमत झाले आहे.

--

...नंतर श्री. गिते....

अमुद्रित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.** : जमीन सुधारणा परियोजना (सुधारणा) विधेयक

L. C. BILL NO.IX OF 2013 (A BILL FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA LAND IMPROVEMENT SCHEMES ACT.) AND MOTION FOR REFERRING THE BILL TO THE JOINT COMMITTEE

श्री.हर्षवर्धन पाटील (सहकार मंत्री ): सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2013 चे वि.प.वि. क्रमांक 9-महाराष्ट्र जमीन सुधारणा परियोजना अधिनियम यात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक विचारात घेण्यात यावे, असा प्रस्ताव मांडतो.

प्रश्न प्रस्तुत झाला.

**सभापती** : विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबतचा प्रस्ताव सन्माननीय सदस्या श्रीमती शोभा फडणवीस यांनी दिलेला आहे. पण त्या सभागृहात उपस्थित नसल्यामुळे मी विधेयक विचारात घेण्यासंबंधीचा प्रश्न मतास टाकतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**सभापती** : विधेयक विचारात घेण्यात आले आहे. आता विधेयक खंडश: विचारात घेण्यात येईल.

खंड 2 ते 9 (दोन्ही सम्मिलित) विधेयकाचे भाग झाले.

खंड 1, संपूर्ण शीर्षक व हेतुवाक्य विधेयकाचे भाग झाले.

श्री.हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, सन 2013 चे वि.प.वि.क्रमांक 9 संमत करण्यात यावे, असा मी आपल्या अनुमतीने प्रस्ताव मांडतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**सभापती** : सन 2013 चे वि.प.वि.क्रमांक 9 संमत झाले आहे.

-------

यानंतर श्री. भोगले....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** : सभागृहाची बैठक आता स्थगित होत आहे. गुरुवार, दिनांक 19 डिसेंबर, 2013 रोजी सकाळी 10.00 वाजता सभागृहाची विशेष बैठक भरेल. या बैठकीत सकाळी 10.00 ते 11.55 या वेळेत म.वि.प.नियम 260 अन्वये सर्वश्री विक्रम काळे, वि.प.स. व इतर यांच्या प्रस्तावावरील चर्चा व उत्तर होईल. सभागृहाची नियमित बैठक दुपारी 12.00 वाजता सुरु होईल.

(सभागृहाची बैठक रात्री 09 वाजून 51 मिनिटांनी, गुरुवार, दिनांक 19 डिसेंबर, 2013 च्या सकाळी 10.00 वाजेपर्यंत स्थगित झाली)

---------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही